# कविचरित्र.

ह्मणजे

## हिंदुस्थानांतील प्राचीन व अर्वाचीन कवि आणि ग्रंथकार यांचा इतिहास.

अनेक संस्कृत, प्राकृत, व इंग्रेजी ग्रंथ यांच्या आधारानें

जनार्दन रामचंद्रजी

यांनीं

मराठी भाषेंत रचिला.

मुंबईः

गणपतकृष्णाजी यांचे छापखान्यांत छापिलें.

सन् १८६०.

शके १७८२.

To

DR. BHAWOO DAJEE, G. G. M. C.

FELLOW OF THE BOMBAY UNIVERSITY, MEMBER OF THE BOMBAY BRANCH OF THE ROYAL ASIATIC SOCIETY, BOMBAY GEOGRAPHICAL SOCIETY,

& & &

This Work is Dedicated,

WITH FEELINGS OF HIGH ADMIRATION AND ESTEEM OF HIS DISINTERESTED BENEVOLENCE, PHILANTHROPIC ZEAL IN PROMOTING THE CAUSE OF NATIVE EDUCATION, AND ENLIGHTENED PUBLIC SPIRIT,

BY

THE AUTHOR.

# डाक्तर भाऊ दाजी,

ग्रांटमेडिकल कालेजाचे ग्राज्यूएट, बांबे युनिवर्सिटीचे
फेलो, रायल एशिआटिक सोसैटीचे मुंबईतील शाखेचे
व मुंबईतील जाग्रफिकल सोसैटीचे सभासद, इत्यादि.

यांस,

ज्यांची निरपेक्ष परोपकारबुद्धि, एत्तद्देशीय लोकांत विद्यावृद्धि करण्याची उत्कंठा, आणि सुप्रकाशित व लोकहितेच्छा पुरस्सर औदार्य आणि गांभीर्य हीं पाहून साश्चर्यप्रीतिपूर्वक मनोभावानें

हा ग्रंथ

कर्त्यानें नजर केला असे.

# प्रस्तावना.

बहुश्रुतपणा हा सर्व मनुष्यमात्राला अवश्य पाहिजे. विद्वान् असो किंवा अविद्वान् असो, त्याला बहुतश्रुतपणापासून फार उपयोग आहे. अभ्यासानें संपादन केलेल्या विद्या बहुश्रुतपणानें शोभेस येतात. देश-कालपरत्वेंकरून लोकांची स्थिति कशी पालटत आहे याचें अनुक्रम-पूर्वक ज्ञान असणें हा बहुश्रुतपणाचा पाया आहे. तर अशा प्रकारचा बहुश्रुतपणा प्राप्त होण्याला कांहीं तरी साधन उपस्थित करून ठेविलें पाहिजे. आपण कोणत्या खंडांत व कोणत्या ठिकाणीं आहों, आपले पूर्वज कोण होते, व जुन्या काळामध्यें कोण कोण प्रख्यात पुरुष होऊन गेले, याची माहितगारी अगत्य असली पाहिजे. हल्लींपेक्षां पुरातन काळांतील लोकांमध्यें बळ, पराक्रम, विद्या, निष्ठा, इत्यादि गुण विशेष होते, असें सर्व कबूल करितात परंतु त्या गोष्टी सप्रमाण जाणायाला साधन असल्यावांचून कांहीं उपयोग नाहीं. याकरितां लोकबुद्धीच्या शिक्षणासाठीं सहाय्यभूत हा ग्रंथ केला आहे.

पुरातन काळापासून या हिंदुस्थानांत ठिकाणोठिकाणीं महा बुद्धिमान् शास्त्रग्रंथाचे कर्त्ते व कवी स्मृतिकारांपासून शंकराचार्यापर्यंत पुष्कळ होऊन गेले. परंतु ते कोणत्या काळांत जन्मले, कोणत्या ठिकाणीं राहत होते, व त्यांच्या नांदणुकी कोठे व कशा झाल्या, त्यांनीं शास्त्र रचण्याच्या विद्या कोणापासून मिळविल्या, अणखी त्यांनीं लोकोपयोगीं कार्यें कोण कोणतीं केलीं, या विषयीं त्यांच्या इत्थंभूत गोष्टी ऐकाव्या असें जर हल्लीं आपणाला वाटलें, तर त्या कळण्याजोगतें साधन ईषन्मात्रही कोणाजवळ नाहीं. कारण कीं, त्यांचा वृत्तांत स्वतां त्यानीं लिहून ठेविला नाहीं किंवा दुसऱ्यांनीं लिहावा तोही लिहिला नाहीं. हल्लींचे विद्वान् असी खातरी बाळगितात कीं, शास्त्रकर्त्ते अथवा काव्यकर्त्ते जे कोणी व्हावयाचे ते पूर्वीं होऊन गेले, वर्तमान काळांत त्यांच्या योग्यतेचा कोणी होईल हा संभवही नाहीं.

पाणिनी ऋषीनें व्याकरण रचिलें, त्यावेळची गोष्ट भाष्यग्रंथांत असी सांगितली आहे कीं, त्या ऋषीला व्याकरणाचीं मूळसूत्रें चवदा

प्राप्त झालीं. तेवढ्या आधारावरून त्यानें शास्त्र रचण्याची कल्पना काढिली आणि ब्रह्मयज्ञाच्या वेळीं स्वस्थ अंतःकरणानें आपल्या आसनावर पूर्वाभिमुख बसून सर्व शास्त्र संहितारूपानें एकदम पढून गेला. त्यांत वैदिक शब्द आणि स्मृतिपुराणादि यावत् गीर्वाण भाषा या दोहींचा ही समावेश होईल असे नियम बांधिले. त्यांत एकही शब्द निरर्थक किंवा चुकून पडला असें घडलें नाहीं. तसेच न्याय, मीमांसा, वेदांत, ज्योतिष, इत्यादि शास्त्रांचीं सूत्रें ज्यानीं रचिलीं तेही पुरुष अगाध बुद्धीचे होते.

याप्रमाणें चरक सुश्रुतादि वैद्यक शास्त्राचे संहिताकार ज्यांनीं लोकांच्या आरोग्यासाठीं स्थावरजंगमात्मक अनेक पदार्थांचें वस्तुस्वाभाव्य बिनचूक वर्णिलें आणि निदान, चिकित्सा, शारीरक हीं मोठालीं प्रकरणें व्यवस्थापूर्वक सांगोपांग निरूपिलीं. तर अशा पुरुषांच्या जन्मवृत्तांतांत आमच्या मनाला बोधक आणि आल्हादकारक असीं बहुत कलमें सांपडण्याचा संभव आहे.

पुरातन काळचे ग्रंथ पाहून आह्मी केवळ तर्क मात्र करितों कीं, त्यांचे कर्ते महा ज्ञानी, तपःसंपन्न, बुद्धिवैभवी, असे समर्थपुरुष असावे आणि त्यांच्या नांदणुकींत त्यांजकडून लोकोपकाराच्या व चमत्काराच्या गोष्टी बहुत घडल्या असतील. परंतु सांप्रत त्या लोकांचीं नांवें मात्र ग्रंथांच्या आरंभीं किंवा समाप्तीस सांपडतात, त्याखेरीज त्यांचे सविस्तर वृत्त कोठेंच उपलब्ध नाहीं. फार जुन्या काळचे वशिष्ठादि स्मृतिकार व व्यास वाल्मिकादि महा कवी यांच्या कांहीं गोष्टी इतिहासांत आणि पुराणांत क्वचित् आढळतात. परंतु त्यानीं केलेले ग्रंथ जसे त्यांच्या अचाट ज्ञानाविषयीं साक्ष देत आहेत, तसे त्यांच्या जन्मवृत्ताविषयीं ते कांहीं बोलत नाहींत.

खंडांतरीच्या लोकांनीं जुन्या काळांतील सर्व प्रकारच्या प्रसिद्ध पुरुषांचें, त्यांत विशेषेंकरून कवींचे चरित्रग्रंथ इतके रचिले आहेत कीं, नुस्ते त्यांच्या नामावळीचेच शतावधि कोश झाले आहेत.

शंकराचार्यापासून अर्वाचीन काळांत जे कित्येक ग्रंथकार व कवी होऊन गेले त्यांचें वृत्त जितकें आह्माला सांपडेल तितकें एकत्र जमवून ल्याहावें असें आह्मी बहुत दिवसांपूर्वीं मनांत उद्देशिलें होतें, शाळेमध्यें विद्यार्थीमंडळांत वृद्धपरंपरागत श्रीहर्ष, भवभूति, कालिदास,

इत्यादि कवींच्या कांहीं कांहीं गोष्टी आह्मी ऐकूं, त्यावेळेस त्या लिहून संग्रहीं ठेवाव्या असें मनांत येई परंतु कांहीं विद्याव्यासंगामुळें त्या लिहून ठेवणें घडलें नाहीं.

कांहीं काळामागें पूर्वदिशेकडील विद्येच्या विषयांवर मोठे परिश्रम व शोध करून संस्कृत जाणणारे इंग्लिश विद्वान् सर उलियम ज्योन्स, प्रोफेसर विलसन, उलियम वार्ड, मिस्तर मुलर, डाक्तर टेलर, आदिकरून साहेबांचे ग्रंथावलोकन करीत असतां त्यांत त्यांनीं एतद्देशीय कवींच्या व ग्रंथकारांच्या कित्येक विशेष गोष्टी लिहिल्या आणि त्या कांहीं प्रकारें दंतकथेस मिळत असून ग्रंथकर्त्यांनीं त्यांची शकसंवत्सरांची मिळवणी केली, असें पहाण्यांत आलें. त्या वेळेस अशा प्रकारचा ग्रंथ रचावा ह्मणून मला इच्छा उत्पन्न झाली. मग त्यात्या कवींच्या व ग्रंथकारांच्या गोष्टी जशा मिळत गेल्या तसे त्यांचें वेंचे घेतले. त्या सर्व गोष्टी एथें लिहिल्या नाहींत परंतु त्यांतून सत्य कोणतें व मिथ्या कोणतें आहे, यांचा विचार करून त्याचा सारसंग्रह केला आहे.

सन्न १८४७ या सालांत कावेल्ली वेंकट रामस्वामी यानें इंग्लिश भाषेंत कवीवर्णनपर एक पुस्तक लिहिलें, त्यांत कित्येक संस्कृत, तेलंगी, तामिळ, आणि प्राकृत, ह्या चार्‍ही भाषांतल्या प्रख्यात कवींचें चरित्र लिहिलें आहे. त्यांतून जितक्या गणनीय गोष्टी आह्माला सांपडल्या ह्मणजे त्यांचे शक, संवत्सर, नांदणुकी, त्यांनीं केलेले ग्रंथ, त्यांचे राजाश्रय व त्यांनीं केलेले लोकविख्यात चमत्कार हीं त्या ग्रंथांतून शब्दशः उतरून घेतलीं आहेत. तसेंच ह्या ग्रंथाच्या सामुग्रीसिद्धिविषयीं एशियाटिक रीसर्चीस ह्मणजे एशिया खंडांतील शोध या नांवाचीं पूर्वीं कलकत्यांत निघणारीं पुस्तकें यांतून ज्याज्या विशेष गोष्टी सप्रमाण दिसल्या त्यांचा यांत संग्रह केला आहे.

कांहीं प्राकृत कवींचें वर्णन करितांना कित्येकांच्या शकसंवत्सरांचा व कांहीं एकांच्या मूळ गोष्टींचा आह्माला मुळींच शोध नव्हता, तो नवनीत ग्रंथावरून घेतला आहे. त्याविषयीं आह्मी स्वतंत्र शोध केला नाहीं. परंतु त्यांत त्यांच्या विशेष गोष्टी व त्यांनीं केलेले जगविख्यात चमत्कार जे त्यांत लिहिले नव्हते, ते आह्मी भक्तिविजय, भक्तलीलामृत व संतलीलामृत ह्या ग्रंथांतून घेऊन पूर्ण केलें.

हा ग्रंथ एवढ्याच लिहिण्यानें पूर्ण झाला असें नाहीं. परंतु ग्रंथप्रमाण

जेवढें आह्मी योजिलें होतें तेवढ्याची भरती इतक्याच गोष्टींनीं झाली. अजूनेही अर्वाचीन काळांतले कित्येक प्रख्यात विद्वानांच्या गोष्टी लिहायाच्या तशाच राहिल्या आहेत. याखेरीज प्राचीन काळांतले देखील कवी व ग्रंथकार यांच्या विशेष गोष्टी जैन लोकांच्या निबंधादि ग्रंथांत अढळण्यांत येतात. तरी ग्रंथांच्या पूर्णतेकडे कांहीं लक्ष नदेतां जितक्या गोष्टींची मिळवामिळव करण्याविषयीं व त्यांचे शकसंवत्सर ठरविण्याविषयीं पुष्कळ काळवेळ मोडून जेवढा आह्मी संग्रह केला तितका प्रस्तुत आह्मी आमच्या वांचणारांस सादर केला आहे.

अणखी आह्मी वांचणारांस असी सूचना करितों कीं, ह्या ग्रंथांत त्यांस कोठे न्यूनाधिकभाव दिसला तर तो त्यानीं आह्माला कळवावा: तसेंच शोधक विद्वानांस यांतील विषयांची विशेष माहितगारी असली तर तीही त्यानीं आह्मास सांगावी. याविषयीं एक उदाहरण सांगतों. बाणकवि हा एक उत्कृष्ट कवि, ज्याविषयीं असी ह्मण आहे कीं, **बाणोच्छिष्टंजगत्सर्वं.** पण तो कोठे होता, त्याची नांदणूक कसी होती, व त्याला कसकसे प्रसंग घडले, याविषयींची माहितगारी कोणालाच नाहीं.

ह्या ग्रंथांत कवींचा व ग्रंथकारांचा कालानुक्रम प्रिन्सेपकृत कोष्टकाच्या आधारानें लाविला आहे.

हा ग्रंथ पहायाला व ध्यानांत ठेवायाला सुलभ पडावें ह्मणून याच्या शेवटीं ग्रंथकार व ग्रंथ यांच्या आकारादि वर्णक्रमानें दोन अनुक्रमणिका जोडल्या आहेत. त्यांवरून कोणताही ग्रंथकार व ग्रंथ किती ठिकाणीं आला आहे व तो कोणत्या पृष्ठावर सांपडेल हें लक्षांत येईल.

ह्या ग्रंथांतील गोष्टींचीं व्यवस्थापूर्वक रचना करण्यांत **गोविंद अनंत शास्त्री लेले त्र्यंबकर** यांचे साह्य घेतलें आहे.

# अनुक्रमणिका.

## संस्कृत कवि.


| | पृष्ठ. |
|---|---|
| शंकराचार्य | १ |
| जयदेवस्वामी | ३० |
| कालिदास | ३२ |
| अमरसिंह | ३४ |
| वररुचि किंवा कात्यायन | ३५ |
| भर्तृहरी | ३७ |
| गोरक्षनाथ | ३९ |
| मच्छेंद्रनाथ | ४१ |
| शालिवाहन | ४२ |
| हलेश्वरोपाध्याय | ४६ |
| हलायुधभट्ट | ५१ |
| लक्ष्मीनारायणाप्पा | ५१ |
| भोजराजा | ५३ |
| भवभूति | ५४ |
| दंडी | ५६ |
| माघकवि | ५७ |
| बाणकवि | ६० |
| भास्कराचार्य | ६१ |
| कल्याणमल्ल | ६३ |
| शार्ङ्गधर | ६४ |
| हेमचंद्र | ६४ |
| रामानुजाचार्य | ६६ |
| श्रीहर्ष | ६९ |
| सोमदेव | ७० |
| सोमनाथभट्ट | ७१ |
| विष्णुशर्मापंडित | ७३ |

| | पृष्ठ. |
|---|---|
| बोपदेव | ७४ |
| ईल्लय | ७६ |
| उरगप्पादंडनाथ | ७६ |
| साकल्यमाला | ७७ |
| माधव किंवा विद्यारण्य | ७७ |
| विद्यानाथ | ८२ |
| वेदांताचार्य | ८४ |
| वरदाचार्य | ८८ |
| पेद्दीभट्ट | ८९ |
| वराहमिहिर | ९१ |
| पोटय्या | ९२ |
| कदंब | ९४ |
| वल्लभाचार्य | ९४ |
| पुरुषोत्तम | १०१ |
| गणिकानंद | १०१ |
| अक्षोभ्यदीक्षित | १०२ |
| क्षीरस्वामी | १०२ |
| अन्नंभट्ट | १०२ |
| शितिकंठ | १०३ |
| गजपतिप्रतापरुद्र | १०४ |
| लक्ष्मण कवि | १०४ |
| अपय्यादीक्षित | १०५ |
| जगन्नाथरायपंडित | १०८ |
| भट्टोजिदीक्षित | ११३ |
| लोलिंबराज | ११६ |
| वेंकटाध्वरी | ११८ |
| अय्यादीक्षित | ११९ |

त्र्यंबकराजवैद्य . . १९९
केळदीबसवप्पानाईक . १२०
ताताचार्य . . . १२०
बहारीलाल . . . १२१
मोरेश्वरभट्ट . . . १२२
नागोजीभट्ट . . . १२२
महेश्वरभट्ट . . . १२५
राजाराम मोहनराय . १२७

## प्राकृत कवि.

चांगदेव . . . १३६
मुकुंदराज . . . १४०
कबीर . . . १४१
रोहिदास . . . १४५
निवृत्तिनाथ . . . १४६
ज्ञानदेव . . . १४७
सोपानदेव . . . १५०
मुक्ताबाई . . . १५०
हेमाडपंत . . . १५१
नामदेव . . . १५१
जनाबाई . . . १५३
गोराकुंभार . . . १५४
उद्धवचिद्घन . . . १५५
नानकशाह . . . १५५
मिराबाई . . . १५७
सूरदास . . . १५८
दामाजीपंत . . . १५९
गिरधरलाल . . . १६१
एकनाथस्वामी . . १६१
तुकाराम . . . १६६
रामदासस्वामी . . १७२
वामनपंडित . . . १७६
मुक्तेश्वर . . . १७८
देवीदास . . . १७८
तुळसीदास . . . १७९
नाभाजी . . . १८२
चोखामेळा . . . १८३
महिपतराव . . . १८३
श्रीधरस्वामी . . . १८४
नरसीमेहता . . . १८४
केशवस्वामी . . . १८५
बोधलेबावा . . . १८६
अमृतराय . . . १८७
मध्वमुनीश्वर . . १८८
प्रेमाबाई . . . १९०
निंबराज . . . १९०
कान्होपाठक . . . १९१
मुद्गलभट्ट . . . १९२
सुभानराव . . . १९३
मोरोपंतपंडित . . . १९३
साळ्यारसाळ . . . १९६
रामजोशी . . . १९६
रघुनाथपंडित . . . १९७
शाहामुनी . . . १९८
महिपति . . . १९८
भैरवनाथ . . . १९९
बाळगंगाधरशास्त्री जांभेकर . . . १९९

## तामिळ कवि.

सेतेकर . . . २०१
आव्हेयरप्रभृतिसप्तज्ञानी २०२
तेरुवेल्लूवर . . . २०६
आधिकनान . . . २०७

| | | | |
|---|---|---|---|
| कपिलर | २०७ | अप्पर | २०८ |
| अपग्गा | २०८ | माणिक्यव्यासर | २०९ |
| मुरग्गा | २०८ | सुंदरर | २०९ |
| वालीज | २०८ | अगस्त्य | २०९ |
| गणासंबंधर | २०८ | | |


## तेलंगी कवि.


| | | | |
|---|---|---|---|
| अथर्वणाचार्य | २१० | भैरवकवि | २२८ |
| बालसरस्वति | २१० | लक्ष्मणकवि | २२९ |
| नन्नयभट्ट | २१० | दुसरा लक्ष्मणकवि | २२९ |
| आंध्रकालिदास | २११ | बंधनकवि | २२९ |
| तिक्कनसोमयाजी | २११ | चिन्नवीरन्ना आणि पेद्दवीरन्ना | २३० |
| पोतराजू | २१२ | लोकभनय्या | २३१ |
| मल्लन | २१३ | गोविंदकवि | २३२ |
| श्रीनाथ | २१३ | वडवानलभट्ट | २३२ |
| रायनीभास्कर | २१५ | मधुरंग चोक्कनाथ | २३३ |
| आयलभास्कर | २१५ | अन्नाय्याच्यारी | २३३ |
| आलसानी पेद्दना | २१५ | मंचनामात्या | २३४ |
| कृष्णरायल्लु | २१८ | अबन्नकवि | २३४ |
| मोहनांगी | २१९ | आप्पाकवि | २३४ |
| मूकूतिमण्णा | २१९ | तिमय्यासाति | २३४ |
| तेनाल रामलिंग | २२० | बसवकवि | २३५ |
| वेंकटपतिराजा | २२३ | भीमकवि | २३५ |
| पिंगळसूरण्णा | २२३ | गंगाधरकवि | २३७ |
| भट्टमूर्त्ति | २२४ | घंटय्यकवि | २३७ |
| रामभद्र कवि | २२५ | जगन्नाथ | २३७ |
| मौल्ली | २२५ | लिंगकवि | २३८ |
| माधवराय | २२६ | लिंगराजा | २३८ |
| मलय्या | २२६ | कावेल्लीवेंकट बोरय्या | २३९ |
| चक्राप्पा | २२६ | | |
| लिंगय्या | २२८ | | |
| बप्पनकवि | २२८ | कृष्णमूर्त्ति | २४४ |

# कविचरित्र,

म्हणजे

## हिंदुस्थानांतील प्राचीन व अर्वाचीन कवि आणि ग्रंथकार यांचा इतिहास.

## संस्कृत कवि.

### शंकराचार्य.

श्रीमच्छंकराचार्य हे वैदिकधर्माचे गुरू व्यास*मुनीच्या पाठीमागून सुमारें अडीचहजार वर्षांनंतर जन्मले. कलियुगामध्यें लोक अगदी मंदबुद्धि होऊन वैदिकधर्माचा मार्ग बरोबर समजणार नाहींत असें जाणून व्यासमुनींनीं द्वापारयुगाच्या अंतीं वैदिक धर्माच्या संरक्षणार्थ जेवढे सुगम उपाय कर्तव्य होते तेवढे केले. सर्वांच्या शेवटीं ब्रह्मसूत्र ज्याला व्यासब्रह्मसूत्र असें ह्मणतात तीं वेदांत शास्त्राचीं चार अध्याय सूत्रें रचिलीं. त्यांत उपनिषदांचे गूढ अर्थ निभ्रांत कळण्यासाठीं संपूर्ण उपनिषदांची एकवाक्यता करून मुख्यार्थ स्पष्ट सांगितले आहेत. याखेरीज पुष्कळ धर्मसंहिता व सूत्रें त्यानीं रचिलीं, तथापि कलियुगाची प्रवृत्ति होऊन सुमारें अडीचहजार देखील वर्षें लोटलीं नाहींत तोंच वैदिक धर्मामध्यें मोठा गोंधळ झाला. लोक वेगवे-

---

* ग्रंथमहोदधि ह्या नांवाचा आह्मी दुसरा एक ग्रंथ केला आहे, त्यांत वेद, पुराणें, कोश, नाटकें व सर्व शास्त्रें यांचीं मूळ उत्पत्ति व प्रत्येक शास्त्रांत मोठे मोठे प्रख्यात ग्रंथ कोणते आहेत त्यांचें संक्षिप्त वर्णन केलें आहे. तेथें व्यास व त्यांचे ग्रंथांचे सविस्तर वर्णन पाहावें.

गळे पंथ कल्पून आगम मार्गामनाणें वागूं लागले.

शंकराचार्यांच्या इतिवृत्ताविषयीं **शंकरकथा**, **शंकरचरित्र**, आणि **केरल उत्पत्ति*** हे ग्रंथ दक्षिण हिंदुस्थानांत मख्यात आहेत परंतु ते आमच्या आढळण्यांत आले नाहींत.

आनंदगिरी जो शंकराचार्यांचा साक्षात् शिष्य त्यानें **शंकरविजय** नामक एक मोठा ग्रंथ रचिला आहे, त्यांत शंकराचार्यांच्या जन्मप्रभृति सर्व मसिद्ध गोष्टी वर्णिल्या आहेत. त्यांत शंकराचार्यकृत दिग्विजय, व्यास मुनींची भेट व त्यांनीं दिल्हेला आयुष्यविस्तार, ब्रह्मदेवाचें दर्शन, भट्टाचें दर्शन, मंडणमिश्राची गांठ व त्याच्या स्त्रियेसीं संभाषण, परकायाप्रवेशविद्येचें ज्ञान, शिष्यांचें येणें, नृसिंहाचा साक्षात्कार, सरस्वतीविजय, कांचीनगर निर्माण, शृंगेरीची स्थापना, कामाक्षिविस्तार, अद्वैत विद्येचें मकाशन, इत्यादिविषय अनुक्रमानें सांगितले आहेत.

कलियुगामध्यें वैदिक धर्माच्या स्थापनार्थ शिवाचा अंश असा एक अवतार होईल ह्मणून भविष्योत्तर पुराणांत त्याची कथा आहे. आह्माला शिवरहस्यांतील एका अध्यायांत शंकराचार्यांविषयीं भविष्यवचनें मिळालीं तीं आह्मी अर्थसहित लिहितों. त्यांत ईश्वर पार्वतीचा संवाद आहे. तो येणेंप्रमाणें:-

ईश्वरउवाच ॥ शृणुदेविभविष्याणांभक्तानांचरितंकलौ ॥
वदामिसंग्रहेणैवश्रवणाद्भक्तिवर्द्धनं ॥
गोपनीयंप्रयत्नेननाख्येयंयस्यकस्यचित् ॥
पापघ्नंपुण्यमायुष्यंश्रोतॄणांमंगलावहं ॥
पापकर्मैकनिरतान्विरतान्सर्वकर्मसु ॥
वर्णाश्रमपरिभ्रष्टानधर्मप्रवणान्जनान् ॥
कल्याब्धौमज्जमानांस्तान्दृष्ट्वानुक्रोशतोंबिके ॥

---

* हा ग्रंथ आचार्यांनींच केला आहे असें कित्येक ह्मणतात. त्यांत केरलदेश ह्मणजे मलबार या देशाची राज्यक्रांति आणि देशस्थिति याविषयीं वर्णन आहे.

मद्दंशजातदेवेशिकलावपितपोधनं ॥
केरलेषुनदाविप्रंजनयामिमहेश्वरि ॥
तस्यैवचरितंतेद्यवक्ष्यामिशृणुशैलजे ॥
कल्यादिमेमहादेविसहस्रद्वितयात्परं ॥
सारस्वतास्तथागौडाःमिश्राःकर्णाजिनाद्विजाः ॥
आसन्मीनाशनादेविआर्यावर्तानुवासिनः ॥
औत्तराविंध्यनिलयाःभविष्यंतिमहीतले ॥
शब्दार्थज्ञानकुशलास्तर्ककर्कशबुद्धयः ॥
जैनावौद्धाबुद्धियुक्तामीमांसानिरताःकलौ ॥
वेदवोधादिवाक्यानामन्यथैवप्ररोचकाः ॥
प्रत्यक्षवादकुशलाःशल्यभूताःकलौशिवे ॥
मिश्राःशास्त्रमहाशस्त्रैःअद्वैतोच्छेदिनोंबिके ॥
कर्मैवपरमंश्रेयोनैवेशःफलदायकः ॥
इतिमुक्तिपरामृष्टवाक्यैरुद्बोधयंतिच ॥
तेनघोराकुलाचाराःकर्मसाराभवंस्तथा ॥
तेषामुच्चाटनार्थायसृजामीशेमदंशतः ॥
केरलेशशलग्रामेविप्रपत्न्यांमदंशजः ॥
भविष्यतिमहादेविशंकराख्योद्विजोत्तमः ॥
उपनीतस्तदामात्रावेदान्सांगानूग्रहीष्यति ॥
अब्दावधिततःशद्धेविहत्यसुसुतर्कजां ॥
मतिमीमांसमानोसौकृत्वाशास्त्रेषुनिश्चयं ॥
वादिमत्तद्विपवरान्शंकरोत्तमकेसरी ॥
भिनत्त्येवमहाबुध्यासिद्धविद्यानषिद्रुतं ॥
नैजान्विजिग्येतरसातथान्यानूकुमतानुगान् ॥

तदामातरमामंत्र्यपरिव्राट्सभविष्यति ॥
परिव्राजकवेषेणमिश्रानाश्रमदूषकान् ॥
दंडहस्तंतथाकुंडीकाषायवसनोमलः ॥
भस्मदिव्यत्रिपुंड्रांकोरुद्राक्षाभरणोज्वलः ॥
स्वशिष्यैस्त्वादृशैर्घुष्यन्भाष्यवाक्यानिसोंबिके ॥
मद्दत्तविद्ययाभिक्षुर्विराजतिशशांकवत् ॥
सोद्वैतोछेदकान्पापान्उछिद्याक्षिप्यतर्कतः ॥
स्वमतानुगतांदेविकरोत्येवनिरर्गलं ॥

अर्थ—"शिव ह्मणतात, देवी श्रवणकर. कलियुगांत भविष्यमाण जे माझे भक्त त्यांचें चरित्र तुला सांगतों, तें श्रवणें करून भक्तीला वाढविणारें, पाप दूर करणारें, आयुष्याला देणारें, आणि ऐकणाऱ्यांस मंगलप्रद असें आहे. हें भलत्यास सांगण्यासारिखें नाहीं. तें प्रयत्नेंकरून गोपन करून ठेव.

हे देवी जेव्हां कलियुगांमध्यें लोक पापकर्मांत तत्पर होऊन वेदोक्तधर्माचा अव्हेर करतील आणि वेदोक्तधर्मापासून भ्रष्ट होऊन अधर्मप्रवण होतील तेव्हां मी कलिसमुद्रांत बुडणाऱ्या दुःखित लोकांतें पाहून केरल देशामध्यें एक तपोधन उत्पन्न करीन, तो माझा अंश असा जाण. त्याचें चरित्र आज मी तुला सांगतों. कल्पादिम ह्मणजे कलियुग प्रवृत्ति होऊन दोन हजार वर्षांच्या पलीकडे असें घडेल कीं, गौड,* सारस्वत, मिश्र, कर्णाजिन हे विंध्य पर्वताच्या उत्तरेस राहाणारे, तसे आर्यावर्त्तांत वासकरणारे सर्व ब्राह्मण हे मत्स्याहार करूं लागतील, आणि त्यावेळेस ते शब्दार्थ ज्ञानाच्या पोकळ वादांत फार कुशल होतील, आणि वाईट तर्कांच्या योगेकरून त्यांच्या बुद्धी फार कठोर होतील.

यामनाणें महा बुद्धिमान जैन, तसे बौद्ध पोकळ विचारामध्यें निमग्न होऊन वेदांतील खऱ्या बोधाचीं वचनें आहेत तीं लोकांला अन्यथा प्रकारानें रुचवितील, आणि ते प्रत्यक्ष वादाच्या

वितंडांत कुशळ होऊन लोकांस कंटकाप्रमाणें उपद्रव देतील. या प्रमाणें मिश्र लोक आपल्या शास्त्ररूप महाशस्त्रांनीं अद्वैत मतांचा उच्छेद करून कर्मच परम कल्याणप्रद आहे, त्या खेरीज फलप्रदाता ईश्वर ह्मणून कोणीच नाहीं या मताचें ते प्रतिपादन करतील आणि ते ऐहिक विषयपर वाक्यें करून लोकांला बोध करतील. त्यानंतर हे देवी, लोकामध्यें वेगळाले व भयंकर असे कुळाचार चालू होतील. तेव्हां तसल्या लोकांचे उच्चाटन करण्यासाठीं केरल देशांत शशलिग्रामामध्यें ब्राह्मण पत्नीचाठायीं एक अवतार होईल. तो शंकर नांवानें प्रख्यात आणि ब्राह्मणामध्यें उत्तम असा होईल आणि त्याचें उपनयन ह्मणजे मौंजीबंधन तें त्याच्या आईकडून होईल आणि तो एका वर्षामध्यें संपूर्ण वेदांचें अध्ययन करील आणि सर्वशास्त्रांत पारंगत होईल. आणि उत्तम तर्कांच्या योगाने योग्य बुद्धि कोणती आहे तीच प्राप्त व्हावी ह्मणून शास्त्रावर आपला भरवसा ठेवील. अणखी शंकराचार्य हा उत्तम सिंह आपल्या महाबुद्धीच्या योगेंकरून वादीरूप मत्त हस्तीचें विदारण करील, आणि अनेक प्रकारच्या चेटकी विद्येंत सिद्ध झालेल्या लोकांचा तो जय करील. अणखी दुसरे कित्येक जे कुत्सित मताला अनुसरतील त्यांला तो मोठ्या वेगेंकरून जिंकील.

नंतर तो आपल्या आईला विचारून सन्यासाश्रम धारण करील आणि आश्रम धर्माला दोष लावणारे जे मिश्र लोक त्यांचा पराभव करील, आणि तो सन्यास वेषाला योग्य जें काषाय वस्त्र, दंडपात्र, भस्माचा उत्तम त्रिपुंड्र यांचें धारण करील. तो स्वतां पवित्र असून रुद्राक्षांच्या अलंकारांनीं फार देदीप्यमान दिसेल आणि शिवपूजा करणें त्याला फार प्रिय होईल आणि शिवाची भक्ति करणारे जे आपले शिष्य त्यांला तो आपल्या भाष्यांचें व्याख्यान देईल.

या प्रमाणें हे अंबिके, ह्मणजे लोकमाते पार्वती, तो सन्यासी म्या दिल्हेल्या विद्येच्या योगेंकरून लोकांमध्यें पूर्णचंद्रासारिखा शोभेल. तो अद्वैत मताचा उच्छेद करणारे जे पापबुद्धि

त्यांला उपटून टाकील, आणि कित्येकांला उत्तम बुद्धि देऊन आपल्या मतांत आणील. आणि शास्त्रविद्येंत निष्णात जे मिश्र लोक त्यांलाही बोध व्हावा ह्मणून व्याससूत्रांवर भाष्य रचील, आणि जे व्यास सूत्राचा अर्थ द्वैतमतानें लावितात अशा मिश्र लोकांला चांगली मनाणें दाखवून त्यांचे खंडन करील, आणि व्यास वाक्येंकरून वाद्यांचा जय करून तो शंकरनामा सन्यासी आनंदित मनाचा विश्वेश्वराचें स्तवन करीत काशीमध्यें वास करील."

शंकराचार्यांला येऊन किती वर्षें झालीं याविषयीं लोकांत काय ह्मणतात ह्मणून आह्मी पुष्कळ शोधक विद्वान्, पुराणिक, शास्त्री यांला विचारून पाहिलें पण ती खरी माहिती कोणीच सांगितली नाहीं. परंतु त्याविषयीं निरानराळी मतें सांपडतात तीं आह्मी एथें लिहितों.

आचार्यांला येऊन बावीसशें वर्षें झालीं असें कित्येक ह्मणतात. कोणी ह्मणतात दोन हजार झालीं. पण त्याविषयीं लिहिण्यासारिखें तथ्य प्रमाण ग्रंथलेख वगैरे नाहींत. आमचे प्रख्यात शोधकाग्रणी डाक्तर भाऊदाजी याणीं त्यांच्या काळावेळेविषयीं बरोबर शोध लावावा ह्मणून पुष्कळ खटपट करून ठरविले कीं, त्यानां येऊन सुमारे १००० वर्षें झालीं. त्याविषयीं एक पुरातन श्लोकही त्यांस मिळाला तो येणेंप्रमाणें.

॥ शिवधीलःकलिमलान्‌दलयंश्चरितामृतैः ॥
॥ जगामशंकराचार्यश्चंद्रचूडपदंशिवं ॥ १ ॥

हा श्लोक शंकराचार्य समाधिस्थ केव्हां झाले याविषयीं श्लोकार्थांत आचार्यांचें वर्णन करून अक्षर गणित बांधिलें आहे. शिवधील ह्मणजे कल्याणबुद्धीचा धारण करणारा आपल्या चरितामृतें करून कलिमलांचें नाशन करीत असतां शंकराचार्य चंद्रचूडाचें जें परम कल्याण पद त्याजप्रत पावले. यांत शिव ह्मणजे ५, व ह्म० ४, धी ह्म० ९, आणि ल ह्म० ३ ह्मणजे ३९४५ इतकीं वर्षें कलियुगाचीं गेलीं होतीं.

व हा दुसरा श्लोक ही त्यांच्या मताला मिळतो.

दोषोगुणेवाखलुगर्भभाजोभावीप्रसूद्दौह्रदतोत्रगम्यः ॥ ज्ञातःशिवांशस्यतुवीतरागमौलेर्गुणोमातुरदौह्रदेन॥ प्रासूनतिष्यशरदामतियातवत्यांएकादशाधिकशतोनचतुःसहस्र्यां ॥ संवत्सरेविभवनाम्निशुभेमुहूर्तेराधेसिते शिवगुरोर्गृहिणीदशम्यां ॥

कुडाळी ब्राह्मण जे शंकरमतानुसारी व तद्धर्म शिक्षक त्यांच्या ह्मणण्यांत आचार्याला येऊन दोन हजार वर्षें झालीं. कर्नल कालिन मेकेन्झी याच्या अमूल्य ग्रंथसंग्रहामध्यें कांग देशाचे राजांचे जे हस्तालिखित इतिहास सांपडले आहेत, त्यांमध्यें दक्षिणेतील स्कंदपूर एथील राजा त्रिविक्रमदेव चक्रवर्ती याचे वेळेस आचार्य होते असे लेख आढळतात. दुसरे असें ह्मणतात कीं, आचार्यांनीं शृंगेरी ह्मणून पश्चिम घांटाच्या कांठीं वसलेलें एक संस्थान ह्मैसूरच्या राज्याखालीं आहे तेथें एक विद्यालय स्थापिलें, तें अद्यापि चालत असून त्याचा हिंदुस्थानांतील सर्व स्मार्त ब्राह्मणांवर धर्मसंबंधी मुख्य अधिकार आहे. त्या लेखावरून तर आचार्याला येऊन १६०० वर्षें झालीं हें निभ्रांत आहे. दुसरे इतिहास ग्रंथांत ते फार अलीकडले असावे असें आढळतें, व कित्येकांचें तर असें मत आहे कीं, त्यांच्या जन्मास केवळ एक हजार वर्षांपेक्षां अधिक काळ झाला नाहीं. दुसरे कित्येक असें ह्मणतात कीं, शंकराचार्यांचा गुरु गोविंदयति हा विक्रमाचा बाप होता ही गोष्ट खचीत आहे. यावरून आचार्य विक्रमाच्या वेळेस होते याविषयीं संशय धरणें नको. अणखी ते इतकें ठरवून देतात कीं, ते केरल देशांत पूर्णानदीच्या कांठीं पोरीघरल ब्राह्मणांच्या वंशांत विक्रम शकाचे पंच्याणवव्या वर्षीं विलंबी संवत्सरांत जन्मले.

असो. आचार्य कोणत्या शक संवत्सरांत आले याचें स्वतंत्र विचार करण्याचें कांहीं विशेष अगत्य नाहीं. इतिहासादि

ग्रंथांमध्यें जीं त्यांच्या येण्याविषयीं भविष्यवचनें आहेत त्यांचा आह्मी सूक्ष्म दृष्टीनें शोध करून त्यांची मूळपीठिका संगतवार सांगतों, तेणेंकरून ठोकताळा ध्यानांत येईल.

द्वापार युगाच्या अंती व्यासमुनींनीं आपलीं कर्तव्यें संपवून लोकांत अदृश्य होऊं लागले. त्यानंतर कित्येका काळानीं श्रौतकर्म आचरणाऱ्या वैदिकधर्मी ब्राह्मणांत तांत्रिकपंथ भारी बळावला. त्यांनीं आपल्या दुराचारांकडून वैदिकधर्माची मूळस्थिति अगदी टाकली ह्मणून त्यां लोकांस अग्निपुराणांत असुर असें ह्मटलें आहे. त्यांचा क्षय करण्यासाठीं ह्मणजे त्यांना वैदिक धर्मापासून भ्रष्ट करावें ह्मणून बौद्धरूपी अवतार झाला. कारणं कीं, ते लोक श्रौतक्रिया लोकांच्या साक्षात् यथायोग्य आचरून एकांती तांत्रिक उपासना करीत असत. जसा रावण हा उत्पत्तीनें ब्राह्मण होत्सातां श्रौत आणि तांत्रिक ह्या दोन्ही क्रिया आचरून लोकांमध्यें बलिष्ठ आणि दुर्जय झाला, तद्वत् ब्राह्मणांचीं बहुत कुळें वाढत चाललीं. त्या कलियुगाच्या आरिकाळामध्यें बौद्धावतार झाला. त्या बलिष्ठ लोकांना वेदापासून भ्रष्ट करावें ह्मणून भगवंतानें निजनिर्मित बौद्धतंत्रें साधारण लोकांला उपदेशिलीं. त्या लोकांला पुराणांत सौगत असें ह्मटलें आहे. त्या सौगतांना तीं बौद्धतंत्रें नीतीचीं, सुबोध आणि परमार्थाला सोपीं असीं वाटून हजारो लोकांनीं तो धर्म अंगीकारिला. मागून त्याच मताचे अनुसारी वेगवेगळाल्या संप्रदायाचे आर्हत, जैन, शाक्य, चार्वाक या खेरीज कापालिक, क्षपणक इत्यादिकांचे पंथ बहुत वाढले. त्या योगानें ब्राह्मणांच्या वेदोक्त क्रिया सहजच बुडत चालल्या. बौद्धमत स्थापित करावें असा भगवंताचा अभिप्राय नव्हता ह्मणून त्या सर्वांचे पंथ मोडून वैदिक धर्माची स्थापना व्हावी ह्मणून कार्तिक स्वामीला अवतार घेऊन कर्मकांडाचा उद्धार कर ह्मणून शिवानें आज्ञा दिल्ही. त्यापूर्वीं संकर्षण आणि पतंजली हे दोघे अवतार शिवाच्या आज्ञेवरून पूर्वींच झाले होते. त्यांनीं उपासनाकांड आणि योगकांड यांची स्थापना केली. नंतर कार्तिकस्वामीचा अवतार कुमारिलभट्ट हा जन्मला आणि

त्यानें जैमिनी सूत्रावर भाष्यकरून कर्मकांडाचा उद्धार केला. त्या काळांत सुधन्वा नामकराजा आणि मंडनमिश्र हे कुमारिल भट्टाच्या सहायार्थं शिवाच्या आज्ञेवरून पृथ्वीवर झाले होते. याविषयीं वचन.

॥ ब्रह्मापितेसहायार्थंमंडनोनामभूसुरः ॥
॥ भविष्यतिमहेंद्रोपिसुधन्वानामभूपतिः ॥

तेव्हां लोकांमध्यें सौगतधर्म फार पसरला असून विशेषेंकरून त्याच धर्माची मान्यता होती. जरी सुधन्वा राजाला सौगतांचा धर्म वेदबाह्य असा ठाऊक होता तरी तो बाह्यात्कारी त्या लोकांप्रमाणें वागत असून कुमारिलभट्ट येण्याची वाट पाहात होता आणि त्यानें मुख्यमुख्य सौगत आचार्य आपल्याजवळ बाळगून ठेवले होते. याविषयीं माधव ग्रंथांतील वचन असें आहे कीं,

॥ सर्वज्ञोप्यसतांशास्त्रेकृत्रिमःश्रद्धयान्वितः ॥
॥ प्रतीक्षमाणःकौचारिंमेलयामाससौगतान् ॥

पुढें कांहींवेळानें कुमारिलभट्ट हा दिग्विजय करीतकरीत सुधन्व्याच्या सभेंत गेला, तेथें पुष्कळ दिवसपर्यंत त्याचा सौगत लोकांशीं वादविवाद होऊन शेवटीं परस्परांनीं आपल्या धर्माच्या बळानें राजाच्या साक्षात् मोठाल्या अद्भुत प्रचीति बरोबरीनें दाखविल्या. सरशेवटीं कुमारिलभट्टाचें मत परम तथ्य आहे असी आकाशवाणी झाली. परंतु बहुत दुराग्रही सौगत वेदनिंदा करण्याचें सोडीनात; त्यावेळेस सुधन्वा राजानें त्यांस भय दाखवून मनाकेलें. याप्रमाणें कुमारिलभट्टाचें कर्तव्य एथपर्यंत संपलें. यापुढें शंकराचार्यांचा अवतार होणार त्याची गोष्ट माधव ग्रंथांत सांगितली. ती असीः—

॥ कुमारिलमृगेंद्रेणहतेषुजिनहस्तिषु ॥
॥ निष्प्रत्यूहमवर्द्धंतश्रुतिशाखाःसमंततः ॥
॥ प्रागित्थंज्वलनभुवाप्रवर्तितेस्मिन् ॥

॥ कर्माध्वन्यखिलविद्राकुमारिलेन ॥
॥ उद्धर्तुंभुवनमिदंभवाब्धिमग्नं ॥
॥ कारुण्यांबुनिधिरियेषचंद्रचूडः ॥

अर्थ—कुमारिल नामक सिंहानें जैन हस्तीचें हनन केलें असतां वेदमार्गाचा निर्विघ्न प्रचार चालला. याप्रमाणें सर्वज्ञ कुमारिलभट्टानें कृत्य केल्यानंतर संपूर्ण भुवनाचा उद्धार करावा ह्मणून शिवानें शंकराचार्यरूपें अवतार घ्यावा असी इच्छा धरिली.

नंतर थोडक्याच वेळांत केरलदेशामध्यें वृषपर्वताजवळ पूर्णानदीच्या कांठीं स्वयंभू शिवलिंगरूपें शिव प्रगट झाले, त्यावेळेस राजशेखर हा त्या देशाचा राजा होता, त्याला दृष्टांत झाल्यावरून त्यानें त्याठिकाणीं देऊळ बांधिलें. ह्याच नदीच्या कांठीं कालटिका या नांवाचा एक फार चांगला इनामी गांव होता, त्यांत विद्याधिराज नामक कोणी एक महान्‌विद्वान् राहत असे. त्याला पूर्व पुण्येंकरून एक पुत्र झाला, त्याचें नांव त्यानें शिवगुरू असें ठेविलें तो शिवाप्रमाणें ज्ञानवान् आणि बृहस्पती प्रमाणें वक्ता असा महासमर्थ होता. विद्याधिराजानें बाळपणांतच त्याची परीक्षा घेतली तेव्हां तो कोणत्याही शास्त्रांत व विषयांत बोलायाला कुंठित झाला नाहीं. त्याच्या मनांत लग्न करायाचें नव्हतें परंतु विद्याधिराजाच्या अतिआग्रहास्तव त्यानें पत्करिलें आणि पुढें मघपंडित यानें आपली कन्या जी सती ती शिवगुरूला दिल्ही. हीं दोघें आपल्या ह्यातारपणापर्यंत महातपस्वी असून त्यांना तोंपर्यंत संतती झाली नव्हती. कांहीं दिवसपर्यंत उभयतांनीं पुत्रप्राप्तीसाठीं नित्यनेमानें पूर्णानदीचें स्नान करून त्याच स्वयंभू देवाचें पूजाव्रत चालविलें. तेथें उभयतांना दृष्टांत होऊन नंतर पुत्र झाला, ते शंकराचार्य.

आचार्यांचे जन्मकाळीचीं सुचिन्हें ह्मणजे पुष्पवृष्टि झाली, दिशा प्रसन्न झाल्या, आकाश निरभ्र झालें, आणि व्यासादिऋषींच्या ऱ्हदयांत आनंद झाला. ते अल्पवयस्क असतां त्यानीं

विद्येचें ग्रहण केलें. तें असें कीं, पहिल्या वर्षांत अक्षर ओळख आणि स्वभाषेचें पूर्णज्ञान इतकें झालें. चार वर्षांपर्यंत काव्य, नाटक यांपासून आरंभ करून सकळ शास्त्रें, इतिहास, पुराणें या सुद्धां पढणें संपलें. पांचव्या वर्षी शिवगुरूच्या मनांत त्यांचें उपनयन कर्तव्य होतें पण तो पूर्वीच मरण पावला. त्याच्या मागें त्यांची आई जी श्रीमहादेवी तिनेंच आचार्यांचें उपनयन केलें. पांचव्या वर्षी संपूर्ण चारवेद यांचें त्यांनीं अध्ययन केलें. याविषयीं आनंदगिरीनें आपल्या ग्रंथांत असें ह्मटलें आहे कीं,

वेदेब्रह्मसमस्तइंगनिचयेगर्गोपमस्तत्कथातात्पर्यार्थविवेचनेगुरुसमस्तत्कर्मसंसर्गणे ॥ आसीज्जैमिनिरेवतद्वनजप्रोद्बोधकंदेसमोव्यासेनैवमदीयसद्गुरुरसौश्रीशंकराख्यःक्षितौ ॥ स्वर्गेयथाकल्पतरुस्तथाभूमौहिशंकरः ॥ सुराणांभूसुराणांचवांछितार्थप्रदोभवत् ॥

अर्थ—माझा गुरु हा वेद जाणण्याविषयीं ब्रह्मदेवासारिखा, वेदांगाचा अर्थ जाणण्याविषयीं गर्गऋषीसारिखा, आणि त्यांचें कथातात्पर्य सांगण्याविषयीं ब्रहस्पतीसारिखा, वैदिक कर्ममार्ग जाणण्याविषयीं जैमिनी सारिखा, आणि इतिहास व्याख्यान करण्याविषयीं व्यासासारिखा स्वर्गामध्यें जसा कल्पतरु तसा भूलोकीं हा शंकर देवांना आणि ब्राह्मणांना वांच्छित देणारा कल्पवृक्षासारिखा जन्मला.

आचार्य हे शरीरानें भव्य, तेजःपुंज, आणि फार रूपवान होते. त्यांच्या शरीरावर महापुरुषाचीं सामुद्रिक चिन्हें लोकांना बाळपणांतच पुष्कळ दृष्टीस पडलीं. त्यांचें मुख पूर्णचंद्रासारिखें होतें. कपाळावर अर्धचंद्राची आकृति, वक्षस्थळ तें विशाल ह्मणजे रुंद आणि आजानुबाहू, पावलें लहान, नखें आरक्तवर्ण. हस्त व पाद यांच्या मध्यभागीं शंखचक्रादि चिन्हें, मस्तकावर वा-

मभागीं त्रिशूळ आणि दक्षिणभागीं अर्धचंद्र इत्यादि चिन्हेंकरून शिवमूर्त्तिसारिखे शोभत असत.

एकदां आचार्य आंपल्या बटुत्वामध्यें एका ब्राह्मणाच्या घरीं भिक्षेस गेले तों भिक्षेपुरतेंही अन्न नव्हतें ह्मणून त्याच्या बायकोने कष्टी होऊन एक आंवळा त्यांच्या भिक्षेला घातला. त्याच दिवशीं रात्रीं आचार्यांनीं लक्ष्मीची स्तुति करून सोन्याच्या आंवळ्याची वृष्टि पाडली.

आचार्यांची कीर्ति ऐकून केरल देशाचा राजा जो राजशेखर त्यानें सत्कारपूर्वक त्यांस आणण्याकरितां आपला मंत्री पाठविला आणि त्याच्या समागमें दाहा हजार मोहरा व एक हत्ती भेटीकरितां दिल्हीं होतीं. तो आला त्यासमयीं आचार्यांच्या जवळ महापंडित आणि विद्यार्थी ह्यांचा मोठा समुदाय बसला होता. तेथें प्रधानानें राजाचा निरोप मोठ्या चातुर्यानें कळविला कीं, हा उत्तम हत्ती राजानें तुह्माला अर्पण केला आहे, हा मदाने परिपूर्ण आहे तरी याच्या अंगी दोषाचा लेश नाहीं. याचा स्वीकार करा आणि राजाचें घर आपल्या चरणधूलीने पवित्र करा. तेव्हां आचार्यांनी प्रत्युत्तर केलें कीं, आमच्या ब्रह्मचारी धर्माला हें रूक्ष भिक्षान्नच बरें आहे. आह्मी मृगचर्म पांघरतों, हेंच कर्म आह्माला सुख देणारें आहे. आह्माला या द्रव्याची आणि हत्तीची गरज नाहीं.

मग आचार्यांनी राजाला आशिर्वाद सांगून प्रधानाला परत पाठिवलें, नंतर राजा समक्ष त्यांच्या भेटीला आला. तेव्हां त्यानें स्वतां रचिलेलीं तीन नाटकें वाचिलीं. आचार्यांनीं त्याची फार नम्रता पाहून त्याला पुत्र होण्याचा आशिर्वाद दिल्हा आणि त्यानें भेटीकरितां ज्या दाहा हजार मोहरा आणिल्या होत्या त्या राजाकडून ब्राह्मणांला वाटिवल्या.

आचार्यांप्रमाणें विद्याभ्यास, सदाचार, स्वधर्म यांच्या आचरणांत जन्मपर्यंत बिनचूक वागणारा असा कोणीच आढळणार नाहीं. पांचव्या वर्षीं मुंज झाल्यावर सातव्या वर्षांपर्यंत गुरुकुलामध्यें वास करून वेद, शास्त्र, पुराण, इतिहास इत्यादि चतुर्दश

विद्या आणि चतुःषष्टी कला यांचा पूर्ण अभ्यास करून आठव्या वर्षी समावर्त्तन ह्मणजे सोडमुंज केली आणि आपल्या घरीं येऊन ग्रहस्थाश्रमानें वागूं लागले. स्नानसंध्या, सकाळ संध्याकाळचे होम, देवपूजा इत्यादि नेमाप्रमाणें करून आईच्या सेवेंत सदासर्वदा तत्पर होते. एकीकडे वेदाची आवृत्ति करीत व आपल्या आईची सेवा करीत असत.

एकदां आचार्यांची आई नदीवर स्नानाला गेली तेव्हां ह्मातारपणच्या हळू चालण्यानें व उन्हामुळें ती फार व्याकूळ झाली. त्याच संध्याकाळीं आचार्यांनी नदीच्यातीरीं जाऊन प्रार्थना केली आणि नदीनें वर दिल्हा कीं,

॥ईहितंतवभविष्यतिकाल्ये योहितंजगतइच्छसिबाल्ये॥

जो तूं बाल्यामध्यें जगाचें हित इच्छितोस, तो तूं उद्यांच्याच काल्यांत ह्मणजे सकाळीं आपलें इच्छित पावशील. नंतर सकाळीं अवघे लोक पाहतात तों पूर्णानदीचा ओघ आचार्यांच्या घराच्या समोरून वाहत आहे. तो अद्याप तसाच आहे.

याप्रमाणें कांहीं दिवस लोटल्यावर अगस्तिप्रभृतिऋषी आचार्यांच्या भेटीस आले. सर्वांचीं संभाषणें होऊन परत जातांना अगस्ती ऋषीनें आचार्यांच्या मातोश्रीला सांगितलें कीं, तुझ्या ह्या सर्वज्ञ पुत्राला आयुष्य आठ वर्षांचें परंतु अणखी आठ वर्षें याला आह्मी देतों मिळून सोळा वर्षें याला आयुष्य होईल असा आशिर्वाद दिल्हा. ह्यावेळेपर्यंत आचार्यांचें आयुष्य इतकें थोडें आहे असें तिला ठाऊक नव्हतें. पुढें ती सर्वदा मुलाच्या थोड्या आयुष्यामुळें चिंता आणि शोक करूं लागली. या गोष्टीला वर्षदीडवर्ष लोटलें इतक्यांत असें घडलें कीं, एकदां आचार्य पूर्णानदींत स्नानाला उतरले असतां मगरानें येऊन त्यांचे पाय गिळले, तेव्हां आचार्यांनी जवळच आक्रोश करणाऱ्या आईकडे पाहून म्हटलें जर तूं यावेळेस सन्यास घ्यायाला मोकळिक देशील तर हा मगर सोडील असें दिसतें. तेव्हां संकटास्तव तिनें अनुमोदन दिल्हें तोंच मगरानें त्यांचे पाय सोडले.

पुढें आपल्या प्रियकर आईला सोडून जायाचा वेळ आला तेव्हां आचार्यांनीं तिच्या सर्व अडचणींविषयीं भाका पुरवून बंदोबस्त करून दिल्हा आणि खातरीपूर्वक सांगितलें कीं, मी तुझ्या जवळ विद्यमान असतां जितकें तुझें हित करावें त्यापेक्षां शतगुण अधिक करीन, असें तिला आश्वासन दिल्हें. अणखी आचार्यांनी आपल्या आईची दुसरी एक मोठी आट होती ती पुरवून ह्मटलें कीं, मी कोठें कोणत्याही ठिकाणीं, कोणत्याही अवस्थेंत असलों तरी तुझ्या अंतकाळीं जवळ येईन, यांत अंतर करणार नाहीं. त्याप्रमाणें आचार्य आपल्या आईला पुढें भेटले आणि तिच्या उत्तरक्रिया स्वतां केल्या. त्यावेळची गोष्ट अशी आहे कीं, ब्राह्मणांनीं शंकराचार्यांवर ग्रामण्य रचिलें आणि त्यांचे मातोश्रीचें प्रेत दहन करायाला येईनात. तेव्हां आचार्यांनी आपल्या बाहूपासून अग्नि काढला आणि घराच्या परसदारीं तिचें दहन केलें. त्यावेळेस आचार्यांनी क्षोभून ब्राह्मणज्ञातीला शाप दिल्हा कीं, इतःपर तुह्मी वेदभ्रष्ट होत्सातां घरोघरीं भिक्षा मागत फिराल. तेव्हांपासून केरळदेशांत परसामध्यें प्रेत दहन करण्याचा संप्रदाय पडला, तो अद्याप तसाच आहे.

मग आचार्य मातोश्रीची आज्ञा घेऊन नर्मदेच्या कांठी व्याघ्रपुरामध्यें आले. तेथें गोविंदयती हे महायोगी गुहेंत राहात होते व अणखी बहुत शिष्यमंडळीही तेथें अध्ययन करीत होती. गुहेला वीतभर धारे होतें, त्यांतून ते आपल्या शिष्यांला पूजेकरितां पाय मात्र बाहेर करीत असत. गोविंदयती कोण होते याविषयीं माधव ग्रंथांतील श्लोक.

॥ व्यासःपराशरसुतःकिलसत्यवत्यांतस्यात्मजश्शुकमुनिःप्रथितानुभावः ॥तच्छिष्यतामुपगतःकिलगौडपादोगोविंदनाथमुनिरस्यचशिष्यभूतः ॥

अर्थ—पराशराचा पुत्र व्यास, त्याचा पुत्र शुकाचार्य, त्याचा शिष्य गौडपाद, आणि त्याचा शिष्य गोविंदयती. गोविंदयती हा

पतंजलीचा अवतार. त्यानें व्याकरण सूत्रावर **महाभाष्य** आणि **योगसूत्रें** यांची रचना करून वेदमार्गाचा उद्धार केला.

तेथें आचार्यांनी यतांच गुहेला तीन प्रदक्षिणा घातल्या आणि गुहेच्या धाऱ्यांशीं बसले आणि सर्व लोकांसमक्ष गोविंदयतींची स्तुति केली. पुढें गोविंदयतीनें आचार्यांची परीक्षा घेऊन त्यांना धाऱ्यांतून आपले पाय दाखवून सन्यासदीक्षा दिल्ही. यावरूनच शंकराचार्यांनी आपल्या ग्रंथांच्या शेवटीं **गोविंदभगवत्पूज्यपादशिष्य** असें आपल्याला ह्मटलें आहे. नंतर व्याससूत्रांचे सांप्रदायिक अर्थ आणि उपनिषदांचे अर्थ गोविंदयतीपासून ऐकिले आणि सर्व शास्त्रांची उजळणी केली.

एकेसमयीं असें घडून आलें कीं, आचार्य हे गोविंदयतीच्या गुहेशीं बसून पाठ घेत असतां पावसाच्या झडीमुळें नदीला महापूर येऊन गुहेला वेढा पडला. तेव्हां गोविंदयती बोलतांना स्तब्ध राहिले असें पाहून आचार्यांनीं आपला कमंडलू नदीच्या काठीं ठेविला आणि त्यांत संपूर्ण पुराचें पाणी जिरविलें. हें पाहून गोविंदयतीनें एकांतीं आचार्याला ह्मटलें पूर्वीं मी अत्रिऋषीच्या आश्रमीं यज्ञसत्रांत गेलों, तेथें ब्रह्मादि देवतांच्या समक्ष व्यास मुनींनीं उपनिषदांचे अर्थ वर्णिले. सभा विसर्जना नंतर ब्रह्मसूत्रावर भाष्य करावें ह्मणून व्यास मुनीला मीं प्रार्थना केली कीं, हल्लीं लोकांमध्यें तुमच्या सूत्रांचे अर्थ विद्वान् लोक हवेतसे करतात, ह्यास्तव तुह्मी आपल्या सूत्रांवर भाष्य करा. त्या वेळेस व्यासांनीं ह्मटलें माझ्या सारिखा सर्वज्ञ एक शिष्य तुला भेटेल आणि तो नदीचें पाणी आपल्या कमंडलूमध्यें जिरवील. तो सूत्रार्थावर भाष्य करणार आहे. मग गोविंदयतीनें आचार्याला ह्मटलें तर तूं आतां काशीक्षेत्रामध्यें जा आणि तेथें ब्रह्मसूत्रांवर व उपनिषदांवर भाष्यकर. पुढें गोविंदयतीची आज्ञाघेऊन काशीस जाऊन राहिले. तेथें त्यांचा प्रथम शिष्य पद्मपादाचार्य हा चोलदेशांतून येऊन त्यांस भेटला. हा आचार्यांचा मोठा कडकडीत भक्त होता. त्याच्या गुरुभक्तिविषयीं अशी गोष्ट सांगतात कीं, एकदां हा गंगानदीला महापूर आला असतां आचार्यांच्या वचनावरून

महापूरांतून येऊं लागला तेव्हां त्याच्या प्रत्येक पावलाखालीं कमळें उत्पन्न झालीं आणि त्यांवरून चालत आला. तेव्हांपासून त्याचें नांव पद्मपादाचार्य पडलें.

आचार्यांच्यापूर्वी व त्यांच्या समकाळीं देवावतार त्यांचे शिष्य पुष्कळ जन्मले, ते त्यांच्या बटुपणापासून त्यांच्याजवळ अध्ययन करीत होते. काशींत आले त्यावेळीं त्यांच्यासमागम शिष्यांचा मोठा समुदाय होता. त्यांचीं नांवें. पद्मपाद—हा विष्णूचा अवतार. हस्तामलक—हा वायूचा अवतार, प्रभाकर नामक ब्राह्मणापासून जन्मला. उदंक—हा शिलादाचा पुत्र जो नंदी त्याजपासून जन्मला. सुरेश्वर—हा ब्रह्मदेवाचा अवतार. आनंदगिरी—हा बृहस्पतीचा अवतार. सनंदन—हा अरुणाचा अवतार. चित्सुख—हा वरुणाचा अवतार. त्रोटक—हा वायूचा दशांश अवतार. तसेच ज्ञानघन—ज्ञानोत्तम—सिंहगिरीश्वर — ईश्वरतीर्थ — नृसिंहमूर्त्ति — वीतरण — विद्याशंकर — भारती कृष्ण — विद्यासैन्य — चंद्रशेखर — नृसिंहभारती — शंकरभारती — पुरुषोत्तमभारती — रामचंद्रभारती — इमादिभारती — अभिनवनृसिंहभारती — सच्चिदानंदभारती — इमादिसच्चिदानंदभारती — अभिनव सच्चिदानंदभारती इत्यादि. हे सर्व पुढें आचार्यपदवी पावले आणि मोठमोठाले वार्तिक ग्रंथ व भाष्यादि ग्रंथांवर टीका, व वेदांत शास्त्रावर मोठाले निबंध ग्रंथ करणारे असे होते.

आचार्य काशींत येऊन राहिले त्यावेळेस त्यांचे वय अकरा वर्षांचें होतें. संपूर्ण शास्त्रांत त्यांची अकुंठित गति आहे असें जाणून क्षेत्रांतील विद्वान् लोकांस फार आश्चर्य वाटलें. त्या वेळेस काशीमध्यें भास्कर पंडित, मुरारिमिश्र, विद्यानाथ, नीळकंठ इत्यादि मोठाले नामांकित आग्रही पंडित होते. काशींतील आबालवृद्धांस आचार्यांचें माहात्म्य आणि योग्यता कळली. आचार्यांनीं सर्व शास्त्रांत विद्यार्थी पढविले. असें सांगतात कीं, काशींत आल्यावर कांहीं दिवसांनीं वेदांत शास्त्राचें मात्र ते स्वतां व्याख्यान देत असत, बाकीचीं शास्त्रें पढविणें तें विद्यार्थ्यांकडे

सोंपलें होतें. त्या काळांत काशी क्षेत्रामध्यें वेदशास्त्रांचा फारच उत्कर्ष झाला.

याप्रमाणें कांहीं काळ लोटल्यावर असें घडलें कीं, एके दिवशीं आचार्य हे नित्याचें आन्हिक उरकावें ह्मणून भागीरथीवर जात असतां वाटेंत कोणी अंत्यज बरोबर चार कुतरीं घेऊन आचार्यांच्या समोर आला. तेथें उभयतांचीं उत्तर प्रत्युत्तरें वेदांत बोधाप्रमाणें झालीं. मग शंकरानीं आपलें रूप प्रगट करून व्यास सूत्रावर भाष्य करण्यासाठीं आज्ञा दिल्हीं आणि त्या चार वेदांसहवर्तमान अदृश्य झाले.

तेथून आचार्य बद्रिकाश्रमीं गेले. तेथें त्यांनीं आपल्या बाराव्या वर्षीं व्यास सूत्रांवर भाष्य रचिलें. नंतर भारतांतील संपूर्ण **गीता, सनत्सुजातीय, नृसिंहतापिनी, ईष, केन, कठ, प्रश्न, मुंड, मांडूक्य, तैत्तिरीय, ऐतरेय, छांदोग्य, ब्रह्दारण्यक** ह्या दशोपनिषदांवर भाष्यें रचिलीं. मग तीं भाष्यें काशींत येऊन शिष्यांला पढवूं लागले, आणि प्रसंगवशानें संपूर्ण तंत्रशास्त्रें उघड करून भास्कर, मुरारिमिश्र, विद्येंद्रगुरु इत्यादि आग्रही पंडितांचा जय केला.

एकदां आचार्य भागीरथीच्या कांठीं बसून सूत्रभाष्यांचें व्याख्यान देत असतां व्यासमुनी वृद्ध ब्राह्मणाच्या वेषानें आले. तेथें व्यासाचा आणि आचार्यांचा आठ दिवस मोठा वाद चालला. त्यामध्यें पद्मपादाचार्यानें आचार्यांला ओळखून खुणावलें. तेव्हां आचार्यांनीं अति आनंद पावून व्यासाची स्तुति केली आणि उभयतांनीं वाद टाकून आलिंगनें दिल्हीं आणि व्यासानीं आचार्यांनीं रचलेल्या भाष्यांचें अभिनंदन केलें. त्यावेळेस आचार्यांची आयुष्यमर्यादा पूर्ण झाली असें जाणून व्यासानीं अणखी सोळा वर्षं आयुष्य दिल्हें आणि सांगितलें कीं, तूं दिग्विजय करून अद्वैत मताचें स्थापन कर. इतकें बोलून सूत्रभाष्याचें पुस्तक प्रसादरूपें आचार्यांच्या हातीं दिल्हें आणि हें तुझें भाष्य अाचंद्रार्क मान्य होईल असा आशिर्वाद देऊन व्यासमुनी अदृश्य झाले.

शंकराचार्य आले त्या काळांत लोकांचे आचार व वैदिक धर्मांची मूळस्थिति किती पालटून गेली होती व जाणत्या लोकांत नवेनवे पंथ कोणकोणते निघाले होते आणि त्यांचे आचार, वेष कसकसे पालटले होते याविषयीं आनंदगिरीनें आपल्या ग्रंथांत एक मोठी मालिका लिहिली आहे. त्यांतील कांहीं घेऊन लिहितों.

कोणी आपल्याला शैव ह्मणवून अंगावर लिंग, त्रिशूल, डमरू यांचें चिन्ह वागवूं लागले, जसे जंगम लोक आणि कोणी आपल्याला वैष्णव ह्मणवून शंख, चक्र, गदा, पद्म यांच्या मुद्रा धारण करूं लागले. तसे सौर ह्मणजे सूर्यभक्त ह्मणविणारे आपल्या अंगावर सूर्यबिंबाची निशाणी असा रक्तचंदनाचा तिलक करूं लागले. कोणी ब्रह्म्याचे उपासक आपल्या हातांत दर्भमुष्टि आणि कमंडलू बाळगूं लागले. तसे अग्निउपासक कांहीं तरी ठिणग्याचें चिन्ह, कोणी दुसऱ्या देवतेचे उपासक अंगांत सोन्याचें डगलें आणि पायाला हळद लावणें असें करूं लागले. कोणी भैरवाचे उपासक भस्म, जटा, आणि तींत स्फटिकाचा केलेला अर्धचंद्र असें चिन्ह, कोणी मल्लारीचे भक्त ह्मणवून गळ्यांत वटमालिका आणि कुतऱ्याचें सोंग घेणें.-कोणी आपल्या दंडावर सुवर्णादि धातूचीं केलेलीं शंख, चक्र, गदा इत्यादि चिन्हें बांधू लागले हे विष्वक्सेनाचे उपासक.—कोणी कालाची उपासना करणारे व संताचा उत्साह करून आपल्या हातांत पुष्पाचें धनुष्य बाळगूं लागले. कोणी जपमाळा चिन्ह.—कोणी इंद्राचे उपासक ह्मणवून आपल्या हातांत मण्यानीं मढविलेला सोटा वज्राप्रमाणें बाळगूं लागले. काळभैरवाचे उपासक आपल्या हातांत मोठा दंड बाळगूं लागले. याप्रमाणें अनेक प्रकारचीं बिरुदें, त्यांतील कित्येक शरीरावर आणि कित्येक आचरणांत आपलीं चिन्हें वागवीत असत. कोणी जलदेवता, मावल्या, ह्मसोबा इत्यादिकांची पूजा करूं लागले. कोणी भूमीची पूजा, कोणी तीर्थयात्राकरून अनेक तीर्थांचीं उदकें कावडींत बाळगूं लागले. कोणी शून्य देवतेची उपासना, कोणी आदिवराहाची

उपासना, कोणी चतुर्दश लोकांची उपासना, कोणी अमावास्या आणि पौर्णिमा या तिथींची उपासना, कोणी आदित्यादि नव ग्रहांची उपासना, कोणी पितरांची उपासना, कोणी कापालिक, क्षपणाक, मुंडमालक इत्यादिमतांचे लोक, कोणी गरुड, वेताळ, शेष, हनुमंत, भद्रकाली, चंद्रकालिका, वराहचामुंडा, चंडभैरव, कालरुद्र, पिचंड इत्यादि कौलिकतंत्रांतील अनेक प्रकारचीं दैवतें यक्ष, राक्षस, भूत, गंधर्व, डाकिनी, शाकिनी, इत्यादि अनेक क्षुद्रदेवता यांचीं बिरुदें बाळगूं लागले.

शेवटीं असें सांगितलें आहे कीं, **एवंमद्यमांसाशिनः सदाएकस्यैवमतस्यभेदषट्कंसमाश्रिताःदुराचाराःसत्यशौचधर्मकर्मज्ञानरहिताःपशवइवद्वैतवादिनःश्रुतिस्मृतीतिहासपुराणभणितकर्मज्ञानरूपमार्गद्वयंपरित्यज्यअपरंतृतीयंपंथानंमूढतात्पर्येणविहिताविहितमविज्ञायसर्वेकुमतशीलाबभूवुः**

मद्यमांसाचें भक्षण करणारे व हिंसाकरणारे होऊन आपल्या मतांतही वेगळे वेगळे पंथ स्वीकारणारे, दुराचारी, सत्य, शौच, ज्ञान, कर्मरहित, पशूंप्रमाणें द्वैतबुद्धि, श्रुतिस्मृतिइतिहासपुराणोक्त मार्गाचा त्याग करून तिसराच पंथ आपल्या मूर्ख समजुतीप्रमाणें काढून सर्वच लोकांनीं वाईट मताचा आश्रय केला.

असो. जे धर्मस्थापक आचार्य आहेत, त्यांनीं सद्धर्मांतून भ्रष्ट झालेल्या लोकांस वाटेवर आणावें हें त्यांचे मोठें कर्तव्य होय. आचार्यांच्या येण्याविषयीं आणि त्यांच्या कृत्याविषयीं जीं भविष्य वचनें होतीं त्यापेक्षांही सहस्रपट अधिक लोकोपकारी महाकृत्यें त्यानीं थोडक्या काळांत केलीं. स्वधर्माचरण, विद्यासंपादन, आणि धर्मरक्षण करण्याचे यत्न, याखेरीज आचार्यांनीं आपला काळ क्षणमात्रही व्यर्थ घालविला नाहीं. पुढें अणखीही कर्तव्यें आहेत तीं पूर्ण करावीं ह्मणून व्यासाची अनुज्ञा झाल्यावर लागलेच तेथून विंध्याचलावरून दक्षिणमार्गानें प्रयागास जायाला

निघाले. तेथें कुमारिलभट्ट हा वैदिक धर्माचा साह्यकारी राहत होता, त्याजकडून आपल्या भाष्यावर वार्तिकें करवावीं असा आचार्यांचा मानस होता. परंतु आचार्य मथागास पोंहचून त्याला भेटायाला गेले तों कुमारिलभट्ट हा पेटलेल्या कोंड्याच्या भट्टींत उभा असतां धुराचा मोठा लोंढा चालला होता. आचार्याला पाहातांच त्याला मोठा आनंद झाला आणि त्यानें आपल्या शिष्यांकरवीं त्यांची पूजा करविली आणि मग लागलेंच आचार्यांनीं त्याला आपलें भाष्य दाखविलें. तें पाहून कुमारिलभट्टानें तत्क्षणींच सांगितलें कीं, यांत आठ हजार वार्त्तिकें होतील असें वाटतें. जर हा अग्निदीक्षा घेतली नसती तर मी वार्त्तिकें केलीं असतीं.

मग आचार्यांनीं त्याला अग्निप्रवेशाचें कारण विचारिलें असतां त्यानें आपलें पूर्ववृत्त सांगितलें कीं, मी एका अर्हता पासून त्याचें शास्त्र शिकलों कारण कीं, ते आपल्या शास्त्रयुक्तीने वेदवचनाचें खंडण करीत असत, याकरितां त्यांच्या शास्त्राचे सिद्धांत कसे काय आहेत ते त्यांजपासून शिकून घेतले. पुढें मीच जैमिनी मताचा अभिमान धरून अर्हतांची कुळें छळून मारिलीं आणि ईश्वराला भ्यालों नाहीं. दुसरें असें कीं, वेद खरे आहेत याचा प्रत्यय दाखविण्यासाठीं मी कड्यावरून बहुत वेळां उड्या टाकिल्या, त्या वेळेस माझ्या मनांत कांहीं संशय वाटत असे त्या योगानें माझा एक डोळा नष्ट झाला. तस्मात् या दोन दोषांच्या निवारणार्थ देहदहनाचें प्रायश्चित मी संकल्पिलें. यावेळीं आपलें दर्शन मोठ्या भाग्यास्तव झालें. माझें शरीर दग्ध होईपर्यंत मुहूर्तमात्र एथें राहा. तेव्हां आचार्यांनीं त्याला ह्मटलें मी तुजवर कमंडलूचें उदक शिंपून पुनः जिवंत करीन. त्या वेळीं कुमारिलभट्ट हा मोठ्या सत्वधीरपणानें प्रार्थना करून ह्मणाला महाराज, तें करायाला आपण समर्थ आहां. परंतु निंद्य देहाचें पुनः उज्जीवन झालें तरी लोकनिंद्यता राहील ह्यास्तव माझा संकल्प पूर्ण होऊं द्यावा. आपल्या मनांत वार्त्तिकें कर्तव्य आहेत तर माहिष्मती पुरांत जा, तेथें माझा शिष्य उर्वेका राहतो. तो

माझ्याच सारिखा आहे. तो सर्व शास्त्रांत पारंगत असून वेदोक्त यज्ञक्रिया यथासांग करितो आणि वैदिक धर्माप्रमाणें त्याचा आचार कडकडीत आहे. त्याच्या स्त्रियें नांव उंबा. ती सरस्वतीचा अवतार आहे. दुर्वासाच्या शापास्तव भूलोकांत अवतरली. उवेंका हा कर्ममार्गाविषयीं मोठा आग्रही आहे. तो अद्वैत मताला अनुकूळ नाहीं ह्यास्तव सरस्वतीला साक्षी ठेऊन मंडणमिश्राचा पराभव कर आणि त्याला अद्वैतमता प्रमाणें उपदेश दे, इतकें बोलून विराम पावला. नंतर आचार्यांनीं त्याला तारक मंत्राचा उपदेश देऊन दोन घटका तेथें राहिले.

मग आचार्य तेथून लागलेच माहीष्मती नगरास जायाला निघाले. मंडणमिश्राचे भेटीस गेले त्यादिवशीं त्याच्या घरीं श्राद्ध होतें ह्मणून सन्यासी आदिकरून अतिथि तेथें येऊं नये ह्मणूनं घराच्या बाहेरलें द्वार बंद होतें, तेव्हां आचार्य योगबलेंकरून अंतराळ मार्गानें त्याच्या अंगणांत अकस्मात् उतरले. तें पाहून मंडणमिश्र विस्मय पावला. तेथं उभयतांचीं शब्द श्लेषाच्या चातुर्यानें उत्तरप्रत्युत्तरें झालीं. त्यांत मंडणमिश्राचा उद्धतपणा जाणून त्याला व्यासानें आणि जैमिनीनें खुणावलें. मग मंडणमिश्रानें त्यांचा पूजासत्कार करून भिक्षेचें आमंत्रण दिल्हें तेव्हां आचार्यांनीं त्याजवळ वादभिक्षा मागितली.

मग उभयतांचा वाद प्रतिज्ञापूर्वक ठरलाकीं, जो आपलें मत स्थापिल त्यानीं दुसऱ्याचें शिष्यत्व करावें. ह्या प्रतिज्ञेच्या वादांत कोणी वरिष्ठ मध्यस्थ असला पाहिजे ह्मणून जैमिनी आणि व्यासमुनि यांनीं मंडणाची स्त्री जी उंबासरस्वती तिची योजना केली. त्यावरून तिचें नांव पुढें उभयभारति असें पडलें. ते दोघेही प्रसन्नमुख आपले आसनावर स्थिर बसून प्रौढरीतीनें परस्परांच्या कोट्या खंडित असत. वाद करतांना कोणालाही कंप किंवा घाम सुटला नाहीं, आणि कोटी सूचेना ह्मणून कोणी आकाशाकडे पाहिलें नाहीं आणि निरुत्तर होण्यामुळें कोणी रागात्रला नाहीं. कर्मेंकरून मुक्तिप्राप्त होते हें मंडण मिश्राचें मत आणि ज्ञानेकरून मुक्ति होते हें आचार्यांचें मत. या वादांत प-

रस्परांनीं प्रमाणें दाखविलीं, असा सात दिवस वाद होऊन शेवटीं आचार्यांचें मत स्थापित झालें.

ही गोष्ट मंडणमिश्रानें आपला गुरु जैमिनी याला जाऊन सांगितली, तेव्हां त्यानें आचार्यांच्याच सिद्धांताला सम्मति दिल्ही; तेणें करून मंडण मिश्राचा संशय फिटला. पुढें सरस्वतीनें आचार्यांला ओळख देऊन ह्मटलें, तूं शिवावतार आहेस हें मी जाणलें तरी मला जिंकल्या वांचून तूं विजयी झाला नाहींस. नंतर सरस्वतीचा आणि शंकराचार्यांचा मोठा अद्भुत वाद झाला. शेवटीं आचार्यांला कोठेंतरी कुंठित करावें ह्मणून प्रश्न केला कीं, कामकला किती आहेत व त्या कोठें व किती दिवस राहतात याचें उत्तर सांग, तेव्हां मात्र आचार्यांनीं महिन्या नंतर उत्तर देईन ह्मणून सांगितलें. मग तेथून आचार्य निघाले. वाटेंत अमरुग राजा मृगया करायाला गेला असतां कांहीं अपघातानें मरण पावला. आचार्यांनीं परकायाप्रवेशविद्येच्या योगानें त्याच्या शरीरांत संचार केला आणि आपलें शरीर शिष्यांच्या संरक्षणार्थ ठेवून आपण राजविलास भोगून कामशास्त्राचा अभ्यास केला. पुढें असें घडलें कीं, राजस्त्रीयांना संशय आला कीं, हा आमचा पति अमरुग राजा मरण पावला असतां कोणी परकायाप्रवेश विद्येंत प्रवीण पुरुषानें त्याच्या शरीरांत प्रवेश करून आह्माबरोबर विलास करीत आहे असें जाणून त्यांनीं आपल्या राज्यांत आज्ञा पाठविली कीं, जेथें कोठें कोणाला प्रेत आढळेल तें जाळून टाकावें. त्या आज्ञे वरून आचार्यांचे शिष्य भयाभित झाले आणि त्यांचें प्रेत दहन करावें ह्मणून अग्नींत ठेविलें. मग आचार्यांनीं लवकर येऊन त्यांत प्रवेश केला आणि तेथें नृसिंहाची स्तुति करून चिताग्नि शमविला. नंतर आचार्य मंडणमिश्राकडे आले तेव्हां उंभासरस्वतीनें आचार्यांशीं कांहीं भाषण करून तेथेंच अंतर्धान पावली. ही गोष्ट त्या वेळच्या लोकांमध्यें मोठी आश्चर्याची घडली. पुढें मंडणमिश्रानें आचार्यांपासून यथाशास्त्र सन्यासदीक्षा घेतली आणि त्यांचें शिष्यत्व करून कृतार्थ झाला. या

गोष्टीची ख्याति सर्वत्र झाली आणि हजारो लोकांनीं आचार्यांचें मत अंगिकारून त्या प्रमाणें वागूं लागले.

आचार्य दिग्विजय करायाला निघाले तेव्हां देशाटन करितांना वेगवेगळ्या पंथाचे महाविद्वान लोक त्यांशीं वाद करायाला आले. ते कोणत्या पंथाचे, व कोठें राहत होते, त्यांचीं चिन्हें व नामें कोणतीं होतीं त्यांची खाली याद लिहितों.

**जंगममती**—त्यांचे भेद. शैव, उग्र, रौद्र, भक्त, जंगम, आणि पाशुपत असे साहा. हे सर्व शिवाचे उपासक. मुद्रा व लिंग यांचे धारण करणारे. रजस्वला, सूतिका, वृद्धि, अशौच यांचे विटाळ व निंद्यानिंद्य हें यांच्या मतांत अगदीं नाहीं. लिंगांक, महाकाल, काल, गणिकापाल, विद्वेषिवीर हीं त्यांचीं नांवें. सेतुबंधरामेश्वराजवळ राहणारे.

**पीठोपासक**—शैवमती जे जंगम त्यांचाच हा एक भेद आहे. हे लिंग, त्रिशूल, डमरु इत्यादिकांच्या तप्तमुद्रा धारण करणारे, आच्छादहीन, सर्वांगावर शुभ्रभस्म आणि अपरिमित रुद्राक्षमाळा घालणारे, पात्रावर वाढलेलें संपूर्ण खावें हा त्यांचा नेम. प्रचंड भैरव, परमत कालानल इत्यादि त्यांचीं नांवें. रामेश्वराकडे राहणारे.

**वैष्णवमती**—भक्त, भागवत, वैष्णव, पांचरात्र, वैखानस, आणि कर्महीन हे त्यांचे साहा भेद. अनंतशयन एथें राहाणारे. कौंडिन्यमुनि, अनंतहृदय, प्रसन्नविष्णु, भद्रपात इत्यादि त्या मताचे प्रख्यात लोक. यांचे पंथ दोन, क्रियापंथ आणि ज्ञानपंथ. त्यांत विष्णु शर्मादि कर्मठ, नामतीर्थ, व्यासदास, आणि ब्रह्मगुप्तादिक हे ज्ञानी. यांत कित्येक तप्तमुद्रा आणि कित्येक चंदनमुद्रा यांचे धारण करणारे आहेत.

**हिरण्यगर्भोपासक**— हे सुब्रह्मण्य क्षेत्र एथील राहणार. हातांत कमंडलू आणि दर्भमुष्टी यांचे धारण करणार.

**अग्निमती**— यांचे पंथ दोन. होत्रावीति आणि कव्यवाहन. अग्नीचें चिन्ह धारण करणारे. हिरे आणि माणकें हीं अग्नीचे अंश आहेत असें जाणून त्यांची पूजा करितात.

**सौर**— त्यांचे पंथ सहा. सौर, प्राभाकर, तापन, मंडळसेवी, कालानुसंधान, आणि भानव; दैवाकर, दिवाकर, भानुवल्लभ आणि कीर्तिमंद्र हे यांतले मतवादी.

**गाणपत्य**— हे गणपुरांत राहणारे. त्यांचे पंथ सहा. महागणपति, हरिद्रागणपति, उच्छिष्टगणपति, नवनीतगणपति, सुवर्णगणपति, आणि संतानगणपति. हे गणपतिमंत्राचा जप आणि वक्रतुंड आणि दंत यांच्या मुद्रा धारण करितात. त्यांतील गिरिजापुत्र, हेरंबनाथ, गणकुमार, ढुंढिराज इत्यादि हे मुख्य उपासक होत.

**शक्तिउपासक**— हे तुळजापुरांत राहणारे. यांची चिन्हें, कपाळी कुंकू आणि बाहूवर सुवर्णाच्या पादुका. त्यांतील त्रैपुर, त्रिपुरकुमार, बिंदुभक्त, पूर्णानंद, पूर्णभाव हे उपासक होत.

**महालक्ष्मी उपासक**— हे कुवलयपुर आणि आदिपट्टन एथील राहणारे. त्यांतील मुख्य भक्त. गंगाकीर्ति, प्रसन्नलक्ष्मी, विलासानंद, आणि आदिजगन्नाथ. यांच्या गळ्यांत पद्माक्ष माळा, कपाळी कुंकुम आणि दंडावर कमळ मुद्रा.

**शारदोपासक**— निगमसावित्र, परागम, सुवाक, सर्ववाक हे यांतले उपासक. पुस्तक, कमल, व पुंड्र यांचे धारण करणारे.

**वाममार्गी**— हे मद्यमांसाचे सेवन करणारे. दुर्गमुनि, अभिषिक्त, व भारती हे यांतले मुख्य उपासक.

**भैरवोपासक**— बटुकनाथ, विश्वरूप, विश्वलय हे यांतील मुख्य उपासक.

**कापालिक**—हे इंद्रप्रस्थ एथील राहणारे. यांचे पंथ सहा चंडभैरव, काळभैरव, संहारभैरव, उग्रभैरव, भीमभैरव, आणि कपालभैरव—त्यांचीं चिन्हें. भस्म, व्याघ्रचर्म, नरकपाल, त्रिशूल आणि मद्यपात्र. हे महाक्रूरकर्मी आणि मनुष्याचा बलि देणारे असे आहेत. बटुकनाथ, भद्रबाहू, असितांग, शबर, अहंमती, दंडजीत इत्यादि यांतले उपासक. कापालिकामध्येंच चार्वाक, क्षपणक, बौद्ध, जैन यांची गणना करितात.

**वायूचेउपासक**—हे ध्वजाचे चिन्ह धारण करणारे.

**निरालंबमती**—हे आकाशाचे उपासक.

**आदिवराहोपासक**—हे वराहाचे चिन्ह धारण करणारे.

**लोकोपासक**—हे शरीरावर चतुर्दश लोकांची मुद्रा धारण करणारे. कालकर्मनामा, कर्मनाम इत्यादि हे यांतील उपासक.

**गुणोपासक**—हे सत्व, तम, आणि रज या तीन गुणांचे उपासक. श्वेत, रक्त, आणि नील असा वेष धारण करणारे. कृतविलास, जीवविलास, लयविलास हे या मार्गांतले उपासक.

**सांख्यमती**—हे चतुर्विंशती तत्वांचे उपासक.

**पिलूपासक**—हे परमाणूला जगत्कारण मानून मरण कालीं पीलवः, पीलवः, पीलवः, असें ह्मणून मोक्ष होतो असें मानणारे. धीरशिव, भट्टशिव, आणि लिंगनाथ हे यांतील मुख्य उपासक.

**कर्मोपासक**—हेअग्निहोत्रादि क्रिया केल्याने मुक्ति होते असें ह्मणणारे. कनकगिरी आणि तुंगनाथ हे यांतील उपासक.

**चंद्रमती**—हे चंद्रोपासक.शिवाभरण आणि ललितगुरु हे यांतील उपासक.

**नवग्रहोपासक**— हे नवग्रहांची दररोज पूजा करितात. अनृण, सुविद्य, कृतविद्य, शर्मिष्ट, कल्माष, आणि क्रूरवदन हे यांतील उपासक.

**कालोपासक**—हे वर्तुळाकार भूगोल निर्माणकरून त्यावरून सूर्यगतीनें कालाचें ममाण परिपूर्ण जाणतात आणि त्याजपासूनच मोक्ष आहे असें मानतात.

**पितरोपासक**—हे पितरांच्या उद्देशानें षण्णवती ह्मणजे शाण्णव श्राद्धें करितात.

**गरुडोपासक**— यांतील उपासक. शंखपाल, कुब्ज, रीढइत्यादि.

**सिद्धमती**—हे मणिमंत्र औषधींच्या योगेंकरून अद्भुत क्रिया दाखविणारे श्रीशैलादिपर्वतावर वास करितात. मारण मोहनादि क्रिया करणारे हे आपल्या मंत्रादिकांच्या योगानें पृ-

थ्वीव्यादिभूतांचा जय करितात, विष, पारद, तैल, कलंक, सोमल यांचें भक्षण करणारे. तसे पुर, नगर व ग्राम यांचा दाह करणारे, वृश्चिक, सर्प, वन्हि, शिला, नक्षत्रें यांची वृष्टि पाडून दाखवतात. स्त्रिपुरुषांला पशूंचे वेष देतात, किमया करितात, सिंह, शरभ, व्याघ्रादिजाति दुष्ट पशूंचे बंधन करितात. नित्यानंद, पराजुंन, चिरकीर्ति हे यांतील मुख्य उपासक.

तसे **कुबेरोपासक, वरुणोपासक, इंद्रोपासक, शेषोपासक** असे अनेक प्रकारचे सर्व मतांचा निरास करून आचार्य काशीक्षेत्रीं येऊन शिष्य पढवित राहिले.

देशाटन करीत असतांना एकेसमयीं आचार्य हे योगबलें करून कैलासपर्वतावर गेले, तेथें शिवपार्वतीची स्तुति केली. तेव्हां शंकरानें त्यांस स्फटिकमय पांच लिंगें दिल्हीं. तीं त्यानीं शिवाच्या आज्ञेवरून भूलोकांत आणलीं. त्यापैकीं एक केदार क्षेत्रांत स्थापिलें, त्याचें नांव मुक्तिलिंग. तेथें पूजेकरितां ब्राह्मणांची नेमणूक करून दिल्ही. मग तेथून कुरुक्षेत्राच्या मार्गानें बद्रिकाश्रमास आले. तेथें नारायणाचें दर्शन करून आचार्यांनीं स्नानाला उष्णोदक मागितलें. तेव्हां देवाच्या पीठापासून उष्णोदकाचा ओघ निघाला, त्यांत आचार्यानीं शिष्यांसहवर्तमान स्नान केलें. त्यापुढें द्वारकादिस्थळें पाहण्याच्या प्रसंगाने दक्षिणेकडून नीळकंठेश्वरास आले, तेथें वरद नामक दुसरें लिंग स्थापिलें. मग अयोध्येवरून गयेस गेले, तेथें चतुर्दश पदाचें दर्शन करून जगन्नाथ मार्गानें श्रीशैलपर्वतावर आले, तेथें मल्लिकार्जुन आणि भ्रमरादेवी यांचें पूजन करीत एक महिनाभर राहिले. मग तेथून शृंगेरीस आले, तेथें तुंगभद्रेच्या कांठीं शास्त्रविधिप्रमाणें सरस्वतीचक्राचें निर्माण करून त्याच्या समोर सरस्वती देवीची स्थापना केली. तेथें स्वतांकरितां एक मठ बांधिला आणि विद्यापीठ स्थापिलें. त्या विद्यापीठावर बारा वर्षेपर्यंत आचार्य राहून बहुत विद्यार्थी पढविले आणि त्यांस भारती संप्रदाय लावून दिल्हा. पद्मपादाचार्याला त्याचा अध्यक्ष नेमून भोगनामक तिसरें लिंग स्थापिलें. मग अहोबळ नामक नरसिंहावताराचें ठि-

काण त्यावरून वेंकटगिरीस गेले. तेथील पुजाऱ्यांमध्यें अद्वैत विद्येचा उपदेश करून लागलेच कांचीनगरास आले. तेथें एंकाम्रेश्वर हें स्वयंभू लिंग आहे. त्या क्षेत्रांत तीन महिने राहिले. तेवढ्या काळांत हीं दोन महत्कृत्यें केलीं कीं, शिवकांची आणि विष्णुकांची हीं दोन नगरें शंकूसूत्राच्या आंखणीसहित पहिल्यापासून नवीं निर्मिलीं. त्यांत शिवकांची याची रचना शास्त्रविधिप्रमाणें यंत्राकार केली आहे. विष्णुकांची ही त्याच्या पूर्वेस आहे. तेथें वरदराज नामक विष्णूचें महास्थान आहे.

पूर्वी सांख्यायन ऋषी कामाक्षीची उपासना करीत होता. तिची मूर्त्ति गुहेमध्यें होती. ती आचार्यांनीं गुहे बाहेर आणून शिवकांची एथें स्थापिली आणि तेथें आपल्याला राहण्याजोगता मठ बांधून सुरेश्वराचार्य नामक शिष्याची स्थापना केली आणि योग नामक जें चवथें लिंग त्याची पूजा करावी असी आज्ञा देऊन त्याच्या स्वाधीन केलें.

याप्रमाणें आचार्यांनीं दिग्विजय केल्यानंतर सहा प्रकारचें शैवमत, वैष्णवमत, सौरमत, गाणपत्यमत आणि शक्तिमत यांची यथायोग्य स्थापना करून शेवटीं सुरेश्वराचार्याला बोलावून पांचवें मोक्ष लिंग त्याच्या स्वाधीन केलें आणि तें चिदंबरेश्वरास पाठवावें ह्मणून आज्ञा दिल्ही.

आचार्यांच्या समाधिस्थ होण्याविषयीं पुष्कळ वेगळालीं मतें आहेत. कोणी ह्मणतात कीं, ते सरस्वतीच्या शापास्तव कर्नाटक देशांत समाधिस्थ झाले. कोणी ह्मणतात कांची नगरामध्यें. माधवकृत शंकरविजय ग्रंथांत बद्रिनारायणास आचार्य गेले त्यावेळीं स्वर्गातील सर्व देवांनीं येऊन त्यांस देहासहित विमानांत बसवून कैलासपर्वतावर नेलें असें वर्णन आहे.

**मठाम्नाय** नामक आचार्यकृत एक लहान ग्रंथ आहे, त्यांत त्यांनीं आपल्या मठांची व्यवस्था फार चांगली लिहिली आहे.

॥ प्रथमःशारदोविद्यात्गोवर्धनोद्वितीयकः ॥
॥ जोशीमठःस्तृतीयस्यात्शृंगेरीतिचतुर्थकः ॥
॥ सुमेरुःपंचमःप्रोक्तःपरमात्माचषष्ठकः ॥
॥ सहस्त्रारकजोनामसप्तमःपरिकीर्तितः ॥

**शारदामठ—** हा द्वारकेमध्यें आहे. तेथील संप्रदायाचें नांव कीटवार. देवता सिद्धेश्वर. आचार्य विश्वस्वरूप आणि तीर्थ गोमति.

**गोवर्धन मठ—** हा जगन्नाथामध्यें आहे. संप्रदाय भोगवार. देवता जगन्नाथ. आचार्य पद्मपाद. तीर्थ महोदधि.

**जोशीमठ—** हा बद्रिकेमध्यें आहे. संप्रदाय आनंदवारी देवता नारायण. आचार्य नरत्रोटक. तीर्थ आलकनंदा.

**श्रृंगेरीमठ—** हा शृंगेरीमध्यें आहे. संप्रदाय भूरीवारि. देवता आदिवाराह. आचार्य पृथ्वीधराचार्य. तीर्थ तुंगभद्रा.

**सुमेरुमठ—** हा काशींत आहे. संप्रदाय काशी. देवता निरंजन. आचार्य मायादेवीश्वर. तीर्थ मानससरोवर.

**परमात्ममठ —** संप्रदाय सत्यतोष. देवता मानसीमाया. आचार्य चेतनाचार्य. तीर्थ त्रिकुटी.

**सहस्त्रारकजमठ—** संप्रदाय सच्छिष्य. देवता विश्वरूप. आचार्य सद्गुरु. तीर्थ सच्छास्त्रश्रवण.

आचार्यांनीं दशविध सन्यासाची स्थापना केली. त्यांचीं नांवें.

॥ तीर्थाश्रमवनारण्यगिरिपर्वतसागराः ॥
॥ सरस्वतीभारतीचपुरीनामयतेर्दश ॥
॥ नमस्कारप्रियोभानुर्जलधाराप्रियःशिवः ॥
॥ उपकारप्रियोविष्णुर्ब्राह्मणाभोजनप्रियाः ॥

पूर्वीं आचार्यकृत ग्रंथांचीं कांहीं नांवें लिहिलीं. त्याखेरीज अणखीही जे त्यांचे ग्रंथ आमचे ऐकण्यांत आले त्यांचें संक्षेपानें वर्णन करितों.

**प्रबोधसुधाकर**— ह्यांत भक्ति, ज्ञान, आणि वैराग्य यांचें निरूपण केलें आहे. याचीं प्रकरणें एकंदर पंधरा आहेत.

**संक्षेपशारीरक**— याची रचना श्लोकरूप असून सूत्रभाष्याचा संक्षेप आहे.

**उपदेशसहस्री**— हा वेदांतशास्त्रावर स्वतंत्र ग्रंथ आहे, यांत हजार प्रकारांनीं ज्ञानाचा उपदेश केला आहे.

**अध्यात्मप्रकाशिका शतश्लोकी**— यांत अध्यात्मविषय वर्णिला आहे.

**सौंदर्यलहरी**— यांत पार्वतीचें पादादिकेशांत शंभर श्लोकांत वर्णन केलें आहे. हिजवर **विद्वन्मनोरमा** व दुसऱ्या पुष्कळ टीका आहेत.

**न्यायकुसुमांजली**— हिजवर वरदराज यानें टीका केली आहे. तींत पूर्वपक्ष आणि सिद्धांत यांचें निरूपण असून द्रव्य, गुण, कर्म, सामान्य, विशेष, समवाय, आणि अभाव ह्या सप्तपदार्थांचें निरूपण व जीवात्मा व परमात्मा यांची भेदसिद्धि इत्यादि विषय आहे.

**अमरुशतक**— यांत साहित्यशास्त्रांतलें नायक नायिकादि व अवांतर पदार्थ यांचे संक्षेपानें शास्त्रार्थ बांधिले आहेत. ह्यावर दोन टीका आहेत. त्यांपैकीं एकीचें नांव **श्रृंगाररसदीपिका**. ही दिवभूपाल यानें केली. हींत संपूर्ण श्लोक वेदांतपर लाविले आहेत. दुसऱ्या टीकेंत यथाश्रुत अलंकारांचीं उदाहरणें व नायिका भेद याच अर्थावर लाविले आहेत. या दोनही टीका बंगाल्यांत छापिल्या आहेत.

**वेदांतपरिभाषा**— यांत वेदांत शास्त्राचीं मूळतत्वें सांगितलीं आहेत. वेदांत. शास्त्राचें अध्ययन करणारे हा ग्रंथ पहिल्यानें ह्मणत असतात.

**कामाक्षी अष्टक**— हें कामाक्षि देवीच्या स्तुतिपर अष्टश्लोकी गीत आहे.

**नक्षत्रमाला**— हा सत्तावीस श्लोकात्मक ग्रंथ चंद्रमौळेश्वर आणि वेंकटेश्वर या देवांच्या स्तुतिपर आहे.

**ललितास्तवराज**— हा पार्वतीच्या स्तुतिपर ग्रंथ आहे.

**शिवमानसपूजा**— यांत शिवाची मानसपूजा रचिली आहे.

**शिवसर्वोत्तम**— हा सुभाषित ग्रंथ शिवाच्या स्तुतिपर आहे.

**विष्णुसहस्रनामभाष्य**— यांत प्रत्येक विष्णूच्या नामाचा अर्थ लिहिला आहे.

तसेच **तत्वानुसंधान, अद्वैतकौस्तुभ, वेदांतमुक्तावली, शिवस्तोत्र** इत्यादि.

## जयदेवस्वामी.

या कवीचा उदय कालिदासाच्या पूर्वी झाला. कारण यानें केलेलें **गीतगोविंद** विक्रमादित्याच्या सभेंत गात असत. हा आपल्या लहानपणीं गुरुजवळ पंधरादिवसांचा पाठ एकदाच घेत असे, त्यावरून याचें दुसरें नांव पक्षधरमिश्र असें पडलें. जगन्नाथ क्षेत्राजवळ किंदुबिल्व या नामें एक गांव आहे तेथें हा जन्मला. मिश्र या नांवावरून तो कान्यकुब्ज जातीचा ब्राह्मण असावा असें लोकांचें अनुमान आहे. हा विष्णुभक्त होता यावरून संतमाळिकेंत याची गणना केली आहे. याच्या ग्रंथाची वाणी फार कोमल असून शृंगार आणि करुणा या दोन्हीं रसानीं पूर्ण आहे. **प्रसन्नराघव** या नांवाचें एक सुंदर नाटक यानें केलें, त्याचे सात अंक आहेत. त्यांत कवीनें वीर, शृंगार, आणि करुण हे रस फार चांगले साधले आहेत. शब्दालंकार आणि अर्थालंकारही पुष्कळ ठिकाणीं आहेत, परंतु अर्थालंकारावर ह्या कवीचें लक्ष्य विशेष दिसतें. त्यामध्यें सीतास्वयंवरापासून रावणाचा वध करून रामचंद्र सीतेला घेऊन अयोध्येस परत आले एथपर्यंत रामचरित्र वर्णिलें आहे. दुसरा **गीतगोविंद** या नांवाचा गद्यपद्यात्मक एक ग्रंथ केला. त्यामध्यें अष्टपदीचालीवर राधाकृष्णाचा विलास वर्णिला आहे.

गीतगोविंद हा ग्रंथ रचित असतां एके दिवशीं असें झालें कीं, एकास्थळीं राधेचें वर्णन योग्यरीतीनें कसें करावें हें त्यांला सुचेना. तेव्हां तो ग्रंथ तसाच ठेऊन जयदेव स्नानास गेले असतां साक्षात् श्रीकृष्णानीं येऊन तो विषय पूर्ण केला. त्यानंतर जयदेवस्वामीनीं येऊन पाहिलें तों तें प्रकरण पूर्ण लिहिलें आहे त्यावरून जयदेवस्वामीस फार विस्मय झाला.

त्या अष्टपद्या कर्नाटक देशांतील गाणारे अनेक तालांत अनेक रागांत फार मनोरंजक गात असतात. **कुवलयानंदाच्या मूळ कारिका** जयदेवस्वामीनीं केल्या. त्याशिवाय न्यायशास्त्रप्रकरणीं कांहीं ग्रंथ केले आहेत. भक्तिविजयांत या कवीच्या दोनचार गोष्टी चमत्कारिक वर्णिल्या आहेत. याच्यावेळीं जगन्नाथ क्षेत्रांत सात्विक या नांवाचा एक राजा होता. त्यानें जयदेव स्वामीनीं केलेल्या तुलनेचें कांहीं कवन रचून त्याच्या प्रती लिहवून लोकांत वाटून दिल्या, आणि तें लोकानीं पाठ करावें ह्मणून आज्ञा केली. त्यावरून क्षेत्रांतील ब्राह्मणानीं स्पर्द्धा करून छळ केला. त्यावेळीं दोन ग्रंथ श्रीजगन्नाथा समोर ठेऊन द्वार बंद करून संकेत ठरविला होता कीं, जो ग्रंथ देवास आवडता होईल तो देव आपल्या जवळ ठेवील, दुसरा टाकून देईल. त्याप्रमाणें राजाचा ग्रंथ देवानें टाकिला असतां जयदेवस्वामीनीं देवाची प्रार्थना करून त्याचे श्लोक आपल्या ग्रंथांत घेतले आणि त्याजवर देवाचा आशीर्वाद मागितला.

एकदां जयदेवस्वामी कोणीएका सावकाराजवळून गुरुदक्षिणा घेऊन गावीं जात असतां चोरांनीं वाटेंत गांठून सर्व द्रव्य लुटिलें आणि स्वामीचे हात पाय तोडून रानांत खांचेंत टाकिलें. त्यानंतर उत्कल देशाचा क्रौंच नामें राजा त्या वाटेनें जात असतां स्वामीची असी अवस्था पाहून त्यांस घरीं आणून ठेविलें आणि स्वतां त्यांची सेवा चाकरी करूं लागला. त्या नंतर ईश्वर कृपेनें जयदेवस्वामीचे हात पाय पूर्ववत् झाले.

जगन्नाथक्षेत्रीं कोणी एक अग्निहोत्री ब्राह्मण राहत होता, त्यांला फार रूपवती एक कन्या झाली तिचें नांव पद्मावती. ती

जगन्नाथास अर्पण करावी असा ब्राह्मणाचा बेत होता. परंतु स्वप्नांत त्याला दृष्टांत झाला, त्यावरून त्यानें आपली कन्या यथा योग्यविधि लग्न करून जयदेवास दिल्ही. ती फार पतिव्रता आणि श्रीकृष्णाची भक्ति करणारी असे. जयदेवस्वामी ज्या राजाच्या पदरीं होते त्या राजाचा मेहुणा मरण पावला आणि त्याची स्त्री सती गेली. असी गोष्ट झाली असतां जयदेवस्वामीची स्त्री सहजावृत्या असें ह्मणाली कीं, पतीचें मरण श्रवण करतांच तत्क्षणी देह विसर्जन करावा, पतिबरोबर गमन करण्याचें प्रयोजन नाहीं.

ही गोष्ट त्या राजाच्या बायकोनें आणि इतर स्त्रियांनीं ऐकून त्यानीं पद्मावतीची परीक्षा पाहिली. जयदेवस्वामी बाहेर गेले असतां त्यांला रानांत वाघानें मारिलें असी खोटी बातमी पद्मावतीला कळविली. त्यावेळी पद्मावतीनें लागलाच देह त्याग केला. नंतर जयदेवस्वामी घरीं आल्यावर ती गोष्ट राजाला समजली. त्यानंतर राजा आपल्या स्त्रीच्या अपराधावरून प्राणत्याग करायास प्रवृत्त झाला असतां जयदेवस्वामीनीं आपल्या स्त्रीच्या प्रेताजवळ बसून अष्टपद्या गायिल्या आणि श्रीकृष्णाची प्रार्थना केली तेव्हां ती पूर्ववत् जिवंत झाली!

कलिंग देशांत श्रीकृष्णाचा वार्षिक उत्साह होत असतो, तेथें गीतगोविंद व अष्टपद्या गाऊन सारीरात्र जागरण करण्याची चाल आहे. सर उलियम जोन्स साहेब यानें इंग्लिशांत गीतगोविंदाचा शब्दशः अर्थ घेऊन भाषांतर केलें आहे.

## कालिदास.

या कवीच्या कीर्त्तिविषयीं दंतकथा पुष्कळच आहेत. परंतु यानें केलेल्या काव्य नाटकादि ग्रंथांवरून व त्याच्या लौकिकावरून या कवीचें थोडेसें वर्णन आह्मी करितों.

हा विक्रमादित्याच्यावेळीं होता, याविषयीं एक प्रमाण आहे तें येणेंप्रमाणें.

धन्वंतरिक्षपणकामरसिंहशंकु वेतालभट्टघटखर्प-
रकालिदासाः ॥ ख्यातोवराहमिहिरोनृपतेःसभा
यां रत्नानिवैवररुचिर्नवविक्रमस्य ॥

भोजप्रबंधावरून तर भोजाच्या सभेंतहीं एक विख्यात कालिदास होता असें स्पष्ट आहे. याप्रमाणें कालाच्या अंतरावरून हे दोघेही कालिदास नांवाचे कवि झाले. परंतु त्यांच्या ग्रंथांत तारतम्य आढळतें, यावरून **शकुंतलानाटक**, **रघुवंश**, व **कुमारसंभव** हीं महाकाव्यांतील दोन काव्यें, व **विक्रमोर्वशी नाटक** हे ग्रंथ विक्रमादित्याच्या वेळच्या कालिदासानें केले असें सिद्ध होतें. याखेरीज **नळोदय**, **भोजप्रबंध**, **भोज चंपू**, **रामायणचंपू** वगैरे जे कालिदास नामानें अंकित ग्रंथ आढळतात ते अर्वाचीन कालिदासानें केलेले आहेत, असें विद्वान लोक मानतात.

हा नामांकित कवि लोक व्यवहारांत उत्कृष्ट मतीचा चतुर होता, त्यामुळें राजदरबारांत व लोकांत याची प्रख्याति विशेष वाढली. याची कवित्वशक्ति अद्भुत होती असें नव्हे, पण कविसंप्रदाय संरक्षण करण्याविषयीं याची दृष्टि फार सूक्ष्म असे, ह्मणून मर्यादिक कविवर्गांत याचें नांव प्रथम गणितात. त्याच्या वर्णनाविषयीं असा एक श्लोक आहे कीं,

॥पुराकवीनांगणनाप्रसंगे कनिष्ठिकाधिष्ठितकालिदासाः॥
॥अद्यापितत्तुल्यकवेरभावादनामिकासार्थवतीबभूव ॥

अर्थ—पूर्वीं कवींच्या गणना प्रसंगीं प्रथमतः कालिदासाचें नांव घेऊन अंगुलीनें गणिलें, त्यानंतर त्याच्या मतीचा दुसरा कवि मोजावा असा कोणीच नाहीं ह्मणून दुसऱ्या अंगुलीचें नांव अनामिका पडलें हें सार्थकच आहे.

यावरून तो सर्व कविवर्गामध्यें उत्कृष्ट होता असें नव्हे, परंतु तो आपल्या चातुर्यादिगुणे करून एवढ्या लोकप्रख्यातीस आला. त्यानें आपल्या बुद्धीचें संपूर्ण सर्वस्व शकुंतला नाटका-

दिग्रंथांत ओंतलें आहे. ज्या कित्येक इंग्लिश विद्वानांनीं संस्कृत विद्येंत बहुत अभ्यास केला त्यानींही या कवीस बहुमान दिल्हा आहे. सरविलीयम जोन्स साहेब हा तर असी-साक्ष देतो कीं, जसा आमच्या लोकांत शेकस्पीयर नामें एक विख्यात कवि होऊन गेला, त्याप्रमाणें हा हिंदुस्थानांतला शेकस्पीयरच होय.

अणखीही कालिदासकृत जे ग्रंथ आढळतात ते येणेंप्रमाणें. **शृंगारतिलक, प्रश्नोत्तरमाला, घटखर्परकाव्य, असज्जनवर्जन, ऋतुसंहार, मालविकाग्निमित्रनाटक, श्रुतबोध, मेघदूतकाव्य, विक्रमोर्वशीनाटक, हास्यार्णवनाटक, कर्पूरमंजरी**, इत्यादि. मेघदूत या काव्यांतील कथा असी आहे कीं, यक्षानीं एक वर्षपर्यंत कुबेराला अलकापुरींतून हाकलून दिल्हें होतें. तेव्हां त्यानें एका मेघाला आपल्या स्त्रियेकडे निरोप सांगण्यास पाठविलें. या काव्याचे श्लोक फार सुरस आहेत. याचे उच्छ्वास दोन आहेत. तसें **श्यामलादंडक** या नांवाचें एक स्तोत्र रचिलें आहे, त्यांत शक्तीची प्रार्थना केली आहे.

प्रोफेसर विलसन साहेबानें शकुंतला व विक्रमोर्वशी ह्या दोन नाटकांचे व मेघदूत काव्याचें इंग्रेजी भाषेंत उत्तम मर्तीचें भाषांतर केलें आहे. तसें जर्मन देशांतील विद्यार्थी आडालफस फ्रेडरिक स्टेन्झलर नामें साहेबानें रघुवंश आणि कुमारसंभव ह्यांवर लाटिन भाषेंत टीका केली आहे. विवाहकालीं ह्मणण्याकरितां कालिदासानी **मंगलाष्टक** केलें आहे, तें ज्योतिषी गाऊन ह्मणत असतात.

## अमरसिंह.

याला कोणी अमरदेव असेंही ह्मणतात. हा नामांकित कवि विक्रमादित्याच्या वेळेस होता. कारण कीं, त्याच्या सभेंतील श्रेष्ठ पंडितांत याचें नांव गणिलें होतें. हा जैनमती होता किंवा जैन मताचा यानें पक्ष धरिला, या गोष्टीविषयीं संशय आहे. पण सिंह या नांवावरून तो जैनमती होता असें दिसतें. त-

सें अमरग्रंथाच्या आरंभीं मंगलही जैन संप्रदायाचें दिसतें पण तो जैनमती होता ह्मणून पंडित मानीत नाहींत. यानें पुष्कळ ग्रंथ केले होते, परंतु असें सांगतात कीं, उदयनाचार्य आणि शंकराचार्य यानीं पाखंडी ग्रंथांबरोबर याचेही ग्रंथ बुडविले. पण त्यानें केलेला **अमरकोश** मात्र लोकोपयोगी ह्मणून ठेविला. अमरकोशांत काळाविषयीं दाखला नाहीं, तरी अमरसिंह हा कोशाचा आद्यरचक ही गोष्ट सर्व मान्य आहे. अमरकोश हा अग्निपुराणांतील नामांचा संग्रहकरून प्रकरणबद्ध रचिला आहे. त्याचीं तीन कांडें असून श्लोक १५०० आहेत.

अमरावर पुष्कळ पंडितानीं टीका केल्या आहेत. क्षीरस्वामी, रामाश्रम, रायमुकुट, भरतमाल, नीळकंठ, भानुदीक्षित, रुद्रभट्ट, नारायणचक्रवर्ती, बोपालित इत्यादि. तसी अच्युतोपाध्याय यानें **वैख्यशुद्धी** यानावें टीका केली आहे. ही टीका मुकुटकृत व्याख्येच्या संक्षेपरूपें आहे. ही बंगाल्यांत सुपद्मनाभदत्त यानें केलेलें **सुपद्म** या नांवाचें व्याकरण जागोजागीं पढवितात त्याला अनुसरून रचिली. याशिवाय मथुरेश पंडिताची **सारसुंदरी** या नांवाची टीका व **अमरवृत्ती** व महादेव वेदांती यानें **बुधमनोहरा** या नांवाची टीका केली आहे. व आलीकडे कोलब्रुक साहेबानें इंग्लिशांत व मराठींत बाळबोध टीका केली आहे.

## वररुचि किंवा कात्यायन.

हा नामांकित कवि शालिवाहन शकाच्या पूर्वीं १२५ वर्षांवर झाला. यानें बाळभाषेवर अकराशें सूत्रें रचिलीं आणि त्यांला **प्राकृतप्रकाश** असें नांव दिल्हें. या ग्रंथाचीं प्रकरणें १२ आहेत. त्यांचीं नामें अज्विधि, अयुक्तवर्णविधि, युक्तवर्णविधि, संकीर्णविधि, लिंगविभक्त्यादेश, सर्वनामविधि, तिङ्.विधि, धात्वादेश, निपातसंज्ञाविधि, पैशाचिक, मागध्याख्य, आणि शौर-

सेनीलक्षण असीं आहेत. यासूत्रांवर **मनोरमावृत्ति** या नांवाची व्याख्या भामह यानें केली आहे.

कात्यायन हें वररुचीचें दुसरें नांव. त्याच नांवानें पाणिनी सूत्रावर याचीं **वार्त्तिकें** प्रसिद्ध आहेत. **सिंहासनबत्तीशी** हा आख्यायिका ग्रंथ संस्कृत भाषेंत यानेंच केला, असें ह्मणतात. या शिवाय अणखीही त्याचे पुष्कळ ग्रंथ असतील. त्या पैकीं **प्रयोगविवेकसंग्रह** या नांवाचा ग्रंथ केला आहे. व्यावहारिक भाषणांत रूढिसिद्ध जसीं वाक्यें व प्रयोग इत्यादि कर्णप्रिय व समर्पक होतात त्यांचा यांत संग्रह केला. हा व्याकरणग्रंथ संस्कृत वाग्व्यवहार करण्यास उपयोगी आहे.

याची जन्मकथा बृहत्कथेच्या आरंभीं लिहिली आहे कीं, पुष्पदंत नामा कोणी शिवभक्त गंधर्व, त्याला कारण परत्वें दुर्गेचा शाप झाला ह्मणून या भूलोकांत अवतरला. त्याजविषयीं श्लोक येणेंप्रमाणें.

॥ एकश्रुतधरोजातोविद्यांवर्षादवाप्स्यति ॥
॥ किंचव्याकरणंलोकेप्रतिष्ठांप्रापयिष्यति॥
॥ नाम्नावररुचिर्लोकेतत्तदस्मैप्ररोचते ॥
॥ यद्यद्वरंभवेत्किंचिदित्युक्त्वावागुपारमत् ॥

अर्थ—तो एकदां श्रवण केल्यानें विद्याधारण करणारा होईल, आणि वर्षनामक कोणी साधारण ब्राह्मण यापासून त्याला विद्या प्राप्त होईल आणि लोकांमध्यें तो व्याकरणाची स्थापना करील व ज्याज्या चांगल्या गोष्टी आहेत त्या याच्या योगानें लोकांत प्रसिद्धीस येतील. त्यावरून त्याचें नांव वररुचि असें पडेल.

त्याप्रमाणें ज्या कवीला वररुचि किंवा कात्यायन असें ह्मणतात तो या पृथ्वींत भ्रमण करीत असे. त्याविषयीं श्लोक

॥ ततःसमर्त्यवपुषापुष्पदन्तःपरिभ्रमन् ॥
॥ नाम्नावररुचिःकिंचकात्यायनइतिश्रुतः ॥

भोजराजाच्या दरबारांतही वररुचि यानांवानें प्रसिद्ध एक म-

नुष्य होता, पण तो केवळ राजाचा पुरोहित असे. त्यानें कांहीं ग्रंथ केले असें ऐकण्यांत नाहीं.

---

## भर्तृहरी.

हा व्याकरण शास्त्राचा पुरातन ग्रंथकार विक्रमादित्याचा वडील भाऊ. हा शालिवाहन शकाच्या सुमारें १३५ पूर्वी उज्जनीस राज्य करीत होता. यानें पातंजल महाभाष्यावर व्याख्यान रूपें एक लक्ष **कारिका** रचिल्या. भर्तृहरी प्रमाणें प्रगल्भ व्याकरणी थोडकेच आहेत. महाभाष्याचा टीकाकार जो कैयट त्यानें ह्या कारिकांचा आश्रय धरून **भाष्यप्रदीप** या नांवाची टीका केली. ह्या टीकेच्या आरंभीं कैयटानें असें ह्मटलें आहे कीं, भाष्यग्रंथ हा समुद्रासारिखा अतिगंभीर आणि मी अल्पमति तथापि हरिकृत कारिकासेतूच्या आश्रयानें भाष्याब्धितरून जायाला इच्छितों. कैयटानें टीका केल्यावर त्या कारिका बहुधा लोपल्या. त्यांतील कांहीं वेचें कौस्तुभ आणि वैयाकरणभूषण इत्यादि अर्थ विचाराच्या ग्रंथांत आढळतात. त्या कारिकांस **हरिकारिका** असें ह्मणण्याची रूढि आहे. **वाक्यप्रदीप** हा अर्थविचारात्मक प्रख्यात ग्रंथ भर्तृहरीनेंच केला. **राहटकाव्य** ह्मणून २२ श्लोकांचा एक लहान ग्रंथ आहे तो यानेंच केला.. त्यांत व्याकरण शास्त्राचे आणि अलंकाराचे नेम बांधून रामावताराची कथा संक्षिप्त वर्णिली आहे. दंतकथेवरून याच्या चमत्कारिक गोष्टी पुष्कळ ऐकतों. त्यावरून ही गोष्ट खरी आहे कीं, भर्तृहरीमध्यें विद्या, वैराग्य, आणि राज्यलक्ष्मी या तिन्ही गोष्टी उत्कृष्टपणानें राहिल्या. हा महाउदार, बुद्धिमान, आणि फार सुरूप होता. आणि स्वभावानें हा मोठा विलासी पुरुष असे. याला लहानपणापासून योगी, तपस्वी अशा लोकांची मैत्री करण्याचा छंद होता. चर्पटिनाथ या नांवाचा

कोणी योगी होता त्यानें भर्तृहरीला योगसंप्रदायाचा उपदेश दिल्हा.

एकदां कोणीएका सिद्धपुरुषानें येऊन भर्तृहरीला एक प्रसादिक दिव्य फळ दिल्हें, तें त्यानें आपली पट्टराणी जी पिंगळा तिच्याजवळ देऊन ठेविलें. या गोष्टीला कांहीं दिवस लोटल्यावर असें घडलें कीं, तें फळ एका दासीनें राजाला आणून दिल्हें. तेव्हां राजा चकित होऊन ह्मणाला हें फळ तुझ्या हातीं कोठून आलें? मग राजाला कळलें कीं, तें पिंगळेनें परपुरुषाला दिल्हें. मग तें फळ कोणाच्या हातीं न देतां राजानें स्वतां भक्षिलें आणि त्या योगानें तो जरामरण रहित होऊन आजपर्यंत विद्यमान आहे असें ह्मणतात. असो पिंगळेच्या अविश्वासावरून त्याला कडकडीत वैराग्य प्राप्त झालें आणि ह्मणाला कीं, अहो,

॥ यांचिंतयामिसततंमयिसाविरक्तासाप्यन्यमिच्छतिजनंसजनोन्यसक्तः ॥ अस्मत्कृतेचपरितुष्यतिकाचिदन्याधिक्तांचतंचमदनंचइमांचमांच ॥

अर्थ— जिला मी संतत मनांत वागवितों ती मजविषयीं विरक्त असून दुसऱ्याला इच्छिती, तोही दुसरीसी आसक्त आहे आणि माझ्यावरही तिसरीच संतुष्ट आहे. तस्मात् त्या स्त्रीला आणि त्या पुरुषाला, मला आणि ह्या माझ्या स्त्रीला व कामवासनेला धिक्कार असो.

त्यानंतर भर्तृहरीनें आपल्या गादीवर विक्रमाला बसवून आपण लागलाच अरण्यांत गेला, आणि तेथें सिद्ध, योगी, तपस्वी यांच्या बरोबर तापस वृत्तीनें राहिला. भर्तृहरीची काव्य वाणी फार सुरस आणि कोमल आहे. त्यानें आपल्या वैराग्यस्थितींत असतां उपदेशपर तीन शतकें रचिलीं. त्यांत वैराग्य, शृंगार, आणि नीति यांचें वर्णन आहे. त्यानें वैराग्याची प्रशंसा करून ह्मटलें आहे कीं,

भोगेरोगभयंकुलेच्युतिभयंवित्तेनृपालाद्भयं ॥ मानेदै
न्यभयंबलेरिपुभयंरूपेतरुण्याभयं ॥ शास्त्रेवादभयंगु
णेखलभयंकायेकृतांताद्भयं॥सर्वंवस्तुभयान्वितंखलुनृ
णांवैराग्यमेवाभयं ॥

अर्थ—स्पष्टच आहे कीं, भोगास रोगाचें भय, मोठ्या कुळाला भ्रष्ट होण्याचें भय, द्रव्याला राजाचें भय, अभिमानाला दारिद्र्याचें भय, बलास शत्रूचें भय, रूपाला स्त्रीचें भय, शास्त्राला वादभय, गुणाला दुर्जनभय, आणि शरीराला मृत्यूचें भय. याप्रमाणें सर्व वस्तु सभय ह्मणजे विनाशी असतां केवळ वैराग्याला मात्र कोणाचें भय नाहीं.

भर्तृहरी हा अरण्यांत राहिला असें ऐकून चर्पटीनाथ हे त्यांजकडे वारंवार जात असत आणि त्यावेळीं गोरक्षनाथ आणि मच्छेंद्रनाथ हे विद्यमान होते. त्यांविषयीं असी गोष्ट सांगतात कीं, एकुदा भर्तृहरी हा पिंगळेची आठवण करून कांहींसा व्याकुळ दिसला. त्यावेळेस त्याचें वैराग्य स्थिर करावें ह्मणून गोरक्षनाथानीं आपल्या सिद्धाईच्या बळानें शंभर पिंगळा त्याच्या समोर आणून उभ्या केल्या आणि सांगितलें कीं, यांतून तुझी पिंगळा कोणती असेल ती ओळखून घे. त्यानंतर राजानें तें गुरूचे विलक्षण माहात्म्य जाणून विषय वासना सोडिल्या.

## गोरक्षनाथ.

याचा जन्म फार चमत्कारिक वर्णिला आहे. एके समयीं मच्छेंद्रनाथ हे आपल्या रीतिप्रमाणें भिक्षेला निघाले असतां एका सावकाराच्या अंगणांत उभे ठाकले. तेव्हां सावकाराचे स्त्रीनें त्याची तेजःपुंज व भव्यमूर्ति पाहून हा कोणीतरी सिद्ध पुरुष असावा असा तर्क केला. तिनें भिक्षा घालून विनंती केली कीं, प्रपंचांत मला सर्व अनुकूलता आहे परंतु पुत्र संतान नाहीं. तेव्हां मच्छेंद्रनाथानी भस्म मंत्रून सांगितलें कीं, हें भक्षणकर ह्मण-

जे तुला पुत्र होईल पण ही गोष्ट कोणाला सांगूं नको. इतकें बोलून नाथ मार्गस्थ झाले. पुढें ही गोष्ट सावकाराच्या स्त्रीनें आपल्या मैत्रीणीला सांगितली. तेव्हां तिनें तें भस्म टाकून द्यावें ह्मणून मसलत दिल्ही. कारण असले चेटकी भोंदू यांच्या योगानें प्रपंचात अनर्थ घडत असतात. मग तें भस्म तिनें आपल्या घराशीं खळी खणून पुरून टाकलें. त्या गोष्टीला बहुत वर्षे लोटल्यावर पुनरपि नाथाची स्वारी सहजानुसार त्या सावकाराचे घरीं आली आणि त्या स्त्रीला पाहून आठवण होतांच विचारलें कीं, आह्मी भस्म दिल्हें होतें तो तुझा पुत्र कोठे आहे. तेव्हां तिनें भयाभीत होऊन आपण केलेलें खरें वर्तमान सांगितलें. नंतर नाथानीं भस्म पुरलें होतें त्या ठिकाणीं जाऊन "आलक्ष" असे शब्दांनी पुकारून हाक मारली. तेव्हां सावकाराची स्त्री समक्ष पाहत असतां जमीनींतून बारावर्षांचा सुंदर मुलगा बाहेर आला. पुढें नाथानीं त्याचें नांव गोरक्ष असें ठेवलें, आणि त्याला आपल्या समागमें तीर्थ यात्रेस घेऊन गेले. गोरक्षानें आपल्या गुरूवर पराकाष्ठेची निष्ठा ठेवली होती.

एकदां भिक्षेंतील कांहीं पदार्थ गुरूला विशेष आवडतो असें पाहून त्याच पदार्थाची भिक्षा मागूं लागला. तेव्हां विनोदानें तुझा एक डोळा दे ह्मणजे आह्मी भिक्षा घालूं, असें ह्मटलें असतां यानें खराखुराच आपला डोळा उपटून काढला आणि आपल्या गुरूला जो इष्ट पदार्थ होता त्याची भिक्षा घेऊन एक डोळा हातानें दाबून गुरु पुढें भिक्षा नेऊन ठेवली. हें कृत्य पाहून गुरूनें मंत्रोदक शिंपडून त्याचा डोळा पूर्ववत् केला. पुढें त्याला संपूर्ण योग विद्या सांगितली. तो पुढें कीर्तिमान् सिद्ध पुरुष झाला. त्याच्या नांवानें प्रसिद्ध जें गोरक्षपुर तेथें त्याचें देवालय होतें. तें पुढें अल्लाउदीन ह्मणून कोणी बादशाह झाला त्यानें त्याचा विध्वंस करून त्यावर मशीद बांधली. नंतर त्याच्या अनुयायी यांनीं ती मोडून तेथें दुसरे ठिकाणी पुनः देवालय बांधलें. तें पुनरपि औरंगजेब बादशाहानें मोडून त्याची मशीद केली. त्याउपरांत त्यावर देवालय बांधलें तें हल्ली कायम आहे तें बांध-

ण्याविषयीं गोरक्षनाथानें आपला शिष्य जो बौद्धनाथ याला सांगून ठेवलें होतें. तें देवालय गोरक्षपुराच्या पश्चिमेस आहे व त्याच्या दक्षिणेस महादेव, पशुपतिनाथ, व हनुमान यांचीं देवालयें आहेत. त्या देवळाच्या परसांत नाथ संप्रदायी पुरुषांच्या पुष्कळ समाधि आहेत.

गोरक्षनाथानें **गोरक्षशतक**, **गोरक्षकल्प**, **गोरक्षसहस्रनाम**, व **गोरक्षगीता** असे ग्रंथ केले आहेत.

## मच्छेंद्रनाथ.

प्राचीनकाळीं नाथशब्दानें प्रख्यात असे पुष्कळ सिद्ध पुरुष एका मागून एक होत गेले आणि त्यांची संख्या येणेंप्रमाणें.

| | | |
|---|---|---|
| आदिनाथ. | विरूपाक्षनाथ. | निरंजननाथ. |
| मच्छेंद्रनाथ. | बिलेशनाथ. | कपालनाथ. |
| शंबरनाथ. | मंथनभैरवनाथ. | बिंदुनाथ. |
| आनंदनाथ. | सिद्धबुद्धनाथ. | काकचंडीश्वरनाथ. |
| भैरवनाथ. | कंथडनाथ. | आल्लमानाथ. |
| चौरंगीनाथ. | पौरंदकनाथ. | प्रभुदेवनाथ. |
| दुसरा मच्छेंद्रनाथ. | सुरानंदनाथ. | गौरैवचिनीनाथ. |
| गोरक्षनाथ. | सिद्धपादनाथ. | डिंडिमीनाथ. |
| मीननाथ. | चरपटनाथ. | भाल्लुकिनाथ. |
| शांभवनाथ. | कानेरीनाथ. | नागबोधनाथ. |
| अद्वयानंदनाथ. | पूज्यपादनाथ. | चडकपालिकनाथ. |
| गैनीनाथ. | नित्यानंदनाथ. | जालंदरनाथ. |

ते सर्व हठयोग संप्रदायाचे प्रवर्तक होते. त्यांत मच्छेंद्रनाथ याची मात्र उत्पत्ति वर्णिली आहे.

एकेकाळीं क्षीर समुद्राच्या तिरीं श्रीशंकर गौरीला उपदेश करीत असतां मगराच्या उदरांत कोणी एक होता, त्यानें ऐकिलें. यावरून तो जन्मतः ज्ञानसंपन्न असा पुरुष जन्मला, तो मच्छेंद्र

नाथ, त्यानें सप्तशृंग पर्वतावर चौरंगीनाथापासून ब्रह्मविद्या आणि योग ह्याविषयीं उपदेश घेतला. त्याच्या अंगीं सिद्धपणाचीं लक्षणें संपूर्ण होतीं. पुढें निवृत्तिनाथ जे ज्ञानेश्वराचे जेष्ठ बंधू त्यांला योगसंप्रदाय गैनीनाथ यापासून प्राप्त झाला. तेव्हां ज्ञानेश्वराच्या वेळेस नाथसंप्रदायी भक्तमंडळी पुष्कळ होती.

मच्छेंद्रनाथानें योगशास्त्रावर **हठदीपिका** या नावांचा एक ग्रंथ केला आहे. त्यांत योगाभ्यासाचे सर्व प्रकार सांगितले आहेत. त्याचीं प्रकरणें आठ आहेत. ब्रह्मानंदबावा जे कांहीं दिवसामागें कनकेश्वरीं राहत होते त्यानीं हठदीपिकेवर टीका केली आहे.

मच्छेंद्रनाथानें योगशास्त्रावर केलेले अणखी ग्रंथ आहेत परंतु त्यांचीं या देशांत प्रसिद्धि नाहीं.

## शालिवाहन.

हा भरतखंडांतील वैदिक धर्माचा रक्षक शककर्त्ता कलियुगामध्यें जे सहा शककर्त्ते येणार त्यांपैकीं हा तिसरा. यानें विक्रमाचा पराभव करून नर्मदेच्या पूर्वतीरीं आपलें राज्य स्थापिलें. **शककर्त्ता, विक्रमजित्, कानीनः, शालिवाहनः** असीं त्याचीं नामें लोकांत पठित आहेत, त्यांत कानीन ह्मणजे अविवाहितेचें अपत्य या अर्थावरून शालिवाहन हा कुमारीपासून जन्मला ही त्याच्याविषयींची गोष्ट खरी आहे. **शालिवाहन चरित्र** ह्मणून एक बखर आहे तींत बखरीच्या शिरस्त्याप्रमाणें पुष्कळ पाल्हाळ आणि अतिशयोक्ति आहेत. त्यांत शालिवाहनाचें इतिवृत्त मूळचें जेवढें तें मात्र संक्षेपानें लिहितों.

पूर्वीं पैठणामध्यें सोमकांत राजा राज्य करीत असतां तेथें एक नीतिमान्, पवित्र, आणि धार्मिक असा ब्राह्मण राहत होता. त्याचें नांव सुलोचन. त्याला एक कन्या झाली तिचें नांव सुमित्रा. ती चार वर्षांची होतांच तिची आई मरण पावली. सुमि-

त्रेचें रक्षण करायाला घरचें दुसरें मनुष्य कोणीच नव्हतें. सुलोचनानें सर्व प्रकारें तिचें पाळणपोषण केलें. पुढें ती उपवर झाली तोंच दैविक संकेताप्रमाणें शेषापासून तिचा ठाईं गर्भसंभव झाला. ज्यावेळीं शेषानें मनुष्यरूप धारण करून तिच्याजवळ येणें केलें, त्यावेळेस सुमित्रा ह्मणाली ह्या गोष्टीविषयीं मी अजाण आहें. मग शेषानें तिला आश्वासन देऊन ह्मटलें तूं भिऊं नको, मी शेष आहें. तुझ्या बापाला किंवा तुला कांहीं संकट पडेल तेव्हां माझें स्मरण कर ह्मणजे मी येऊन तत्क्षणीं तें दूर करीन आणि तुला पराक्रमी व शककर्त्ता असा पुत्र होईल. इतकें बोलून तो पुरुष गुप्त झाला. सुमित्रेनें ती साकल्य गोष्ट बापाला सांगितली. त्यानें ती दैविक संकेत जाणून मनांत ठेविली. सुमित्रेचीं गर्भचिन्हें स्पष्ट झाल्यावर लोकांनीं सुलोचनाला बहिष्कार घातला आणि राजाज्ञेवरून त्याला गांवांतून काढून दिल्हें. मग तो सुमित्रेसुद्धां निघून गांवाबाहेर कुंभार शाळेंत जाऊन राहिला.

त्याच ठिकाणीं शालिवाहन हा पांचा वर्षांचा होऊन आपलें सर्व खेळणें राज्यकारभाराचें खेळूं लागला. तो आपल्या बरोबरीच्या सोबत्यांला प्रधान, कारभारी, चाकर असें करून आपण त्यांचा राजा होत असे. तो त्याच वेळेस उत्कृष्ट बोलका आणि परीक्षक असा होता. कुंभार लोक त्याचें ज्ञान आणि चातुर्य पाहून विस्मित होत असत. शालिवाहनानें कुंभार मंडळीला सांगून ठेविलें होतें कीं, आपल्या राजाच्या दर्बारांत ज्या विशेष गोष्टी ऐकत जाल त्या मला कळवा आणि कोठेंही कोणाला जे कठीण न्याय निवडत नसतील ते मी निवडितों ह्मणून लोकांला सांगा आणि त्यांला माझ्याकडे घेऊन या.

एकदां शालिवाहन आपल्या खेळण्यामध्यें सिंहासनावर बसला असतां तेथें गांवजोशी पंचांग सांगायाला आला. तेव्हां त्याला शालिवाहनानें विचारिलें कीं, जोशीबावा यंदा आमच्या राज्याला कसें आहे? जोशानेंही त्याला कौतुकानें उत्तर दिल्हें कीं, महाराज फत्ते आहे. मग त्यानें आव्यांतून एक मातीची

घागर काढून त्याला दक्षिणे बद्दल दिल्ही. असें सांगितलें आहे कीं, ती घागर दुसऱ्या दिवसीं सोन्याची झाली. ही प्रचीति कुंभार लोकांस समजली. पुढें त्याचें ज्ञान आणि कीर्ति वाढत चाललीं. देशादेशांतून लोकांनीं बिकट पंचायती त्याजकडे आणिल्या आणि त्यानें यथान्याय त्यांचा निवाडा केला. आठव्या वर्षीं सुमित्रेनें त्याची मुंज केली, तरी त्याजकडून विद्याभ्यास न होतां तो खेळण्यांतच काळक्षेप करीत असे. शालिवाहनाला कुंभार मंडळी अनुकूळ होती त्यांजकडून त्यानें हजारो गाडे माती तयार करविली आणि आपण स्वतां मातीचीं चित्रें, रथ, उंट, घोडे, पालख्या, पायदळ, हत्ती, इत्यादिक हजारो करून कुंभारशाळेच्या आंत आणि बाहेर सांठवून ठेविलीं. हा व्यापार सदासर्वकाळ त्याचा चालू असे. पुढें त्याच्या पुष्कळ अद्भुत गोष्टी विक्रमानें ऐकिल्या आणि त्याजकडेस अवघड पंचायती वगैरे पाठवून त्याची वेळोवेळ परीक्षा घेतली. विक्रमानें वारंवार भेटाया करितां त्याला बोलावूं पाठविलें परंतु शालिवाहनानें त्याची आज्ञा मानिली नाहीं.

पुरंदरपुर या गांवामध्यें धनंजय नामे कोणी सावकार होता. त्यानें आपल्या मरणकाळीं पलंगाच्या चाऱ्ही खुरा खालतीं कोंडा, कोळशे, माती, आणि कागद असे पुरून ठेविले आणि ते वांटे पुत्रांनीं घ्यावे ह्मणून त्यांला सांगून आपण मरण पावला. त्यानंतर त्या पुत्रानीं पलंगाखालीं खणलें, तों कोंडा, कागद, माती, आणि कोळशे असें निघालें. तें पाहून कोणी कोणता वांटा घ्यावा ह्याविषयीं बापाचा संकेत काय होता त्याचा कोणालाच निवाडा होईना. शेवटीं ती पंचाईत सर्व राज्यांतून फिरत फिरत शालिवाहनाकडे आली. तिचा निवाडा शालिवाहनानें असा केला कीं, माती ह्मणजे भूमी हा वांटा वडील पुत्राला, कागद ह्मणजे लोकांकडील येणें तें मधल्याला, कोळशे ह्मणजे रोकड, सोनें, रुपें, तें तिसऱ्याला आणि कोंडा ह्मणजे धान्याचा गल्ला तो चवथ्याला द्यावा. याप्रमाणें ह्याच्या बापाचा संकेत आहे असें सांगून ती पंचाईत यथायोग्य निवडिली.

एकदां विक्रमानें त्याची परीक्षा पाहण्याकरितां एक मोठा हत्ती पाठवून सांगितलें कीं, हा किती वजन आहे तें सांग. तेव्हां शालिवाहनानें तो हत्ती नावेवर चढविला आणि नाव बुडे पर्यंत तिजमध्यें वाळूच्या थैल्या भरविल्या. नंतर हत्ती उतरून त्याबद्दल वाळूच्या थैल्या पुन्हा ती नाव बुडेपर्यंत भरिल्या आणि त्यावरून त्यानें हत्तीचें वजन ठरविलें. शालिवाहन कोणत्याही गोष्टीमध्यें कधीं कुंठित झाला नाहीं, त्याला वरचेवर युक्ति सुचत असत.

शेवटीं विक्रमराजा आपल्या सैन्यासुद्धां पैठणावर स्वारी करायाला आला, तेव्हां मात्र शालिवाहनानें आपल्या आईला ह्मटलें कीं, खरोखर विक्रमराजा मला जिंकायाला आला आहे. आतां कसें करावें ! मग सुमित्रेनें आपल्या कुंवारपणांतली गोष्ट त्याला सांगितली आणि तिनें शेषाचें स्मरण केलें. मग शेषानें प्रगट होऊन त्याला अमृताचा कुंभ दिल्हा आणि सांगितलें कीं, हें तूं आपल्या मातीच्या चित्रांवर शिंपड आणि तूं प्राशन कर. तसें केल्यावर कुंभारशाळेंतून हजारो फौज बाहेर निघाली. हें अद्भुत कृत्य पाहून लोक फार चकित झाले. पुढें शालिवाहनाचें आणि विक्रमाचें मोठें तुंबळ युद्ध झालें. शेवटीं विक्रम नर्मदेच्या पार पळून जात असतां शालिवाहनानें त्याचा पाठलाग केला. तेव्हां आकाशवाणी झाली कीं, शालिवाहना, नर्मदेच्या उत्तरतीरीं विक्रमाचें राज्य आणि पूर्वतीरीं तुझें राज्य होवो. आतां लढाई करूं नको. मग शालिवाहनानें आपलें सैन्य माघारें आणून नर्मदेच्या पूर्वतीरीं आपलें राज्य करूं लागला आणि तेथें त्याचा शक चालू झाला. त्यास आज १७८२ वर्षें झालीं, आणि पुढें तो १६२१८ वर्षेंपर्यंत चालेल. एकंदर त्याचा शक १८००० वर्षें चालेल.

एकदां अवर्षणामुळें राज्यांत मोठा दुष्काळ पडला, तेव्हां शालिवाहनानें पैठणाजवळ अनंदी ह्मणून एक टेंकडी आहे तींतून हजारो खंडी धान्य आणि पैका काढून लोकांस वांचविलें. असो. कविवर्गामध्यें शालिवाहनाची गोष्ट लिहिण्याचें कारण हें-

च कीं, त्यांनें वैद्यशास्त्र आणि अश्वपरीक्षा इत्यादिकांवर मोठाले ग्रंथ केले आहेत. त्यांपैकीं अलंकार शास्त्रावर **शालिवाहनसप्तशती** या नांवांचा एक ग्रंथ आहे त्याची मात्र लोकांस माहिती आहे. **दुर्गसप्तशती** प्रमाणें त्या ग्रंथाचे श्लोक ७०० आहेत.

---

## इलेश्वरोपाध्याय.

हा विद्यावर्द्धक विद्वान् शालिवाहन शकाच्या सातव्या शतकांत प्रसिद्धीस आला. श्रीशैल शहराच्या पश्चिमेकडे इलेश्वर नामें एक नगर आहे तेथचा हा रहिवासी असे ह्मणून इलेश्वरोपाध्याय असें त्याचें नांव पडलें. त्यानें लहानपणांत अध्यात्मशास्त्र ह्मणजे वेदांतशास्त्र याचाच मुख्यत्वें व्यासंग केला, आणि अल्पकाळांत त्या विद्येमध्यें इतका निष्णात झाला कीं, लागलेंच त्यानें पुढें पुष्कळ शिष्य पढविले. गुरुत्वामुळें इलेश्वरोपाध्याय हें प्रख्यात नामाभिधान त्याला फार लवकर मिळालें. ह्या उपनांवानें यद्यपि त्याच्या स्वदेशास थोरपणा मिळाला, तथापि त्याचें मुळचें नांव अगदी लोपून गेलें. तें पुढें त्याच्या वंशपरंपरेनें चालत आलें नाहीं. त्याचे वंशज त्यास त्याच नांवावरून मात्र ओळखत असत.

या पंडितानें गौतमस्मृतीवर मोठी टीका केली, तिला **स्मृतिदर्पण** असें नांव दिल्हें. तो आपल्या चवदाव्या वर्षींच देशांतरीच्या राजांकडे भेटायाला जाऊं लागला आणि त्यांच्या दरबारांत सत्यधर्माचा प्रतिपक्षी जो कोणी वादी भेटेल त्याचें तो खंडण करीत असे. यानें भूगोलशास्त्रावर एक ग्रंथ लिहिला, त्यांत तैलंगण देशाच्या स्थलविशेषाचें वर्णन करतेवेळीं त्या देशाचे शंभर भाग कल्पिले आणि त्यांस नाड असें नांव दिल्हें, जसे वेगनाड, वेलनाड, मुर्कीनाड, कासलनाड, इत्यादि. त्या भागांविषयींचे लेख कोंडवीडू एथील दफ्तरांत आणि कृष्णानदीच्या पश्चिमेकडील प्रांतांत रक्षण करून ठेवले आहेत. ते प्रांत वारंगूळ,

वेमूळवाड, इलेश्वर इत्यादि. ते लेख देशभाषेत लिहिलेले असून अद्यापि पाटील कुळकरण्यांच्या जवळ आहेत.

तैलंगण देशांत जरी राज्याच्या पुष्कळदा उलटापालटी झाल्या आणि निरनिराळ्या राजांच्या हाताखालीं तो आला, तरी इलेश्वरोपाध्यायानें जे त्याचे भाग केले ते व त्यांची नांवें गांवें अद्यापपर्यंत तींच आहेत. ह्या कवीला तसी देशव्यवस्था रचायाला मोठे परिश्रम पडले. त्याखेरीज दुसरीं उपकारिक कृत्यें त्यानें केलीं, त्याबद्दल नानादेशच्या राजानीं व श्रीमान् गृहस्थानीं त्याला ज्या जमीनी बक्षीस दिल्या त्या त्यानें ब्राह्मणांस वाटिल्या. त्यांचीं सनदापत्रें अद्यापि त्यांच्या वंशजांजवळ आहेत.

इलेश्वरोपाध्यायानें रघुपतिपेठ, नारायणगड, आणि दुसऱ्या ठिकाणच्या राजांस संस्कृत काव्यें आणि छंदःशास्त्र हीं पढविलीं, ह्यामुळें ते त्याचा बहुमान राखीत असत व त्याला बहुत द्रव्यही देत होते.

ह्या कवीनें खासगीचें एक विद्यालय स्थापिलें होतें, त्यांत पांचशें विद्यार्थी काव्य, नाटक, अलंकार, आणि न्याय, व्याकरण, धर्म, ज्योतिष इत्यादि शास्त्रांचा अभ्यास करीत असत. आणि असें सांगतात कीं, ह्या कवीच्या कुटुंबांतील बायकाही संस्कृत शब्द वारंवार कानीं पडून ती भाषा देशभाषेप्रमाणें अस्खलित बोलत असत, कारण इलेश्वरोपाध्यायाला इतर भाषांचा मोठा तिरस्कार असे. इतर भाषा बोलणें हें शास्त्रविरुद्ध आहे असें समजून संस्कृत वाणी वांचून दुसरी कोणतीही भाषा बोलूं नका ह्मणून तो सांगत असे.

अणखी असें ह्मणतात कीं, इलेश्वरोपाध्यायाच्या शिष्य मंडळांत कित्येक असामी अगदी मंदबुद्धि असून त्यांला आपला पाठ उमगत नाहीं, ही गोष्ट त्याच्या लक्षांत होती. एकदां पुरातन ग्रंथ पाहतां पाहतां एक्या ऐंद्रजालिक प्रकरणांत कित्येक बुद्धिवर्द्धक कल्प सांगितले होते, त्यांत ज्योतिष्मतिकल्प* त्यास

* ह्याला संस्कृतांत सुवर्णलता असें ह्मणतात. तो देशांत पुष्कळ प्रसिद्ध आहे. तो पर्जन्यकाळांत उगवतो. त्याची फळें रक्तवर्ण व लहान

सांपडला. तो मालकांगोणीच्या तेलाचा आहे. सूर्यग्रहणामध्यें तें तेल पिऊन पाण्यांत बसून कांहीं मंत्राचा जप करावा लागतो असें त्याचें विधान आहे. म्हैसूर, तंजोर, काशी, आणि कांची एथील विद्यालयांत पुष्कळ पंडित आपल्या शिष्यांचें बुद्धिमांद्य जाण्याकरितां ह्या तेलाचा उपयोग करीत असत. उपाध्यायांनीं शिष्यांस जेव्हां ह्या सर्वोत्कृष्ट औषधीचें तेल योजना करून दिल्हें तेव्हां असें सांगतात कीं, त्या योगानें त्यांची बुद्धि इतकी विशद झाली कीं, त्यांला कोणताही गूढ विषय समजूं लागला आणि पुढें त्यांनीं मोठाल्या विद्यांचा अभ्यास केला.

इलेश्वरोपाध्यायानें शिष्यांस पढविण्याविषयीं मोठे परिश्रम घेतले, आणि त्याच्या लोकोत्तर गुणांच्या कीर्तीचा प्रसर अनेक प्रांतांत झाला आणि शेवटीं अकबर बादशाहाच्या पदरीं खानखान ह्मणून विख्यात एक सरदार होता त्यानेंही याचे गुण ऐकिले. तो स्वतां संस्कृत भाषेंत उत्कृष्ट व्युत्पन्न होता. त्याला ह्या नामांकित पंडितास भेटावें ह्मणून फार उत्कंठा झाली आणि बरोबर मोठें सैन्य घेऊन दरकूच दरमजल करीत उपाध्ययाचे गांवीं आला, आणि भेटीस गेला तेव्हां त्यानें उपाध्यायास साष्टांगनमस्कार केला; परंतु उपाध्यायानीं **म्लेच्छक्षयोस्तु** ह्मणजे म्लेंच्छांचा नाश असो, असें कर्ण कठोर आशीर्वचन दिल्हें. तेव्हां सरदारानें लागलेंच प्रत्युत्तर केलें कीं, **म्लेच्छक्षयइत्यत्र पंचमी तत्पुरुष एवास्तु** ह्मणजे म्लेंच्छापासून मनुष्यांचा नाश असो. यापुढें उपाध्यायानीं अर्थांतर सांगितलें परंतु सरदारानें वर प्रत्युत्तर न करतां ही पुढील समस्या पूर्ण करावी ह्मणून अ-

---

आकृतीचीं असून त्यांचे घोंप असतात. तीं पक्क होतात तेव्हां फार कडू लागतात. ह्या वनस्पतीला कधीं फुलें येत नाहींत. हिच्या बियांचें तेल काढण्याचा प्रकार सांगितला आहे तो असा कीं, ग्रीष्मऋतूंत त्यांस उन्हांत तरवारीच्या पात्यावर ठेवावीं. नंतर सुर्कीत ह्मणजे रिटोर्टांत (सरपोस) घालून अग्निसंयोगानें त्यांचें तेल काढावें. हें तेल अन्नादिकांबरोबर सेवन करावें ह्मणजे तेणेंकरून बुद्धि चांगली विशद होऊन प्रकाश पावते.

घों श्लोक ह्मटला **सहस्रशीर्षा पुरुषः सहस्राक्ष सहस्रपात्.** त्यावर पंडितानें **चलितश्चकित श्छन्नः प्रयाणे तव भूपते** ह्या अर्ध्या श्लोकानें समस्या पूर्ण केली. याचा अर्थ— हे राजन् तुझी स्वारी निघाली ह्मणजे सहस्रशीर्षा शेष तो चलित होतो, सहस्राक्ष इंद्र चकित होतो, आणि सहस्रपाद सूर्य आच्छादित होतो. ह्यावरून त्याची सेना अपार आहे असें सुचविलें. हें ऐकून सरदार मोठा आनंद पावला आणि पंडिताला पुष्कळ द्रव्य दिल्हें आणि इलेश्वरोपाध्यायशिरोमणि असें अभिधान देऊन आपण राजाच्या दरबारीं गेला. ह्यानंतर इलेश्वरोपाध्यायानें एक नाटक रचिलें, त्याला **गिरिशनाटक** असें नांव दिल्हें. त्यांत श्रीशैलमलकार्जुनेश्वराच्या विवाहाचें संविधान फार उत्कृष्ट बांधिलें आहे.

ह्या कवीला पुत्रसंतान नव्हतें, तीन कन्या मात्र होत्या. त्यापैकीं नाची ह्मणून एक होती ती दुर्दैवेंकरून विधवा झाली. ती आपल्या वयांत आली तेव्हां वैधव्यामुळें आपल्यास पुढें संतानाची व संसारसुखाची कांहीं आशा राहिली नाहीं, ह्मणून दुःखितांतःकरण होत्साती आपला प्राणत्याग करावा असा तिचा बेत होता परंतु आत्महत्येचा महादोष आहे असा तिच्या बापानें तिला उपदेश करून तिचें मन फिरविलें. शेवटीं नाचीनें तो बेत सोडून दिल्हा. मग तिनें आपलें अवशिष्ट आयुष्य शास्त्राभ्यासांत घालविण्याविषयीं निर्धार केला. ज्योतिष्मतीचें तेल पुष्कळ प्यालें असतां बुद्धि फार तीव्र होते किंवा पांच तासांत मरण येतें, असें तिनें आपले बापाच्या तोंडचें ऐकिलें होतें ह्मणून त्याची प्रचीति पाहण्याकरितां धैर्य धरून तें पुष्कळ प्याली. तेणेंकरून अल्प कालांत तिच्या सर्वांगाचा इतका दाह झाला कीं, तिच्यानें तो सहन होईना; आणि कावरीबावरी होऊन तिनें मागील दारीं विहीर होती तींत उडी टाकिली आणि दोन तास पर्यंत पाण्यांत बुडून राहिली. इतक्यांत तिच्या बापानें आपली लाडकी मुलगी फार वेळ दिसत नाहीं असें पाहून शिष्यांस पाठ सांगत होता, तें सोडून देऊन

तिच्या शोधार्थ मागीलद्वारीं गेला, आणि नाची ह्मणून हाका मारूं लागला. तेव्हां तिनें विहीरींतून उत्तर दिल्हें आणि आपण केलेलें कृत्य सर्व त्याला तेथूनच विदित केलें. तेव्हां तिला सांगितलें कीं, तूं पांच तास पर्यंत तेथेंच बसली राहा, नंतर बाहेर ये. त्याप्रमाणें तिनें केलें. त्या योगानें तिच्या सर्वांगाचा दाह अगदीं शांत झाला. असें ह्मणतात कीं, त्या तेलाच्या योगेंकरून तिची बुद्धि इतकी वाढली कीं, थोडक्या काळांत सर्व शास्त्रांत व कला कौशल्यांत ती निपुण झाली, आणि पदार्थविज्ञान शास्त्रांतील अत्यंत गहन विषयांवर व्याख्यानें देऊं लागली. तसेंच ती कविताही करीत असे, व **नाचीनाटक** ह्मणून एक वीररसप्रधान चरित्र रचिलें, त्यांत तिनें आपल्या जन्मापासून वैधव्यदशा प्राप्त होई तोंपर्यंत ज्या सर्व गोष्टी घडल्या त्यांचें सुंदर संस्कृत श्लोकरूपानें वर्णन केलें आहे. नंतर तिनें तीर्थयात्रा करण्याकरितां बापाचें अनुमोदन घेतलें. देशाटन करतां करतां तिनें पुष्कळ देशीं मोठ मोठे विद्वान् पंडितांस वादकरून जिंकिलें आणि जे कोणी तिच्याशीं वादकरावयास येत त्यांचें तिनें खंडणच करावें असें सांगतात. ती दिल्ली आणि जैपूर एथील राजांपासून बक्षिसें मिळवून परत स्वग्रामीं आली. तिची विद्वत्ता आणि समयसूचकता यांविषयीं लोक फार आश्चर्य करूं लागले.

इलेश्वरोपाध्यायाला दुसरी मुलगी होती तिजपासून त्याला फारच दुःख झालें. तें असें कीं, कांहीं कृत्रिमानें तिचें लग्न एका नीच जातीच्या पुरुषाबरोबर झालें, त्यापासून तिला संतती झाली. उपाध्यायाला आपल्या जांवयाची वास्तविक जात समजली तेव्हां त्याची ती सर्व गोष्ट आपल्या मुलीला सांगितली. नंतर तिला अतिशय लज्जा वाटून आपलें राहतें घर पेटवून दिल्हें आणि त्यांत पतिपुत्रांसुद्धां मरण पावली.

इलेश्वरोपाध्यायानें ह्मातारपणीं **इलेश्वर विजय** नामक एक धर्मशास्त्राचा ग्रंथ केला. त्यांत सर्व जातीचा भेद व परस्पर संबंध यांचा फार सूक्ष्म विचार केला आहे, आणि अनेक ग्रंथकार त्यांतील वचनें प्रमाणार्थ लिहितात. त्यावेळेस हा ग्रंथ

जरी फार प्रख्यात होता तरी हल्लीं त्याची मत पुष्कळ शोधकरून पाहिली तरी कोठेंच मिळत नाहीं.

इलेश्वरोपाध्यायानें बहुत शिष्य पढविले आणि त्याची विद्वत्ता फारच मोठी होती ह्मणून जेवढा त्याचा लौकिक होता, त्याप्रमाणेंच तो मेला तेव्हां त्याच्या निर्दोष वर्तणुकीवरून त्याची लोकांत मोठी वाहवा झाली.

## हलायुधभट्ट.

हा प्राचीन ग्रंथकार ब्राह्मण होता. **अभिधानरत्नमाला** ज्याला **हलायुधकोश** असें ह्मणतात तो यानें केला. अणखी छंदःशास्त्रावर ही याचा एक ग्रंथ आहे. याच नांवाचा दुसरा एक कोंकणस्थ ब्राह्मण ग्रंथकर्त्ता होऊन गेला, त्यानें मृतांच्या उत्तरक्रियेविषयीं **मृतसंजीविनी** या नांवाचा ग्रंथ केला. शुल्बशास्त्रांतील पिंगलसूत्रावर जे पुष्कळ व्याख्याकार झाले त्यांतही याची गणना आहे.

प्रसिद्ध मीमांसक जो भट्टभास्कर याचा हा शिष्य होता असें ह्मणतात. जर ही गोष्ट खरी असली तर हा इसवी शकाच्या सातव्या शतकांत होता असें सिद्ध होतें.

## लक्ष्मीनारायणाप्पा.

हा कवि मगध प्रांतांतला राहणारा अ॰
नांव व्यंकाप्पा. तो नियोगी जातीचा ब्राह्मण असे. तो पुष्कळ दिवसपर्यंत कर्नाटक देशांत राहत होता. त्याची भरभर आठव्या शतकांत झाली. म्हैसूर एथील नंदराजवादीयर राजाचे वेळीं तो होता, व त्यास त्याचे दर्बारीं कांहीं हुद्दा असे. त्यानें कानडी भाषेचें चांगलें ज्ञान संपादन करून मगध एथील विद्यालयांत संस्कृत भाषा पढला. त्याची बुद्धि फार चांगली असे. त्यानें बहुधा त्यावेळचीं सर्व उत्कृष्ट काव्यें अवलोकन केल्यामुळें निरनिरा-

ऱ्या देवांची स्तुतिपर फार सरस स्तोत्रें व कवनें केलीं. त्यांविषयीं प्रायः लोक फार आश्चर्य मानीत असत. तीं पुस्तकें नंदराजाच्या कानावर येतांच त्यानें त्याला पाचारण केलें आणि मोठ्या संतोषानें त्याला पोषाक, जवाहीर, व अणखी मोलवान बक्षिसें देऊन आपल्या दर्बारच्या शास्त्रीपणाचें कामही दिल्हें.

राजाच्या आज्ञेवरून लक्ष्मीनारायणाप्पानें **नंदराजयशोभूषण** नामें एक वीररसप्रधान काव्य रचिलें. हें मोठ्या श्रमानें केलें होतें, कारण त्यांतील प्रत्येक श्लोक द्व्यर्थी असे. एक अर्थ त्या राजाच्या गृहकार्य संबंधी आणि दुसरा त्याच्या राजकृत्यसंबंधी. या ग्रंथाचे पांच अंक आहेत. हा सर्व ग्रंथ त्यानें एका वर्षांत संपूर्ण करून आपला धनी जो राजा त्याला अर्पण केला. हा ग्रंथ केल्यामुळें लक्ष्मीनारायणाप्पा यास राजाकडून मगध प्रांतामध्यें जमीन इनाम मिळाली. नंतर त्यानें फावल्या वेळेंत महाभारतांतले विषय निवडून त्यांवर नाटकें रचण्याचा उद्योग आरंभिला. तो नंजन देवाच्या वार्षिक महोत्सवाला गेला, ते वेळीं त्यानें त्या देवावर एक नाटक केलें, त्याला **नंजननाटक** असें नांव दिल्हें. त्यावेळेस तो तीस वर्षांच्या वयाचा होता. त्या नाटकांत आरंभापासून शेवटपर्यंत उत्साहामध्यें रथसमारंभादिक जे महोत्साह झाले, त्यांचें फार सुंदर वर्णन केलें आहे. असें सांगतात कीं, लक्ष्मीनारायणाप्पानें हें नाटक पांचा दिवसांत समाप्त केलें. त्यानें दुसरींही नाटकें केलीं, तीं येणेंप्रमाणें—**उत्तरगोग्रहण**, त्यांत दुर्योधनाच्या सैन्यानें विराटराजाच्या गाई नेल्या ह्याचें वर्णन. **शारदासंभव**, ह्यांत सरस्वतीच्या जन्माचें वर्णन. **रंभानाटक** ह्यांत शंभर श्लोक आहेत. **ऐरावनविजय**, आणि दुसरीं पुष्कळ पुस्तकें त्यानें रचिलीं. हे ग्रंथ करून त्यानें पुष्कळ द्रव्य संपादन केलें, त्यापैकीं कांहीं भाग तळें बांधण्यांत खर्चला. तें तळें मोठें असून त्याला चहूंकडून पायऱ्या केल्या होत्या, आणि सभोवतीं नारळी लाविल्या होत्या.

लक्ष्मीनारायणाप्पा जवळ संस्कृत भाषेच्या पुस्तकांचा मो-

ठा संग्रह होता व कानडी भाषेचींही थोडीं पुस्तकें होतीं. त्याच्या जवळ विद्यार्थीही पुष्कळ होते, त्यांस त्यानें छंदःशास्त्राचे नियम शिकविले. कल्याणदुर्ग, रायदुर्ग, गुत्ती, रतनगिरी, मध्यगिरी, नंजनगुडी, एथील विद्वानांनीं ह्या कवीची कीर्त्ति ऐकून त्याजवळ पढायास आले. आणि असें सांगतात कीं, त्यांना चांगलें आध्यापन करून त्यानें थोड्या दिवसांत तयार केले आणि ते लवकरच नवीन काव्य करण्यास समर्थ झाले. ह्या कवीनें आमरणांत अनेक विषयांवर ग्रंथ लिहिले आणि ते ग्रंथ दक्षिण व पश्चिम हिंदुस्थानांत चहूंकडे फार पसरलेले आहेत.

लक्ष्मीनारायणाप्पा मगध एथें आपल्या वयाच्या एकसष्ठाव्या वर्षीं मरण पावला त्याचीं सर्व पुस्तकें त्याच्या पुत्रास मिळालीं.

## भोजराजा.

हा माळव्यांतील धार नामें एका संस्थानाचा राजा होता. इसवी शकाच्या ९८२ पासून १०८२ पर्यंत यानें राज्य केलें. त्यावेळीं संस्कृतविद्येला यानें मोठ्या औदार्येकरून उत्तेजन दिल्हें होतें. देशोदेशीचे पंडित आणि कवि हे याच्या राजधानींत येऊन द्रव्य आणि प्रतिष्ठा मिळवीत असत. यानें आपल्या संग्रहीं १४०० पंडित बाळगिले होते असें सांगतात. याच्या कीर्तिवरून तर-असें अनुमान होतें कीं, हा राजा नसता तर कालिदासप्रभृति कवि एवढ्या प्रसिद्धीस आलेच नसते आणि त्यांचीं सुरस काव्यें आणि नाटकें हल्लीं जीं विद्यालयांत उपलब्ध आहेत तीं आह्माला मिळालीं नसतीं. दंडी, भवभूति, वररुचि, सुबंधु, बाण, मयूर, रामदेव, हरिवंश, शंकर, कलिंग, कर्पूर, विनायक, मदन, विद्याविनोद, कोकिल, तारेंद्र प्रभृति प्रसिद्ध कवि याच्या कारकीर्दींत होते, असें ऐकण्यांत आहे. या राजाची ख्याति अशी सांगतात कीं, कोणीही नवा श्लोक करून आणिल्यास लक्ष रुपये बक्षीस देत असे. पण ही गोष्ट असंभाव्य आहे. त-

थापि त्या संस्थानांत कवड्यांचें नाणें फार वापरण्याची चाल होती. यावरून नवे श्लोक करणाऱ्यांस लक्षोगणती कवड्या देत असेल असें अनुमान होतें.

याच्या समागमानें कवनशक्ति प्राप्त व्हावी असा कांहीं याचा विलक्षण स्वभावगुण होता. **भोजचंपू** आणि **भोजप्रबंध** या ग्रंथांचीं कांहीं प्रकरणें यानें रचिलीं असून कालिदास प्रभृतींनीं ते ग्रंथ संपविले असें सांगतात. भोजप्रबंधांत कवींच्या गोष्टी वत्यांच्या चमत्कारिक उक्तिप्रत्युक्ति वगैरे गोष्टी यांचा संग्रह आहे. भोजचंपूंत तर संपूर्ण रामायणाच्या कथा आहेत. यानें योगसूत्रावर व्याख्या केली आहे. काव्यें आणि नाटकें एतद्विषयक साहित्यशास्त्रावर प्रथम ग्रंथ ह्मणजे **सरस्वतीकथाभरण** तो यानेंच केला. त्याचे अध्याय पांच आहेत. त्यावर रत्नेश्वरमहोपाध्याय यानें टीका केली आहे. तसा **राजमार्तंड** हाही ग्रंथ यानें केला, असें कोणी ह्मणतात. **मंजप्रतिदेशव्यवस्था** या नांवाचा एक ग्रंथ इसवी शकाच्या नवव्या शतकाच्या अखेरीस याचा चुलता जो मंज त्यानें केला. त्या उपरांत भोजानें सुधारून नीट केला व **भोजप्रतिदेशव्यवस्था** हें नांव देऊन प्रसिद्धींत आणिला. **भोजप्रबंध**, **विक्रमचरित्र**, आणि **भोजचरित्र** ह्या ग्रंथांच्या हस्तलिखित प्रती विलायतेंतील एशियाटिक सोसायटी नामक मंडळीच्या पुस्तकगृहांत आहेत.

## भवभूति.

या प्रख्यात कवीचें जन्मवृत्त इतकेंच मिळालें आहे कीं, हा बेदर गांवीं राहणारा काश्यप गोत्री कोणी एक ब्राह्मणाचा मुलगा होता. त्याच्या कंठामध्यें वक्तृत्व सरस्वती नेहमी वास करीत असे, त्यावरून याचें नांव श्रीकंठ असेंही पडलें होतें. कारण त्यानें उज्जनी आणि तिच्या प्रांतवर्ती जे पर्वत, नद्या, अरण्यें, निर्झर यांचें अगदीं हुबेहुब वर्णन जागोजागीं केलेलें आढळतें यावरून तो गोंडवन या नांवाच्या रमणीय जंगलामध्यें कां-

हीं दिवस वस्तीस होता असा तर्क होतो. सृष्टीचें सौकुमार्य आणि सौंदर्य यांचें सुयुक्त वर्णन करायाचा स्वाभाविक गुण यामध्यें इतर कविपेक्षां उत्कृष्ट होता.

भवभूतीचें जन्मस्थान त्याच्या विद्येचा नांवलौकिक वाढण्यासारिखे नव्हतें तरी हिंदुस्थानांतील कित्येक राजांच्या आश्रयानें तो मत्र्यातीस आला. यशोवर्मा ह्मणून कोणी कनोजा राजा होता त्यानें याला बाळगिलें होतें असें सांगतात. हा धारच्या संस्थानांत गेला तेव्हां भोजाच्या सभेमध्यें याला कालिदासाच्या बरोबरीनें मानित असत. **उत्तररामचरित्र, मालतीमाधव**, व **वीरचरित्र** हीं तीन नाटकें या कवीचीं आहेत. उत्तररामचरित्र ह्या नाटकाचे अंक सात आहेत. ह्या नाटकास उत्तररामचरित्र हें नांव ठेवण्याचें कारण हेंच कीं, राजा रामचंद्र अयोध्या पुरींत सिंहासनारूढ झाल्यावर जें चरित्र झालें तें ह्यांत बांधिलें आहे. पहिल्या अंकांत लोकापवादामुळें रामानें सीतेचा त्याग केला आहे, दुसऱ्या अंकांत शंबुक वधाच्या निमित्तानें रामचंद्र पंचवटीस गेला आहे; तिसऱ्या अंकांत सीतेच्या विरहानें रामास फार शोक झाला आहे; चवथ्या अंकांत वाल्मीकि मुनीच्या आश्रमास कौसल्या; जनक, वसिष्ठ हे गेले आहेत, पांचव्या अंकांत चंद्रकेतु आणि लव, कुश, ह्यांचा युद्धप्रसंग झाला आहे; साहाव्या अंकांत रामाची आणि लव, कुश,ह्यांची भेट झाली आहे; आणि सातव्या अंकांत सर्वांच्या भेटी होऊन वाल्मीकिमुनीनें रामाची आणि सीतेची भेट करून दिल्ही आहे. ह्या नाटकाचा खेळ महाकालेश्वराचे उत्सवांत केला होता. हें नाटक विशेषेंकरून विद्वानांस मान्य व रसिक जनांस प्रिय असें आहे. नाटकाचे जे गुण ते सर्व ह्या नाटकांत कवीनें आणिले असून त्यांत कारुण्य रस अतिशय बांधिला आहे. मालतीमाधवांत शृंगाररस विशेष आहे व महावीरचरित्र नाटकाचे सात अंक आहेत. त्यांत रामकथा सर्व रामायणाच्याच आश्रयानें संक्षिप्त वर्णन केली असून वीररस विशेष आहे. ह्या कवीचे इतर

ग्रंथ जसे गांभीर्य विचार, पदलालित्य, भाषेची मौढी इत्यादिकें करून पूर्ण आहेत, त्याप्रमाणेंच हें आहे.

कालिदास आणि भवभूति यांचीं राजसभेमध्यें नाटकालंकार विषयांवर सुरस भाषणें होत असत. एकदां राजाच्या आज्ञेवरून त्या उभयतांनी एकेका श्लोकांत शृंगार रसाचें पूर्ण वर्णन केलें. पुढें असें सांगतात कीं, त्याच्या उत्कृष्टपणाच्या स्पर्द्धेवरून श्लोक देवालयांत नेऊन देवी पुढें तोलले. तेव्हां कालिदासाचा श्लोक वजनदार दिसून येतांच देवीनें आपल्या हस्तकमलांतील मकरंद भवभूतीकडल्या पारड्यांत ओतून जड केलें.
भवभूति विषयीं असी एक ह्मण आहे कीं,

कारुण्यंभवभूतिरेवतनुते

अर्थ— कारुण्य रस हा भवभूतीनेंच बांधावा.

## दंडी.

हा मोठा नामांकित कवि भोजराजाच्या दबारीं होता. दुसरे जे दोन मसिद्ध कवि कालिदास व भवभूति या उभयतां बराबर कवितेविषयीं वारंवार तो मतिस्पर्द्धा करीत असे. हे तिघेही देवीउपासक होते.

या तीन कविविषयीं असें सांगतात कीं, एकदां सरस्वती-रूपवती तरुण स्त्रीचें रूप धारण करून त्यांसमोर एका मोठ्या रस्त्यावर कंदुक क्रीडा करीत मगट झाली; तेव्हां त्या तीन कवींतून मथम दंडी ह्मणाला कीं, जेव्हां ही आपल्या कोमल व पाटल हस्तानें कंदुक ग्रहण करिती तेव्हां त्या कंदुकाचे तीन वर्ण व्यक्तपणी दिसून येतात. समदृष्टीनें पाहती तेव्हां कर्णांतील कमळाची त्याजवर छाया पडल्ये ह्मणून तो रक्तवर्ण दिसतो, जमिनीवर आपटती तेव्हां नेत्रकांतीमुळें जांबळा व तांबुस वर्णाचा दिसतो. भवभूति ह्मणाला कीं, कंदुक तिच्या कुचासारखा दिसतो ह्मणून त्याला भूमिवर आपटती. कालिदासानें ह्मटलें तो आपलें मुखचुंबन करील यास्तव त्याला आपटिते.

त्यावेळीं तीं देवी गुप्त झाली व त्या रस्त्याच्या दुसऱ्या नाक्यावर तांबोळ्याचें दुकान घालून बसली. तेथें हे तीन कवि गेले. देवीनें भवभूतीला कांहीं चुना दिल्हा, दंडीला सुपारी, आणि कालिदासाला पान दिल्हें. दंडीनें तिला असें देण्याचें कारण विचारलें. तिनें उत्तर केलें कीं, त्रिवर्गाचे गुण समान नाहींत. नंतर तिनें त्या तिघांला दुकानाच्या मागें नेलें व त्यांच्या गुणाच्या खुणेचे तीन गंज दाखविले. त्यांत कालिदासाचा सर्वांत मोठा होता, दंडीचा मध्यम व भवभूतीचा कनिष्ठ.

कोणे एकेसमयीं कालिदास आणि दंडी यांचीं स्पर्द्धा लागली असतां देवीनें साक्षी दिल्ही कीं, **कविर्दंडी, कविर्दंडी, कविर्दंडी नसंशयः** अर्थ—कवि तर दंडीच होय. असें त्रिवार बोलल्यावर कालिदासानें रागानें देवीला ह्मटलें **अहंरंडे, अहंरंडे** ह्मणजे रांडे मी कोण आहे. याप्रमाणें कालिदासाचें वचन ऐकून देवी ह्मणाली **त्वमेवाहं नसंशयः** अर्थ— तूं आणि मी एकच आहें.

असें झाल्या नंतर हे तीनही कवि अप्तांत प्रतिस्पर्धा सोडून एकचित्तानें वागून जिवलग मित्र झाले.

दंडीनें **काव्यादर्श** आणि **दशकुमार** या नांवाचे साहित्यशास्त्रावर दोन ग्रंथ सर्वोत्कृष्ट केले आहेत.

## माघकवि.

आलिकडे आमचे प्रख्यात डाक्तर भाऊदाजी यानीं **प्रबंधचिंतामणि** या नांवाचा एक ग्रंथ मिळविला आहे, त्यांत भोजाच्या वेळच्या कित्येक पंडितांच्या गोष्टी लिहिल्या आहेत. त्यांतून माघकवीचा वृत्तांत संक्षेपानें लिहितों.

हा कवि भोजाच्या वेळेस कविवर्गामध्यें मान्य होता आणि श्रीमालपुरांत राहत असे. परंतु तो इतर पंडितांप्रमाणें त्याच्या दर्बारांत कधीच गेला नाहीं. तोच स्वतां मोठा दौलतवान् असून विद्वान् लोकांला पुष्कळ द्रव्य देत असे. विक्रमानें त्या-

ची दानकीर्ति आणि विद्वत्ता हीं ऐकून त्याला पुष्कळदां बोलावणीं पाठविलीं. एकदां हिंवाळ्याच्या दिवसांत माघकवि भोजाला भेटायाला गेला आणि तेथें एक दिवस मात्र राहिला आणि दुसऱ्या दिवशीं लागलेंच जाण्याची आज्ञा घेतली. राजा आपल्या बागेपर्यंत त्याला बोळवायाला आला तेथें माघकवीनें भोजराजाला आपल्या घरीं येण्याची विनति केली.

कांहीं दिवसानंतर भोजराजा माघकवीच्या श्रीमालपुरास आपल्या स्वारीसुद्धां गेला, तेथें भोजाचें सर्व सैन्य त्याच्या अश्वशाळेंत सामावलें. राजा मात्र माघकवीच्या वाड्यांत राहिला. वाड्यांत जाण्याचा रस्ता जाड कांचेच्या तक्तयानी मढविला होता. तेथें अनेक प्रकारचे पदार्थ आणि उपचार सामग्री इत्यादि पाहून भोजराजाला मोठें आश्चर्य वाटलें. दुपारी भोजनाच्या वेळेस पुष्कळ प्रकारच्या शाका, व्यंजनें आदिकरून पदार्थ आणि सर्व ऋतूंतील फळें वाढिलीं होतीं. त्या दिवसीं फार थंडी होती ह्मणून तेथें जे ऊष्ण उपचार योजिले होते तेणेंकरून राजाला विजण्याचा वारा घ्यावा लागला. त्या रात्रीं काव्य, नाटक, अलंकार, यांमध्यें उभयतांचीं बहुत वेळ संभाषणें झालीं.

कोणी ज्योतिष्यानें माघकवीला पत्रिका करून दिल्ही, तींत असें वर्तविलें होतें कीं, त्याला उत्तरोत्तर पुष्कळ संपत्ति प्राप्त होऊन अंतकाळीं तो निर्धन होईल आणि त्याच्या पायाला सूज येईल. या भविष्यलेखा प्रमाणेंच त्याला वृद्धापकाळांत दारिद्र्य आलें. तरी पहिल्याप्रमाणें दरिद्री लोक त्याजकडे मागायाला येत असत. तेव्हां त्यानें असें ह्मटलें कीं,

॥ दारिद्र्यानलसंतापःशांतःसंतोषवारिणा॥
॥ दीनाशाभंगजन्मातुकेनायमुपशाम्यतु ॥

अर्थ— दारिद्र्यरूप अग्नीचा संताप मी आपल्या संतोषरूप उदकानें शांत करितों, तरी दीनांचा आशाभंगरूप जो ताप तो कशानें शांत करूं.

एकदां त्यानें आपल्या स्त्रीला ह्मटलें कीं,

॥ देशंस्त्यमपिमुंचंतिमानम्लानंमहाशयाः ॥

॥ दिनावसानेव्रजतिद्वीपांतरमहर्मणिः ॥

अर्थ— जे उदार आहेत ते आपत्काळीं आपला देश सोडितात. पाहा. सूर्यही दिवसाच्या शेवटीं द्विपांतरास जातो.

मग माघकवि आपल्या स्त्रीसहवर्तमान भोजाकडे धारानगरीस गेला आणि आपलें **माघकाव्य** राजाला दाखवावें ह्मणून तिच्या स्वाधीन केलें. जेव्हां राजानें मध्येंच पुस्तक उघडून पाहिलें तेव्हां प्रथम हा श्लोक दृष्टीस पडला.

॥ कुमुदवनमपश्रिश्रीमदंभोजखंडंत्यजतिमुदमुलूकःप्रीतिमांश्चक्रवाकः ॥ उदयमहिमरश्मिर्यातिशीतांशुरस्तं ॥ हतविधिललितानांहीविचित्रोविपाकः ॥

या श्लोकाचा अर्थ मनांत आणून भोजानें ह्मटलें कीं, सर्व काव्याची गोष्ट काय सांगावी. परंतु या एका श्लोकाला पृथ्वीचें मोल्यही थोडकें आहे. राजानें एक लक्ष रुपये तिची संभावना केली.

एकेका कविमध्यें एकेक गुण विशेष वर्णिले आहेत. त्यांत

॥ उपमाकालिदासस्यभारवेरर्थगौरवं ॥

॥ दंडिनःपदलालित्यंमाघेसंतित्रयोगुणाः ॥

अर्थ—उपमा कालिदासाची, भारवीचें अर्थगौरव, आणि दंडी कवीचें शब्दसौंदर्य असे एकेक उत्कृष्ट आहेत. परंतु माघकवीमध्यें उपमा, शब्दसौंदर्य, आणि अर्थगौरव हे तिन्ही गुण आहेत. ते माघकाव्य पाहिलें असतां ध्यानांत येतात.

## बाणकवि.

पूर्वीं भोजराजाच्या वेळीं कुरुजंगल देशामध्यें हर्ष या नांवाचा एक मांडलिक राजा होता, त्या राजाच्या वर्णनपर **हर्षचरित** या नांवाचा एक मोठा ग्रंथ आहे. त्यांत बाणकवीचा वृत्तांत सविस्तर लिहिला आहे. त्या ग्रंथाच्या माहितगारापासून बाणकवीच्या वृत्तांताचे जितके शब्द आह्माला मिळाले ते व कादंबरीच्या उत्तरार्धांत आरंभीच जे श्लोक आहेत त्यांवरून त्याच्या पिढीविषयीं जेवढी माहितगारी झाली आहे तेवढी लिहितों.

बाणकवि हा वात्स्यायन गोत्री ब्राह्मण मोठ्या विद्वान् घराण्यांत जन्मला. त्याच्या आईचें नांव राज्यदेवी आणि बापाचें चित्रभानु. तो वेदशास्त्रसंपन्न असून नेहमी यज्ञयाग करीत असे. एकदां यज्ञ करितांना चित्रभानूला श्रमामुळें फार घाम आला असतां सरस्वतीनें येऊन त्याला वारा घातला असी दंतकथा आहे. व बाणकवीच्या पुत्रानेंही त्याला असें विशेषण दिल्हें आहे कीं,

॥ सरस्वतीपाणिसरोजसंपुटप्रमृष्टहोमश्रमसीकरांभसः ॥

बाणकवीच्या आजाचें नांव अर्थपति आणि पणजाचें नांव कुबेर. हा विख्यात पुरुष गुप्तसंप्रदायी लोकांचा गुरु होता. बाणकवीचें घर शोणनदीच्या पश्चिमेस च्यवन ऋषीच्या आश्रमापासून दीड कोशावर प्रीतिकूट नामे गांवामध्यें होतें, तें गंगेच्याकांठीं वेळूच्या काठ्यांनी बांधिलें असे. बाणकवीचा बाप त्याच्या चौदाव्यावर्षी मरण पावला. त्याला आश्रय देणारे भद्र, नारायण, ईशान, आणि मयूरक, असे चार मित्र होते.

बाणकवीची बुद्धि त्याच्या नांवाप्रमाणेंच अत्यंत शीघ्रगति, सूक्ष्म, तीक्ष्ण, आणि ह्रदयंगम असी होती. त्याचा बाप वारल्यावर त्यानें लागलेंच आपले काठ्याचें घर सोडून शितिकंठ देशामध्यें हर्ष राजाकडे गेला. तेथें राजानें त्याची विलक्षण बुद्धि आणि विद्वत्ता पाहून त्याला आपल्या सभेत अध्यक्ष

करून ठेविलें. तेथें त्यानें **कादंबरी** ग्रंथ रचिला. त्या ग्रंथावरून ह्या कवीचें बुद्धिवैभव केवढें होतें याविषयीं विशेष वर्णन करायाला नको. श्लेषात्मक कवितेविषयीं या कवीचा तर बाणाच होता, यावरून असी एक ह्मण आहे कीं **बाणोच्छिष्टंजगत्सर्वं** ह्मणजे अर्वाचीन कवींच्या संपूर्ण श्लेषोक्ति बाणकवीच्या काव्यांत गतार्थ होतात. कादंबरी ग्रंथाचें पूर्वार्ध संपल्यावर बाणकवि मरण पावला. पुढें त्याच्या पुत्रानें उत्तरार्ध पूर्ण करून तो ग्रंथ शेवटास नेला.

## भास्कराचार्य.

हा जातीचा ब्राह्मण असून मोठा ज्योतिषी असे. त्याचा जन्म शालिवाहन शकाच्या अकराव्या शतकांत निजामाच्या राज्यांत बेदर ह्मणून एक गांव आहे तेथें झाला. तो लहानपणीं गणित, मुहूर्तग्रंथ, व सिद्धांत ग्रंथ मोठ्या आस्थेनें पढून त्यांमध्यें इतका प्रवीण झाला कीं, शेवटीं त्याला त्या शास्त्रावर ग्रंथ लिहिण्याविषयीं सामर्थ्य आलें. **बीजगणित** ह्मणून त्यानें एक गणिताचा ग्रंथ लिहिला. त्याला एकही पुत्र नव्हता, परंतु लीलावती नामक एक कन्या मात्र होती. तिच्या पोटींही कांहीं संतान नव्हतें. तिचें नांव चिरकाळ राहावें असें करण्याकरितां तिला एक ग्रंथ समर्पण करावा असा त्यानें निश्चय केला, आणि हिंदुशास्त्रांत द्वादश पुत्रांमध्यें कन्या ही पुत्रस्थानापन्न कल्पिली आहे आणि तिला पितृधन प्राप्त व्हावें हें योग्य आहे. एथें चिरस्थायी पितृधन तो ग्रंथच होय. इसवीसन्न ११५२ ना मध्यें त्यानें गणितशास्त्रावर जो ग्रंथ केला तो तिला समर्पण करून कन्येचें नांवावरून त्याला **लीलावती** असें नांव दिल्हें. हा ग्रंथ गणिताविषयीं उत्कृष्ट आहे. बंगाल्यांत लीलावती हा ग्रंथ प्रथमतः छापला, त्यावर इंग्रेजी मुखपत्र आहे. बीजगणित आणि लीलावती हे ग्रंथ सिद्धांतशिरोमणीचे उपोद्घात-

रूप आहेत. ब्रह्मगुप्तानें ब्रह्मसिद्धांत ह्मणून जो ग्रंथ केला आहे त्याच्या १२ व्या आणि १८ व्या अध्यायांतील विषय यांत घेतले आहेत. डाक्तर टेलरसाहिबाजवळ एक हस्तलिखित पुस्तक आहे त्यांत लीलावतीमध्यें जे नियम सांगितले आहेत, त्यांची सिद्धता केली आहे. त्याला **उदाहरण** असें ह्मणतात. हाही ग्रंथ बहुधा आचार्यांचाच असावा. धनेश्वरदैवज्ञ ह्मणून कोणी एक महापंडित होते त्यांनीं लीलावतीवर टीका केली, तिचें नांव **लीलावतीभूषण. अमृतसागरा** ही एक लीलावतीवर दुसरी टीका गंगाधर पंडित यानें केली आहे. हा जंबूसर एथला राहणारा उत्कृष्ट ज्योतिषी होता व त्याचे पूर्वजही ज्योतिषी होते असें त्यानें ग्रंथारंभी लिहिलें आहे. अणखी रंगनाथ, सूर्यदश, आणि गणेश, यानीं टीका केल्या आहेत.

ह्यानंतर त्यानें इसवी सन्न ११५४ नांत सिद्धांत प्रकरणीं एक ग्रंथ केला, त्याला **सिद्धांतशिरोमणि** असें नांव दिल्हें. त्याचे दोन भाग केले आहेत. एकाचे नांव गोलाध्याय व दुसरा गणिताध्याय. **सूर्यसिद्धांत** हा मोठा गणिताचा ग्रंथ भास्कराचार्यानें केला. याजवर **गुढार्थप्रकाशिका** या नांवाची टीका रंगनाथ यानें केली आहे. आणि नृसिंहगणक व भूधर या दोघानीं टीका केल्या आहेत. **तिथितत्व, ज्योतिषतत्व**, असे दोन ग्रंथ, एक फलग्रंथ व दुसरा सिद्धांतग्रंथ हे आचार्यानेंच केले असावे.

ज्योतिष ग्रंथ हे प्राचीन काळापासून चालत आले आहेत. त्यांतील गणितें हल्ली बरोबर मिळत नाहींत. जसें सूर्यग्रहण किंवा चंद्रग्रहण अमुक वेळानें लागेल असें लिहिलेलें असतां त्यास दाहा पांच पळांचा तरी फेर पडतो, याचें कारण असें कीं, पूर्वीच्या ग्रंथकारांनीं जीं गणितें करून ठेविलीं आहेत त्यावर भास्कराचार्या खेरीज दुसरा कोणी चालना देणारा झाला नाहीं. भास्कराचार्यानें सर्व ग्रंथ तपासून जेथें न्यूनाधिक करावेंसें वाटलें तेथें करून नवीन गणित करून नियम बांधिले. ह्या गोष्टीलाही सुमारे सात आठशें वर्षें झालीं. त्यावर दुसरा कोणी त्यासारिखा

चालना देणारा झालाच नाहीं, त्यामुळें अंतर पडतें. भास्कराचार्यानें ग्रहांचे आणि नक्षत्रांचे वेध केले, तेव्हां दुर्बीण वगैरे कांहीं साधन नव्हतें, बुरती बांबूची नळी घेऊन वेध केले व ग्रहांच्या उंच्या, लंबोन्नति, आकार, परिमाण, आणि पृथ्वीचें स्वरूप वगैरे सर्व गोष्टी आपल्या बुद्धिकौशल्यानें शोधून काढल्या. गणित, पृथ्वीचा आकार, ग्रहण, इत्यादिकांविषयीं जे त्यानें सिद्धांत लिहिले आहेत ते हल्लीं सुधारलेल्या इंग्लिशांच्या सिद्धांताशीं कित्येक अंशीं बरोबर मिळतात. यावरून सहजच लक्षांत येतें कीं, भास्कराचार्यांच्या जवळ यंत्रादिकांचें कांहीं साधन नसतां त्यानें ज्या गोष्टी लिहिल्या त्या अनेक साधनविशिष्ट इंग्लिशांच्या मताशीं मिळतात. तेव्हां भास्कराचार्यांच्या बुद्धीचें चातुर्य व कल्पनाशक्ति किती असावी !

भास्कराचार्य बेदर मुकामीं आपल्या वयाच्या पांसष्ठाव्या वर्षीं स्वर्गवासी झाला.

## कल्याणमल्ल

हा जातीचा ब्राह्मण असून कलिंग देशचा राहणारा असे. कलिंगदेशचा राजा अनंगभीम ज्यास लाडदेव असेंही ह्मणतात त्याच्या राज्यांत तो उदयास आला. त्या राजानें शालिवाहन शकाच्या १०९४ वामध्यें जगन्नाथाचें देवालय बांधिलें, हें त्या देवळांत एका दगडावर कोरलें आहे त्यावरून सिद्ध होतें. कल्याणमल्लानें आपल्या राजाच्या आज्ञेवरून कामशास्त्र विषयक ग्रंथ रचिला, त्याला **अनंगरंग** असें नांव दिल्हें. हल्लीं त्या ग्रंथाच्या भाषांतरासहित पुष्कळ आवृत्ति छापून प्रसिद्ध झाल्या आहेत. त्याची दाहा प्रकरणें आहेत. यावरून असें अनुमान होतें कीं, तो राजा अत्यंत विषयासक्त होता.

## शार्ङ्गधर.

हा कवि नामांकित पौराणिक असे. त्याची भरभर शालिवाहन शकाच्या अकराव्या शतकांत अनंगभीम राजाच्या वेळीं झाली. तो दामोदर याचा पुत्र होय. त्याच्या आजाचें नांव राघवदेव. तो हम्मीर राजाच्या दर्बारीं मुख्य पंडित असे.

ह्या कवीनें एक ग्रंथ केला, त्याला **हम्मीरविजय** हें नांव दिल्हें. त्यांत हम्मीर राजाची वंशावळी व त्याचीं लोकोत्तर कृत्यें लिहिलीं आहेत. तसाच त्यानें अणखी एक नानाप्रकारचे विषय निवडून व कित्येक सुभाषित श्लोकांचा संग्रह करून एक ग्रंथ लिहिला, त्याला **शार्ङ्गधरपद्धति** हें नांव दिल्हें, त्यालाच **सुभाषितशार्ङ्गधर** असें ह्मणतात. त्यानें दुसरा एक वैद्यक विषयावर ग्रंथ केला, त्यालाही **शार्ङ्गधर** हें नांव दिल्हें. त्याचीं तीन खंडें आहेत आणि सर्व ग्रंथ मिळून सव्वीसशें श्लोक आहेत. हा ग्रंथ सुलभ असून वैद्यांच्या फार उपयोगी आहे. हल्लीं या ग्रंथाच्या दोन आवृत्ति मराठी अर्थसहित छापिल्या आहेत.

शार्ङ्गधर बराच वृद्ध होई तोंपर्यंत वांचला परंतु त्याच्या वेळीं विशेष वर्तमानें कोणकोणतीं झालीं व तो कसा मृत्यु पावला याचें सत्य वृत्त त्याच्या संततीस पुढें मिळालें नाहीं व तो कोठें राहत होता हेंही ठाऊक नाहीं.

---

## हेमचंद्र.

पार्श्वनाथ जो जैनांचा मुख्य देव त्याचा व त्याच्या संप्रदायाची प्रथम प्रवृत्ति होऊन सुमारें २५०० वर्षें झालीं. त्यानंतर बहुत काळानें त्या मताचा अनुसारी एक नामांकित पुरुष होऊन गेला, त्याचें नांव हेमचंद्र. तो पाटलीपुत्र किंवा ज्याला पाटण असें ह्मणतात तेथील मुळचा रहवासी असे, असें **समयविलोक** नामक ग्रंथावरून दिसतें. तो महाविद्वान् असतां श्रावक

लोकांमध्यें त्याची मोठी मान्यता होती. त्यांच्या मतांत कित्येक प्रख्यात विद्वान होऊन गेले परंतु याच्या प्रतीचा कोणीच झाला नाहीं. त्याला धर्म कृत्यांत आचार्यपणाची पदवी असतां हरएक विषयांत त्याची सम्मति घेत असत. नेहरवाला प्रांतांत पूर्णपतन या नांवाचा एक प्रख्यात गांव आहे तो गुनमरपाळ रजपुत या राजाच्या ताब्यांत होता. त्याला हेमचंद्र यानें शके १०९५ वांत श्रावक धर्मांत आणिलें. त्याविषयींचें कांहीं इतिहासग्रंथ गुजराथ देशांत आहेत त्यावरून पाहतां हेमचंद्रानें त्या देशामध्यें जैनधर्माची प्रवृत्ति फार वाढविली. त्या ग्रंथांत हेमचंद्राला हेमाचार्यजीजती किंवा हेमराज असें ह्मणण्याचा व्यवहार अढळतो.

हेमचंद्रानें एक स्वतंत्र व्याकरण रचिलें, त्याचे सूत्राध्याय सात आहेत. त्याखेरीज **हेमचंद्रकोश** व **अनेकार्थकैरव** ज्याला **हैमकोश** असें ह्मणतात त्याची साहा कांडें केलीं आहेत, व **हैमशेषकोश** तो दक्षिणेंत प्रसिद्ध नाहीं परंतु टीकाग्रंथांत त्याचा उल्लेख अढळतो, तो व साहित्यशास्त्र, तर्कशास्त्र, योगशास्त्र, **त्रिषष्टिशिलाकापुरुषचरित्र**, इत्यादि मोठमोठाले ग्रंथ त्यानें रचिले ते या देशांत उपलब्ध नाहींत. कारण जतीमताचे लोक ते ग्रंथ दुसऱ्या लोकांच्या दृष्टीस पडूं देत नाहींत. सांप्रत डाक्तर भाऊदाजी यांनीं मोठ्या प्रयासानें हेमचंद्रकृत एक काव्य ग्रंथ आणिला आहे, त्याचे सर्ग २० आहेत आणि त्याचे अनुष्टुभ व इतर छंदांचे सर्व श्लोक मिळून ३५०० आहेत. त्यावर लेशाभयतिलक ह्मणून जैनमतानुसारी कोणी महाविद्वान होता त्यानें पदशः व्याख्या केली आहे. तिची रचना संवत्१२९२ वांत झाली. ह्या काव्यांत चौलुक्य वंशोत्पन्न जे कुमारपालादि राजे त्यांचें इतिवृत्त वर्णिलें आहे. हें काव्य करण्याविषयीं हेमचंद्राचा दुसरा एक मुख्य हेतु हा कीं, आपण जें व्याकरण रचिलें आहे त्याचीं उदाहरणें लोकांत कसकशीं उपयोगांत येतात हें स्पष्ट दाखवावें, ह्मणून भट्टीकाव्या प्रमाणें प्रकरणशः सूत्रांचीं उदाहरणें देऊन राजवृत्त वर्णिलें आहे. किंबहुना भट्टिकाव्यापेक्षां

हेमचंद्रानें आपल्या व्याकरणाच्या प्रथम सूत्रापासून शेवटच्या सूत्रापर्यंत सर्वच व्याकरण या काव्यांत बांधिलें आहे. काव्याचा आरंभ श्लोक.

॥ अंस्तिस्वस्तिकवद्धर्मैधर्मागारंनयास्पदं ॥
॥ पुरंसदाश्रियाश्लिष्टंनाम्नागेहिलपाटलं ॥

पुढें दुसऱ्या श्लोकापासूनच संधिप्रकरणाचीं उदाहरणें देण्यास आरंभ केला ते येणेंप्रमाणें:—

उमाभर्तृषभस्कंदमातापितृऋषिपूजकाः
नभर्तृऋषभाअस्मिनूनासनूपुत्रेणवर्जिताः ॥
इहर्णार्णकंबलार्णवत्सरार्णंदशार्णकं
वसनार्णवत्सतरार्णप्रार्णवानकस्यचित् ॥
मणीवमसृणौचक्रदंपतीवयुतौस्तनौ
विजेतुंरोदसीवात्रस्त्रीणांभातःस्मरायुधे ॥
अमीअमुमुईचोस्यनखाःकंठेइहक्षताः
अपेहित्वमुउत्तिष्ठयद्याएवंनुमन्यसे ॥

याप्रमाणें व्याकरणोदाहरणें राजवर्णन प्रसंगांत कसकशीं आणिलीं आहेत तीं पाहून व्याकरणज्ञांस मोठा चमत्कार वाटेल, व शब्दाची व्युत्पत्तिही दृढ होईल, असी या काव्याची रचना सर्वोत्कृष्ट आहे.

## रामानुजाचार्य.

हा शंकरमताचा प्रतिपक्षी शालिवाहन शकाच्या अकराव्या शतकांत दोरासमुद्र नामक शहराचा राजा बेटावर्द्धन याच्या वेळीं श्रीपेनुमुतूर या गांवीं जन्मला. त्याच्या बापाचें नांव केशवाचार्य आणि आईचें नांव कांतिमती. तो गांव मद्रासेपासून चोवीस मैलांवर कांची किंवा ज्याला कंजेवरम् असें ह्मणतात

त्याच्या मार्गावर आहे. त्याचें आठवें वर्षी मौंजीबंधन झालें. नंतर त्यानें आपला मामा जो यादवप्रकाश त्यापासीं वेदशास्त्रांचें अध्ययन केलें. तो महाबुद्धिमान् होता. त्यानें प्रथम पेलुमुतूर यां गावांत एक चिंचेचें* झाड होतें, त्याखालीं बसून रामचंद्राची उपासना केली. पुढें त्यानें जीवेश्वराचा भेदवाद हें नवें मत काढून शंकरमताचे खंडण केलें. तो सीतारामाची पूजा व त्रिपुंड्र धारणादिकाचे संप्रदाय हे लोकांस उपदेशूं लागला. कांहीं दिवसानीं त्यानें देशपर्यटन केलें, आणि मल्लुकोट शहरास जाऊन तेथील ब्राह्मणांस दोन गोष्टी सांगून त्यानीं शैवमत सोडावें असें केलें, व त्यानीं आपल्या मतानें वागावें याविषयीं त्यांस कित्ता घालून दिल्हा. नंतर तो तानोर प्रांतांतून दोरासमुद्र एथें गेला, आणि तेथील राजाच्या कन्येला पिशाचबाधा झाली होती ती त्यानें घालविली. तेणेंकरून त्यावरराजाची मर्जी प्रसन्न होऊन त्यानें त्याला मोठीं मोलवान बक्षिसें दिल्हीं. त्या राजालाही यानें वैष्णवधर्मोपदेश केला. नंतर आचार्यबावा नानाक्षेत्रीं जाऊन तेथील ब्राह्मणांस सर्वकाळ शुद्ध वैष्णवमार्ग शिकवीत असे. आपला शिष्य जो यमदुनाचार्य यास बरोबर घेऊन यानें तिरूपति, जगन्नाथ, काशी, आणि जयपूर अशा क्षेत्रीं तिर्थाटणें केलीं. त्या क्षेत्रांत यानें वैष्णवधर्म दृढ स्थापून कांहीं मठही बांधिले. या कवीचीं वैष्णवधर्मसंबंधी व्याख्यानें ऐकून जयपूरचा राजा आत्यानंदित झाला, आणि त्याला जैनलोकांचा मोठा त्रास येऊन त्यानें त्या लोकांस तेलाच्या घाण्यांत घालून मारून टाकिले. आचार्यानें जयपुरांत वैष्णवांकरितां एक मठ बांधिला, आणि नंतर बद्रीनारायणास जाऊन तेथील देवाचें दर्शन घेतलें. शेवटीं स्वदेशीं परत आला, तेथें त्यानें स्वमतानुरोधी कित्येक ग्रंथ केले. ते येणेंप्रमाणें: — **व्याससूत्रभाष्य** त्यालाच **श्रीरामानुजभाष्य** असें ह्मणतात. **गीताभाष्य, तर्कभाष्य, वेदार्थसंग्रह, न्यायामृत, वेदांतप्रदीप, वेदांततत्वसार, श्रौतभाष्यशतदूषणी, चंडमारुती, त्रिशतूध्यान,**

*रामानुज संप्रदायी त्या झाडाची अद्याप पूजा करितात.

**नारदीयपंचरात्र**, **विष्णुपूजा**, व **विष्णुप्रबोधन**-यांत विष्णूच्या स्तुतिरूपें प्रातःस्मरण आहे. **रंगनाथस्तोत्र** यांत त्रिचिनापल्ली किंवा श्रीरंगपट्टण एथील मूर्त्तीचें स्तवन आहे. **सिद्धांत**, या ग्रंथांत स्वमताचें स्थापन केलें आहे. **विष्णुसहस्रनाम**, यांत विष्णूची स्तुति, संध्यावंदन, स्नानविधि, ऊर्ध्वपुंड्रधारण, इत्यादि व रामानुजमताचे आचार व संप्रदाय यांचें कथन केलें आहे. **त्रिगद्य**, यांत तीन गद्यांचा संग्रह आहे. पहिलें **विष्णुलोकगद्य**, यांत वैकुंठलोकाची रचना व पदार्थ व तेथील ऐश्वर्य यांचें निरूपण आहे. दुसरें **श्रीरंगगद्य**, यांत विष्णूची स्तुति आहे. आणि तिसरें **शरणगद्य**, यांत विष्णूची प्रार्थना व त्याला अनन्यभावेंकरून कसें शरण जावें हा प्रकार आहे. **वाशिष्टाद्वैतभाष्य**, हा ग्रंथ रामानुजाचार्यांचा आहे.

त्यानें स्वमतानुयायी वैष्णव मंडळीकरितां एक धर्मसंहितेचा ग्रंथ करण्यांत आपलें उत्कृष्ट बुद्धिकौशल्य दर्शविलें. जेव्हां तो पन्नास वर्षांचा झाला तेव्हां त्यानें सर्व प्रपंचाचा परित्याग करून चतुर्थाश्रम घेतला आणि आपलें सर्व अवशिष्ट आयुष्य भगवच्चिंतन, आणि न्याय व वेदांतपर पुस्तकें वाचण्यांत घालविलें.

रामानुजाचार्य श्रीपेनुमुतूर एथें आपल्या स्वदेशीं समाधिस्थ झाला. पुष्कळ वैष्णव लोक तो शेषाचा अवतार असें मानीत असत. त्यानीं आचार्याची हुबेहुब धातुमय मूर्त्ति करून तेथील मठांत स्थापिली आणि मुख्य द्वादश अवतारांपैकीं हा एक होय असें ते अद्यापि मानतात. रामानुजाचार्यांची एक गादी तादरीमध्यें आहे, तिचें नांव तिगळ. दुसरी गळता गावांत आहे. अणखी अहोबळ मठांत एक गादी आहे तिचें नांव वडगळ. आणिही रेवासा एथें एक गादी आहे. वडगळ आणि तिगळ यांमध्यें कांहीं संप्रदायभेदामुळें वारंवार भांडण होत असतें.

रामानुज पिढीचे कित्येक पुरुष होऊन गेल्यानंतर रामानुज संप्रदायिक द्रविड आचार्यांमध्यें राम नांवाचा एक साधु उत्पन्न झाला. त्यानें आनंद संप्रदाय काढिला. तो रामानुजी मतालाच अनुसरून आहे. त्याचें नांव रामानंदी. हिंदुस्थानांत

रामानंद संप्रदायाचे बैरागी हजारो आहेत. बैराग्यांतही संयोगी, निहंगी, इत्यादि उपसंप्रदाय निघाले. कबीर हा रामानंदाचा शिष्य. त्यानें आनंद संप्रदायांत कांहीं कल्पित आचाराची भेळ करून एक नवाच पंथ काढिला, त्याचें नांव नानकपंथ. पुढें त्या पंथांतही बारा उपदेश निघाले. अलीकडे शके १६७३ रांत रामानुज संप्रदायी गलता गादीच्या आचार्यांत एक रामाचरण नामें साधु उत्पन्न झाला, त्यानें मूर्त्तिपूजा, उपवास इत्यादि नेम प्रकरण फारच वाढिवलें. रजपुत लोकांत त्याची एक गादी आहे. रामाचरण संप्रदायांतून निरंजन व रामस्नेही हे उपसंप्रदाय निघाले. याप्रमाणें रामानुजाचार्यांचा संप्रदाय वाढत गेला आहे.

## श्रीहर्ष.

हा कवि आपल्या सुप्रसन्न नांवाप्रमाणें उत्कृष्ट बुद्धिमान् आणि कल्पक होता. **नैषधकाव्य** जें पंचमहाकाव्यांत शिरोभाग तें, **उत्तरनैषधचरित्र**, **नागानंद नाटक** व **साहसांकचंपू** हीं श्रीहर्षाचीं आहेत. तसाच त्यानें **रत्नावली** हा एक लहान ग्रंथ केला. त्यांत वत्सराजा आणि रत्नावली नामें एक स्त्री यांचें कामचरित्र वर्णिलें आहे.

हा न्याय व्याकरणादि शास्त्रांत महापंडित होता. त्यानें सर्व शास्त्रविषयांवर क्रोड ग्रंथ केले आहेत! अर्वाचीन काळचे पंडित त्या क्रोड पत्रांतील कोट्या काढून वादीचें खंडण करीत असतात. या कवीचें साहाजिक भाषणही सुरस आणि अनुप्रासभरित असे. एकदां हा उडीद खात बसला असतां गुरूनें विचारलें **श्रीहर्ष किं जक्षसि** त्यावर श्रीहर्षानें उत्तर दिल्हें. **शेमुषी मुषमाषान्नं** अर्थ—बुद्धीला मंद करणारें माषान्न खातों.

या कविविषयीं असी गोष्ट सांगतात कीं, याचा बाप जो श्रीहीर तो वादी पंडित होता. तो वादप्रसंगांत सर्व पंडितांना जिंकीत असे. तो निवर्तल्यावर श्रीहर्ष लहानपणांत खोडक

आणि जडमति असतां त्याचा कोणी उपहास केला: पुढें त्यानें आपल्या आई जवळून विद्याप्राप्ति करितां एक मंत्र घेतला आणि तिच्या सांगण्याप्रमाणें तिचा वध करून प्रेतावर बसून मंत्रजप केला. मग सरस्वती त्याला प्रसन्न होऊन त्याच्या आईला जिवंत केलें आणि त्याच्या जिव्हेवर मंत्राक्षरें लिहून अपार विद्येचें वरदान दिल्हें.

श्रीहर्ष या नांवानें आह्मी गोष्ट लिहिली त्याजविषयीं कोणी असें सांगतात कीं, सदरी लिहिलेल्या ग्रंथांचा कर्त्ता धावक या नांवाचा कोणी महाकवि श्रीहर्ष या नांवाच्या राजा जवळ शके ११११३ मध्यें होता. त्यानें ग्रंथांवर राजाचें नांव ठेवून पुष्कळ द्रव्य मिळविलें. ही गोष्ट काव्यप्रकाशांत **काव्यंयशसेर्थकृते** या श्लोकाच्या व्याख्येंत उदाहरणार्थ घेतली आहे. यास्तव पूर्वीचें सर्व वर्णन धावक कविपर समजावें.

## सोमदेव.

हा प्रख्यात कवि महाबुद्धिमान् वक्ता तर सर्वोत्कृष्ट होता, असें सांगतात. हा काश्मिर एथला राहणारा शके बाराव्या शकांत होता. याचें कांहीं इतिवृत्त कोण कोणाला ठाऊक आहे ते असी कथा सांगतात कीं, सोमदेव हा हनुमंताचा उपासक होता. त्यानें दुसरें एक महाभारत रचून भारतीय कथा वर्णाव्या असी योजना केली असतां त्याला व्यासाचें दर्शन झालें आणि त्याला गुणाढ्य असें नांव दिल्हें. पुढें त्यानें **कथासरित्सागर** ज्याला **बृहत्कथा** असें ह्मणतात त्याची संख्या एक लक्ष तो ग्रंथ रचिला. दक्षिणेमध्यें याचीं कांहीं प्रकरणें उपलब्ध आहेत. त्यांत एकेक गोष्टी मोठाल्या लांब लांब व विचित्र आख्यानयुक्त रचिल्या आहेत. त्या ग्रंथाची रचना पद्यरूप असून त्याची वाणी अतिगंभीर, प्रौढ, आणि मनोरंजक असी आहे.

गोवर्धन सप्तशतीकारानें पुरातन कविबरोबर यालां नमस्कार केला आहे कीं,

॥ श्रीरामायणभारतबृहत्कथानांकवीन्नमस्कुर्मः ॥
॥ त्रिस्रोताइवसरसासरस्वतीस्फुरतियैर्भिन्ना ॥

या अनुमानावरून हा कवि फार पुरातन काळचा असावा असा तर्क होतो.

**प्रक्रियानीतिवाक्यामृत** हा ग्रंथ सोमदेवानेंच केला. यांत राजकीय नीतिप्रकरणें बांधिलीं आहेत. रघुवंशादि पंचकाव्यांच्या टीकेंत ठिकाणो ठिकाणीं या ग्रंथाचे श्लोक प्रमाणार्थ लिहिले आहेत. यांत धर्मसमुपदेश, अधर्मसमुपदेश, षड्वर्गसमुपदेश, अन्विक्षिकीसमुपदेश, त्रयीसमुपदेश, वार्तलसमुपदेश, क्षत्रियाचारसमुपदेश, मंत्रिसमुपदेश, स्वामिसमुपदेश, जनपदसमुपदेश, बळसमुपदेश, विचारसमुपदेश, आणि दंडसमुपदेश इतकीं प्रकरणें आहेत. या ग्रंथाची वाणी गंभीर, अर्थभरित, व प्रौढ आहे.

## सोमनाथभट्ट.

हा जातीचा तेलंगी ब्राह्मण असून राजमहेंद्रि प्रांतांत तेनलंका ह्मणून एक गांव आहे, तेथील राहणारा असे. तो शालिवाहन शकाच्या बाराव्या शतकांत जन्मला होता, असें त्या प्रांतांतले पंडित लोक ह्मणतात. तो पुष्कळ दिवस दरिद्रावस्थेंत होता, कारण त्या प्रांतांतील पूर्वीच्या राजानें त्याच्या पूर्वजांस जी थोडिशी जमीन दिल्ही होती तीचकायती त्याची माल मिळकत होती.

तो मोठा झाला तेव्हां लग्नाचा खर्च भागण्या पुरतें त्याचे जवळ साहित्य नव्हतें आणि लवकरच लग्न करून घ्यावें ह्मणून उत्कंठित झाला होता. याकरितां त्यानें आपल्या एका नातेवाईकाचे घरीं जाऊन माझें लग्न करून द्या असी त्याजपाशीं विनवणी केली. तो व दुसरा एक ब्राह्मण ज्यास त्याच्या पूर्वजांचा लौकिक माहित होता, त्या दोघानीं श्रम घेऊन सोमनाथभट्टाला

एका मोठ्या श्रीमान् गृहस्थाला नेऊन भेटविलें. त्यांला त्याची दया येऊन त्यानें लग्नाचा खर्च देण्याचें कबूल केलें, आणि त्याचें एका सभ्य गृहस्थाच्या मुलीशीं लग्न लावून दिल्हें. लग्नोत्साह समाप्त झाल्यानंतर चालीप्रमाणें सोमनाथभट्टानें आपल्या सासूला साष्टांग नमस्कार घातला. परंतु ती बाई लालुचखोर होती ह्मणून ह्या कवीचा तिनें धिक्कार केला, व तो तीच्याजवळ गेला, तेव्हां तिनें तोंड मुरडलें. ही गोष्ट त्याच्या मनाला लागून सोमनाथभट्ट काशीस निघून गेला. तेथें वीस वर्षेंपर्यंत राहून त्यानें न्यायशास्त्र, वेदांतशास्त्र, आणि अलंकारशास्त्र, ह्यांचा मोठ्या तत्परतेनें चांगला अभ्यास केला. ह्या शास्त्रांत तो पूर्ण झाला तेव्हां आपल्या स्वदेशीं आला. मार्गांत येतांना तो टेक्कली, मंदसा, चक्कली इत्यादि देशच्या राजांस भेटला, आणि त्यांच्या पुढें आपली विद्वत्ता दाखविली. त्या प्रत्येक राजांपासून पालख्या, म्यानें, कंठ्या, शालजोड्या इत्यादि मोठमोठीं मोलवान बक्षिसें मिळविलीं. त्यानें सोन्याच्या जाळ्या व फुलें वगैरे नक्षीचें काम केलेल्या बांगड्या खरेदीकरून आपल्या सासूला बक्षीस दिल्या. त्या योगानें त्या लोभिष्ट बाईला इतका आनंद झाला कीं, ती त्याला सतत आशीर्वाद देऊं लागली

नंतर सोमनाथानें न्यायशास्त्र पढविण्याची शाळा घातली आणि पुष्कळ प्रतिष्ठा मिळविली. पार्थसारथीमिश्र ह्मणून कोणी एक प्रख्यात टीकाकार झाला, त्यानें मीमांसाशास्त्रावर **शास्त्रदीपिका** या नांवाची एक टीका केली. त्या टीकेवर सोमनाथभट्टानें **मयूखमाला** ह्मणून एक विस्तृत टीका केली आहे विद्वान लोक ह्या टीकेचा फार व्यासंग करितात आणि ह्या कवीला पुष्कळ सन्मान देतात. दक्षिणेंतील विद्वान लोकही त्या टीकेला फार वाखाणतात.

सोमनाथाला कांहीं मुलें होतीं. तो आपले देशांत साठावे वर्षीं मरण पावला. त्याचे वंशज अद्यापि आहेत.

# विष्णुशर्मापंडित

हा महापंडित सुमारें शके बाराशांत होता. यानें नीतिशास्त्रांतील प्रमेयें एकत्र करून नीतिविषयक पंचतंत्रात्मक एक ग्रंथ केला आहे, त्यास हितोपदेश असें ह्मणतात. त्यांत पशुपक्ष्यांच्या वगैरे चमत्कारिक गोष्टी लेंकरांस मौज वाटण्यासारिख्या सोप्या रचून नीति बांधली आहे. ह्या ग्रंथाची रचना गद्यपद्यात्मक असून त्यांत मित्रलाभ, सुहृद्भेद, काकोलुकय, लब्धप्रशमन, आणि अपरीक्षितकारित्व असीं पांच प्रकरणें आहेत.

हा ग्रंथ करण्याचें कारण असें सांगतात कीं, कोणी एक सुदर्शन नामक उदार व विद्वान् असा राजा होता. त्यास तीन पुत्र जडमती असे झाले होते. तेव्हां राजानें प्रधानांस बोलावून सांगितलें कीं, माझ्या पुत्रांस विद्या संपादन करण्याचा त्रास आहे आणि विचार करण्यास असमर्थ आहेत हें तुह्मास माहितच आहे. त्यांच्या वर्तणुकीविषयीं मी विचार करतों तेव्हां मला असें वाटतें कीं, माझें राज्य कांट्यानीं भरलेलें आहे आणि तें मला सुखदायक होत नाहीं. कारण ह्मटलें आहे कीं, कुसंतानापेक्षां निसंतान बरें. त्या मुलांस आपण कोण व आपली स्थिति कशी आहे हा बोध करण्यास तुह्मी समर्थ आहां काय? त्यावरून एका प्रधानानें उत्तर दिल्हें कीं, ज्यापेक्षां आयुष्य थोडें आहे व सर्व नीतिशास्त्राचें ज्ञान संपादन करण्यास काळ बहुत लागतो, त्यापेक्षां नीतिशास्त्राचें ज्ञान अल्पकालांत साध्य होईल अशा विषयीं नीतिशास्त्राचें प्रमेय थोडक्यांत सांगतां येईल असा कांहीं मार्ग शोधून काढावा. कारणकीं, संपूर्ण नीतिशास्त्राचा बोध होण्यास कठीण ह्मणून राजहंस पक्षी जसा उदकांशाचा त्यागकरून दुग्ध ग्रहण करतो तसें आपण सर्व नीतिशास्त्राचा सारांश ग्रहण केला पाहिजे. तर या कामाकरितां सर्व शास्त्रसंपन्न एक नामांकित विष्णुशर्मा ब्राह्मण आहे. तो ह्या मुलांना सुशिक्षित करील. राजानें विष्णुशर्म्याला बोलावून आणिलें आणि सांगित-

लें कीं, या मुलांनी तुह्मी चांगले शिकवून त्यांच्या मित्रांपेक्षां हुशार करावें ह्मणजे तुह्मास इनामें देईन.

विष्णुशर्मा ह्मणाला राजा ऐक. मी केवळ बक्षीशीच्या लोभास्तव ज्ञान देत नाहीं. परंतु अल्पकाळांत मीजर तुझ्या मुलांना नीतिशास्त्रांत प्रवीण न करीन तर माझें नांवच खोटें असी प्रतिज्ञा करितों. मग राजानें मुलांना त्याच्या स्वाधीन केलें. विष्णुशर्म्यानें त्यां मुलांना आपल्या बराबर घरीं नेलें व त्यांच्या करितां पूर्वोक्त ग्रंथ तयार करून त्यांस पढविला, आणि साहा महिन्यांत त्यांस नीतिशास्त्रांत निष्णात केलें तेव्हांपासून ह्या पांचतंत्रांची ख्याती झाली. हा ग्रंथ वाचल्यानें नीतिशास्त्राचे मुख्य सिद्धांत चांगलें समजतात. ह्याची प्राचीन काळापासून हिंदुलोकांस फार प्रीति यामुळें भाषांतरांत याच्या आवृति पुष्कळ झाल्या आहेत.

या ग्रंथाचें प्रथम भाषांतर नशिरवान बादशाहाच्या वेळीं फारशी भाषेंत झाल्या नंतर फारशी भाषेंतून फ्रेंच भाषेंत पेटिट् ली क्राक्स यानें भाषांतर केलें. पुढें सर विलीयम जोन्स, कोलब्रूक, आणि विलकिन्स ह्यां साहेबानीं त्याचीं इंग्लिशांत भाषांतरें केलीं. तेणें करून सर्व सुधारलेल्या देशांत या ग्रंथाची माहिती आहे. युरोप व पश्चिम एशिया यादेशांत कलिल आणि दिम्न यानांवानें याग्रंथाची प्रसिद्धि आहे. हितोपदेश हें जें त्याचें मूळ नांव तें हिंदुस्थानांत मात्र प्रसिद्ध आहे.

## बोपदेव.

हा महापंडित व ग्रंथकर्त्ता शके १२०० शांत झाला. बहुधा सर्व शास्त्रांत ह्याचे निबंध ग्रंथ आहेत. व्याकरण, वैद्यक, अलंकार इत्यादिकांवर जे आलीकडे ग्रंथकर्ते झाले त्यानीं याचें मत वारंवार दाखविलें आहे. त्यानें **मगधबोध** ह्मणून बाळभाषेवर व्याकरण रचिलें, त्याचीं सूत्रें अकराशें आहेत. त्यांन मागधी, पैशाची, शूरसेनी, राक्षसी इत्यादि भाषेचींही नेमसूत्रें

आहेत. या ग्रंथाचीं प्रकरणें बारा आहेत. त्या सूत्रांवर वृत्त या नांवाची एक टीका आहे. अणखी रामानाचारी यानेंही एक टीका केली आहे असें ह्मणतात. एकंदर या व्याकरणावर आठ टीका आहेत असें सांगतात. बंगाल्यांत ह्या व्याकरणास विद्वान लोक फार मान देतात.

संस्कृत व्याकरणाचेही नेम बोपदेवानें बांधिले आहेत परंतु ते आर्ष ह्मणजे ऋषिप्रोक्त नाहींत ह्मणून लोकांत त्या व्याकरणाचा प्रचार राहिला नाहीं. दुसरेही त्याचे मोठाले व्याकरण ग्रंथ बुडाल्या सारिखे आहेत, तरी बंगाल्या कडील पंडित त्या मताचे अनुसारी त्यांचा व दक्षिणेंतील पंडितांचा कित्येक शब्दां विषयीं मतभेद आढळतो.

**धातुपाठ** आणि **छंदःशास्त्रकोश** हे ग्रंथ बोपदेवाचे आहेत. **कविकल्पद्रुम** हा ग्रंथ त्यानें संपूर्ण क्रियापदांचे मूळ धातूंची गणना करून श्लोकरूपें रचिला आहे. ल्यांगलिस साहेबाच्या मता प्रमाणें त्यांत दोन हजारापेक्षां अधिक धातू नाहींत. रोजन साहेब ह्मणतो कीं, त्यांत मूळ धातू २३५० आहेत, परंतु ल्यांगलिस साहेब बोपदेवाच्या मता प्रमाणें २००० च आहेत असें ह्मणतो. अणखी जर बरोबर विचार केला तर यापेक्षां ही कमी भरतील. या ग्रंथांत समानानुपूर्विक धातूंची गणना करून त्यांचीं उदाहरणें श्लोकांत दाखविलीं आहेत. कविकल्पद्रुमावर **धातुदीपिका** या नांवाची टीका दुर्गादास यानें केली. दुसरी टीका रामन्यायालंकार यानें केली, तिचें नांव **कविकल्पद्रुमव्याख्या.**

तसाच त्यानें **कविकामधेनु** या नांवाचा दुसरा ग्रंथ केला आहे. त्यामध्यें दशगणांतील समानानुपूर्विक जे धातू आहेत ते कस कसे पालटतात याजविषयीं वेगवेगळ्या खुणा देऊन निराळे काढले आहेत, आणि त्यांत अवांतर व्याकरणें, इंद्र, चंद्र, काशकृत्स्नी, आपिशली, शाकटायन, पाणिनी इत्यादि वैय्याकरणांच्या मतें कोण कोणत्या खुणा आहेत यांविषयीं त्यां-

च्या मतांचा विचार करून सर्व साधारण नेम या काव्यांत दर्शविले आहेत.

**श्रीमद्भागवत** हें बोपदेवानें केलें असा लोकप्रवाद आहे. वैद्यशास्त्रांत **शतश्लोकी** या नांवाचा ग्रंथ आहे तो बोपदेवानें केला.

## ईल्लय.

हा विजयनगरचा राहणारा शालिवाहन शकाच्या १२९० मध्यें होता. हा ज्योतिषशास्त्रवेत्ता आनागोंदी ज्याला किष्किंधानगर ह्मणतात तेथील विरूपाक्ष राजाच्या पदरीं असे. तो ज्योतिषांत इतका प्रवीण होण्याचें कारण असें कीं, लहानपणापासून बहुतकाळपर्यंत त्यानें ज्योतिषशास्त्राचा सतत अभ्यास केला तेणेंकरून त्या शास्त्रांत त्यानें पुष्कळ ग्रंथ रचिले. त्यापैकीं **सूर्यसिद्धांत** ह्मणून एक प्राचीन मयासुरकृत ग्रंथ आहे त्यावरची टीका त्याची आहे. हा ग्रंथ भरतखंडांत सर्वत्र लोकमान्य आहे व पंचांगांचें गणित ह्यावरूनच करितात. सर्व सूर्यसिद्धांताचें इंग्रेजी भाषांतर क्यापटन वारेन यानें केलें, तें मद्रासेंत छापलें आहे.

ईल्लयानें ज्योतिषशास्त्रावांचून दुसऱ्या कोणत्याही शास्त्राचा व्यासंग केला नाहीं. त्याचा काळ विजयनगर एथेंच झाला.

## उरगप्पादंडनाथ.

हा कवि लश्करी खात्यांत मोठ्या प्रतीचा सरदार असे. असें ह्मणतात कीं, हा विजयनगरचा राजा हरिहरराय याचा सेनाधिपति असे. हा आनागोंदी किंवा ज्याला किष्किंधानगर असें ह्मणतात तेथें जन्मला होता. त्याचा उदय शालिवाहन शकाच्या तेराव्या शतकांत झाला.

त्याची व्याकरणशास्त्रांत फारचांगली गति असे. त्यानें

दोन कोश केले. त्यांचीं नांवें **नानार्थरत्नमाला** आणि **एकाक्षरनिघंट.** भरतखंडांत सर्व विद्यालयांत ह्या ग्रंथांचा उपयोग करितात.

## साकल्यमाला.

हा कवि आनागोंदीच्या समीप विरूपाक्ष ह्मणून एक गांव आहे, तेथील राहणारा असे. त्याचा भरभराट शालिवाहन शकाच्या तेराव्या शतकांत झाला. हरिहर राजाच्या दरबारीं त्याला न्यायाधीशाचें काम होतें त्यानें **गजेंद्रविजय** नामक एक चंपू केला. त्यांत गजेंद्रमोक्ष या नांवाचें प्रसिद्ध आख्यान ह्याविषयीं सविस्तर वर्णन केलें आहे. तो ग्रंथ गद्यपद्यात्मक आहे.

साकल्यमाला या कवीनें मोठी प्रतिष्ठा मिळविली. तथापि त्याचें लक्ष बहुतकरून सरकारी काम करण्यांत फार असे, ह्मणून त्याच्या हातून अणखी विशेष गोष्टी घडल्या असें सांगवत नाहीं. परंतु एवढेंच समजलें कीं, तो स्वग्रामीं स्वर्गस्थ झाला.

## माधव किंवा विद्यारण्य.

हा तुंगभद्रा नदीच्या काठीं पंपा नामक एक क्षेत्र आहे तेथें राहत असे. त्याचा जन्म शालिवाहन शकाच्या तेराव्या शतकांत झाला. विजयनगरचे हरिहरराय आणि बक्काराय ह्या राजांचे वेळीं तो उदयास आला. याचा वृत्तांत लोकवार्तेमध्यें ऐकतों तो येणेंप्रमाणें.

हा चाळीस वर्षांच्या वयाचा होई तोंपर्यंत अत्यंत दारिद्रावस्थेंत होता. त्याला पुष्कळ मुलें होतीं, त्यांच्या उदरनिर्वाहार्थ तो कधींमधीं भिक्षाही मागत असे. अशा स्थितींत असतां त्या क्षेत्रांत एके दिवशीं कोणी सिद्धपुरुष विरूपाक्षेश्वर देवाच्या दर्शनास आला होता, तो त्याला भेटला आणि त्यानें त्याला एक

स्तोत्र दिल्हें आणि सांगितलें कीं, दररोज तूं ह्याचा पाठ करीत जा, ह्मणजे तुला द्रव्य व प्रतिष्ठा प्राप्त होईल. नंतर त्यापासून माधवभट्टानें अनुग्रह घेतला. त्यानें द्रव्यप्राप्तीसाठीं गायत्री मंत्राचीं चोवीस पुरश्चरणें यथासांग केलीं, तथापि त्याला संपत्ति प्राप्त झाली नाहीं. शेवटीं त्रासून त्यानें सन्यास घेतला. तेव्हां त्याला गायत्री प्रसन्न होऊन पुढें उभी राहिली, आणि "वरमाग" ह्मणून बोलली. तेव्हां त्यानें फार रागावून ह्मटलें कीं, आतां तूं मजकडे कशासाठीं आलीस ! मला द्रव्याची किंवा दुसऱ्या कोणत्याही विषयाची गरज नाहीं. तूं आलीस तशी जा. तथापि देवीनें प्रसन्न होऊन त्याला चतुर्दश विद्या समग्र दिल्या आणि त्याचें नांव विद्यारण्य असें ठेविलें. आणि त्याच्या संतोषार्थ देवीनें होनाची वृष्टि पाडिली. तेव्हां राजानें बंदोबस्त ठेऊन लोकांच्या घरांवर पडलेले लोकांस दिल्हे आणि अरण्यांत व रस्त्यांत पडलेले राजानें घेतले. तेव्हांचे होन अद्यापि कोणाजवळ सांपडतात.

त्यानें वैद्यशास्त्र, धर्मशास्त्र, ज्योतिष, वेदांत, इत्यादिकांवर पुष्कळ ग्रंथ केले आहेत. त्यांपैकीं हे पुढील कांहीं होत.

**निदानमाधव**—हा वैद्यक ग्रंथ आहे. याग्रंथाची प्रसिद्धि दाक्षिणोत्तर हिंदुस्थानांत सर्वत्र आहे. याचे मूळ श्लोक १५०० आहेत. यांत ज्वर, अतिसार, ग्रहणी, अर्श, अग्निमांद्य, विषूचिका, कृमि, कामला, पांडु, रक्तपीति, राजयक्ष्मा, कास, हिक्का, श्वास, स्वरभेद, अरोचक, छर्दि, तृष्णा, मूर्च्छा, मदात्यय, दाह, उन्माद, अपस्मार, वायु, वातरक्त, उरस्तंभ, अमवात, शूल, अनाह, उदावर्त, गुल्म, हृद्रोग, मूत्रकृच्छ्र, अश्मरी, प्रमेह, मेद, उदरशोथ, वृद्धि, गलगंड, गंडमाला, श्लीपद, विद्रधि, नाडीव्रण, व्रणशोथ, भगंदर, उपदंश, शुक्रदोष, त्वगामय, शीतपित्त, उदर्द, कुष्ठ, आम्लपित्त, विसर्प, विस्फोट, मसूरिका, दोनशे प्रकारचे क्षुद्ररोग, नासारोग, चक्षुरोग, शिरोरोग, स्त्रीरोग, बालरोग, विषरोग इत्यादि रोगांचें निदान ह्मणजे मूळकारण व त्यांचीं लक्षणें व वात, पित्त, कफ या भेदेंकरून प्रत्येक रोगाचें त्रिविधत्व व साध्यासाध्य या विषयींचीं चिन्हें व परीक्षा बरोबर सांगितल्या आहेत.

यावर नरसिंह व विजयरक्षित यानीं टीका केल्या आहेत.

**कालमाधव** — हा धर्मशास्त्रावर ग्रंथ आहे. याची प्रकरणें चार आहेत. पहिल्या तीन प्रकरणांत वर्ष, अयनें, षट्ऋतु, मास, पक्ष, तिथि, श्राद्धकाल, एकभुक्तनिर्णय, नक्तनिर्णय, इत्यादि विषय आहेत. आणि चवथ्यांत कालनिर्णय, ऋतुनिर्णय, चांद्रसौरमासनिर्णय, अधिकमासनिर्णय, रविसंक्रमनिर्णय, इत्यादि विषय आहेत. हा धर्मशास्त्र सांगणाऱ्यांस फार उपयोगी आहे.

**शंकरविजय**—यांत शंकराचार्यकृत दिग्विजय, व्यासमुनीचीभेट व त्यानीं दिल्हेला आयुष्यविस्तार, ब्रह्मदेवाचेंदर्शन, कुमारिलभट्टाचेंदर्शन, मंडणमिश्राचीगांठ व त्याच्या स्त्रियेसीं संभाषण, परकायाप्रवेशविद्येचें ज्ञान, शिष्यांचें येणें, नृसिंहाचा साक्षात्कार, सरस्वतीविजय, कांचीनगरनिर्माण, शृंगेरीची स्थापना, कामाक्षिविस्तार, अद्वैतविद्येचें प्रकाशन इत्यादि विषय अनुक्रमानें सांगितले आहेत. या ग्रंथाची कविता फार मनोरंजक, प्रौढ, व गंभीर असी आहे.

**पंचदशी**—हा वेदांतपर ग्रंथ असून यांत पंधरा प्रकरणें आहेत.त्यांचीं नांवें. चित्रदीप, तृप्तिदीप, कूटस्थदीप, ध्यानदीप, नाटकदीप, तत्वविवेकदीप, पंचभूतविवेकदीप, पंचकोशविवेकदीप, अद्वैतविवेकदीप, महावाक्यविवेकदीप, ब्रह्मानंदयोगानंद, आत्मानंदयोगानंद, अद्वैतानंद, विद्यानंद, आणि विषयानंद.

**ब्रह्मगीता**— हींत माध्व, शांकर, आणि रामानुज यांच्या मतांचे प्रतिपादन करून श्रुतिसंमत जो अद्वैतसिद्धांत त्याचें स्थापन केलें आहे. इजवर **प्रकाशिका** या नामें टीका आहे.

**शतप्रश्नकल्पलतिका**—यांत प्रत्येक प्रश्नाचे उत्तररूप दाहा दाहा श्लोक केले आहेत आणि त्या लहान प्रकरणांस दशक असें नांव दिल्हें आहे. याप्रमाणें शंभर प्रश्नांवर शंभर दशकें आहेत. त्यांत पांच दशकें ब्राह्मणांच्या अवांतर भेदाविषयीं आहेत. त्यांत पंचद्रविड व पंचगौड कोणाला ह्मणावें व चित्तपावन, कऱ्हाडे, किरवंत, देवरुखे, शेणवी, इत्यादि भेद कशामुळें झाले व

तीं नावें कशामुळें पडलीं हें त्यांच्या मूळ कारणासहित सविस्तर वर्णिलीं आहेत.

**सर्वदर्शनसंग्रह**— या ग्रंथांत न्याय, वेदांत, मीमांसा, सांख्य, काणादं इत्यादि शास्त्रांचें संक्षेपानें कथन केलें आहे.

**विद्यारण्यकालज्ञान**— ह्या ग्रंथांत तैलंगण देश यवनांच्या हस्तगत होई तोंपर्यंत त्यांत राज्यक्रांति व त्या राज्यावर जे राजे अधिरूढ झाले, त्यांचीं कृत्यें ह्या गोष्टींचें भविष्य कथन केलें आहे.

**माधववृत्ति.**— या ग्रंथांत क्रियापदांचें मूल धातू जे बावीशशे आहेत त्यांवरून वेगळाले प्रत्यय होऊन कसे कसे शब्द सिद्ध होतात याविषयीं सूत्र, भाष्य, आणि वार्त्तिकें हीं वचनें घेऊन अनुक्रमानें उदाहरणें दाखविलीं आहेत. त्यांत बहुधां सर्व शब्दांचा संग्रह झाला आहे. या ग्रंथाची संख्या २५००० आहे.

**न्यायमाला.**— ही जैमिनीसूत्राच्या बारा अध्यायावर व्याख्या आहे.

**वेदांतमाला**— ही व्यासकृत जीं वेदांत सूत्रें त्यांवर टीका आहे. ईत शांकरभाष्याचे सिद्धांत संक्षेपाने रचिले आहेत.

तसें विद्यारण्यानें पाराशर सूत्रावर भाष्य केलें, त्याला **पाराशरमाधवीय** असें ह्मणतात.

ह्या ग्रंथाच्या आरंभीं त्यानें आपला इतिहास श्लोकबद्ध बांधला आहे. तो येणें प्रमाणें:—

॥ श्रीमतीजननीयस्यसुकीर्तिर्मायणःपिता ॥
॥ सायणोलोकनाथश्चमनोबुद्धीसहोदरः ॥
॥ यस्यबौधायनंसूत्रंशाखायस्यचयाजुषी ॥
॥ भारद्वाजकुलंयस्यसर्वज्ञःसहिमाधवः ॥

हा ग्रंथ त्यानें बक्काराय यास नजर केला. हरिहररायानें विद्यारण्याचे मोठे आभार मानून आणि त्याच्या बुद्धीचें व गुणांचें आश्चर्य करून राज्यकारभारांत व धर्मप्रकरणांत सर्व प्रकारें त्याची मसलत घेत असे.

विद्यारण्य फावल्या वेळेंत शिष्यांस पढवीत असे. त्याच्या चांगल्या मसलतीमुळें हरिहररायाच्या संपत्तीची फार समृद्धि होऊन त्याचें राज्य सर्व ठिकाणीं पसरलें. नंतर कांहीं दिवसानीं विद्यारण्यानें पुष्कळ तीर्थ यात्रा केल्या आणि शेवटीं वादविवादांत जिकलेले लोक बरोबर घेऊन पंपा क्षेत्रास आला. पुढें ते लोक त्याचे शिष्य झाले.

विद्यारण्यानें साठाव्या वर्षीं वेदांवर भाष्यें केलीं, तीं मोठीं विस्तीर्ण व स्वयंप्रकाश आहेत. ह्मातारपणामुळें नवीन पुस्तकें करण्याचें आपल्यास सामर्थ्य राहिलें नाहीं, असें पाहून त्यानें जे ग्रंथ प्रसिद्ध केले होते, तेच शोधून नीटनेटके करण्याविषयीं पुष्कळ परिश्रम घेतले. त्यांच्या पुष्कळ प्रती लिहवून कांहीं जमीनींत निरनिराळ्या ठिकाणीं पुरल्या, कांहीं गुहांत ठेवल्या आणि शेष राहिल्या त्या मठ, विद्यालयें, व क्षेत्रें ह्यांमध्यें वांटल्या, व थोड्याशा आपल्या विद्यार्थ्यांच्या उपयोगार्थ रक्षण करून ठेवल्या. मरणाच्या पूर्वीं दाहा वर्षें त्यानें आपला सर्व काळ ईश्वरसेवा व चिंतन ह्यांत घालविला. तो आपल्या वयाच्या नव्वदाव्या वर्षीं पंपा एथें मरण पावला.

ह्या ग्रंथकाराचीं कांहीं पुस्तकें कर्नल कालिन मेकेन्झी यानें सन् १८११ मध्यें ह्या प्रांतांत विद्याविषयक ग्रंथांचा संग्रह करण्याकरितां हेरांकडून ती जमीन उकरून तींतून काढलीं होतीं. त्या पुस्तकांचीं अक्षरें मिश्र असून अव्यावहारिक शब्दांनीं मिसळलेलीं आहेत. सांप्रत तीं वाचणारे थोडेच मिळतील. असें असतां मेकेन्झी साहेबानें मोठमोठे विद्वान् पंडितांची त्यांजवर योजना करून त्यांच्या पुष्कळ भागांचीं इंग्रेजींत भाषांतरें केलीं आहेत.

## विद्यानाथ.

हा ब्राह्मण जातीचा कवि एकासील नगर किंवा ज्याला वारंगूळ असें ह्मणतात तेथील राहणारा असे. त्याचा भरभराट शालिवाहन शकाच्या तेराव्या शतकांत प्रतापरुद्र राजाच्या वेळीं झाला. त्याचें मौंजीबंधन झाल्यावर त्यानें लहानपणींच वेदाभ्यास केला. दुर्दैवाच्या योगानें त्याचा भाऊबंदकीचा तंटा लागला, त्यांत त्याच्या बापानें त्याला दिल्हेला थोडासा पैका होता, तो सर्व खर्चला आणि मोठ्या विपत्तींत पडला. तो सोळा वर्षांचा असतां रामायण व ज्यांत प्राचीन राजे व वीर पुरुष यांच्या कृत्यांचें वर्णन होतें, असीं काव्यें पढूं लागला. नंतर त्यानें शास्त्राभ्यास मोठ्या व्यासंगानें केला. चाळीस वर्षांचा झाला, तेव्हां त्यानें सृष्ट्युत्पत्तीविषयीं कांहीं श्लोक रचिले, ते अतिप्रौढ असून त्यांत परस्पर मेळ असे, व त्याच्या वेळचे लोक त्या श्लोकांचें फार आश्चर्य मानीत असत. ते श्लोक प्रसिद्ध करून आपल्या उदर निर्वाहार्थ त्यांपासून त्यानें थोडासा पैका जमा केला.

विद्यानाथाला एक मुलगी होती. तिच्या लग्नाचा खर्च भागण्या पुरता ह्या लहानशा श्लोकरूप ग्रंथानें पैका प्राप्त होत नाहीं ह्मणून त्याला मोठें दुःख वाटलें आणि काय करावें हें त्याला सुचेना. असें असतां त्याला एक पुरातन कवीनें केलेल्या वाक्याचें स्मरण झालें. तें असें कीं, पुरुषानें नीच लोकांची कृपा संपादन न करतां, राजे व प्रतिष्ठित लोक ह्यांचा आश्रय करावा. ह्या विषयीं असी एक ह्मण आहे कीं, **विनाश्रयान शोभंते पंडिता वनिता लताः**, ह्मणजे पंडित, स्त्री, आणि वेली, ह्या आधारा वांचून शोभत नाहींत. ह्मणून विद्यानाथानें एक वीररसप्रधान काव्य रचिलें, त्याला **प्रतापरुद्रनाटक** असें नांव दिल्हें. त्यांत प्रतापरुद्र राजाच्या शौर्याचें वर्णन केलें आहे. मोठ्या श्रमानें केलेलें हें नाटक संस्कृत भाषेंत एक उत्कृष्ट अलंकाराचा ग्रंथ झाला आहे. त्यांत सर्व प्रकारचीं रूपकें, उत्प्रेक्षा, आणि उपमा इत्यादि सर्व अलंकार सांगितले असून त्यां-

च्या उदाहरणार्थ जे श्लोक घातले आहेत, त्यांत प्रतापरुद्राच्या जयाचें वर्णन आहे. त्यांत प्रसंगोपात्त दुसऱ्या कथा असून शृंगाराचें फार चांगलें वर्णन केलें आहे. हा ग्रंथ रचीत असतां, एके दिवशीं विद्यानाथ राजसभेमध्यें प्रधानाजवळ बसला होता, तेव्हां शिवय्याकवि राजाचे भेटीस आला. तो इलेश्वर अग्रहार एथला राहणारा होता. तेथले लोकांस कांहीं जुलूम होत असे, तो राजाला विदित व्हावा या बुद्धीनें शिवय्यानें हें पुढील वाक्य ह्मटलें— **नवलक्षधनुर्धराधिनाथ, पृथिवींशासतिवीररुद्रभूपे ॥ अभवत्परमग्रहारपीडा.** अर्थ. —हे नवलक्ष धनुर्धर स्वामिन्, तूं वीररुद्र राजा पृथ्वीचें राज्य करीत असतां अग्रहाराला (तेथील राहणाऱ्या ब्राह्मणांस) अत्यंत पीडा झाली. हें ऐकतांक्षणीं वीररुद्र राजानें लागलीच आज्ञा केली कीं, ब्राह्मणांच्या जमीनी त्यांच्या स्वाधीन कराव्या, त्यांपासून सारा घेऊं नये. त्याच वेळेस विद्यानाथानें पुढील चरण ह्मटला. तो मागील तीन चरणांचा अर्थ बदलण्याजोगा होता. **कुचकुंभेपुकुरंगलोचनानां** एथें अग्रहार शब्द द्व्यर्थ आहे—ह्मणजे ब्राह्मणांच्या जमीनी, अथवा मौक्तिक हार. शिवय्यानें जे तीन चरण केले, त्यांत राजाची निंदा सुचविली; परंतु विद्यानाथानें केलेल्या चवथ्या चरणानें तो सर्व श्लोक राजाच्या स्तुतिपर झाला.

॥नवलक्षधनुर्धराधिनाथ पृथिवींशासतिवीररुद्रभूपे॥
॥अभवत्परमग्रहारपीडा कुचकुंभेपुकुरंगलोचनानां॥

अर्थ—हे नवलक्ष धनुर्धर स्वामिन्, वीररुद्रराजा पृथ्वीचें पालन करीत असतां स्त्रियांच्या स्तनमंडलावर मोत्यांच्या हारांचें फार ओझें झालें.

विद्यानाथाची समयसूचकता पाहून प्रतापरुद्राला अत्यंत आनंद झाला आणि त्याला मोठमोठीं इनामें दिल्हीं, तेणेंकरून सर्व सभेला संतोष झाला व आश्चर्य वाटलें. तो जें काव्य करीत होता तें त्याला पुढें चालविण्याविषयीं उत्तेजन दिल्हें आणि तें समाप्त झाल्यावर यथायोग्य दक्षिणा देऊं असें अभिवचन दिल्हें.

हा ग्रंथ करीत असतां प्रतापरुद्रराजा दिल्लीच्या बादशाहाशीं लढाई करीत होता, तो धरला गेला. तेथें तीन वर्षेपर्यंत कैदेंत होता. नंतर तो आपल्या राज्यावर आला आणि संसाराला कंटाळून आपला जो भाऊ अन्नमदेव त्याच्या स्वाधीन राज्य केलें, आणि त्याजवळ विद्यानाथ कवीची शिफारस केली.

प्रतापरुद्रानें संपूर्ण ग्रंथ तयार झालेला पाहून परम आल्हादयुक्त होत्सातां आपली अंगठी त्याचे स्वाधीन केली आणि सांगितलें कीं, वारंगूळच्या खजीन्यांत जाऊन ही अंगठी दाखऊन पाहिजे तितकें द्रव्य तूं घेऊन जा. विद्यानाथानें आपल्या मुलीच्या लग्नापुरतें आणि आपल्यास चिरकाळ अन्नवस्त्र पुरण्यापुरतें द्रव्य नेलें.

अन्नमदेव राजानें विद्यानाथकृत काव्याच्या अनेक प्रती लिहिविल्या, आणि निरनिराळ्या प्रांतांत वाटल्या. त्यांची फार वाखाणणूक झाली. त्याराजानें एक विद्यालय स्थापिलें, त्यावर विद्यानाथाला मुख्य अधिकारी नेमला आणि त्याला स्वास्थ्य करून दिल्हें. त्याविद्यालयांत पुष्कळ विद्यार्थी तयार झाले. त्यांच्या खाण्यापिण्याची स्वस्थता शाळेंतच करून दिल्ही होती.

विद्यानाथकवि, अन्नमदेव राजाचे अमलांत आपल्या वयाच्या पंचावन्नाव्या वर्षी स्वर्गलोकवासी झाला.

## वेदांताचार्य.

हा जातीचा वैष्णव ब्राह्मण वेदव्यासभट्ट याचा पुत्र. कांची ही त्याची जन्मभूमि होय. हा विद्यारण्याच्या वेळेस होता. त्याचा व्रतबंध झाल्यानंतर, तो मोठ्या व्यासंगानें काव्यें व ज्यांत मुख्यत्वेंकरून सूर्य व सोमवंशी राजांचें शौर्यादि कृत्यांचें वर्णन होतें असे ग्रंथ पढला. तसाच तो न्यायशास्त्र व व्याकरणशास्त्र हीं पढला. चाळीस वर्षांचा झाला तेव्हां तो कर्नाटक व द्राविड देशच्या राजांच्या दरबारीं गेला, व तेथील पंडितांशी धर्माविषयीं वादविवाद करून त्यांचें खंडण केलें. वैष्णवांच्या धर्मांत ज्या चुका पडल्या आहेत त्या सुधारण्यास आणि सातानी किंवा चौ-

थ्या वर्गांतील ब्राह्मणांनीं तेंगळ ब्राह्मणाच्या धर्ममार्गांत शिरून त्यांचीं कर्में भ्रष्ट केलीं, तीं सुधारण्याकरितां मी व्यंकटेशाच्या अंशानें जन्मलों आहे, असें त्यानें लोकांत उठविलें. त्यानें विध्युक्त मार्ग स्थापला आणि त्याविषयीं कांहीं सूत्र लिहिलें, तें राजांनीं व सर्व लोकांनीं मान्य करावें असें केलें. त्यांत न्यायाच्या गोष्टी होत्या व तें मोठें प्रौढ होतें, यास्तव तें सर्व मान्य झालें.

या नंतर वेदांताचार्यानें संसार कृत्य सोडून कांचीपासून कांहीं अंतरावर एक झोपडी किंवा पर्णकुटी होती तेथें गेला. तेथें सात ब्राह्मणांच्या घरीं माधुकरी मागून आपण व स्त्री आणि एक शिष्य यांचा उदरनिर्वाह करी, तो शिष्य सर्वकाळ त्याजपाशींच होता. वेदांताचार्य अशा रीतीनें राहत असें कीं, त्याची वर्त्तणूक पाहून लोकांना करुणा येत असे. त्यानें नेम केला कीं, कोणापासून कधीं द्रव्य घ्यावयाचें नाहीं. फक्त खाण्याचे पदार्थ आणले तर मात्र घ्यावे. ह्मणून त्यास लोक तांदुळामध्यें मोहरा व रुपये घालून गुप्तदान देत असत. वेदांताचार्याच्या दृष्टीस तें पडले ह्मणजे तो नेहमी फेंकीत असे, व त्याची बायकोही तसेंच करीत असे. ती मोठी पतिव्रता होती पतीची आज्ञा कधीं उल्लंघन करीत नसे. वेदांताचार्यानें अशा एकांत वासांत राहून एक वेदांतपर ग्रंथ केला. त्याला **वेदांतभाष्य** ह्मणतात.

त्यानें एक नाटकही रचिलें, त्याला **संकल्पसूर्योदय** असें ह्मणतात. तें फार आश्चर्य करण्याजोगें आहे. तें दक्षिण हिंदुस्थानांत सर्व शाळांमध्यें लोक पढतात. त्यावर नारायणाचार्य या नांवाच्या एका विद्वानानें टीका केली आहे. ह्या कवीनें एकशें तीन ग्रंथ केले. त्यांत नानाप्रकारचे विषय होते. त्यापैकीं पुष्कळ गाहाळ झाले आहेत. वेदांताचार्यानें आपल्या उत्तर वयांत ईश्वर चिंतन करून वृद्धापकाळामुळें अशक्त होत्सातां सन्यास वृत्तीनें राहण्याचा निश्चय केला. प्रथमतः पत्नीला तिच्या बापाच्या आणि भावाच्या स्वाधीन करून

नंतर त्यानें तिचें अनुमोदन घेऊन आपला संकल्प-सिद्धीस नेला. त्याचा शिष्य वरदाचार्य तो गुरूचें प्राणोत्क्रमण होई तोंपर्यंत त्याच्या सेवेंत होता. त्यानें पुढें गुरूरूपेनें एक ग्रंथ केला. त्याचें नांव **वेदांतविजय**. त्यांत त्याच्या गुरूच्या सद्गुणांचें वर्णन केलें आहे. आणि वेदांताचार्यानें कोणत्याही राजाकडे जाऊन याचना केली नाहीं व कांहीं बक्षीसही घेतलें नाहीं. मुळापासून श्रमानें जें मिळेल त्यांवर प्रपंचाचा निर्वाह करी हाही त्याचा नामांकित सद्गुण वर्णिला आहे. आणि त्या ग्रंथांत गुरूनें जो कांहीं मार्ग सांगितला होता तदनुसार मतें लिहून ठेविलीं आहेत.

त्यानें केलेले ग्रंथ सांप्रत जे प्रसिद्ध आहेत त्यांचीं नांवें येणें प्रमाणें:—

**पादुका सहस्र**- याचे श्लोक हजार आहेत. यांत लक्ष्मीच्या पायांचें वर्णन केलें आहे. या ग्रंथांतले श्लोक फार सुरस आणि मनोरंजक आहेत.

**रघुवीर गद्य**— यांत रामायणांतील साहा कांडांतील कथा बांधल्या आहेत.

**महाभारततात्पर्यरक्षा** — यांत महाभारताचें तात्पर्य संक्षेपानें सांगितलें असून शिवाचें महात्म्य खंडित करून तो परमदेव नव्हे असा सिद्धांत केला आहे.

**वरदराजपंचाशती**— याचे श्लोक ५५ आहेत. यांत कंजीवरम् एथील विष्णूचें स्तवन आहे.

**पंचायुधस्तोत्र**— यांत विष्णूच्या शंख, चक्र, गदा, पद्म, आणि सुदर्शन या पांच आयुधांचें वर्णन केलें आहे.

**अंतर्ज्योति**— यांत विष्णूच्या परम तेजाचें त्हृदयांत ध्यान कसें करावें त्याविषयीं सांगितलें आहे.

**शरणगतिदीपिका**— यांत काया, वाचा, मानसें करून विष्णु चरणीं शरण जाण्याचा प्रकार कथन केला आहे.

**यतिराजसप्तति**— यांत रामानुजाचार्यांचें वर्णन आहे.

**कस्तूरीतिलकपंचाशती** — यांत विष्णूच्यां कस्तूरी तिलकाचें वर्णन आहे.

**सुदर्शनस्तोत्र**— यांत विष्णूचें मुख्य शस्त्र जें सुदर्शन त्याचें वर्णन आहे.

**दयाशतक**— यांत विष्णूचें पादादिकेशांत वर्णन असून त्याची दयाही वर्णिली आहे.

**ऊर्ध्वपुंड्रविधि**— यांत स्मृति, पुराण, इतिहास इत्यादि ग्रंथांतून वचनांचा संग्रह करून ऊर्ध्व पुंड्राचे धारण वैष्णवानीं अगत्य करावें, जो कोणी ऊर्ध्व पुंड्राचे धारण करणार नाहीं तो कोणत्याच कर्माविषयीं योग्य नाहीं असें स्थापन केलें आहे.

**क्षमाषोडशी**— याचे श्लोक सोळा आहेत. यांत विष्णूजवळ आपल्या अपराधांची क्षमा मागितली आहे.

**श्रीगुणरत्नकोश**— यांत लक्ष्मीचें वर्णन आहे.

**भगवत्ध्यानसोपान**— याचे श्लोक बारा आहेत. यांत विष्णूचें ध्यान करण्याचा क्रम सांगितला आहे.

**न्यासदशक**— याचे श्लोक दाहा आहेत. यांत विष्णूच्या नांवे करून प्रत्येक अंगाच्या ठायीं न्यास करायाला सांगितले आहेत. तसाच **न्यासतिलक** हाही त्याचाग्रंथ. यांतविषय असाच आहे.

**अभीतिस्तव**— हें रंगनाथाचें स्तोत्र आहे.

**हरिस्मरण**— ही स्तुति विष्णूचें प्रातःकाळीं स्मरण करण्या करितां केली आहे.

**दशअवतारस्तुति**— यांत दाहा अवतारांची स्तुति आहे.

असें सांगतात कीं, वेदांताचार्याला मारून टाकावें ह्मणून कोणी तांत्रिकानें प्रयोग करून त्याजवर सात सर्प पाठिवले. त्यांत सातवा जो तक्षक तो वेदांताचार्यावर चाल करून आला, तेव्हां त्यानें गरुडाची स्तुति केली. तेव्हां गरुडानें येऊन तक्षकाला चोंचेंत घेऊन नेलें. त्याच ग्रंथाला **गरुडपंचाशती** असें नांव दिल्हें.

वेदांताचार्य हा महा बुद्धिमान् आणि विष्णुमताविषयीं मो-

ठा अभिमानी होता आणि तो सर्व तंत्रें विष्णुपर लावीत असे. त्यावरून त्या काळांतले लोक त्याला सर्वतंत्रस्वतंत्र असें ह्मणत असत.

## वरदाचार्य.

हा कवि कांची नगरांमध्यें वैष्णवांच्या उत्तम कुळांत जन्मला आणि प्रसिद्ध जो वेदांताचार्य त्याचा हा मुख्य शिष्य. विजयनगरचा ह्मणजे आनागोंदीचा राजा जो कृष्णराय महाराज याच्यावेळीं ह्मणजे शालिवाहन शकाच्या तेराव्या शतकांत होता. चंद्रगिरी एथील राजाचा कुळगुरु जो ताताचार्य त्याचा हा नातेवाईक असे.

वरदाचार्य लहानपणापासून काव्य पढला. तो बुद्धीनें फार तीव्र व स्मृतीचा धड होता. त्याला सर्व मोठमोठे उत्कृष्ट कवींचे ग्रंथ माहित होते. त्याची कल्पनाशक्ति व शोध इतके प्रखर असत कीं, तो एका तासांत शंभर श्लोक करी, आणि त्याला एक काव्य पुरें करण्यास एक दिवस पुरा होत असे. **रहस्यत्रयसार** आणि **तत्वत्रयनिरूपण** हे दोन ग्रंथ त्यानें केले. पहिल्या ग्रंथांत विष्णुपर जे मंत्र आहेत त्यांची व्याख्या केली आहे आणि दुसऱ्यांत चित्, अचित्, आणि ईश्वर या त्रिपुटीचें निरूपण करून विष्णु हाच जगत्कारण असा सिद्धांत केला आहे.

**वसंततिलक** ह्या नांवाचा एक भाण वरदाचार्यानें केला. त्यांत कंजीवरम एथील रंगनाथ देवाच्या उत्साहाचें व त्याच्या रथसमारंभाचें वर्णन असून वसंतऋतु, अनंतसरोवर, देवाच्या मुरळ्यांचें विनोदभाषण, आणि उत्साहास येणारे विट, वेश्या, इत्यादिकांच्या नकला, निरनिराळ्या देशच्या व जातीच्या लोकांचें समाज व त्यांचे पोषाक, रूप, भाषा व चाली; कामुक पुरुषांचे विलास व क्रीडाकलह, गारोड्यांच्या हिकमती, तमासगीर लोकांचे खेळ, नर्तकांचें हावभाव, एडक्यांच्या टकरी, कोंबड्यांचें झुंजणें, नटचर्या, जयतोरणें व त्यांचे अलंकार, जयघोष, स्त्रि-

यांचें सौंदर्य, पुष्पांच्या माला व त्यांचें विखरणें, आणि अशा दुसऱ्या अनेक विषयांचें वर्णन पुष्पित वाणीनें विलक्षण व अति प्रौढ करून त्यांत सर्व प्रकारचे रस ओतून आपल्या कल्पना शक्तीची व बुद्धीची सीमा केली आहे.

त्यानें हें आपलें पुस्तक रंगनाथ देवाला वाहिलें होतें आणि हिंदुस्थानांतील प्रत्येक विष्णूच्या देवालयांत त्याची एक एक प्रत दिल्ही होती. हें पुस्तक इतकें साल्हाद आश्चर्य करण्याजोगें होतें कीं, त्यावरून कित्येक राजांनीं ह्या कवीला मोठमोठीं बक्षिसें दिल्हीं. तेणेंकरून त्यानें आपलें अवशिष्ट आयुष्य स्वतंत्रतेनें घालविलें.

वरदाचार्यानें शेवटीं आपली कविताशक्ति निरंतर विष्णूच्या स्तुतिपर ग्रंथ करण्याकडे लाविली. हा लौकिकवान् कवि कांची एथें आपल्या वयाच्या चौपन्नावे वर्षीं वैकुंठवासी झाला॰

## पेद्दीभट्ट.

हा कवि कोलचनवारू कुळांतील एक ब्राह्मण होता. एलोर प्रांतांत परिमी ह्मणून एक खेडें आहे तेथला तो रहवासी असे. शालिवाहन शकाच्या तेराव्या शतकांत सर्वज्ञशिगमनीडू या राजाच्या कारकीर्दींत हा प्रख्यातीस आला. या कवीच्या चरित्रावरून मनास लागण्या सारिखें असें उदाहरण मिळतें कीं, एखाद्या मनुष्याची बुद्धि बहुत वर्षेंपर्यंत अगदी प्रसुप्त असावी नंतर कांहीं दैवयोग घडून आल्याने तिच्या सर्व शक्ति व्याप्त व्हाव्या.

पेद्दीभट्ट हा तीस वर्षांचा होई पर्यंत अगदी जडमति होता, तरी तो अभ्यासांत इतका निमग्न असे कीं, साऱ्या लोकांनीं त्याला वेडें ठरविलें होतें. सकाळीं पाठ करावे तें संध्याकाळीं त्यानें विसरावें. त्याविषयीं असी गोष्ट सांगतात कीं, तो एके दिवसीं कांहीं संस्कृत ग्रंथ घेऊन आपल्या घरी चिंतना करीत बस-

ला होता. पण तो ग्रंथ कांहीं केल्यानें त्यास लागेना. त्यावेळी त्याची मेव्हणी जवळच तांदूळ कांडीत होती, तिनें ते व्यर्थ प्रयास पाहून खदखदा हांसली आणि कानवंडी होऊन ह्मणाली **मुसलःकिसलायेत**, यांत तिचा भाव असा होता कीं, या मुसळाला पल्लव येतील पण माझ्या मेव्हण्याला संस्कृत येणें कठीण. हें त्या स्त्रियेचें विनोद भाषण त्याच्या वर्मी लागलें आणि त्याच वेळेस तो घरा बाहेर पडला, आणि शेजारी एक सिद्ध पुरुष राहत असे त्याच्या सेवेस राहिला. मल्ली त्याचा वडील भाऊ हा पहिल्यानें त्याजवळ होता. पण मल्लीला घरीं जाण्याचें होतें ह्मणून त्यानें पेद्दीभट्टाची त्याजकडे सोपणूक केली. इतक्यांत असें झालें कीं, त्या सिद्ध पुरुषाची अकस्मात् प्रकृती बिघडून कण्हूं लागला आणि मोठ्या उत्कंठेनें मल्लीला त्यानें हाका मारिल्या. पण तो घरीं नव्हता ह्मणून पेद्दीभट्ट हाक देऊन त्याच्या जवळ आला. तेव्हां असें सांगतातकीं, तो सिद्ध पुरुष पेद्दीच्या हातावर ओकला आणि तें त्यानें प्राशिलें. तेव्हां पासून पेद्दीला भूत, भविष्य, व सर्व शास्त्रांची प्रमेयें समजूं लागलीं. पुढें मल्ली परत आल्यावर आपल्या गुरुजीची गती पाहून त्यानें ताडिलें कीं, याप्रसंगी पेद्दीवर कांहींतरी अनुग्रह झाला असावा, आणि आपण जवळ नव्हतों ह्मणून फार दुःखित झाला. पुढें त्या पेद्दीला शपथा आणा घालून त्याजवळून कबुलात करून घेतली कीं तूं स्वकल्पित आपल्या नांवानें कांहींच ग्रंथ करूं नको, पण इतर ग्रंथांवर व्याख्या मात्र कर. मग पेद्दीभट्टानें मल्लीच्या नांवानें बहुत ग्रंथांवर व्याख्या केल्या. पंचकाव्यावर त्यानें **घंटापथ** नामें टीका केली. नैषधावरची टीका मात्र ह्या देशांत अढळण्यांत आली नाहीं. या शिवाय इतर गहन विषयांवर व्याख्याग्रंथ केले आहेत. ते कालमाहात्म्यानें विलुप्त होऊन प्रस्तुत जे उपलब्ध आहेत, ते विद्वन्मान्य आहेत.

यानें तीर्थाटन केलें आणि सर्वज्ञसिंगमनीडू याच्या दरबारांत जाऊन आपली विद्वत्ता प्रगट केली. त्या राजानें त्याची फार प्रतिष्ठा करून पुष्कळ इनामें देऊन रवानगी केली. यानें

व्याख्यारूप ग्रंथ लिहिण्यांत सर्वदा लेखणी धरली असे. पण त्यानें किती ग्रंथ केले याचा दाखला कोठें लिहिला नाहीं ह्मणून त्यांची सविस्तर संख्या सांगवत नाहीं.

हा बासष्ठाव्या वर्षी मरण पावला. यानें एक हजार श्लोकांचा द्व्यर्थक एक ग्रंथ **मल्लीनाथी** नांवें केला. त्याची तैलंगण देशांत प्रख्याति आहे.

## वराहमिहिर.

याच्या बापाचें नांव आदित्यदास. तो सूर्योपासक होता आणि कापित्थ गावांत राहत असे. त्याच्या प्रसादानें वराहमिहिर मोठा ज्योतिषशास्त्रज्ञ झाला. तो शालिवाहन शकाच्या १३३२ सांत होता. त्याचें वास्तव्य अवंती ह्मणजे उज्जनी एथें प्रायः असे. त्याची बुद्धि मोठी तीव्र, आणि त्याचा विचार इतका गंभीर होता कीं, त्याचे वेळचे लोक व त्याची संतति त्याविषयीं फार आश्चर्य मानीत असत. त्याला सिद्धपदार्थ विज्ञानांतील सर्व विषयांचें जेवढें सूक्ष्म ज्ञान होतें, तेवढें त्याच्या वेळच्या थोड्याच लोकांस असेल.

त्यानें मोठे परिश्रम करून एक ग्रंथ रचिला, त्याला **वराहमिहिरसंहिता** असें नांव दिल्हें. त्यांत सूर्यमंडळ आणि सृष्टींतील चमत्कार ह्याविषयीं प्रबंध होते. त्याच प्रमाणें त्यानें प्राचीन ऋषींचीं मतें अवलोकन करून ज्योतिष प्रकरणीं एक पुस्तक केलें, त्याला **बृहज्जातक** असें नांव दिल्हें. त्याचे अध्याय २६ आहेत. यांत विषय क्रमेंकरून बांधले आहेत. ते येणें प्रमाणें:—

| | | | |
|---|---|---|---|
| राशिप्रभेद. | दशांतर्दशा. | प्रव्रज्या. | स्त्रीजातक. |
| ग्रहयोनिभेद. | अष्टवर्ग. | राशिभाव. | निर्याण. |
| वियोनिजन्म. | कर्मजीव. | दृष्टिफल. | नष्टजातक. |
| निषेक. | राजयोग. | भावफल. | द्रेष्काण. |
| जन्म. | नाभसयोग. | आश्रय. | उपसंहार. |
| रिष्ट. | चंद्रयोग. | प्रकीर्णका. | |
| आयुर्दाय. | द्विग्रहयोग. | अनिष्टयोग. | |

उत्पलभट्ट यानें बृहज्जातकावर जगच्चंद्रिका या नांवाची मोठी विस्तीर्ण टीका केली आहे. ग्रंथलेखावरून पाहतां हा महापंडित व ज्ञानी होता असें दिसतें. ग्रंथाच्या शेवटीं किंवा आरंभीं यानें आपलें वास्तव्य किंवा जातगोत वगैरे कांहींच सांगितलें नाहीं.

दुसरी महिधरभट्ट यानें ही टीका केली आहे. ही उत्पलभट्टकृत टीकेपेक्षां संक्षिप्त आहे. तो नृसिंहोपासक होता.

अणखी वराहमिहिरकृत यात्रानिबंध एक ग्रंथ आहे. त्यांत प्रश्न, तिथि, तिथिबल, चंद्रबल, वारफल, नक्षत्र, दिवस, ग्रहभेद, लग्ननिश्चय, इत्यादि वेगवेगळे प्रकरणांचे अध्याय २१ केले आहेत. तसाच विवाहकालोपयोगी ग्रहशुद्धि विषयीं एक ग्रंथ केला आहे. षट्पंचाशती हा एक ग्रंथ वराहमिहिर यानेंच केला. यांत मेषादिराशींचे भाव, प्रस्थान, मुहूर्त, कार्यारंभास दिनशुद्धि, चोराचा शोधलावणें आणि त्याची जात, वर्ण, वगैरे सांगण्याची विद्या इत्यादि विषय आहेत.

## पोटय्या.

हा कवि जातीचा ब्राह्मण असून ज्याला कादंबरी असें ह्मणतात, तेथील राहणारा असे. हें स्थान तैलंगण देशांत गोदावरीच्या तीरीं राजमहेंद्रि प्रांतांत असून मुकटीईश्वरूडू राजानें कांहीं ब्राह्मणांस अग्रहार करून दिल्हें होतें. पोटय्याच्या बापाचें नांव सींगय्या. पोटय्याला तिघे बंधु होते, त्यांचीं नांवें, सींगय्या, कुमारस्वामी, आणि आन्नंमय्या. त्यानें लहानपणांच तेलंगी भाषेचा अभ्यास केला, आणि अठरा वर्षांचा झाला तेव्हां त्याला त्या भाषेचें पूर्ण ज्ञान झालें. त्यानें संस्कृत भाषेचा अभ्यास केला, आणि माघ, भोजचंपू, व दुसरीं पुष्कळ काव्यें पढला आणि योग्यवेळीं त्याला संस्कृत भाषेचें पूर्ण ज्ञान झालें. आणि शालिवाहन शकाच्या १३८८ मध्यें त्यानें एक मोठा ग्रंथ केला, त्याला प्रसंगरत्नावली असें ह्मणतात. त्यांतील विषय

प्राचीन निरनिराळ्या मूल ग्रंथांवरून घेऊन ग्रथित केले होते. ह्या ग्रंथांत ऱ्यायंशीं प्रकरणें आहेत. त्यांचा क्रम येणेंप्रमाणें:—

१ वक्तृत्वप्रशंसा. २ भिन्नभिन्न देवांच्या स्तुतिप्रशंसा. ३ दशांवतारप्रशंसा. ४ काशीप्रशंसा. ५ उमामहेश्वरसंवाद. ६ गृहकृत्य. ७ चतुर्युगप्रशंसा. ८ द्विजप्रशंसा. ९ भाषाप्रशंसा. १० छंदःशास्त्रप्रशंसा. ११ मैत्रीप्रशंसा. १२ दैवप्रशंसा. १३ सुजनप्रशंसा. १४ दुर्जनप्रशंसा. १५ दुर्व्यसनप्रशंसा. १६ उपयुक्तप्राणिप्रशंसा. १७ नीतिप्रशंसा. १८ तिरस्कृतवाक्य प्रशंसा. १९ सन्मार्गप्रशंसा. २० प्रीतीप्रशंसा. २१ याचकताप्रशंसा. २२ मत्सरप्रशंसा. २३ सुखप्रशंसा. २४ आसन व नमस्कार यांचे प्रकारप्रशंसा. २५ द्रव्यसंग्रहणोपायप्रशंसा. २६ सुपुत्रप्राप्त्युपाय. २७ अज्ञानी आणि छांदस मुलांचें वर्णन. २८ संपत्तिप्रशंसा. २९ दारिद्रप्रशंसा. ३० दानकर्म प्रशंसा. ३१ न्यायप्रशंसा. ३२ उपकारप्रशंसा. ३३ स्थलविकल्प प्रशंसा. ३४ काल आणि लोक यांचा विकल्प. ३५ आतिथ्यप्रशंसा. ३६ मूर्खप्रशंसा. ३७ भाविसुखदुःखप्रशंसा. ३८ विश्वासप्रशंसा. ३९ कृपणताप्रशंसा. ४० सौजन्यप्रशंसा. ४१ विंशतिश्रेष्ठगुणप्रशंसा. ४२ संसारनिवृत्तिप्रशंसा. ४३ दानापहारणप्रशंसा ४४ राजाच्यास्तुत्य तीन कर्मांविषयीं. ४५ इतिहास व दुसरे विषय. ४६ भरताच्या अष्टादश पर्वांविषयीं. ४७ छपन्नदेशप्रशंसा. ४८ बाहत्तररोगप्रशंसा. ४९ चौसष्ठ कळांविषयीं. ५० राजांच्या षड्गुणांविषयीं. ५१ राजमंत्रिधर्मप्रशंसा. ५२ तांबूलप्रशंसा. ५३ उद्भिजप्रशंसा. ५४ सत्यप्रशंसा. ५५ स्त्रीगुणप्रशंसा. ५६ पातिव्रत्यप्रशंसा. ५७ सतीगमनप्रशंसा. ५८ परहितेच्छाप्रशंसा. ५९ ढोंग आणि राजाभिवंदनप्रशंसा. ६० शिल्पकर्मप्रशंसा. ६१ स्त्रीशरीरव्यवच्छेदनविद्या. ६२ स्त्रियांचें अवयव व भूषणें याविषयीं. ६३ स्त्रीकुचप्रशंसा. ६४ स्त्रियांच्या अनुरागाविषयीं. ६५ सुरतप्रशंसा. ६६ ऋतुदर्शनानंतर जें कृत्य करितात त्याविषयीं. ६७ व्यभिचाराविषयीं. ६८ शिष्टाचारप्रशंसा. ६९ ज्ञातिप्रशंसा. ७० प्रातःकाल व सायंकाल यांचें वर्णन. ७१ चंद्रोदयवर्णन. ७२ चंद्रलांच्छनवर्णन. ७३ किर्तिवंत राजांचें वर्णन. ७४ प्रसन्नकाव्यरचना. ७५ षड्ऋतुवर्णन-

७६ कूटश्लोकप्रशंसा. ७७ अंतर्लापिका. ७८ बहिर्लापिका. ७९ विरहिणीप्रशंसा. ८० अन्योक्तिप्रशंसा. ८१ चंद्राच्या षोडश कला वर्णन. ८२ स्त्रीजातिप्रशंसा. ८३ कविधर्मप्रशंसा.

पोटय्यानें महान् प्रयासानें केलेलें हें पुस्तक ईश्वरास अर्पण केलें. नंतर त्यानें एक शाळा घातली, तींत संस्कृत व तेलंगी भाषा अनेक विद्यार्थ्यांस पढविल्या. तो रिकामे वेळेंत पुस्तकें वाचीत असे आणि कांहीं उपदेशपर गोष्टी रचीत असे. त्यांचा तैलंग देशांत विद्वान् लोकांमध्यें चहूंकडे प्रसार करी, तेणेंकरून त्या गोष्टींमध्यें परस्पर ऐक्यता व नीतिप्रावण्य असे, यामुळें त्यांची स्तुति फार होत असे. ह्याच्या पुस्तकांची राजेरजवाडे लोकांत पुष्कळ मान्यता झाली असतांही त्याला त्यांपासून थोडाच पैसा मिळत असे.

पोटय्या मरण पावला तेव्हां त्याचें वय पांसष्ट वर्षांचें होतें. त्याच्या मागें त्याचें नांव राखण्यास कांहीं मुलें होतीं.

## कदंब.

हा नामांकित पुरुष गजपति प्रतापरुद्रराजाचा दिवाण असे. तो कलिंगदेशचा राहणारा होता. त्याच्या ज़वळ मोठी सत्ता असून लोकांत वजन असे. तो उत्कृष्ट ज्योतिषी होता. त्याला त्या शास्त्राचा लहानपणापासूनच छंद असे. त्यानें **ज्योतिषार्णव** या नांवाचा एक ग्रंथ रचिला, आणि त्याच्या प्रस्तावनेंत त्यानें असें लिहिलें आहे कीं, मी शालिवाहन शकाच्या १३८४ मध्यें जन्मलों होतों. ह्या ग्रंथाची मोठी आख्या असून तो पंचांगें करणारांच्या फार उपयोगी आहे.

## वल्लभाचार्य.

विठ्ठलनाथाचा शिष्य गिरधर कवि. त्यानें **संप्रदायप्रदीप** या नांवाचा ग्रंथ रचिला, त्यांत व **निजवार्ता**, **मूळपुरुष**,

इत्यादि ग्रंथांत वल्लभाचार्यांचे मूळपुरुष व इतिवृत्त लिहिलें आहे.

तैलंगण देशांत कांकरव गांवामध्यें नारायणभट्ट नामक यजुर्वेदी तैत्तिरीयशाखी भारद्वाज कुळांतला एक ब्राह्मण होता, त्यानें वेदविधि प्रमाणें सोमयाग केला असतां असें सांगतात कीं, यज्ञकुंडांतून अग्नीनें त्याला वर दिल्हा कीं, मी तुझ्या कुळांत अवतार घेईन. त्याप्रमाणें वल्लभाचार्य आणि विठ्ठलनाथ हे दोन पुरुष अवतारी झाले. त्या नारायणभट्टाचा मुलगा गंगाधरभट्ट. त्याचा मुलगा गणपती. त्याचा मुलगा वल्लरभट्ट. त्याचा मुलगा लक्ष्मणभट्ट. त्याच्या बायकोचें नांव लमागार. लक्ष्मणभट्टाला देवानें दृष्टांत दिल्हा कीं, तुला तीन पुत्र होतील, त्यांत दुसरा तो माझा अवतार होईल. त्याप्रमाणें रामकृष्णभट्ट हा प्रथम पुत्र जन्मल्यावर लक्ष्मणभट्ट तीर्थयात्रा करायाला निघाला. तो प्रयागावरून काशीस गेला त्यावेळीं काशींमध्यें सन्यास्यांचा आणि मुसलमानांचा झगडा चालला होता. त्या गडबडींत लक्ष्मणभट्ट कुटुंबसुद्धां पळून चंपारण्यांत आला. तेथें लक्ष्मणभट्टाची स्त्री आठा महिन्याची प्रसूत होऊन शके १४०० वैशाख वद्य ११ रविवार या दिवशीं दुसरा पुत्र झाला. तें लेंकरूं तेथें झाडपाल्यांत लिकवून ठेऊन उभयतां चौंडा नगरांत जाऊन राहिलीं. नंतर काशींतील कज्जा मिटल्यावर पुनरपि काशीस परत जातांना चंपारण्यांत लमागार प्रसूत झाली, त्या ठिकाणीं आले तों तेथें एक बाळक अग्नीच्या मध्यभागीं खेळतांना पाहिलें आणि तें बाळक आपलें असें जाणून त्याला घेऊन काशीस जाऊन राहिले आणि त्या मुलाचें नांव वल्लभ असें ठेविलें. त्याच्या जन्मभूमीवर देऊळ बांधिलें, तें अद्याप आहे.

त्या मुलाची पांचव्यावर्षीं मुंज केली आणि नारायणभट्ट नामें एका विद्वानाजवळ पढायाला घातलें. साहाशास्त्रें, अठरापुराणें, आणि चार वेद इतकें तो मुलगा चार महिन्यांत शिकला, असें सदहु ग्रंथांत लिहिलें आहे. ह्या सुमारास लक्ष्मणभट्टाच्या स्त्रीला-तिसरा पुत्र झाला, त्याचें नांव केशव. वल्लभाच्या अकराव्या वर्षीं बाप मरण पावला. पुढें तो आईची आज्ञा घेऊन ती-

र्थयात्रेला निघाला. दक्षिणेकडे जातांना त्यास एक मोठें शहर लागलें तेथील नगर शेटाला चार पुत्र होते, त्यांतला दामोदरदास हा वल्लभाचार्याला पहिला शिष्य मिळाला, त्याला संगतीं घेऊन वल्लभाचार्य विद्यानगरांत आले. त्या नगराचा राजा कृष्णदेव त्यावेळेस त्याच्या सभेमध्यें स्मार्तवैष्णव या मतांचा अतिशय वादविवाद चालू असे. तेथें वैष्णवमतानुसारी मध्वाचार्य याचा शिष्य व्यासतीर्थ हा मोठा प्रख्यात होता. तो स्मार्तमताचा खंडक असे. याखेरीज रामानुज, मध्वाचार्य, निंबार्क, आणि विष्णुस्वामी ह्या चार संप्रदायांतील विद्वान तेथें होते. त्या समयांत वल्लभही तेथें आला. त्या सर्वांनीं मिळून शंकरमतवाल्यांस जिंकिलें. हें पाहून कृष्णदेव राजा संतुष्ट झाला आणि त्यानें त्या चार संप्रदायापैकीं विष्णुस्वामीची प्राचीन गादी स्थापिली.

संप्रदायप्रदीप आणि निजवार्ता ह्या ग्रंथांत विष्णुस्वामीची मूळपीठिका लिहिली आहे कीं, द्रविड देशांत एक मांडलिक राजा होता, त्याच्याजवळ एक ब्राह्मण प्रधान असे. त्याचा पुत्र विष्णुस्वामी. तो वेदशास्त्र पढला असे आणि मोठा वादी होता. त्यानें स्वकल्पित वैष्णव संप्रदाय काढला. त्यावेळच्या लोकांत त्याचें विशेष वजन होतें ह्मणून तो आपला संप्रदाय लोकांकडून चालवूं लागला. तो श्रीमद्भागवत आणि भगवद्गीता यांस मुख्य मानून विष्णुमूर्त्तीची पूजा करीत असे. विष्णुस्वामी त्रिदंडी सन्यासी होऊन समाधिस्थ झाल्यावर त्याच्या गादीचा मान ज्ञानदेवाकडे दिल्हा. पुढें ज्ञानदेवानें ती गादी आपला शिष्य जो केशव त्याला सोंपली. तेव्हांपासून त्या गादीवाल्यांस वंशपरंपरेनें गोस्वामि हें नांव प्राप्त झालें. त्याचा पुत्र हिरालाल, त्याचा पुत्र श्रीराम. त्याला साहा पुत्र झाले त्यांपैकीं श्रीधर यानें **प्रेमामृत** या नांवाचा ग्रंथ केला आहे. ही गादी बिल्वमंगळ या पुरुषापर्यंत चालली होती. पुढें ती खंडित झाली. ही हकिकत लिहिण्याचें कारण इतकेंच कीं, कृष्णदेवाला दृष्टांत झाल्यावरून त्या गादीवर वल्लभाची स्थापना केली.

मग वल्लभाचार्यांनें आपली मतें त्या संप्रदायांत मिळवून पु-

ष्टिमार्ग या नांवाचा संप्रदाय चालू केला. त्यांतील मुख्य नियमांची दाहा कलमें येणेंप्रमाणें:—

१ आचार्यांचा दृढ आश्रय करणें.

२ श्रीकृष्णाची भक्तिकरणें हेंच मुक्तीचें मुख्य साधन.

३ लोकलज्जा आणि वेदशास्त्राची आज्ञा टाकून आचार्याला शरण जाणें.

४ देव आणि गुरु यांच्यापाशीं नम्रता.

५ मी पुरुष नाहीं पण वृंदावनांतली गोपी आहे असें मानणें.

६ नित्यशः गोस्वामीचे गुण गाणें.

७ गोस्वामीच्या नांवाचें महात्म्य वर्णन करणें.

८ गुरूची आज्ञा पाळणें.

९ गोसायी जें करील व बोलेल त्याजवर विश्वास ठेवणें.

१० वैष्णवांचा समागम आणि सेवा.

हे वल्लभ मतांत मुख्य संप्रदाय आहेत. या दाहा आज्ञांप्रमाणें वागणारा तोच मुख्य भक्त आणि शास्त्राप्रमाणें चालणारा तो मर्यादा मार्गी असी वल्लभाचार्यांनी व्यवस्था करून दिल्ही. त्यांत पुष्टीमार्गी लोक तेच मुख्य वैष्णव होत.

या खेरीज आचार्याला सर्व वस्तु समर्पण करून द्याव्या आणि नंतर त्या वस्तूंचा उपभोग करावा. याविषयीं **सिद्धांतरहस्य** नामक ग्रंथांमध्यें दृढ आज्ञा वचनें लिहिलीं आहेत.

॥ ब्रह्मसंबंधकरणात्सर्वेषांदेहजीवयोः ॥

॥ सर्वदोषनिवृत्तिर्हिदोषाःपंचविधामताः ॥

या श्लोकाचें तात्पर्य—त्यात्या वस्तु समर्पण केल्यानें ब्रह्मरूप होतात आणि त्यांच्या उपभोगापासून पांच प्रकारचे दोष लागत नाहींत.

॥ अन्यथासर्वदोषाणांननिवृत्तिःकथंचन ॥

॥ असमर्पितवस्तूनांतस्माद्वर्जनमाचरेत् ॥

॥ निवेदंभःसमर्प्यैवसर्वंकुर्यादतस्थतः ॥

तसें न केल्यास त्याविषयीं या श्लोकांत दोष सांगितला आहे, त्याची व्याख्या गोकुळनाथानीं स्पष्ट सांगितली कीं,

तस्मादादौस्वोपभोगात्पूर्वमेवसर्ववस्तुपदेनभार्या पुत्रादीनामपिसमर्पणंकर्त्तव्यं ॥ विवाहानंतरंस्वोपभोगेसर्वकार्येसर्वकार्यनिमित्तंतत्कार्योपभोगिवस्तुसमर्पणंकार्यम् ॥ समर्पणंकृत्वापश्चात्तानितानिकार्याणिकर्त्तव्यानीत्यर्थः ॥

सर्व समर्पण करणें ह्मणजे आपल्या भार्यापुत्रादिकांचेही समर्पणकेल्या वांचून आपल्या उपयोगांत आणूं नये. याविषयीं अणखीं वचनें व त्यांची व्याख्या लिहिली आहे.

॥ समर्पणेनात्मनोहितदीयत्वंभवेध्रुवम् ॥

॥ अतदीयतयाचापिकेवलश्चसमाश्रयः ॥

॥ तदाश्रयतदीयत्वंबुद्धौकिंचित्समाचरेत् ॥

शेवटीं हें दुर्धर कर्म करण्यास जे असमर्थ असतील त्यानीं आपण आचार्याचें आहों असें मानून राहावें असीही मोकळिक दिल्ही आहे, असें या श्लोकांचे तात्पर्य आहे.

याप्रमाणें वल्लभ संप्रदायाची स्थीति आह्मी संक्षेपानें सांगितली, व त्याप्रमाणें त्याच्या मतानें वागणारी शिष्यमंडळी त्याला पुष्कळच मिळाल्यावर विद्यानगरच्या कृष्णदेव राजानें त्याला सात मण सोन्याचा तुळा पुरुष दान दिल्हा. त्या द्रव्यावर वल्लभाचार्यानें विठ्ठलनाथजीच्या मूर्त्तीला अलंकार केले, आपल्या बापाचें कर्ज वारिलें, आणि घर खर्चाला ठेविलें, असी व्यवस्था केली.

पुढें व्यासतीर्थ नामें तेथें एक प्रख्यात सन्यासी होता, त्यानें वल्लभाचार्याला सन्यास देऊन गादी चालविण्याविषयीं सांगितलें. पण ती गोष्ट त्यानें मान्य केली नाहीं आणि तेथून प्र-

यागास जाऊन काशीस गेला. तेथें त्यानें अणखी विद्याभ्यास केला. मग केदारनाथ, गया, हरिद्वार इत्यादि क्षेत्रीं नव वर्षें पर्यंत पर्यटन केलें. वाटेनें कित्येक क्षेत्रीं राहून पुष्कळ ग्रंथ रचिले. त्यांपैकीं

| | | |
|---|---|---|
| **व्याससूत्रभाष्य.** | **अंतःकरणप्रबोध.** | **जलभेद.** |
| **जैमिनीसूत्रभाष्य.** | **विरोधलक्षण.** | **सन्यासनिर्णय.** |
| **तत्वदीपनिबंध.** | **नवरत्न.** | **निरोधलक्षण.** |
| **भागवतटीकासुबोधिनी.** | **निबंधेभक्तिप्रकरण.** | **सेवाफल.** |
| | | **शृंगाररसमंडण.** |
| **सिद्धांतमुक्तावली.** | **विवेकधैर्याश्रय.** | **पुरुषोत्तमसहस्रनाम.** |
| **पुष्टिप्रवाहमर्यादा.** | **पत्राविलंबन.** | |
| **सिद्धांतरहस्य.** | **कृष्णाश्रय.** | **वैद्यवल्लभ.** |
| **चित्तप्रबोध.** | **भक्तिवर्द्धनी.** | |

हे होत. हे सर्व ग्रंथ मिळून संख्या एक लक्ष आहे.

शेवटीं काशीस येऊन राहिले. तेथें स्वजातीच्या लक्ष्मी नामक एका कन्ये बरोबर लग्न करून अग्निहोत्र घेतलें. त्याला गोपीनाथ आणि विठ्ठलनाथ हे दोन पुत्र झाले. शके १४४१ सांत गोवर्धन पर्वतावर जाऊन श्रीनाथजीची मूर्त्ति जी तेथें स्थापिली होती ती तेथून काढून मेवाडामध्यें नेऊन स्थापिली आणि काशीस परत आले. नंतर काशीविश्वेश्वराच्या देवळावर जाहीर नामा लावला कीं, श्रीकृष्णकृपेने आह्मी शंकर मताचें खंडण केलें. त्यास ज्या कोणास धर्मसंबंधी वाद करावयाचा असेल त्यानें आह्माकडे यावें. याप्रमाणें शंकरमतवाल्यांस जिंकिलें. ह्यागोष्टी गोपाळदासकृत **वल्लभाख्यान** आणि गदाधरकविकृत **संप्रदायप्रदीप** ह्या ग्रंथांत लिहिल्या आहेत.

शके १४५२ आषाढ शुद्ध तृतीया या दिवशीं हनुमान् घाटावर वल्लभाचार्य सन्यास ग्रहण करून समाधिस्थ झाले.

पुढें गोपीनाथ आणि विठ्ठलनाथ या दोघां भावांचा गादीच्या मालकीविषयीं तंटा लागून ते दिल्लीच्या बादशाहा जवळ कांहीं दिवस राहिले होते. तेथें गोपीनाथ मरण पावल्यावर विठ्ठलनाथ

गादीचा मालक झाला. तो फार बुद्धिमान् होता त्यामुळें त्यानें वल्लभाचार्यांचा संप्रदाय पुष्कळच वाढविला आणि हजारो लोक त्याला ईश्वराचा अवतार असें मानूं लागले. त्यानें हिंदुस्थानांतल्या पुष्कळ भागांत ह्मणजे पूर्वेसकाशी, मथुरा; पश्चिमेस कच्छ; द्वारका; उत्तरेस मारवाड, मेवाड; आणि दक्षिणेस पंढरपूर, मुंबई, इत्यादि ठिकाणीं वारंवार पर्यटनें केलीं. त्यांत त्यांत्या ठिकाणचे हजारो लोक त्याच्या भजनी लागले. त्यांत भाटे, वाणी, कुणबी, सुतार लोहार वगैरे होते.

विठ्ठलनाथजीला रुखमिणी आणि पद्मावती ह्या दोन बायका होत्या. त्यांपासून त्याला शोभा, यमुना, कमला, आणि देवका ह्या चार कन्या आणि गिरधर, गोविंदराय, बाळकृष्ण, गोकुळनाथ, घनःशाम, रघुनाथ आणि यदुनाथ हे सात पुत्र अशी संतती झाली.

विठ्ठलनाथानीं कित्येक नवे ग्रंथ केले व जुन्या ग्रंथांवर टीका केल्या. त्यांत **विद्वन्मंडण** नामक ग्रंथामध्यें शंकराचार्याला **हृदयशून्योभासि, भ्रांतोसि, प्रच्छन्नबौद्धोसि,** इत्यादि उद्धत भाषणें पुष्कळच लिहिलेलीं आहेत.

शके १५०७ सांत माघवद्य ७ यादिवशीं विठ्ठलनाथजी आपल्या वयाच्या ७०व्या वर्षीं मरण पावले. नंतर त्याच्या साता पुत्रांनीं आपल्या वेगवेगळाल्या गाद्या स्थापून देशोदेशीं पर्यटनें करून आपला संप्रदाय वाढविला. एकानें छप्पन्नभोग, एकानें तीर्थयात्रा, एकानें अग्निवांचून देहदहन इत्यादि महत्कृत्यें केलीं असें सांगतात आणि बहुत शिष्य केले. ह्यागोष्टी **मालाप्रसंग** वगैरे ग्रंथांत लिहिलेल्या सांपडतात.

वल्लभाचार्यांच्या पिढींतल्या पुरुषानीं व त्याच्या संप्रदायी लोकांनीं कित्येक ग्रंथ केले. त्यांची याद खाली घातली आहे.

| | | |
|---|---|---|
| **निजवारता.** | **हररायजीकृतशिक्षापत्री.** | **अग्निकुमार.** |
| **चौऱ्यांशीवैष्णवांची कथा.** | **तत्वदीपनिबंध.** | **शरणोपदेश.** |
| | | **रससिंधु.** |

दोनशेंबावन्नवैष्णवांचीकथा.
सेवाप्रकरण.
मूळपुरुष.
द्वारकेशकृतनित्यकृत्य.

अंतःकरणप्रबोध.
विवेकधैर्याश्रय.
कल्पद्रुम.
बालबोध.
मालाप्रसंग.
अणुभाष्य.

शुद्धाद्वैतमार्तंड.
विठ्ठलनाथजीअष्टोत्तरनाम.

## पुरुषोत्तम.

हा कलिंगदेशाचा राजा शालिवाहन शकाच्या १४ व्या शतकांत होता. कटक ही त्या देशाची मुख्य राजधानी होय. तो जातीचा आरीस्सा क्षत्री होता. घरगुती संस्कृत शाळांच्या उपयोगार्थ कांहीं पुस्तकें रचावीं, असा त्यानें मनांत संकल्प करून तो लहानपणींच संस्कृत भाषा शिकला. त्यानें कित्येक नामांकित पंडितांच्या आज्ञेवरून **हारावली**, **त्रिकांडशेष**, आणि **एकाक्षरी**, असे तीन कोश केले. ते हल्लीं जागो जागीं छापले आहेत. हा राजा मग लागलाच मरण पावला.

## गणिकानंद.

हा मोठा गणिती असे. शालिवाहन शकाच्या चवदाव्या शतकाच्या आरंभीं त्याचा उदय झाला. त्याला लहानपणींच संस्कृत भाषा चांगली शिकविली होती. त्यानें तरुणपणीं एक ग्रंथ रचिला, त्याला **गणिकानंद** असें नांव दिल्हें. त्याचे मित्र व आप्तविषयीं ह्यांमध्येंच प्रथमतः त्या ग्रंथाचा प्रसर झाला, परंतु काळेंकरून त्याच्या पुष्कळ प्रती होऊन तो ग्रंथ सर्व विद्वज्जनांत प्रसृत झाला.

## अक्षोभ्यदीक्षित.

हा ब्राह्मण मध्वमतानुसारी असे. तो सावनूर एथील राहणारा होता. त्यानें लहानपणींच न्यायशास्त्राचा अभ्यास केला आणि कर्नाटकी व महाराष्ट्र ह्या दोन भाषांत तो फार निष्णात असे, असें सांगतात. त्याचा सर्व वेळ विद्याभ्यासांत लागलेला असे. त्यानें मध्वलोकांच्या मतांविषयीं पुष्कळ ग्रंथ लिहिले परंतु ते सांप्रत उपलब्ध नाहींत. तो मोठा खळवादी असे. त्यानें आपलें द्वैतमत मोठ्या बुद्धीच्या बळानें रक्षण केलें. तो आपली जन्मभूमी जें सावनूर खेडें तेथेंच शके १४०० मध्यें मरण पावला, असें ह्मणतात.

---

## क्षीरस्वामी.

हा कवि जातीचा ब्राह्मण असे. त्याचा उदय प्रतापरुद्र राजाच्या राज्यांत शालिवाहन शकाच्या १४२२ व्या वर्षीं झाला. त्यानें संस्कृतांत एक कोश केला, त्याला **क्षीरस्वामिनिघंट** असें नांव दिल्हें. त्यांत एक सहस्र श्लोक आहेत. अणखी त्यानें अमरावरही एक टीका केली आहे. तो बेताबातानें व मितव्ययीपणानें राहत असे, ह्मणून मुख्यत्वें करून त्याला कांहीं रोग न होतां तो पुष्कळ वर्षेंपर्यंत वांचला, असें ह्मणतात.

---

## अन्नंभट्ट.

हा मोठा सिद्धांती नैयायिक जातीचा तैलंग ब्राह्मण होता. गरिकपाद ह्मणून पूर्वीं निझामअल्लीखान याच्या अधिकाराखालीं एक खेडें होतें तेंच हल्लीं चिंतपल्ली एथील राजाच्या अधिकारांत आहे तेथें हा जन्मला. त्याचा उदय शालिवाहन शकाच्या पंधराव्या शतकांत चालुक्य राजांच्या वेळीं झाला. तो कौंडिण्यपुर किंवा ज्याला कोंडवीडू असें ह्मणतात, तेथील शाळेमध्यें बारा वर्षेंपर्यंत सतत न्यायशास्त्र पढला. त्या वेळांत त्यानें न्याय-

शास्त्राचे ज्ञान पूर्ण संपादिलें. नंतर नवीन अभ्यास करणाऱ्यां स न्यायशास्त्रांतले पदार्थ व सिद्धांत थोडक्यांत कळावे ह्मणून एक संक्षिप्त ग्रंथ केला, त्याचें नांव **तर्कसंग्रह.** हा ग्रंथ सर्वत्र प्रख्यात असून न्यायशास्त्राचे प्रथमाभ्यासी हाच ग्रंथ पढत असतात.

अन्नंभट्टानें स्वदेशांत न्यायशास्त्र शिकविण्याकरितां एक विद्यालय स्थापिलें, तेथें त्यानें आपल्या शिष्यांस तर्कसंग्रह, दीपिका, मुक्तावली, गदाधरी अशा क्रमानें सर्व ग्रंथांचें पाठ सांगितलें. या प्रमाणें त्याचा क्रम बहुत दिवस चालल्यानें त्याचे विद्यार्थी त्या शास्त्रांत मोठे प्रवीण झाले. तो प्रथमतः स्वकृत ग्रंथ (तर्कसंग्रह) आपल्या शाळेंत विद्यार्थ्यांस पढवीत असे. अन्नंभट्ट सुमारें पंचावन्न वर्षांचे वयांत असतां बरोबर कांहीं शिष्य घेऊन श्रीशैलमलकार्जुनेश्वराच्या दर्शनास गेला, तेथून परत आल्यानंतर त्यानें आपला (सकाळचे व संध्याकाळचे एक दोन तास खेरीज करून) सर्व वेळ अध्ययन व अध्यापन ह्यांत घातला. प्रातःकाळीं व सायंकाळीं स्नानसंध्या करीत असे.

अन्नंभट्ट कोणत्याही राजसभेस गेला नाहीं, व मोठ मोठ्या गृहस्थांपासून त्यानें बक्षीसाची आशाही केली नाहीं; कारण त्याच्या बापाच्या वेळचें द्रव्य त्याच्या निर्वाहास पुष्कळ होतें त्यांतच तो संतोष मानीत असे. तो सर्वदा सुखी असे, त्याला पुष्कळ मुलें होतीं तीं सर्व जीवंत असतां तो मृत्यु पावला.

## शितिकंठ.

हा कवि जातीचा स्मार्त ब्राह्मण होता. निझामअल्लीखान यानें ब्रिटीश सरकारास गंडीकोटा ह्मणून एक प्रांत दिल्हा आहे त्याच नांवाच्या मुख्य शहरांत त्याचें वास्तव्य असून तो तेथेंच जन्मला होता. हा शालिवाहन शकाच्या पंधराव्या शतकांत प्रख्यातीस आला.

लहानपणींच त्याचा बाप वारला आणि दुसरे सुहृत्संबंधे त्याला कोणीच नव्हते ह्मणून तो मोठ्या विपत्तींत होता. त्या-

ची काळजी वाहणारा कोणीच नसे ह्मणून लहानपणीं त्याला दुर्व्यसनें लागलीं. मोठेंपणापर्यंत त्याला लिहितां वाचतां कांहीं येत नव्हतें. शेवटीं त्याला वाटलें कीं, आपण जर अशाच अज्ञानांधकारांत राहिलों, तर आपणास कोणी विचारणार नाहीं, उलटे तिरस्कार करतील. मग तो तेथून निघून काशी क्षेत्रीं गेला. तेथें रूपावली, समासचक्र, कोश, काव्य, इत्यादि पढला. मग न्यायशास्त्रावर त्यानें भारी व्यासंग केला. नंतर त्यानें बऱ्याच वेळानें तर्कसंग्रहावर टीका केली, तिचें नांव **तर्कसंग्रहदीपिका.** ही टीका सरस आणि बाळबोध असून फार मार्मिक आहे. या टीकेची ग्रंथसंख्या सुमारें ६००० आहे. परंतु त्याचे शिष्य आणि दुसरे लोक ती शितिकंठानें केली ह्मणून तिला **शितिकंठी** असें ह्मणत असतात.

शितिकंठानें आपलें लग्न केलेंच नाहीं. मरणपर्यंत ब्रह्मचारी राहून त्यानें आपला संपूर्ण काळ विद्यार्थी पढविण्यांत घालविला आणि शेवटीं काशीमध्यें मरण पावला.

## गजपतिप्रतापरुद्र.

कलिंग ह्मणून जो देश आहे, तेथें हा नामांकित राजा शके पंध्राशामध्यें राज्य करीत होता. त्यानें आपले राज्यांत न्याय करण्याविषयीं मोठी सुधारणा केली आणि स्वकपोलकल्पित एक कायद्यांचें पुस्तक केलें, त्याला **सरस्वतिविलास** असें नांव दिल्हें. त्याचप्रमाणें ह्या राजानें काम शास्त्रावर एक ग्रंथ रचिला.

## लक्ष्मणकवि.

हा स्मार्त ब्राह्मण वारणासीवारू या कुळांत जन्मला. बंदर सरकार ही त्याची जन्मभूमि होय. त्याच्यां बापाचें नांव वेंक-

देशकवि. तो शालिवाहन शकाच्या पंध्राव्या-शतकांत होता. त्यानें लहानपणींच तेलंगी व संस्कृत भाषांचा अभ्यास केला आणि मग पंध्रा वर्षेपर्यंत काव्यें व नाटकें यांच्या संपूर्ण ग्रंथांवर व्यासंग केला. लक्ष्मणकवि हा स्वतां कळावंतिणींचीं आणि नटांचीं संगत धरून नाट्यशास्त्रांत सांगितल्या प्रमाणें त्यांस हावभाव करायाला शिकवीत असे. या कृत्यांमुळें सभ्य लोक त्याचा धिक्कार करीत असत. तेणें करून त्याची मान खंडना वारंवार झाली. मग त्यानें आपला दुर्गुण छपविण्याकरितां कांहीं तरी लोकोत्तर उत्कृष्ट ग्रंथ रचावा आणि आपली कविताशक्ति विद्वानांस दाखवावी असा संकल्प केला. त्या वेळीं भोजराजानें भोजचंपू ज्याला चंपूरामायण असेंही ह्मणतात त्याचीं पांच कांडें रचून ठेविलीं होतीं तो चंपू समाप्त करण्या जोगें कोणाच्या अंगीं सामर्थ्य नाहीं असें पाहून कित्येक पंडितांच्या सांगण्यावरून त्या चंपूचें साहावें जें युद्धकांड तें त्यानें रचिलें आणि चंपू समाप्त केला. त्या कांडाची वाणी पूर्व ग्रंथासीं समतोल उतरली त्यावरून त्याची मोठी वाहवा झाली आणि त्याला भोजचंपूलक्ष्मण हें पद प्राप्त झालें त्याच्या स्वदेशच्या राजानीं त्याची कीर्त्ति ऐकून त्यानीं त्याला पुष्कळ बक्षीसें दिल्हीं. हा चंपू काव्यशाळेमध्यें पढविण्याचा संप्रदाय आहे. हल्लीं हा ग्रंथ पुणे पाठशाळेंत शुद्ध करून छापला आहे.

लक्ष्मणकवि आपल्या वयाच्या पंचावन्नाव्या वर्षीं मच्छिलीपटन एथें मरण पावला.

## अप्पय्यादीक्षित.

हा जातीचा द्रविड ब्राह्मण असे. तो कांची शहरापासून ४०° अक्षांशावर आग्नेय दिशेस आदिपाल्य नामक अग्रहार आहे तेथें राहत असे. तो नारायणदीक्षिताचा पुत्र होय. त्याची भरभर शालिवाहन शकाच्या पंध्राव्या शतकांत विद्यानगरचा राजा जो कृष्णदेव याच्या कारकीर्दींत झाली. तो बारा वर्षांचा

असतांच त्यानें वेदाध्ययन पूर्ण केलें. आणि याशिवाय कित्येक दुरधिगम विद्यांमध्यें तो प्रवीण होता, आणि ब्रह्मविद्येमध्यें ही त्याचें ज्ञान लोकोत्तर होतें. ह्या कारणामुळें त्यावेळचे लोक त्याला शिवांशसंभूत असें मानीत असत. अपय्यादीक्षित हा मुख्यत्वेंकरून शिवाचा उपासक होता ह्मणून त्याला शैव असें ह्मणत असत. त्यानें तीन बायका केल्या त्यांच्या पोटीं त्याला अकरा मुलगे झाले. त्यानें आपल्या उमेदींत भरसभेमध्यें धर्मसंबंधी विषय नानाप्रकारचे नैयायिक विषय आणि मुख्यत्वेंकरून शिव आणि विष्णु यांचे साम्यदर्शन, ह्यामध्यें महान् महान् पंडितांचें खंडन केलें, तेणेंकरून चंद्रगिरीचा राजा व्यंकटपतिरायलू याची कृपा संपादन केली.

त्या राजानें दीक्षिताला कुटुंबाचे व विद्यार्थ्यांचें निर्वाहार्थ एक जमीन करून दिल्ही. त्यानें शिवोपासना मार्गावर ग्रंथ केले. ते येणें प्रमाणेंः—

**शिवार्चनचंद्रिका.** तिचे ३० अध्याय आहेत.

**शिवतत्वविवेक.** त्याचें २० अध्याय आहेत.

**शिवमणिदीपिका.** यांत श्रुति, स्मृति, पुराणे, इत्यादिकांतील वचनांचा संग्रह करून शिव हाच परम दैवत असें स्थापन केलें आहे.

**शिवकर्णामृत.** या काव्यांत पंचरात्र आणि विष्णुपुराणहीं केवळ विष्णु मतानुरोधी आहेत या मताचें खंडण करून शिवाचें प्राधान्य निरूपिलें आहे.

**आत्मार्पण.** हा सर्व ग्रंथ शिवभक्तिपर शंभर श्लोकांचा आहे.

**वीरशैव.** या ग्रंथांत शिवालयाच्या निर्माणाविषयीं शास्त्रार्थ, शिवमूर्त्तीचें निर्माण व स्थापना इत्यादिकांविषयीं शास्त्रार्थ सांगितले आहेत. याचीं पटलें २७ आहेत.

**रामायणसारस्तव.** हें स्तोत्र आहे. यांत रामायणाचे तात्पर्य शिवपर लाविलें आहे.

**नामसंग्रहमाला** आणि **शब्दप्रकाश** हे दोन कोश आहेत.

पहिले तीन ग्रंथ दीक्षितानीं अगोदर किय्बेक यज्ञ केल्यानंतर केले. असें सांगतात कीं, आत्मार्पण ग्रंथ करण्याच्या कांहीं दिवस पूर्वीं दीक्षित धोत्र्याच्या बिया खात असे, कारण धर्माविषयीं विचार करायास अंतःकरण फार निर्मळ पाहिजे, तें साफ राखण्याची शक्ति ह्या वनस्पतीच्या अंगी आहे ह्मणून लोकवार्त्ता होती. असें ह्मणतात कीं, त्या औषधीच्या योगानें दीक्षिताला ईश्वरी प्रेरणा होऊन त्यानें त्या समयीं जें सुचलें तें चार लेखक कडून लिहविलें. तो हा आत्मार्पण ग्रंथ होय. ह्या ग्रंथाविषयीं दक्षिण हिंदुस्थानचे सर्व लोक आश्चर्य मानितात.

अपय्यादीक्षितानें वेदांत, अलंकार, न्यायशास्त्र, इत्यादि मिळून एकंदर चवऱ्यांशीं ग्रंथ केले. त्यां पैकीं **कुवलयानंद**, **चित्रमीमांसा**, हे अलंकारावर; आणि **दशकुमारचरित्रसंक्षेप** हे ग्रंथ फार सुंदर आहेत. सर्व पंडित लोक त्यां ग्रंथांचा अभ्यास करितात. बाकीचे ग्रंथ बहुधा दुर्दैवानें त्रुटित झाले आहेत.

अपय्यादीक्षित कांहीं दिवसांनीं त्रिचनापली, तंजोर, आणि मधुरा एथील राजांच्या भेटीस गेला. त्याची विद्वत्ता व बुद्धिमता पाहून त्या राजांनीं त्याला बक्षीसें देऊन प्रोत्साहन दिल्हें. तो मोठा नैष्ठिक व धर्मपालक असे ह्यामुळें त्यानें कावेरी नदीच्या तटाकीं आपल्या आश्रयदात्यांच्या औदार्यानें पुष्कळ यज्ञ केले. जेथें जेथें तो जात असे तेथें तेथें शिवाची स्तुति गात असे, आणि जो कोणी वैष्णव धर्म सोडून शिवोपासना घेई त्याची स्तुति करीत असे.

व्यंकटपति राजाच्या सभेमध्यें अपय्यादीक्षितानें ताताचार्याचें वेदांत व धर्म ह्याविषयीं खंडण करून पराजय केला होता, ह्मणून त्यानें दीक्षिताशीं हाडवैर बांधलें, आणि कोणत्यातरी उपायानें दीक्षिताचा नाश करावा याविषयीं निश्चय केला. नंतर दीक्षित रानांतून जात असतां त्यानें त्यास मारण्यासाठीं मारेकरी पाठविले. ते अपय्यादीक्षितावर चालून गेले, परंतु तत्क्षणीं तेथें कोणी एक वीरपुरुष अकस्मात् त्याच्या दृष्टीस पडला. त्यानें ह्या मारेकऱ्यांस पिटवून लावले, आणि दीक्षिताचें प्राणरक्षण

केलें असें सांगतात. ही गोष्ट राजाचे कानावर गेली तेव्हां त्यानें दीक्षिताची शिवावर पूर्ण निष्ठा आहे, असें पाहून अमूल्य वस्त्राभरणांनीं त्याचा बहुमान केला.

अप्य्यादीक्षिताचें साठ वर्षांचें वय झालें तेव्हां त्यानें काशीयात्रेची तयारी केली, परंतु चिदंबर एथील विद्वान ब्राह्मणांस त्याचा जाण्याचा बेत कळल्यावर त्यांनीं चिदंबर एथें येऊन राहावें असी विनंती केली, कारण त्याच्या मताप्रमाणें चिदंबर ही जागा काशीपेक्षां पवित्र होय, आणि गंगेपेक्षां शिवगंगेचा डोह पवित्र होय. त्या लोकांच्या इच्छेनुरूप अप्य्यादीक्षितानें महायात्रेचा बेत फिरविला आणि चिदंबराकडेस निघाला. तेथें तो तीस वर्षेंपर्यंत राहून त्यानें सर्व वेळ धर्माचरणांत घालविला.

दीक्षिता जवळ मरते वेळीं पांच स्फटिकाची लिंगें होतीं, त्यांपैकीं दोन ब्राह्मणांस बक्षीस केलीं. एक आपल्या पुतण्यास देऊन मधुरेस स्थापण्याविषयीं सांगितलें. एक आपल्या भावाबंदास दिल्हें, आणि पांचवें चिदंबर एथें त्यानें आपल्या हातानीं स्थापिलें. नंतर लागलाच तो कैलासवासी झाला. त्यावेळीं त्याच्या वयाला सुमारें ९० वर्षें असावीं.

## जगन्नाथरायपंडित.

हा कवि तैलंगण देशांत मुंगंडा म्हणून एक शहर आहे तेथील राहणारा असे. वेगीनाड कुळांतील रामचंद्र उपाध्याय नामक ब्राह्मणाचा हा मुलगा होय. तो अकबर बादशाहाच्या वेळीं होता. जगन्नाथ हा बारा वर्षांचा होई तोपर्यंत त्याला संस्कृत भाषेचा एक शब्दही ठाऊक नव्हता. नंतर आपल्या मेहुण्याच्या घरीं राहून त्यानें काव्याभ्यास केला. रात्रंदिवस श्रम करून त्यानें ह्या गीर्वाण भाषेचें चांगलें ज्ञान संपादन केलें. तदनंतर न्याय, अलंकार, मीमांसा, शास्त्र पढून तो मोठा बुद्धिमान् कवि झाला. नंतर तो कर्नाटक देशच्या राजांच्या भेटीस गेला, परंतु तेथें त्याच्या इच्छेप्रमाणें गुणांची चहा न झाल्यामुळें

जो अपमान झाला तद्बोधक कांहीं श्लोक रचावे ह्मणजे त्याचें लक्ष लागेल ह्मणून त्यानें कांहीं श्लोक रचिले. असी युक्ति केली तथापि त्याच्या श्रमाकडे कोणी लक्ष दिल्हें नाहीं. त्या नंतर जगन्नाथपंडित तेथून निघून जयपुरास गेला आणि तेथें बहुत वर्षे राहून अनेक प्रकारच्या शास्त्रविषयामध्यें पंडितांस त्यानें जिंकिलें आणि तेथें मोठी शाळा घालून शेंकडो विद्यार्थ्यांस शास्त्रें, पुराणें, इत्यादि पढविलीं.

दिल्लीस बादशाहाचे पदरीं एक महान् विद्वान काजी होता. त्यानें आपल्या विद्येच्या बळानें "यवन धर्म खरा" असें स्थापण्याच्या उद्देशानें देशोदेशीं जाऊन कित्येक पंडितांस कुंठित केलें, तेव्हां त्यांस मोठी चिंता पडली. जगन्नाथरायपंडितानें सांगितलें कीं, एक वर्षाची मुद्दत द्याल तर मी त्या काजीचा पराभव करीन. नंतर त्यानें त्याच काजीजवळ जाऊन यवन धर्मातलें सर्व ग्रंथ पाहिले, आणि त्या शास्त्राचें त्यास मार्मिक ज्ञान झालें. तेव्हां कोटिक्रमानें त्या काजीशीं धर्मविषयक वाद करून त्यास कुंठित केलें आणि स्थापिलें कीं, यवनांचा धर्म तो यवनांनींच आचरावा, दुसऱ्यास अधिकार नाहीं. तेणेंकरून बादशाहाची मर्जी फार प्रसन्न झाली, आणि त्यानें पंडिताला आपल्या पदरीं बाळगिलें. फारशी भाषा शिकल्या नंतर मनोरंजनार्थ पंडितानीं संस्कृत श्लोक, फारशी शायरी असे मिश्रभाषात्मक कित्येक रचिले. बादशाहाचे दरबारीं जगन्नाथरायपंडितापेक्षां कोणी वरिष्ठ नव्हता. पुढें त्याची विद्याकीर्त्ति सर्वत्र पसरली.

जगन्नाथरायपंडित स्वरूपानें फार सुंदर देखणा पुरुष होता, आणि विषयासक्त फार असे. ही गोष्ट राजकन्येच्या कानावर गेली आणि तिला त्याच्या बुद्धीचा व सौंदर्याचा अभिनव चमत्कार वाटून ती आपल्या महालांत बसून जाळीच्या पडद्यांतून वारंवार त्याकडे पाहत असे. त्या कन्येचें वय सोळा वर्षांचें झालें असतां जगन्नाथपंडिता बरोबर लग्न करावें असा तिनें निश्चय करून आपलें मनोगत आईला सांगितलें. ह्या नामांकित राजकन्ये-

चें नांव लवंगी. ती फारच रूपवती आणि गुणवती होती.

एके दिवशीं जगन्नाथरायपंडित बादशाहा बरोबर बुद्धिबळें खेळत असतां बादशाहाला तहान लागली, तेंव्हां राजकन्या लवंगी सुवर्णकलश डोक्यावर घेऊन राजाकडे आली. राजा पाणी प्याल्या नंतर ती आली तसी मस्तकावर सुवर्णकलश घेऊन परत जाऊं लागली, तेंव्हां राजानें पंडितास ह्मटलें कीं, तुह्मी कवि आहांत. या कन्येवर श्लोक करावा. पंडितानें ताबडतोब असा श्लोक रचिला:—

॥ इयंसुस्तनीमस्तकन्यस्तकुंभा कुसुंभारुणंचारु
चेलंदधाना ॥ समस्तस्यलोकस्यचेतःप्रवृत्तिं गृ
हीत्वाघटेस्थाप्ययातीवभाति ॥

अर्थ— ही उत्तम स्तनवती तुझी कन्या कुसुंभानें रंगविलेलें चांगलें वस्त्र नेसली आहे आणि मस्तकावर कुंभ घेऊन चालली असतां मला वाटतें ही सर्व लोकांच्या चित्तवृत्ति जणूं त्यांमध्यें भरून जात आहे.

बादशाहानें तो श्लोक ऐकतांच एवढ्या थोड्या वेळांत श्लोक केला ह्मणून त्याची मर्जी फारच प्रसन्न झाली. तेंव्हां पंडिताला सांगितलें कीं, तुझ्या इच्छेस येईल तें माग. तेंव्हां पंडित बोलले:—

॥ नयाचेगजालिंनवावाजिराजिं नवित्तेषुचित्तं
मदीयंकदाचित् ॥ इयंसुस्तनीमस्तकन्यस्तकुंभा
लवंगीकुरंगीदृगंगीकरोतु ॥ १ ॥
॥ यवनीनवनीतकोमलांगी शयनीयेयदिलभ्यते
कदाचित ॥ अवनीतलमेवसाधुमन्ये नवनीमाघ
वनीविनोदहेतुः ॥ २ ॥

अर्थ— अणखी जगन्नाथपंडित ह्मणतो, राजा मी तुझे गजंसमुदाय किंवा अश्वसमुदाय यांची याचना करीत नाहीं आ-

णि द्रव्याचाठाईंही माझें चित्त नाहीं. परंतु ही मस्तकावर घडा घेऊन चालली जी हरिणलोचना तुझी कन्या ती माझा अंगीकार करो. एवढेंच मागणें आहे.

ही नवनीताप्रमाणें कोमलांगाची यवनी ह्मणजे तुझी कन्या ती मला कदाचित् प्राप्त झाली तर इंद्राच्या नंदनवनापेक्षां या भूलोकींचेंच सुख मी विशेष मानीन.

हें मागणें ऐकतांच बादशाहा अंतःकरणांत खिन्न झाला, परंतु वचन गेलें, त्यामुळें कुंठित झाला. नंतर पंडितास ह्मणाला तूं आमच्या बरोबर खाना खाशील तर आह्मी तुला आपली मुलगी देऊं. पंडितांनीं ती गोष्ट कबूल केली, आणि आपलें ब्राह्मण्य नष्ट झालें तरी चिंता नाहीं परंतु राजकन्या प्राप्त होवो असा निश्चय त्यानें केला.

जरी राणीच्या मनांत आपल्या कन्येचें त्याच्याशीं लग्न लावूं नये असें आलें, तरी तिची इच्छा पूर्ण केली तरच ती जगणार अन्यथा प्राणत्याग करील, असें पाहून तिनें एके दिवशीं राजाची प्रसन्न मर्जी पाहून त्याजवळ ही गोष्ट काढण्याचा विचार केला. तों इतक्यांत राजानेंच येऊन राणीला तें वृत्त कळविलें. नंतर बादशाहानें त्या दोघांचें लग्न मोठ्या समारंभानें लाविलें. आणि त्यानंतर लोकांनीं जगन्नाथपंडिताला जातीबाहेर टाकिलें तरी राजाश्रयामुळें तीं उभयतां सुखानें नांदलीं. या गोष्टीला बहुत वर्षें लोटल्यावर पंडितराय हे वैराग्य पावून त्या यवनी सहवर्त्तमान काशीस जाऊन राहिले.

एके दिवशीं जगन्नाथपंडित यवनी सहवर्त्तमान भागीरथीच्या कांठीं निजले होते, तों प्रहर दिवस आला तरी जागृत झाले नाहींत. त्यावेळेस त्या मार्गानें अपय्यादीक्षित जात होते; त्यांनीं पाहून ह्मटलें, असल्या प्रसिद्ध ठिकाणीं कोण चांडाल यवनीला घेऊन निजला आहे. जवळ जाऊन पाहातात तों त्याच्या डोकीचे केंस पिकले होते. तेव्हां दीक्षितांनीं अर्धश्लोक ह्मटला

॥ किंनिःशंकंशेषेशेषेवयसित्वमागतेमृत्यौ ॥

अर्थ— तूं आपल्या अवशिष्ट वयांत मृत्यु सन्निहित प्राप्त झाला असतां निःशंक एथें कसा निजतोस.

तेव्हां जगन्नाथपंडितानें तोंडावरचें पांघरूण काढिलें असतां दीक्षितांनीं त्याला ह्मटलें कीं,

॥ अथवासुखंशयीथाः निकटेजागर्तिजान्हवीभवतः ॥

बापा पंडितराया तूं आहेस काय ? तर खुशाल नीज. कारण तुझ्यासाठीं भागीरथी सर्वदा जागृत आहे.

जगन्नाथपंडितानें केलेले ग्रंथ येणेंप्रमाणें:—

**रसगंगाधर** — हा अलंकार शास्त्रावर मोठा वादग्रंथ आहे. त्यांत कित्येक ठिकाणीं अपय्यादीक्षिताच्या ग्रंथांचें खंडण करून कांहीं निंदाही केली आहे. जगन्नाथपंडित मोठा अभिमानी होता. त्यानें आपल्या ग्रंथांत अलंकाराच्या उदाहरणार्थ नवे श्लोक करून घातले. दुसऱ्या कवींनीं केलेले श्लोक जसे अपय्यादीक्षितांनीं आपल्या कुलवयानंदांत घेतले आहेत त्याप्रमाणें घेतले नाहींत.

**भामिनीविलास** — याचीं तीन शतकें आहेत. त्यांत नीति, अन्योक्ति, आणि शृंगार यांचें वर्णन आहे.

**अश्वधाटी**—या काव्याचे श्लोक २७ आहेत. यांत रामचंद्राची स्तुति असून मनाला बोध केला आहे. त्याचा छंद व रचना फार उत्कृष्ट असून मोठें बिकट आहे.

**गंगालहरी**—ही गंगेची स्तुति आहे. हिचे श्लोक ५२ आहेत. इजवर वामनाची समश्लोकी टीका आहे.

**कुचमर्दिनी** — या ग्रंथाची संपूर्ण प्रत अढळण्यांत येत नाहीं. दक्षिणेंत कांहीं प्रकरणें आहेत. त्यांत प्रौढमनोरमा जी सिद्धांतकौमुदीची टीका तिचें पदोपदीं खंडण केलें आहे.

जगन्नाथपंडित काशीस जाऊन राहिले, तेव्हां त्याला शुद्धकरून घेण्याविषयीं तेथील विद्वानांच्या मनांत होतें परंतु पंडिताचें ह्मणणें असें होतें कीं, माझ्या यवनीसुद्धां मला शुद्धकरून

ष्याल तर मी प्रायश्चित्त घेईन परंतु ती गोष्ट घडायाची नाहीं ह्मणून तो विचार तसाच राहिला. पंडितरायानें अंतर्यामी पश्चात्ताप पावून भागीरथीवर पूर्ण भाव ठेविला होता ही गोष्ट पुढें सर्व लोकांच्या प्रत्ययास आली. शके १५०० मध्यें एके दिवशीं पंडितराय यवनीसहवर्त्तमान घाटावर बसले आणि गंगेची स्तुति आरंभिली. तेंव्हां दर श्लोकास गंगेचें पाणी एकेक पायरी चढूं लागलें. अशा बावन्न श्लोकांस बावन्न पायऱ्या पाणी चढलें, त्या वेळेस तो चमत्कार पाहण्यासाठीं काशींतले आबालवृद्ध सर्व लोक आले असतां त्यां देखतां गंगेनें त्यांस दर्शन देऊन यवनीसहवर्त्तमान त्यांचा उद्धार केला. ही गोष्ट जगविश्रुत आहे.

## भट्टोजिदीक्षित.*

हा प्रख्यात व्याकरणशास्त्रांतला ग्रंथकार शके १५०० शांत जन्मला. कारण अद्यापि याची पांचवी किंवा साहावी पिढी काशींत जिवंत आहे. याला होऊन सुमारें ५००. वर्षे झालीं असें पुष्कळ लोक उगीच बोलतात परंतु हा पंडित अपय्यादीक्षिताच्या वेळीं होता असें पुष्कळ प्रमाणांवरून पटतें. दुसरी एक गोष्ट. अशी आहे कीं, भट्टोजीदीक्षित हा इतर पंडितांबरोबर जरी स्पर्द्धा करीत असे तरी त्यानें अपय्यादीक्षिताची मोठ्या नम्रतेनें भेट घेतली आणि आपल्या कौमुदीप्रभृति ग्रंथांचा लोकांत प्रचार व्हा-

---

* शालिवाहन शकाच्या चवदाव्या शतकांत कर्नाटक देशाचा आद्यराजा मयूरवर्मा होता, त्यानें गौड ब्राह्मणांचीं पुष्कळ कुळें आणून कोंकण आणि कऱ्हाड यांच्यामधील सह्याद्रि नामक पर्वताच्या पायथ्याशीं त्यांची स्थापना केली. त्यांमध्यें भट्टोजिदीक्षिताचा आजा सकुटुंब होता. ह्या कुटुंबांची निरनिराळे प्रांतांत चांगली वस्ती झाल्यानंतर, मुसलमानाचें प्राबल्य झालें, तेंव्हां त्यांस जे त्या प्रांतांत अधिकार दिल्हे होते ते सर्व त्यांनीं बळकाविले; आणि आपले सैन्याच्या प्रत्येक टोळीचें अधिपत्य त्यांस दिल्हें. त्या वेळेपासून ब्रिटिश लोकांचें हिंदुस्थानांत राज्य होईपर्यंत त्यांना शेणवी हें पद होतें.

वा ह्मणून विनंति केली. याची माहिती दक्षिणोत्तर हिंदुस्थानाच्या सर्व ठिकाणीं आहे.

यानें व्याकरणशास्त्रावर लोकोपयोगी उत्कृष्ट ग्रंथ पुष्कळ केले, त्यांत प्रथम गणनीय ग्रंथ असा **सिद्धांतकौमुदी**. या ग्रंथीची रचना अध्ययन करणाऱ्यास इतकी सुलभ आणि बिनचूक झाली आहे कीं, यापेक्षां अणखी सुधारणा होणें उरलेंच नाहीं. याच्या पूर्वीं प्राचीन काळापासून भरत, वोपालित, वृत्तिकार, माधव, वैयाकरणसर्वस्वकार, काशिकाकार, वामन, इत्यादि पंडितानीं संस्कृत व्याकरणाचे ग्रंथ केले; परंतु सिद्धांतकौमुदीप्रमाणें व्यवस्थित रचना कोणालाच साधली नाहीं. हा ग्रंथ झाल्यावर संस्कृत व्याकरणाची सुधारणा होणें पूर्ण झालें. या ग्रंथांत प्रथम संधिप्रकरण, मग विभक्तिप्रकरण, विभक्त्यर्थप्रकरण, समासप्रकरण, नामप्रकरण, क्रियापदप्रकरण, कृदंतप्रकरण, इत्यादि प्रकरणें, त्यांचे नेम व उदाहरणें यांसुद्धां प्रश्नोत्तररूपानें दाखविलीं आहेत. तेणेंकरून संस्कृत भाषा शिकण्यास हा ग्रंथ फार सोयकर झाला आहे.

**प्रौढमनोरमा.** ही कौमुदीची टीका आहे. यांत प्राचीन ग्रंथकारांचीं जीं भाष्यविरुद्ध मतें त्यांचें खंडन करून कौमुदीचा अर्थ सविस्तर सांगितला आहे. याची संख्या १२००० आहे. इजवर **लघुशब्दरत्न** आणि **बृहच्छब्दरत्न** ह्या दोन टीका नागेशभट्टानें केल्या.

**तत्वबोधिनी.** ही कौमुदीची दुसरी एक मोठी विस्तीर्ण टीका ज्ञानेंद्रसरस्वती यानें केली आहे.

**वैयाकरणभूषण.** हा व्याकरणशास्त्रसंबंधी अर्थविचाराचा ग्रंथ आहे. यांत कृदंत, तद्धित, समास, कारक, एकशेष, विभक्ति, प्रत्यय, नामधातू, इत्यादिकांच्या अर्थव्यवस्था उदाहरणासहित सांगितल्या आहेत. हा ग्रंथ न्यायशास्त्राचें कांहीं अध्ययन करून शिकावा ह्मणजे याच्या अध्ययनेंकरून व्याकरणांत व्युत्पत्ति चांगली होते.

**शब्दकौस्तुभ.** हा ग्रंथ भाष्याच्या टीकेदाखल आहे. मूळ

भाष्यांत सूत्रार्थाचा निर्णय करण्यासाठीं शंकासमाधानरूपें जेवढा विचार केला आहे तेवढ्याचा संग्रह करून संपूर्ण भाष्यार्थ सरळ दाखविले आहेत. भट्टोजिदीक्षिताच्या ग्रंथांची वाणी फार सुरस आणि प्रौढ असून सुखमुखोच्चार्य आहे. त्यांत कौस्तुभाची वाणी फारच आनंदकारक आहे. असें सांगतात कीं, भाष्याच्या आठांही अध्यायांवर कौस्तुभ हा एकंदर लक्ष ग्रंथ झाला होता, परंतु तो पंडितांनीं बुडविला. कारण कीं, त्यांत संपूर्ण भाष्यार्थ सुगम लिहिला तेणेंकरून लोकांमध्यें भाष्यग्रंथ कोणीच पाहणार नाहीं. भाष्याच्या पहिल्या अध्यायांत जीं नऊ लहान प्रकरणें आहेत त्यांला **नवान्हिकी** ह्मणतात तेवढा मात्र कौस्तुभ ग्रंथ आतां उपलब्ध आहे. याची संख्या ९००० आहे.

दुसरा **भूषणसार** तो याच ग्रंथाचा संक्षेप आहे. अणखी एक **वैयाकरणभूषण** आहे, तो कोंडभट्ट यानें केला. भूषणसारावर बाळंभट्ट पायगुंडे यांची टीका आहे. व हरिवल्लभ यानेंही **भूषणसारदर्पण** या नावें एक टीका केली आहे.

भट्टोजिदीक्षित यानें प्रथमतः संपूर्ण ग्रंथांचे खर्डे तयार करून मग चांगले सुधारून शुद्ध केले. नंतर आपल्या ग्रंथांच्या पुष्कळ प्रती लिहविल्या आणि त्याचा लोकांत प्रचार व्हावा ह्मणून त्या वेळेस जे व्याकरणी ग्रंथकर्त्ते होते त्यांची भेट घेऊन आपल्या ग्रंथांत कांहीं दोष असल्यास कोणी तरी काढून दाखवावे अशा उद्देशानें पूर्वोत्तर हिंदुस्थानांतील क्षेत्रांत व प्रसिद्ध विद्यालयांत पर्यटन केलें, आणि जागोजागीं आपलीं पुस्तकें वांटून दिल्हीं. ते ग्रंथ सांप्रत उपलब्ध असून विद्वन्मान्य आहेत.

धर्मशास्त्रावरही दीक्षितांचे कित्येक ग्रंथ आहेत, त्यांत **अशौचनिर्णय** व **आन्हिक** हे लोकांत चालू आहेत. बाकीचे ग्रंथही अन्यत्र प्रसिद्ध असतील.

इंग्लिश ग्रंथांत भट्टोजिदीक्षिताविषयीं कांहीं वृत्त लिहिलें आहे तें येणेंप्रमाणें;—

हा जातीनें गौडब्राह्मण असून प्रथम महाराष्ट्र देशांत राहत होता. तो एका देवसंस्थानांतील पुजारी असे. ती वृत्ति त्या-

च्या वंशपरंपरेनें चालत आल्यामुळें त्याला मिळाली होती. त्यानें आपलें वडिलोपार्जित दीक्षित हें नांव राखण्यासाठीं मोठ्या तत्परतेनें शास्त्राभ्यास केला. पहिल्यानें हा स्वदेशीं असतां त्याला शास्त्र पढू सांगणारा त्याच्या देशांत कोणीच विद्वान् नव्हता. त्यानें पुष्कळ काव्यें वाचून नुस्तें संस्कृत भाषेचें ज्ञान संपादन केलें. नंतर काशीस जाऊन तेथें व्याकरण शास्त्राचा चांगला अभ्यास केला. त्याची बुद्धि विलक्षण सूक्ष्म होती. त्याला एक पुत्र होता, त्याचें नांव भानुदीक्षित.

भट्टोजिदीक्षितानें आपल्या उतारवयामध्यें न्यायशास्त्राचा अभ्यास करून सर्वकाळ विचारांत घालविला. त्याचें देहावसान काशीक्षेत्रीं त्याच्या वयाच्या छपन्नाव्या वर्षी झालें.

भट्टोजिदीक्षिताविषयीं असी एक लोकवार्त्ता चालत आली आहे कीं, त्याचा व्याकरणशास्त्रांत जितका निर्भर होता त्याप्रमाणें व्याकरणशास्त्रीं बहुत शिष्य तयार करावे. असा त्याचा हेतु होता तसें न घडल्यामुळें तो ब्रह्मपिशाच होऊन आपल्या वाड्यांत राहिला. तो वाडा क्षेत्रस्थानीं ओसाड टाकिला होता. कांहीं दिवसानंतर दोघे पांथस्थ गैरमाहित ब्राह्मण त्या वाड्यांत गेले असतां तेथें भट्टोजिदीक्षितानें त्या दोघांस भोजनाची वगैरे सोय करून देऊन त्यांस संपूर्ण व्याकरण शिकविलें. पुढें त्या विद्यार्थ्यांस त्याचें स्वरूपज्ञान झाल्यावर त्यांनीं भट्टोजिदीक्षितास सद्गति दिल्ही.

## लोलिंबराज.

पूर्वीं जुन्नरामध्यें दिवाकरभट्ट नांवें एक उत्कृष्ट विद्वान् ब्राह्मण राहत होता. तो बहुत दिवस सूर्याची आराधना करीत असतां वृद्धापकाळीं सूर्याच्या प्रसादें करून त्याला एक पुत्र झाला, त्याचें नांव लोलिंबराज ठेविलें. त्याचा बाप लहानपणींच निवर्त्तला यास्तव पुढें त्यास सुशिक्षा नसल्यामुळें तो मुलगा स्वच्छंदी, मूर्ख, व विषयी असा झाला, त्यावरून लोक त्याचा फार तिरस्कार करीत असत.

या प्रमाणें कित्येक दिवस लोटल्यावर शके १५५२ त्यामध्यें लोलिंबराज पश्चात्तापानें सप्तशृंगास जाऊन तेथें निष्ठापूर्वक देवीची आराधना करूं लागला. पुढें त्याच सालांत आश्विन शुद्ध अष्टमीच्या दिवशीं त्यानें देवीपुढें होमकुंड रचिलें आणि शस्त्रानें आपल्या शरीराचा एकेक तुकडा काढून होमकुंडांत जाळूं लागला. याप्रमाणें शरीराचा कांहीं भाग दग्ध झाल्यावर तो आपल्या मस्तकाची पूर्णाहुती देणार होता तोंच देवीनें प्रसन्न होऊन त्याचा हात धरिला आणि ह्मटलें कीं, "लोलिंबा वरमाग!" त्यावेळीं छिन्नभिन्न झालेल्या त्याच्या शरीरांतून रक्तधारा वाहत असतां त्यानें देवीला धिक्कारून ह्मटलें कीं, दुष्टे आतां तुझा वर घेऊन मला काय कर्त्तव्य आहे ? मग देवीनें त्याच्या शरीरावरून हात फिरविला. तेणेंकरून त्याचें शरीर यथापूर्व झालें. नंतर देवीनें आपल्या मुखांतील तांबूल त्याला खायाला देऊन ह्मटलें कीं, तुझ्या जिव्हाग्रीं सरस्वती वास करील आणि तूं सर्व विद्यांचा निधि होशील.

मग लोलिंबराज आपल्या गावीं जुन्नरास आल्या नंतर त्याच्या हातून कांहीं अलौकिक कृत्यें घडूं लागलीं. एकदा बादशाहानें पालखी पाठवून त्याला मोठ्या समारंभानें आपल्या घरीं आणिलें आणि प्रश्न केला कीं, माझी स्त्री गरोदर आहे, तिला पुत्र होईल किंवा कन्या ? तेव्हां बादशाहाची उपवर झालेली कन्या जवळ उभी होती. ती रूपलावण्यसंपन्न व सुकुमार असी पाहून लोलिंबराज निर्भिडपणें ह्मणाला कीं, जर माझा प्रश्न खरा झाला तर त्वां आपली उपवर कन्या मला द्यावी. बादशाहानें तें कबूल केल्यावर लोलिंबराज ह्मणाला, "तुला पुत्र होईल." तसें पुढें बादशाहाचे प्रचीतीस आल्यावरून त्यानें त्यास आपली कन्या दिल्ही. मग लोलिंबराजानें तिचें नांव रत्नकला असें ठेविलें.

पुढें शके १५५५ त्यांत लोलिंबराजानें **वैद्यजीवन** या नांवाचा ग्रंथ रचिला. त्यांतील श्लोक फार रसिक व अनेक छंदयुक्त आहेत. त्यांत रत्नकलेला वारंवार संबोधनें देऊन पुष्क-

ळ प्रकारचे औषधिकल्प बांधिले आहेत. तो सांप्रत प्राकृत अर्थासहित छापला आहे. दुसरें **हरिविलास** या नांवाचें काव्य केलें आहे. त्यांत कृष्णजन्मापासून कंसवधापर्यंत कथा फार सुरस वर्णिल्या आहेत.

## वेंकटाध्वरी.

हा कवि वैष्णव ब्राह्मण मोठ्या विद्वान घराण्यांत जन्मला. याच्या बापाचें नांव रघुनाथदीक्षित कवि. तो अपय्यादीक्षिताचा पुत्र आणि तातार्यांचा भाचा. तातार्य हा कांची मंडलामध्यें फार प्रख्यात विद्वान होता. त्यानें वाजपेयादिक मोठाले यज्ञ केले होते. रघुनाथदीक्षित हाही वेदशास्त्रसंपन्न, यज्ञ करणारा, आणि कवि असा होता. त्यामुळें त्याला रघुनाथदीक्षितकविं असें ह्मणत असत. तो कांची मंडलांत बहु आणि पयस्विनी या दोन नद्यांच्या मध्यभागीं अरिशल्लपल्ल या नांवाचा एक अग्रहार आहे तेथें राहत असे. यानें आपल्या वैष्णव संप्रदायावर कित्येक संग्रह ग्रंथ रचिले, ते वैष्णव लोकांत चालत आहेत. वेंकटाध्वरी हा लक्ष्मीचा उपासक होता. त्यानें नीति, अन्योक्ति, आणि राजवर्णन अशा विषयांवर बहुत काव्यरूप ग्रंथ केले. त्यांत त्याचे तीन ग्रंथ फार प्रसिद्ध आहेत. **विश्वगुणादर्श**, **लक्ष्मीसहस्त्र**, आणि **हस्तिगिरिचंपू**. या ग्रंथांत उत्प्रेक्षा, श्लेष, शब्दसौंदर्य, आणि अनुप्रास इत्यादि उत्तम काव्याचे गुण विशेष असल्यामुळें हल्लीच्या व्युत्पन्न लोकांस फार आवडतात.

विश्वगुणादर्श हा ग्रंथ गद्यपद्यात्मक चंपूसारिखा आहे. यांत कृशानु आणि विश्वावसु असे दोन गंधर्व पात्रें कल्पून त्यांच्या संवादरूपानें रचिला आहे. ते गंधर्व विमानांत बसून आकाशमार्गानें पर्यटन करीत असतां जीं जीं तीर्थें, क्षेत्रें, पर्वत, नद्या, लोक, अरण्यें, त्यांच्या दृष्टीस पडलीं त्यांचे विश्वावसूनें गुण वर्णिले. त्यावर कृशानूनें दोष दिल्हे. असा या ग्रंथांतील वर्णनाचा प्रकार आहे. लक्ष्मीसहस्त्र यांमध्यें केवळ लक्ष्मीचें वर्णन आहे. त्यांत वेगवेगळीं

प्रकरणें बांधून त्यांस स्तबक असें नांव दिल्हें आहे. पहिला आरंभस्तबक, मग प्रादुर्भावस्तबक, कटाक्षस्तबक, मंगलस्तबक, यत्नस्तबक, सौंदर्यस्तबक, शृंगारस्तबक, ऐश्वर्यस्तबक, चित्रस्तबक, इत्यादि अठ्ठावीस स्तबक मिळून अनेक प्रकारच्या वृत्तांचे श्लोक १००० आहेत. हस्तिगिरिचंपूमध्यें लक्ष्मीनारायणाच्या विवाहाचें संविधान आहे. वेंकटाध्वरी हा मलयकावेरी नामक राजाच्या सभेमध्यें मुख्य पंडित होता. अणखी वेंकटाध्वरीविषयीं असी कथा आहे कीं, त्यानें विश्वगुणादर्श हा स्तुतिनिंदात्मक ग्रंथ केला त्यामुळें देवताक्षोभ होऊन त्याचे डोळे गेले. मग लक्ष्मीसहस्र ग्रंथ केल्यावर त्याला यथापूर्व दृष्टि आली.

## अय्यादीक्षित.

हा अपय्यादीक्षिताचा पुतण्या होय. त्याला सर्व शास्त्रांचें थोडें थोडें ज्ञान होतें. त्याला कविताशक्ति फार चांगली असे. तो आपल्या बुद्धीच्या बळानें मधुरा शहरचा राजा तिरूमल नाईक याच्या प्रधानगीरीच्या पदास चढला. त्यानें त्याचा राज्यकारभार अशा रीतीनें चालविला कीं, त्याचे राज्यांत सर्व प्रजा आनंदानें व सुखानें वागत असे.

त्याचा बाप मेल्यानंतर त्यानें **नीलकंठविजय** नामक एक चंपू केला. त्यांत नानातऱ्हेच्या देशांचें उत्कृष्ट वर्णन केलें आहे. त्याची भाषा नाटकाच्या पद्धतीनें लिहिली आहे.

## त्र्यंबकराजवैद्य.

श्रीमत्करवीर क्षेत्रीं वेदशास्त्रसंपन्न असा त्र्यंबकराज नामक कोणी धन्वंतरीतुल्य वैद्य राहत असे. तो वैद्यशास्त्रांत फार निष्णात असे. त्याच्या हातून शेंकडो लोकांचे असाध्य रोग दूर झाले. त्यानें अनेक प्रकारचे अनुभवसिद्ध असे नवे नवे औषधिकल्प योजून ठेविले होते. त्याला पुत्र संतती झाली नाहीं. त्यानें त्र्यंबकी या नांवाचा एक सोपा वैद्यक ग्रंथ रचिला, आणि

तो आपल्या बायकोला पढविला आणि अनेक रसायणें, मात्रा, इत्यादि सिद्ध करण्याच्या संपूर्ण कृति तिला शिकविल्या. असें सांगतात कीं, त्र्यंबकराज मरण पावल्यावर त्याच्या बायकोनें बहुत वर्षें उत्कृष्ट वैद्यक चालविलें आणि लोकांपासून कधीं पैका घेतला नाहीं. एकदां तिनें औषधाकारितां दोन मण तांब्याचा रस करविला होता. त्यांत कांहीं वनस्पतीचा अकस्मात् योग झाल्यानें तेवढ्याही तांब्याचें सुवर्ण झालें असें सांगतात.

याला होऊन सुमारें अडीचशें वर्षें झालीं असें अनुमान होतें.

## केळदीबसवप्पानाईक.

बेदनूर प्रांतांत केळदी नामक एक गांव आहे, तेथील हा राजा असे. तो शालिवाहन शकाच्या सोळाव्या शतकांत होता. **शिवतत्वरत्नाकर** ह्मणून एक ग्रंथ आहे, त्याचा हा कर्त्ता असें ह्मणतात. परंतु कोणी ह्मणतात कीं, तो त्याच्या दरबारच्या पंडितानीं केला. त्यांत नानातऱ्हेच्या कलांचें व विद्यांचें वर्णन आहे व तो रचण्यास त्याला मोठे श्रम पडले असावे असें दिसून येतें.

## ताताचार्य.

हा कवि जातीचा वैष्णव असे. कांची ही त्याची जन्मभूमी होय. त्याच्या गुणांची व बुद्धीची इतकी विलक्षण आख्या असे कीं, तो विष्णूच्या अंशापासून उत्पन्न झाला असें त्याला लोक मानीत असत असी दंतकथा आहे. त्याचा उदय शालिवाहन शकाच्या सोळाव्या शतकांत झाला. त्याच्या औदार्यानें पुष्कळ लोकांची लग्नें झालीं ह्मणून त्याला **कन्यादानी** हें अभिधान प्राप्त झालें. त्यानें एक **सात्विकब्रह्मविद्याविलास** ह्या नांवाचा ग्रंथ वेदांतशास्त्रावर केला. हा कवि चंद्रगिरी राजाचा कुळगुरु असे. तो नेहमी कांचीहून जाऊन त्याला भेटत असे.

तो बाहेर जाई तेव्हां त्याची प्राणप्रिया साध्वी स्त्री पतीची वाट पाहत दाराशीं उभी राहत असे. एके दिवसीं दुर्दैवानें अशी गोष्ट घडली कीं, ती आपल्या नेहमीच्या जागीं उभी असतां कोणी दुष्ट व निर्दय लोक तिच्या सभोंवती मिळाले, आणि लटकेंच सांगितलें कीं, तुझा पति कांहीं अपघातानें मारला गेला, तिनें हें वर्तमान ऐकतांच मूर्छित होऊन जमिनीवर आंग टाकिलें आणि मरण पावली. नेहमी प्रमाणें ताताचार्य परत आला, तेव्हां आपल्या स्त्रीची असी दशा पाहून त्यानेंही तत्क्षणींच अतिशय दुःखाच्या भरानें आपला प्राण सोडला. ह्या प्रमाणें त्या उभयतां स्त्रीपुरुषांस एकाच दिवसांत अकाल मृत्यु आला.

ताताचार्यासाठीं त्याचे सर्व स्वदेशीय लोक फार हळहळले, कारण त्याचें उत्कृष्ट अध्ययन असून तो पराकाष्ठेचा सभ्य व परोपकारी मनुष्य असे; आणि बहुधा लग्नकार्यासाठीं गरीब लोकांस पुष्कळ पैका देत असे.

## बहारीलाल.

हा रसिक कविवर्गामध्यें प्रख्यात कवि होऊन गेला. यानें वृजभाषेमध्यें **सतसय्या** या नांवाचा सातशें दोहोऱ्यांचा एक ग्रंथ केलाआहे. तो श्लेष, उपमा, उत्प्रेक्षा, अन्योक्ति इत्यादि उत्तम काव्यगुणांनीं रसभरित आहे हरदास लोक कीर्तनामध्यें प्रसंगानुसार या ग्रंथांतील दोहोरे ह्मणून अर्थ सांगत असतात.

त्यानें वर्णक्रम धरून दोहोरे रचिले आहेत. त्या प्रत्येक वर्णप्रकरणास व्रज्या असें नांव दिल्हें. हा ग्रंथ कोणती एक कथा धरून रचिला आहे असें नव्हे, पण राधाकृष्णाचें रूप वर्णन व त्यांचा विलास व संभाषण व त्यांचे अलंकारादि पदार्थ व वृंदावन, यमुना, व राधाकृष्णाचें क्रीडाकुंज इत्यादि पदार्थ व साधारण बोध, असे या ग्रंथांत विषय आहेत. या ग्रंथाची रचना शके १६०० मध्यें झाली.

## मोरेश्वरभट्ट.

पूर्वी अहमदनगरांत वैद्यकक्रियेमध्यें निपुण व जगप्रसिद्ध असा माणिकभट्ट ह्मणून एक वैद्य राहत असे. त्याच्या पुत्राचें नांव मोरेश्वरभट्ट वैद्य. हाही आपल्या बापाप्रमाणेंच मोठा नामांकित झाला. एके दिवशीं त्यास वाटलें कीं, आपण वैद्यक विषयावर एक लहान असून सर्व संग्रही व सुबोध असा ग्रंथ रचावा. नंतर त्यानें शके १६०३ दुर्मतिनाम संवत्सर या वर्षी **वैद्यामृत** नामक संस्कृत श्लोकबद्ध ग्रंथ केला. तो हल्लीं अर्थसहित छापला आहे.

## नागोजीभट्ट.

हा अर्वाचीन काळामध्यें व्याकरणशास्त्रावर प्रख्यात ग्रंथकार होऊन गेला. याचा जन्म शालिवाहन शकाच्या सोळाव्या शतकांत झाला. शेखर ग्रंथाच्या आरंभीं श्लोक आहेत त्यांत याचें थोडेसें इतिवृत्त आहे. ते श्लोक येणेंप्रमाणें:—

पातंजलेमहाभाष्येकृतभूरिपरिश्रमः॥ शिवभट्टसुतोधीमान्सतीदेव्यास्तुगर्भजः ॥ शृंगबेरपुराधीशाद्रामतोलब्धजीविकः ॥

यावरून नागोजीभट्ट हा शिवभट्टाचा पुत्र आणि याच्या आईचें नांव सती; यानें पातंजल महाभाष्यावर बहुत परिश्रम केला होता आणि शृंगेरीच्या रामराजाकडून याला आश्रय होता ही गोष्ट स्पष्ट आहे.

नागोजीभट्टाचें थोडेसें इतिवृत्त नाड्य नामक विद्यालयाच्या लेखांत आहे. तें येणेंप्रमाणें:—

यानें लहानपणीं वेदाभ्यास केला आणि मोठा झाल्यावर शांतिक, पौष्टिक वगैरे याज्ञिकीकरून आपला प्रपंच चालवूं लागला. पुढें मिळकत थोडी होऊं लागली तेवढ्यावर त्याचा निर्वाह होईना ह्मणून त्रासला आणि ती वृत्ति सोडून वाई ह्मणून कृष्णा-

तिरी एक पवित्र स्थान आहे तेथील विद्यालयांत प्रढावयास गेला. तेथें तो सर्व शास्त्रांचे थोडे थोडे उत्कृष्ट विषय शिकला, त्यांत विशेषें करून काव्यही शिकला. तो चाळीस वर्षांचा झाल्यावर काशीस गेला, तेथें त्यानें आपलें लक्ष मुख्यत्वें करून व्याकरणशास्त्रावर फार दिल्हें, आणि आपला देशबंधु जो भट्टोजीदीक्षित त्यानें व्याकरणशास्त्रावर जितके ग्रंथ केले होते तितके लक्षपूर्वक पढला आणि पन्नासावे वर्षी मंत्रशास्त्राचा अभ्यास केला, आणि त्याचवेळीं मार्कंडेय पुराणांतील सप्तशती जिला चंडीपाठ असें ह्मणतात, तीवर टीका केली, आणि पतंजलि सूत्रावर भाष्य केलें, त्याला **पतंजलिसूत्रवृत्ति** असें ह्मणतात. तो बासष्टाव्या वर्षी काशी क्षेत्रीं मरण पावला.

त्यानें व्याकरणशास्त्र आणि दुसरे विषय यांवर मोठाले ग्रंथ केले, ते हल्लीं उपलब्ध आहेत. इतके ग्रंथ करायाला कोणाचा तरी आश्रय असल्यावांचून अवकाश व स्वस्थता प्राप्त व्हावयाची नाहीं. त्यापेक्षां आह्मांला अणखी असें अनुमान होतें कीं, यानें अध्ययन संपविल्यावर शृंगेरीस रामराजाच्या आश्रयानें स्वस्थपणीं राहून आपलें आयुष्य ग्रंथ करण्यांत घालविलें असावें. पुढील यादींत त्याचे ग्रंथ व त्यांचीं नांवें पाहा.

**भाष्यप्रदीपोद्योत.**— ही व्याकरण, महाभाष्य आणि त्याची टीका जो कय्यट यां दोघांवर टीका आहे. या ग्रंथाची संख्या सुमारें तीस हजार आहे.

**लघुशब्देंदुशेखर.**— ही कौमुदीवर टीका आहे. याची संख्या अठरा हजार आहे. या ग्रंथाचा पूर्ण व्यासंग केल्यानें व्याकरणशास्त्रांत पांडित्य करण्याची शक्ति येते, आणि या ग्रंथाच्या परिशीलनाशिवाय अतिगूढ जे भाष्याभिप्राय ते समजत नाहींत, ह्मणून शेखराचें अध्ययन संपल्यावर भाष्य पढण्याचा शाळेमध्यें संप्रदाय आहे.

**प्रायश्चित्तेंदुशेखर.**— हा एक मोठा धर्मशास्त्रप्रकरणीं ग्रंथ आहे: यांत प्रायश्चित्ताच्या शास्त्रार्थाविषयीं इतर ग्रंथकारांनीं

जे उपयुक्त विषम टाकिले त्यांचा संग्रह केला आहे. याची संख्या २२०० आहे.

**बृहच्छब्देंदुशेखर.**— ही कौमुदीचीच टीका आहे. परंतु यामध्यें सिद्धांताचें निरूपण सविस्तर केलें आहे, आणि वादोपयोगी कोटीकक्षा यांत विशेष आहेत. याची संख्या ३०००० आहे.

**परिभाषेंदुशेखर.**— हा व्याकरणशास्त्रोपयोगी ज्या परिभाषा ह्मणजे लोकसिद्ध, न्यायसिद्ध, किंवा ज्ञापकसिद्ध जीं वाक्यें त्यांचा संग्रहरूप ग्रंथ आहे. याची संख्या १५०० आहे.

**लघुमंजूषा.**— हा व्याकरणशास्त्रांत अर्थविचाराविषयीं ग्रंथ आहे. यांत धातू, नामधातू, प्रकृति, प्रत्यय, विभक्ति, समास, कृदंत, तद्धित, इत्यादिकांचे अर्थ कसकसे होतात याविषयीं उत्कृष्ट विचार केले आहेत. जे प्रख्यात वैयाकरणी आहेत ते या ग्रंथाचे अध्ययन अवश्य करितात. या ग्रंथाची संख्या ८००० आहे.

**बृहन्मंजूषा**— यांत विषय पूर्वोक्तच परंतु पांडित्यामुळें विस्तार झाला आहे. याची संख्या २५००० आहे.

**लघुशब्दरत्न**— हा मनोरमा जी कौमुदीची टीका तिच्यावर व्याख्याग्रंथ आहे. या ग्रंथाच्या अध्ययनेंकरून व्याकरणशास्त्रांत व्युत्पत्ति चांगली होते. या ग्रंथाचे कित्येक भाग शिकल्यावर शेखराचें अध्ययन करितात असी व्याकरण शालेची चाल आहे. याची संख्या १२००० आहे.

**बृहच्छब्दरत्न**— ही मनोरमेचीच टीका परंतु ईत व्याख्यान विस्तार बहुत आहे. याची संख्या २५००० आहे.

**अशौचनिर्णय**— हा ग्रंथ सर्वप्रसिद्ध आहे. याची संख्या ८०० आहे. यांत सुतक आणि सुयेर याविषयीं शास्त्रार्थ सांगितले आहेत.

## परिभाषेंदुशेखरावरील टीका.

या ग्रंथावर जितका जितका बारीक विचार करावा तितका तितका यांतून विशेष अर्थ निघतो, असा प्रकारचा हा ग्रंथ

आहे. याजवर बहुत वैयाकरण पंडितांनी वेगळाल्या टीका केल्या आहेत. त्यांतील कल्पना व अर्थ आणि वादोपयोगी ज्या अनेक कोट्या यांची उपस्थिति ठेऊन व्याकरणशास्त्री वादविवाद करीत असतात. त्या टीका व टीकाकार येणेंप्रमाणें:—

**गदा**— बाळंभट पायगुंडे यानें केली. हा नागोजीभट्टाचा साक्षात् शिष्य. या टीकेंत वादविवादाच्या कोट्या नसून ग्रंथकाराचें वास्तव मतच दाखविलें आहे.

**मिश्री**— काशीमध्यें मिश्रजी या नांवें एक व्याकरणी पंडित होता त्यानें केली. यांत वादोपयोगी कोट्या पुष्कळच आहेत.

**त्र्यंबकी**— त्र्यंबकभट्ट हा एक वांईकर पंडित होता त्यानें केली. ईत वादोपयोगी कल्पना व अर्थचातुर्य पुष्कळ आहे.

**भैमी**— भीमाचार्य ह्मणून एक नाशिककर वैष्णव वैयाकरण पंडित होता त्यानें केली. ईतही परिभाषेंदुशेखराचा अर्थ सविस्तर दाखविला आहे.

**त्रिपथगा**—राघवेंद्राचार्य गजेंद्रगडकर जे अर्वाचीन मख्यात पंडित साताऱ्याच्या शाळेवर कांहीं वर्षे विद्यागुरु होते त्यांनीं केली. या टीकेंत अर्थचातुर्य आणि काल्पनिक कोट्या पुष्कळ असून ग्रंथलेख फार सुरस आहे.

**शांकरी**—शंकरपंडित या नांवें एक मोठा वादी वैयाकरण होता, त्यानें केली. या ग्रंथाचा लेखही मखर आणि गंभीर आहे, आणि कल्पनासृष्टिही या टीकेंत पुष्कळ आहे परंतु या टीकेची पूर्ण मत कोठे मिळत नाहीं.

तशाच **अस्थिमाला—मन्युदेवी—नक्षत्रमाला—पाठकी**—ह्मा टीका व त्या शिवाय गोविंदाचार्य अष्टपुत्रे, विष्णुशास्त्रीभट, इत्यादिकांनींही टीका केल्या आहेत.

## महेश्वरभट्ट.

हा नामांकित विद्वान् जातीचा शेणवी ब्राह्मण आणि गो-

मांतक प्रांतींचा राहणारा होता. याच्या बापाचें नांव रामचंद्र सुकथंकर. याचा जन्म इसवी सन्न १७१९ ह्मणजे शालिवाहन शकाच्या १६४० सांत झाला.

यानें आपलें अध्ययन स्वदेशांतच संपादिलें. न्यायशास्त्र व धर्मशास्त्र या दोन्हींमध्यें तो प्रमाणिक मताचा असून लोकांमध्यें त्याची मान्यता मोठी असे. अभिधानग्रंथ ह्मणजे कोश त्यांमध्यें याची माहिती फार होती. त्यानें **विश्वप्रकाश** या नांवाचा एक अनेकार्थ कोश रचिला, त्याची पूर्वोत्तर हिंदुस्थानांत प्रसिद्धि आहे. **द्विरूपकोश** हाही त्यानेंच केला. याशिवाय अणखीही त्याचे ग्रंथ असावे असा तर्क होतो. भगवद्गीतेवर त्यानें टीका केली आहे. अमरकोशावर टीका केली तिचें नांव **अमरविवेक.** ही टीका फार बाळबोध व पदार्थज्ञान होण्यास फार उपयोगी आहे. याच टीकेंत अणखी कांहीं कोशांतरींचे शब्द घालून वाढविली व सुमारें दाहा वर्षांमागें रघुनाथशास्त्रीबावा तळेकर ह्मानीं मेजर क्यांडी साहेब यांच्या द्वारें सरकारास कळवून पुणें पाठशाळेकडील छापखान्यांत छापविली. मुहूर्तमाला ह्मणून ज्योतिष प्रकरणी ग्रंथ आहे, त्यावर महेश्वरभट्टाची टीका आहे, तिचें नांव **सौंदर्यबोधिनी** व दुसरी एका ज्योतिषशास्त्रांतील सिद्धांत ग्रंथावर टीका केली आहे. ह्या टीका केल्या तेव्हां त्याचें वय सुमारें तीस बत्तीस वर्षांचें होतें असें सांगतात.

त्याच्या विद्वत्तेवरून त्यास जी प्रतिष्ठा मिळाली होती, ती त्यानें आपलें सर्व आयुष्य सदाचरण व ईश्वरसेवन ह्मांत घातल्यामुळें अधिक वाढली. हिंदुस्थानांत त्याची कीर्त्ति चहूंकडे पसरली.

तो धर्माविषयीं आपलें मत कधीं खोटें देत नसे, ह्यामुळें कोठे ग्रामण्य किंवा धर्मप्रकरणीं वाद पडला असतां लोक त्याजवळ येऊन खऱ्या खोट्याचा निवाडा करून घेत असत. हा मनुष्य मोठा परोपकारी असून साधा असे. यानें काव्य, अलंकार, न्याय, आणि धर्म ह्मा शास्त्रांमध्यें कित्येक विद्यार्थी पढवून तयार

केलें. याच्या वंशजानींही ह्याच मार्गाचें अवलंबन केलें. महेश्वरबावाचें कधीं नांव निघालें तर ते त्याची स्तुति करून नमस्कार करीत.

महेश्वरभट्टजी वैकुंठवासी झाले, तेव्हां त्यांच्या वयाला ९८ वर्षे होतीं. ही गोष्ट इसवी सन् १८१७ मध्यें घडली.

## राजाराममोहनराय.*

याचा बाप रामकंठराय हा मुर्शिदाबादच्या सरकारांत कांहीं अपमान झाल्यामुळें आपल्या वतनाचें गांव जें बरद्वान परगण्यांतील राधानगर एथें येऊन राहिला होता, तेव्हां सन् १७७४ रांत राममोहनराय हा त्याला पुत्र झाला.

त्याचे वडील मोठे कुलीन ब्राह्मण असून बहुत काळापासून राजाश्रयानें सरकारी कामें करीत असत. त्याच्या आजानें तर सुराजउद्दौला याच्या वेळीं मुर्शिदाबादच्या दरबारांत मोठ्या प्रतिष्ठेचीं व जोखमाचीं कामें वहिवाटलीं होतीं.

राममोहनरायानें विद्याभ्यासाविषयीं पुष्कळ कामें केलीं. त्यानें बंगाली भाषेचा अभ्यास करून त्या भाषेची सुधारणूक केली, आणि त्या भाषेंत तो मोठा वाकबगार झाला. त्याच्या लिहिण्याची शैली फार सुलभ असून अर्थ स्पष्ट दाखविण्याची रीति फार उत्कृष्ट होती. पाटना एथें जाऊन तो अरबी आणि फारसी या भाषा शिकला. त्यांत आरिष्टातिल् आणि युक्लीड या ग्रथांच्या अभ्यासानें त्याचें मन सुशिक्षित होऊन प्रफुल्लित झालें होतें. पुढें तो संस्कृत भाषा शिकायाला काशीस गेला. कांहीं दिवसांनीं त्याला पुराण ग्रंथ हे केवळ दंतकथेनें भरले आहेत व तीं असन्मार्ग दाखविणारीं आहेत असें वाटून त्यानें मूर्त्तिपूजा निषेधक एक ग्रंथ आपल्या वयाच्या सोळाव्या वर्षीं लिहिला. त्याची

---

*आलिकडे "राममोहनराय याचें चरित्र" नामक एक स्वतंत्र ग्रंथ छापला आहे, त्याजवरूनच हें त्याचें पुढील वर्णन आह्मी संक्षेपानें लिहिलें आहे.

स्वधर्मावर आस्था नव्हती त्यामुळें त्याचा बाप व दुसरे नातलग यांसी त्याचें पडत नसे. मग तो आपलें मत आपल्या देशबंधूंस प्रकट करावें या हेतूनें हिंदुस्थानांतील निरनिराळ्या ठिकाणीं जाऊन तेथें कोणकोणतीं धर्ममतें आहेत व त्यांचें लोकांत वजन कसें पडतें हें पाहत पाहत बहुत देश फिरला. त्यावेळीं त्याचें वय १६ वर्षांचें होतें. मग तो तिबेटांत गेला, तेथील लामा नामक देवाची भक्ति करण्याची रीत पाहून त्याला कंटाळा आला आणि त्या लोकांस त्यानें निषेधिलें. तो विसा वर्षांचा होई पर्यंत देशोदेशीं फिरला. नंतर त्याच्या बापानें त्याला घरीं आणिलें. तेथें राहून त्यानें वेद, पुराणें, आणि शास्त्रें यांवर अभ्यास चालविला आणि इंग्लिशही शिकूं लागला. दुसऱ्या भाषांत जसा तो वाकब होता त्याप्रमाणें इंग्लिशांत तो हुशार नव्हता. त्याचा इंग्लिश अभ्यास साहा वर्षें झाल्यावर ती भाषा त्याला शुद्ध रीतीनें लिहितां व बोलतां येऊं लागली. तरी उत्कृष्ट पंडितासारिखें ज्ञान नव्हतें तथापि तो बंगालींत लिहिणारा उत्कृष्ट, संस्कृतांत उत्तम मतीचा विद्वान; आरबी, फारसी, हिंदी, आणि उर्दु या भाषांचेंही चांगलें ज्ञान होतें व ग्रीक, लाटीन, हिब्रू, आणि फ्रेंच या भाषाही बऱ्याच अगवत होत्या; आणि याखेरीज इतिहास, पदार्थविज्ञान, गणित, मानसशास्त्र, नीतिशास्त्र, न्यायशास्त्र, ज्योतिषशास्त्र, अलंकार इत्यादि अनेक शास्त्रांचें ज्ञान त्याला होतें.

राममोहनराय याचा बाप सन् १८०३ मध्यें मरण पावला. जगमोहनराय हा एक त्याला धाकटा भाऊ होता. तोही मरण पावल्यावर प्रपंचनिर्वाह करणें त्याजवर पडलें. तेव्हां सरकारची कांहीं तरी चाकरी धरावी असें त्याच्या मनांत आलें परंतु लोक सुधारणुकीविषयीं जे प्रयत्न करायाचे त्याच्या मनांत होते त्यांत चाकरी धरल्यामुळें मोठा अडथळा होईल असें त्याला वाटलें. सरकारी कामदार साहेबलोक हे त्याला मानीत असत व त्याला मोठा अधिकार द्यावा असेंही त्यांच्या मनांत होतें तरी त्यावेळीं हल्लींप्रमाणें मोठाले अधिकार एतद्देशीय लोकांस देण्याचा रिवाज नव्हता, केवळ शिरस्तेदारीपर्यंत मात्र हिंदूंस जागा मिळत अ-

सत. ती जागा मिळावी ह्मणून प्रथम तो रंगपूर तालुक्याचा कलेक्टर मिस्तर जानूडिंगूबी याचे कचेरींत कारकुनाच्या ठिकाणीं राहिला. त्याच्या विद्वत्तेमुळें साहेबानें त्याचा फार मान राखिला आणि लवकरच त्याला सिरस्तेदारीची जागा दिल्ही. थोड्याच वर्षांनी त्यानें एक जमीन विकत घेतली. तिजवर वर्षाचे दहा हजार रुपये त्याला मिळूं लागले. मग त्यानें कलकत्यामध्यें एक बाग आणि बंगला घेतला. त्या नंतर सरकारी काम सोडून धर्म आणि तत्वज्ञान यांच्या अभ्यासांत काळ घालविण्याचा जो त्याचा मुख्य उद्देश होता तो त्याच्या चाळीस वर्षांच्या वयाच्या सुमारास सिद्धीस गेला. सुधारणुकीनें स्वदेशास पुनर्जन्म देण्याच्या महत्कार्याप्रीत्यर्थ आपलें आयुष्य खर्चावें हें त्याला बरें वाटलें.

राममोहन कलकत्यांत राहूं लागला तेव्हां बुद्धिमान् व शोधक मनाचे बहुत लोक त्याजवळ मिळूं लागले आणि स्वदेशीय लोकांची सुधारणा करावी हें काम त्यानें फार प्रयत्नानें चालविलें. हिंदूंतून मूर्त्तिपूजा काढून टाकावी आणि खऱ्या देवाकडे त्यांचें चित्त वळवावें या गोष्टीच्या सिध्यर्थ त्यानें आपली बुद्धि, काळ, आणि धन यांचा खर्च केला. याच्या सारिखी उत्कंठा बाळगून श्रम घेणारा असा सुधारणारा विरळाच झाला असेल. गृहस्थपणा, विद्वत्ता, लोकप्रीति, लीनता, उत्कंठा, आणि स्वतंत्रता इतक्या गुणांचें तो एक पात्र होता. असा हा योग्य आणि प्रतापी पुरुष होऊन गेला.

हिंदूस अनुचित धर्मबंधनांतून मुक्त करून त्यांच्या ठाईं न्याय, सत्य, परोपकार, ईश्वरभक्ति इत्यादिकांविषयीं उत्तम विचार त्यांच्या मनांत ठसवून देण्यास त्यानें सहस्रावधि उपाय केले. त्यानें नीतिवर व धर्मावर लहान लहान पुस्तकें स्वतां खर्च करून स्वदेशीय लोकांस फुकट वांटिलीं.

हिंदुधर्मांतलीं वेदांत प्रकरणें जीं अति कठीण तीं त्यानें बंगाली भाषेंत तर्जुमे करून छापिलीं. केनोपनिषदाचें भाषांतर केलें. कर्मकांड आणि ज्ञानकांड असे वेदाचे दोन भाग आहेत. प-

हिल्यांत पंचमहातत्त्वांची पूजा व यज्ञयागादि कर्मे सांगितलीं आहेत. दुसऱ्यांत केवळ ईश्वरगुणांचे स्तवन करून त्याचें अस्तित्व प्रतिपादिलें आहे. कर्मकांडांत सांगितलेलीं वेडवेडी कर्मे आणि पुराणांत सांगितलेल्या अनेक मूर्त्तिपूजा यांचा त्याग करून आपल्या स्वदेशीय लोकांचें खऱ्या देवाकडे चित्त वळावें यासाठीं यजुर्वेदांतील कठोपनिषद आणि अथर्व वेदांतील मुंडकोपनिषद यांचें इंग्लिश आणि बंगाली यामध्यें भाषांतर करून त्या पुस्तकांचा त्यानें लोकांत होईल तितका प्रसार केला.

उपनिषदें छापिल्यावरून आणि इंडिग्याझेट नामें वर्तमान पत्राच्या कर्त्यानें राममोहनराय यास **सुधारणारा** आणि **शोधून काढणारा** असीं विशेष नांवें दिल्हीं होतीं. त्यावरून मद्रासेंतील इंग्लिश शाळेचा मुख्य शिक्षक शंकरशास्त्री हा राममोहनराय यासीं धर्मसंबंधि वादविवाद करूं लागला. तसें कलकत्त्यांतील भट्टाचार्य नांवाचा एक विद्वान होता, त्यानें इंग्लिशांत आणि बंगालींत एक पुस्तक छापून त्यानें राममोहनरायाच्या मतावर बहुत हल्ले केले तथापि त्यानें त्यांचे यथायोग्य खंडन केलें. तसें राममोहनराय यानें ख्रिस्तीशास्त्राचा व्यवहारोपयोगी जो भाग त्यांतील कित्येक निवडक वेंचे घेऊन त्यांचे एक निराळेंच पुस्तक छापिलें आणि त्याला **सुखाचा व शांततेचामार्ग** असें नांव दिल्हें.

भगवंतानें जाति, पदवी, आणि संपत्ति यांचा भेद न राखितां मनुष्यमात्रांस सुख, दुःख, मरण, इत्यादिकांविषयीं एकसारिखें पात्र केलें आहे. त्यांत उंचनीच भाव नाहीं, आणि सर्व लोकानीं आपल्या वेड्या समजुती टाकून एकाच निराकार देवाला भजावें आणि आपलीं योग्यकर्त्तव्यें कोणतीं आहेत यांचा देशबंधूंस समज व्हावा ह्मणून त्यानें बहुत प्रयत्न केले.

कांहीं दिवसांनीं राममोहनरायाच्या श्रमाचें फळ दिसूं लागलें तें असें कीं, मूर्त्तिपूजा टाकणाऱ्या लोकांचा समुदाय दिवसानुदिवस वाढत चालला. विद्वान, प्रतिष्ठित, आणि संपत्तिवान् असा पुष्कळ लोकांनीं राममोहनरायाचीं मतें स्विकारिलीं. त्यापैकीं

बाबुप्रसन्नकुमार वगैरे कित्येक गृहस्थ हल्लीं कलकत्त्यांत हिंदुमध्यें प्रमुख आहेत. त्यांतला दुसरा एक द्वारकानाथ ठाकूर हा तर बहुत लोकांस ठाऊकच असेल. तो कांहीं वर्षांमागें विलायतेंस जाऊन मुंबईस परत आला, तेव्हां प्रयत शेट फ्रामजी कावसजी यांच्या बंगल्यात उतरला होता.

राममोहनराय यानें आपल्या लोकांची अज्ञान व देवभोळेपणा व वेड्या समजुती व अनुचित आणि क्रूर असे आचार यामुळें काय हानि झाली व होत आहे हें मनांत आणून त्या अवघ्यांचा विध्वंस करून टाकण्यास बहुत प्रयत्न केले, आणि त्याच्या मताला बहुत लोक मिळाले. राममोहनराय यानें कलकत्त्यांत एक सभा सन् १८२२ सांत स्थापिली, तिचें नांव **ब्रह्मसभा.** ही आजपर्यंत प्रति बुधवारीं कलकत्त्यांत भरत असते. तिजमध्यें वेद वाचून अर्थ सांगतात आणि धर्मसंबंधी व नीति संबंधी व्याख्यानें देतात.

या सभेच्या विरुद्ध दुसरी एक **धर्मसभा** या नांवाची लोकांनीं स्थापिली. या सभेचे परस्पर युद्ध चाललें परंतु ती सभा थोड्या वेळानें बुडाली. सन् १८२० यांत राममोहनरायानें स्त्रियानीं सती जाऊं नये या विषयावर संवादरूप दोन ग्रंथ एकामागून एक छापून लोकांस फुकट वांटिले. या उद्योगावरून सन् १८२५ या सालीं लार्ड विल्यम बेनूटिक हिंदुस्थानाचे गवरनर यानीं सती जाण्याची क्रूर चाल मोडून टाकली.

जनरल आसेंब्लीची शाळा ज्यानें स्थापिली तो गृहस्थ सन् १८२० सांत प्रथमच हिंदुस्थानांत आला, तेव्हां पासून राममोहनरायाचें व त्याचें सख्य पडलें आणि त्यानें त्या गृहस्थाला सुधारणुकीच्या कामांत बहुत मदत केली.

ज्यावेळीं कंपनीला नवी सनद द्यावी असें पार्लमेंट सभेचा विचार ठरला आणि दिल्लीच्या बादशाहास राजा ह्मणून मान देत असत तो बंद करावा असा विचार झाला, तेव्हां बादशाहानें अपील करण्या करितां राममोहन यास मुखत्यारीनें वकील करून सन् १८३९ सांत युरोपास पाठविलें.

राममोहनराय लिवरपुरास बहुत दिवस राहिला. तेथें डाक्तर स्पर्झहेम यासीं त्याचें मित्रत्व पडलें, तसें लंडन शहरास पोंहचल्यावर तेथील मख्यांत बेन्थम या नांवाच्या मख्यात तत्वज्ञान्यासीं त्याचा बहुत परिचय झाला. राममोहन लंडनास पोंहचला त्यावेळीं राष्ट्रांतील पहिल्या मतीचे आणि नामांकित मोठाले गृहस्थ त्याच्या भेटीस आले आणि सर्वांस त्याच्या गुणांवरून आश्चर्य वाटलें.

तो राज्यसंबंधी अधिकारानें बादशाही वकिलाच्या नात्यानें इंग्लंडास आला. हें राजाच्या मधानानीं मान्य केलें यावरून राममोहनरायाविषयीं त्यांच्या मनांत किती सत्कार असे हें दिसून येतें. लंडनशहरीं पहिल्या मतीच्या लोकांत त्याची गणना झाली. हिंदुस्थानांत कामकरून गेलेले जड्ज, कौन्सिलर, आणि गवरनर, यांसीही त्याचें मित्रत्व पडलें. बहुतेक अर्ल, मार्क्किस, आणि ड्यूक यानीं त्याची योग्यता जाणून त्यापासून हिंदुस्थानाचीं माहिती काढून घेण्यास इच्छिलें. लार्ड ब्रूहम आणि राममोहनराय हे दोघे अत्यंत विश्वासू आणि जिवलग मित्र झाले.

सर जी. सी. हाब्हौस त्यासमयीं बोर्डआफ् कंट्रोल सभेचा अध्यक्ष होता, त्यानें राममोहन यास राजाच्या दरबारीं नेलें. तेव्हां महाराजानीं त्याचें आगत स्वागत केलें आणि परदेशी वकिलांमध्यें त्यास जागा दिल्ही. त्याला सर्व मकारच्या सभेंत आमंत्रग येत असे.

राममोहनरायाची विद्वत्ता, अनुभव, आणि स्वदेशप्रीति यांवरून स्वदेशाच्या राजव्यवस्थेबावद तो योग्य होता याविषयीं संशय धरणें नको. त्याच्या ज्या साक्षी घेतल्या त्यांचा एक स्वतंत्र ग्रंथ बांधून छापिला आहे, त्याचें नांव **हिंदुस्थानचेंन्यायखातें आणिवसूलखातें व लोकांची स्थिती यांचें विवेचन.** त्यांत हिंदुस्थानच्या कंपनीची व्यर्थ निंदा नकरितां आपल्या देशबांधवांची स्थिति सुधारण्याविषयीं त्याची मनःपूर्वक उत्कंठाच दिसून येते आणि अगदीं चोपून गेलेली असी हिंदुस्थानची

कोट्यावधि रयत तिजविषयीं विशेषें करून फारच कळवळा प्रगट केलेला आहे.

व्हिग आणि कान्सर्वेटिव ह्मणून इंग्लंडांत राज्यप्रकरणीं दोन पक्ष होते, त्या दोहोंतीलही प्रमुखांत राममोहनरायाची वग असे, आणि ही वग त्यानें स्वार्थासाठीं खर्चिली नाहीं पण स्वदेशाच्या कल्याणार्थ खर्चिली तेणेंकरून त्याचें वजन विशेष पडलें.

राममोहनराय यानें जें कांहीं केलें त्याचा उद्देश हाच होता कीं, ज्या भूमातेच्या पोटीं आपण जन्म घेतला आहे तिच्या बाळकांचें ह्मणजे देशबांधवांचें कल्याण करावें. कोणी ग्रंथकारानें त्याजविषयीं असें ह्मटलें आहे कीं, कांटेऱ्यां झाडांत जसा चांफा तद्वत् राममोहनराय आपल्या स्वदेशीय लोकांत आहे. तो इंग्लंडांत असतां तेथें त्याचें वजन किती होतें तें या गोष्टीवरून ध्यानांत येतें कीं, हौस आफ् लार्डस या मानकऱ्यांच्या सभेमध्यें हिंदुस्थानच्या राज्यव्यवस्थे विषयीं एक खर्डा तयार होत होता त्यास कान्सर्वेटिव पक्षाचे लोक प्रतिकूळ होते, ते राममोहनरायाचें पत्र जातांच उगे राहिले.

सन् १८३२ सांत राममोहनराय फ्रान्स देशास गेला, तेथें त्याचा बहुत सत्कार झाला. राजानें त्याला आपल्या बरोबर दोन वेळा भोजनास बोलाविलें आणि तेथील दरबारी लोक आणि विद्वान् यानींही त्याचा बहुमान केला. तेथून तो सन् १८३३ यासालाच्या आरंभींच इंग्लंडास परत आला आणि थोड्याच वेळानीं ब्रिस्टल ह्मणून एक प्रख्यात व्यापारी बंदर आहे त्या ठिकाणीं गेला, तेथें त्याला ताप येऊन सप्तेंबर महिन्याच्या २७ व्या तारिखेस देवाज्ञा झाली.

राममोहनराय हा युरोपास निघून जाण्यापूर्वीं आपल्या मित्रांसीं बोलला होता कीं, मी मरण पावल्यानंतर ख्रिस्ती, हिंदु, मुसलमान हे सर्व मला आपआपल्या मताचा ह्मणूं लागतील. हें त्याचें बोलणें खरें झालें कीं, त्याचें मरण ऐकून त्या त्या धर्माचे लोक तो आपल्या मताचा होता असें मानूं लागले. कारण कीं,

त्यानें आपल्या प्रीतिस्वभावेंकरून सर्व धर्मांच्या चांगल्या भागावर आवड दाखविली होती.

राममोहनराय हा खरोखर मोठ्या योग्यतेचा पुरुष होता. त्याची बुद्धि तीव्र व सर्व विषयांत चालणारी व विशाळ होती. विद्वत्ता, खोलविचार, आणि चांगल्या विषयांची अभिरुचि आणि अंतःकरणाचें औदार्य, उपकारिकपणा, प्रीति, इत्यादि अनेक गुणांवरून तो मनुष्य जातींतील निवडक पुरुषांमध्यें गणावा असा होता.

इतरांनीं आपणासीं ज्या रीतीनें वागावें ह्मणून आपण इच्छितों त्याच रीतीनें आपण त्यांसीं वागावें हें ख्रिस्ती शास्त्रांतलें उत्कृष्ट वचन तो वारंवार घोकीत असे. उद्योगशीलता, धैर्य, परोपकार बुद्धि, स्वदेशकल्याणाची उत्कंठा, हे सर्व गुण एकत्रकरून देशबांधवांचा देवभोळेपणा व दुराग्रह यांपासून त्यांचीं मनें मुक्त करण्यास त्यानें बहुत श्रम केले. भरतखंडाच्या मतांत आणि स्थितींत आतां जी सुधारणा होत चालली आहे तिचें बीजारोपण राममोहनरायाच्या वेळीं झालें.

राममोहनरायानें आपलें मत प्रकट करण्यासाठीं कलकत्यामध्यें सन् १८३० सांत एक सभा स्थापिली, तिचें नांव **ब्रह्मसभा.** ही ख्रिस्ती लोकांप्रमाणें नेमल्यावेळीं नेमानें भरत असे. तींत उपनिषदें वाचून अर्थ सांगावा आणि प्रार्थना व गायन यांहींकरून ईश्वराची आराधना करावी असा या सभेचा क्रम चालला. ही सभा राममोहनराय युरोपास गेल्यावर बंद पडली होती. पुढें सन् १८३९ या सालीं रामचंद्र पंडित व त्याचे मित्र व शिष्य यांनीं त्या सभेच्यास्थानीं **तत्वबोधिनी** या नांवें एक सभा स्थापिली. त्या सभेनें आपले उद्देश रिपोर्टांत लिहिले. ते येणेंप्रमाणें.

१ ब्राह्मधर्म शास्त्रांतून बाहेर काढिला पाहिजे. २ ईश्वराचें चातुर्य व शक्ति यांचा बोध त्याच्या कृत्यावरून झाला पाहिजे. ३ धर्माचरणास मार्गदर्शक नेम बांधिले पाहिजेत. ४ मूळशास्त्र काय आहे व कर्म, आचरण, भगवद्भजन व त्याचे नेम सांगितले

पाहिजेत. ५ आणि स्मृति, पुराणें, तंत्रें, व षट्दर्शनें, व त्यांत सांगितलेल्या अर्वाचीन धर्मांची उत्पत्ति कसी झाली याचा शोध करणें. ६ या उपयुक्त गोष्टींचा शोध करणें तर, चार वेद, सर्व स्मृति, पुराणें, तंत्र आणि षट्दर्शनें, हीं जमा केलीं पाहिजेत आणि तीं वाचून व तपासून त्यांचें भाषांतर करून तीं समजावण्यास पंडित व विद्यार्थी नेमिले पाहिजेत. ७ उत्पन्नकर्त्याच्या कृत्यांवरून त्याचें चातुर्य, शक्ति, व चांगुलपणा, हीं स्पष्टपणें ध्यानांत यावीं ह्मणून मानसशास्त्र, ज्योतिषशास्त्र, सिद्धपदार्थविज्ञान, रसायनशास्त्र, इत्यादिकांवर स्वभाषेंत ग्रंथ झाले पाहिजेत आणि मुलांनां त्यांचा अभ्यास करावा याकरितां सर्व देशभर शाळा झाल्या पाहिजेत. ८ ईश्वरास मान्य असीं कर्मे करून त्याची कृपा संपादन करण्यास मनुष्यांस प्रवृत्त करण्याचा जो उद्देश तो सिद्धीस नेण्याकरितां नीतिमार्गप्रदर्शक एक ग्रंथ तयार केला पाहिजे.

या सभेनें एक प्रेस ह्मणजे छापण्याचें यंत्र संग्रही ठेविलें. त्यावर **तत्वबोधिनी** या नांवाची एक पत्रिका काढिली. हें पत्र निघूं लागून आठ वर्षें झाल्यावर शास्त्राचा बराच फैलावा झाला. त्या पत्रिकेंत ऋग्वेदाचे कित्येक भाग, उपनिषदें, व त्यांचीं भाष्यें व इंग्लिश भाषांतरें, सभेंत झालेलीं संभाषणें, वेदांवर कित्येक पुराणांवर लिहिलेले निबंध, हिंदुमतांची गणना, महाभारताचें बंगालींत भाषांतर, व सभेचे रिपोर्ट व सभेच्या विरुद्ध मतांचें खंडण,इत्यादि मजकूर छापिला गेला. ही पत्रिका कलकत्ता, कृष्णनगर, सुखसागर, बरद्वान, हुगळी, धाका, आणि काशी, इत्यादि ठिकाणीं पसरली आहे.

या सभेनें एक पुस्तकालय स्थापिलें आहे, त्यांत लहान मोठीं १३०० पुस्तकें आहेत. ही सभा सन् १८४३ पासून १८४७ पर्यंत उत्कर्षास पावली. कलकत्त्यांतील मोठमोठाले गृहस्थ इचे सभासद आहेत. कैलासवासी राजाराममोहनराय याचा पुत्र बाबुराम-प्रसादराय हा हल्लीं या सभेचा चिटणीस आहे.

# प्राकृतकवि.

## चांगदेव.

प्राकृत कवींच्या वर्णन प्रसंगी मुकुंदराज यांची आद्यस्थानी योजना करणें योग्य होतें तरी त्यापेक्षांही चांगदेव हे फार पुरातन काळचे असून त्यानीं प्राकृत कविताग्रंथ रचिले, ते जरी प्रस्तुत उपलब्ध नाहींत तरी त्यांविषयीं ग्रंथलेख आहेत व एकनाथानींही त्यांची प्राकृत कविवर्गांत गणना केली आहे कीं,

वंदूंप्राकृतकवेश्वरू ॥ निवृत्तिप्रमुखज्ञानेश्वरू॥
नामदेवचांगदेववटेश्वरू॥ ज्यांचेंभाग्यथोरगु
रुकृपा॥जयांचेग्रंथपाहतां॥ज्ञानहोयप्राकृतां॥
तयांचेचरणींमाथा ॥ निजात्मतानिजभावें ॥

यास्तव चांगदेवापासून आरंभकरून मुकुंदराजादिक प्राकृत कवींचें इतिवृत्त लिहितों.

एके काळीं स्वर्गलोकांमध्यें इंद्रानें मरुद्गणाला कारणपरत्वें शाप दिल्हा कीं, भूलोकांत पतन पाऊन नरदेहांत कांहीं दिवस राहवें. नंतर मरुद्गणानें शापविमोचन मागितल्यावर इंद्रानें सांगितलें कीं, ज्ञानेश्वरप्रभृति देवांश जन्मतील तेव्हां काळवशें करून त्यांचा समागम होऊन पूर्ववत् या लोकांत येणें घडेल. मग तो मरुद्गण मनुष्याचा दिव्य देह धारण करून तापीपयोष्णीच्या संगमीं एका रमणीय कर्दळीच्या वनामध्यें उतरला, आणि पयोष्णीचें स्नान केलें आणि तेव्हांपासूनच चर्मचक्षु मिटून तेथें तपश्चर्या करीत बसला. नंतर कांहीं वेळानें तो लोकांच्या दृष्टीस पडला. त्याचें स्वरूप फारच उत्कृष्ट होतें ह्मणून लोकानीं त्याचें नांव चांगदेव असें ठेवलें. पुढें चांगावटेश्वर असेंही त्याचें नांव पडलें. त्याचें कारण असें कीं, अरुणगांवकर ब्राह्मण दोघे

बंधु त्याचे भजनीं लागले होते. तेव्हां चांगदेव नेत्र उघडीत नसत. त्यांस एकदां तापी संगमी त्यानीं स्नानास नेलें असतां तेथें पार्थिव पूजेसाठीं त्यांला माती आणायास सांगितली. तेव्हां त्यानीं वाळूमध्यें वाटी पालथी घालून कपटानें ह्मटलें महाराज, एथें आयतेंच शिवलिंग आहे, पूजा करावी. मग असें झालें कीं, चांगदेव त्यावर अभिषेक व गंध पुष्पादि अर्पून प्रार्थना करीत असतां तेथील वाळू वाटीसुद्धां एकरस होऊन संपूर्ण पाषाणमय शिवलिंग झालें. ह्या चमत्काराची प्रख्याति सर्वत्र झाल्यानंतर चांगावटेश्वर हें नांव चांगदेवाचें व त्यादेवाचेंही पडलें. पुढें तेथें देशोदेशीचे लोक व राजेरजवाडे येऊन मोठी यात्रा भरूं लागली आणि चांगदेवाच्या सिद्धाईच्या योगेंकरून हजारो लोकांचे रोग गेले व नवस पुरत असत, असा प्रकार चालला.

चांगदेवानीं सर्व विद्या आणि कळा यांचा पूर्ण अभ्यास केला, तेणेंकरून त्यांची कीर्त्ति फार विस्तारली. त्यानीं योगबळें करून आपलें आयुष्य चौदाशें वर्षें वाढविलें होतें. प्रत्येक शतक भरत आल्यावर समाधिस्थ राहून आपला मृत्यु टाळीत असत. नंतर आपलें ठिकाण वर्षभर पालटीत. याप्रमाणें त्यानीं चौदाशतकांत चौदा ठिकाणें पालटिलीं. याविषयीं असें लिहिलें आहे कीः—

**शतवर्षेंभरतांजाणा ॥ पुढतीकरितीकाळवंचना ॥ पुनरपिआणूनिदेहभाना ॥ कौतुकेंनानादावी ॥ येकसहस्त्रचारशतेंवरी ॥ चांगदेववांचलेयाचपरी ॥ कीर्त्तिप्रगटलीदेशांतरीं ॥ उपमाडुसरीअसेना ॥ चौदाशेंवर्षांतसाचार॥चौदावर्षेंक्रमिलींबाहेर ॥ तितुकींहीस्थळेंभिन्नाकार ॥ पृथ्वीवरअसतीं ॥**

शेवटल्या शतकांत जेव्हां ज्ञानेश्वर रेड्याकडून वेद बोलविल्यावरून प्रख्यात झाले, त्याविषयीं ऐकून चांगदेव आपल्या चौदाशे शिष्यां सहवर्तमान वाघावर बसून आणि हातांत सापाचा चाबूक घेऊन मोठ्या समारंभानें त्याच्या भेटीस गेले. पुढें उभ-

यतांचा संवाद होऊन ज्ञानदेवापासून त्यानीं उपदेश घेतला.

चांगदेव हे जेव्हां तापीतीरीं होते, तेव्हां मुधोपंत यानांवाचा एक कुळकर्णी नगराजवळ नारायणडोह ह्मणून एक क्षेत्र आहे तेथें राहत असे. तो कुटुंबासुद्धां चांगदेवाची सेवा करीत राहिला. त्याच्या पोटीं पुत्रसंतान नव्हतें. त्यानीं तुह्मासारिखा पुत्र व्हावा असें चांगदेवाजवळ मागितलें असतां त्यानीं वरदान दिल्हें होतें. तें सिद्धीस नेण्याकरितां चांगदेव तोरणमाळास आले आणि गोरक्षाची भेट घेऊन त्याशीं संकेत ठरविला कीं, आपण मुधोपंताचे घरीं भिक्षेस जाऊन संप्रदायाप्रमाणें मुरली वाजवावी ह्मणजे त्या शब्दासरसें त्याचे घरीं मी बाळरूपें जन्म घेईन आणि याचप्रमाणें मुधोपंताशीही संकेत ठरविला होता. ही विनंती गोरक्षानें मान्य केल्यावर चांगदेव अंतर्धान पावले. मग गोरक्षनाथ मुधोपंताचे घरीं आले आणि अंगणांत उभे राहून रीतीप्रमाणें मुरली वाजविली, तों तत्क्षणीं चांगदेव दिव्य बाळकरूप होऊन अवतरले. त्या उभयतांशीं चांगदेवाचा संकेत होताच. त्याप्रमाणें तें दिव्य बाळक पावून आनंदानें त्याचें संपूर्ण जन्मसोहळे केले आणि चांगावटेश्वर याच्या कृपें करून तो पुत्र प्राप्त झाला ह्मणून बाराव्या दिवसीं त्याचें नांव चांगावटेश्वर असेंच ठेविलें. तो पुढें मोठा होऊन सर्व विद्या आणि कला यांत निपुण झाला आणि धनवान् लोकांनीं त्याला बहुत द्रव्य दिल्हें आणि तो लग्न करून गृहस्थाश्रम करूं लागला. पुढें त्याची आईबापे वयातीत होऊन निवर्तल्यावर काशी व गयावर्जन इत्यादि करून पुनः आपल्या गांवीं आला. मग असें झालें कीं, ज्ञानदेवानीं पूर्वींच्या जन्मांत त्याला सांगितलें होतें कीं, पंढरीस जाऊन कांहीं दिवस श्रीविठ्ठलाची सेवा कर ह्मणजे तूं मुक्त होशील या गोष्टीची त्याला आठवण झाली. मग कुटुंबासुद्धां चांगदेव पंढरीस आले, तेथें विठ्ठलाचा प्रसाद व आज्ञा पावून पुनः कुटुंबासुद्धा नारायणडोहास येऊन राहिले.

त्या नंतर गोदातीरीं जाऊन राहावें असी इच्छा होऊन तेथून कुटुंबासुद्धां निघाले. तेव्हां गांवकरी लोकांस फार वाईट वा

टलें ह्मणून त्यांनीं स्मरणार्थ आपल्या हातानें एक धोंडा स्थापिला, तो अद्याप नारायणडोहास आहे. तो लोकांच्या नवसास पावतो.

अस्तु. मग गोदातीरीं पुण्यस्तंभ नामें क्षेत्रांत येऊन राहिले. तेथें त्यांनीं केशव नामें शालग्रामाची मूर्त्ति स्थापिली, त्यावरून त्यांचें नांव चांगाकेशवदास असें पडलें. तेथें त्यानें सिद्धाईच्या बळानें लोकोपकार पुष्कळ केले. त्यावेळेस रामराजा राज्य करीत होता. तो कीर्त्ति ऐकून भेटीस आला आणि त्यांजवळ एका उपवनांत बारा वर्षें राहिला होता. तेथें चांगा केशवदास यांनीं जगविख्यात चमत्कार केले.

सकेशविधवास्त्रीला उपहासरूपें विठ्ठलसवाशीण ह्मणण्याचो रूढी पडलेली आहे, त्याचें कारण चांगाकेशवदास यांच्या वेळेस घडलें. कोणी एक यजुर्वेदी ब्राह्मण पोटीं संतति न होतां निवर्त्तला. त्याची स्त्री पतीच्या अस्थी घेऊन काशीयात्रेला जात होती. तेव्हां ती पुण्यस्तंभास मुक्कानाला आली असतां चांगाकेशवदास यांचें दारींत दर्शन झालें, तिला “ पुत्रवती हो ” असा आशीर्वाद दिल्हा. जें वचन खरें करण्यासाठीं तिच्या नवऱ्याच्या अस्थीवर संजीवनी मंत्रानें उदक शिंपून तें शेंकडो लोकांदेखतां तिला पियाला देतांच तिचें रूप पालटून गर्भ लक्षणें तिच्यामध्यें दिसून आलीं. पुढें तिला पुत्र झाला. हा चमत्कार जरी मंत्रसिद्धीनें वास्तविक घडला होता तथापि चांगाकेशवदास यानीं बहुत दृष्टांत दाखवून त्याला स्वज्ञातींत घेवविलें व पंढरपुरांत जाऊन त्याची मुंजी व लग्न सर्व यथास्थित केलें. त्या मुलाच्या मुंजीच्या वेळेस भांड्यामध्यें थोडका भात उरला असतां केशवदास यानां सांगितलें कीं, भांडे लवंडून भात वाढा ह्मणजे सहस्रावधि लोकांस पुरेल. तसें केल्यावर भात पुरला. अद्याप त्या वंशातले पंढरीस यात्रेला येतात तेव्हां भात लवंडून वाढीत असतात आणि त्यांचें उपनांव भातलवंडे असें पडलें आहे.

बेदरच्या दुष्ट यवन राजानें पंढरी क्षेत्राला बहुत उपद्रव दिल्हा आणि विठ्ठल मंदिराच्या ठिकाणीं मशीद बांधिली. त्यांवेळीं चांगाकेशवदास यानीं राजाची भेट घेऊन त्याची आवडती बा-

यको मरण पावली होती तिला संजीवनी विद्येनें जिवंत केलें. नंतर पंढरीस येऊन मशीद मोडून व देवाची स्थापना करून मोठा उत्साह केला.

याप्रमाणें चांगदेवाचा दुसरा अवतार जो चांगाकेशवदास याच्या गोष्टी भक्तलीलामृत ग्रंथांत सविस्तर वर्णिल्या आहेत.

## मुकुंदराज.

या प्रख्यात साधुविषयीं कांहीं गोष्टी ऐकण्यांत येतात, त्यांवरून तो जातीचा देशस्थ ब्राह्मण, जोगाईचें अंबें ह्मणून एक गांव देशांत आहे तेथील राहणारा बाराशें वर्षां पूर्वीं जयपाळ ह्मणून लाहोर प्रांतीं एक राजा होता त्याच्या कारकीर्दींत प्रख्यातीस आला.

त्याविषयीं असें सांगतात कीं, जयपाळ राजानें पुष्कळ साधु बंदींत टाकले होते. तो त्यांस ह्मणे कीं, तुह्मी ब्रह्माविषयीं गोष्टी सांगतां तें ब्रह्म मला दाखवा. तें दाखवितां न आल्यामुळें तो त्यांची छळणा करीत असे. एकदां मुकुंदराज त्या राजाकडे गेला, तेव्हां राजानें त्या प्रमाणेंच त्याची छळणा केली असतां मुकुंदराजानें त्याला एक क्षणभर ब्रह्मस्वरूप दाखवून त्याची खातरी केली. मग राजानें मुकुंदराजास आपला गुरु करून बंदींत टाकलेले साधूंस मुक्त केले.

त्यानें वेदांतविषयावर **विवेकसिंधु** ह्या नांवाचा महाराष्ट्र भाषेंत उत्कृष्ट ओवीबद्ध मोठा ग्रंथ केला आहे. संस्कृतांत आद्यकवि वाल्मीकि आणि अनुष्टुप् छंदांत रचलेलें रामायण हें आदिकाव्य, तसें मराठी भाषेंत आद्यकवि मुकुंदराज आणि ओवीछंदोबद्ध आद्यग्रंथ विवेकसिंधु होय ह्मणून प्राकृतभाषाभिज्ञ यांचें मत आहे. तसाच **परमामृत** नांवें एक लहानसा ग्रंथ यानेंच केला, त्यांत वेदांताचीं मूळतत्वें सांगितलीं आहेत.

मुकुंदराजाचें चित्त ब्रह्मविचारांत निमग्न होतें, असें त्याच्या ग्रंथांवरून उघड दिसतें. त्याची वाणी शुद्ध आणि प्रौढ, थोडक्या

शब्दांत अर्थ पुष्कळ, ओव्या गोड आणि सरळ, विषय जरी कविताशक्तीस अनुकूळ नाहीं तरी ती स्थळविशेषीं स्पष्ट दिसून येते.

याचें जन्म मरण कोठें झालें याचा पक्का निश्चय करण्यास चांगला आधार सांपडत नाहीं.

## कबीर.

याच्या जन्माविषयीं दोन तीन मतें आहेत. कोणी ह्मणतात कीं, प्रख्यात जे रामानंद साधू त्यांचा हा एक शिष्य होता. तो एके दिवशीं आपली कन्या जी बालविधवा होती तिला बरोबर घेऊन रामानंदाच्या दर्शनास गेला. त्या कन्येनें रामानंदाला नमस्कार केला असतां त्यांनीं तिची अवस्था न जाणून पुत्रवती हो असा आशीर्वाद दिल्हा. परंतु साधूचें वचन मिथ्या व्हावयाचें नाहीं; त्यांच्या आशीर्वाद मात्रेंकरून तिला गर्भ राहिला. पुढें ती लोकलज्जेस्तव नव महिन्यापर्यंत एकांतीं राहून पुत्र प्रसवली. तें बाळक तिनें अरण्यांत टाकून दिल्हें. दैवयोगेंकरून त्या वाटेनें यवन जातीचीं दोघें स्त्रीपुरुषें नीमा आणि नूरी हीं लग्नकार्याला जात असतां त्यांनीं तें बाळक उचलून घेतलें आणि त्याचा सांभाळ केला.

कोणाच्या मतें खानदेश प्रांतीं काशी या नांवाचा एक गांव आहे, त्यालाच कबीरपंथी लोक आमची मुख्य काशी असें मानितात. त्या गावांजवळ लहरतलाव या नांवाचें एक सरोवर आहे त्यामध्यें नीमा ही पाणी प्यायाला गेली असतां एका कमळाच्या पानांत नुक्तेंच जन्मलेलेंसें बाळक तिच्या समोर तरंगत आलें तें तिनें उचलून पदरांत घेतलें.

कोणी याचा जन्म नामदेवाप्रमाणें शिंपीपासून वर्णिला आहे. एक यवन जातीचा मोमीन ज्याला मालमोमीन ह्मणत असत त्याला भीमेमध्यें प्रारब्धयोगेंकरून एक शिंपा सांपडला, त्यामधून रामनामाचा ध्वनी निघतांना ऐकून विस्मयानें उकल-

तां तो नुकताच जन्मलेलेसा बाळक सांपडला. पुढें बाराव्या दिवसीं त्याचें नांव कबीर असें ठेविलें. कारण कीं, तो यवनांच्या वंशात असून जन्मताच विष्णुभक्त होता. या तिन्ही मतांतून एक गोष्ट सिद्ध आहे कीं, त्याचें जन्म दुसऱ्या ठिकाणीं होऊन त्याचें पाळनपोषण यवनांच्या घरीं झालें.

याचा जन्म कबीरपंथी यांच्या ह्मणण्याप्रमाणें संवत १२०५ ह्मणजे शके १०७० रांत होऊन तो संवत १५०५ ह्मणजे शके १३७० रा पर्यंत होता असें आहे.* यावरून याला ३०० वर्षें होतात, परंतु कोणी तो इतके दिवस जगला हें मानित नाहींत. तथापि तो दीर्घायुषी होता असें बहुत प्रमाणांवरून सिद्ध होतें. कारण ज्ञानदेवाच्या वेळेस तो होता याविषयीं भक्तिलीलामृत ग्रंथ प्रमाण आहे. दुसरें असें कीं, शिकंदरबादशाहाच्या वेळीं नानक आणि कबीर यांचा आपआपल्या मताविषयीं झगडा होत असे. ही गोष्टही इतिहासावरून खचीत आहे. व शिकंदर बादशाहानें स्वतां त्यानें परधर्म स्विकारल्यावरून त्याच्या बहुत छळणुका केल्या त्या त्याजवर लागू नझाल्यामुळें पुढें त्याच्या वाटेस कोणी जाऊंनये असी मोकळिक दिल्ही.

कबीर हा लहानपणांतच कृष्णभजनामध्यें नेहमी तल्लीन असे, तरी आईबापानीं प्रीतीस्तव त्याचें लग्नही केलें. त्याला एक मुलगा झाला त्याचें नांव कमाल. तोही बापाप्रमाणें कृष्णभक्त होता. त्यानें आपल्या सातव्या वर्षींच बापाची आज्ञा घेऊन बहुत तीर्थयात्रा केल्या. ते बापलेंक दोघेही संतपणानें प्रख्यात झाले. त्यांचे घरीं साधुसंतमंडळी पुष्कळ येत असे तितक्यांची हे भोजन वगैरे तर्तूद ठेवित असत. असें सांगतात कीं, एकदां यानीं दोनशें संतमंडळी घरीं आली. असतां त्यांचे भोजनाची सोई नहोई ह्मणून एका वाण्याच्या घरांतून गुप्तरूपें शिधासामग्री काढून घेतली आणि वाण्याला जागें करून पळाले. तों

---

* सम्वत् बार हसये औ पाचमों ज्ञानी कियौ विचार। काशी मांहि प्रगट भयो शब्द कहौ टकसार॥ सम्वत् पंदर हसये औ पांचमों मगर कियौ गवन। अगह्नन् सुदि येकादसी मिले पवन सो पवन॥

कमाल त्याचा मुलगा एका भोंकातून जातांना अडकला असतां वाण्यानें त्याचे पाय खेंचून धरले. पुढें कबीरानें त्याचें डोकें छेदून घरीं जाऊन मुकाट्यानें संतास जेऊं घातलें. पुढें असा चमत्कार घडला कीं, त्या अपराधाबद्दल चोराचें धड सुळीं द्यावें असें राजानें ठरविल्यावरून तें सुळावर चढविलें असतां वाटेवरून संतांची मोठी टोळी जात होती त्यावेळेस सुळावर चढविलेल्या कबीरपुत्राच्या धडानें हात जोडून सुळावरून त्यांस दंडवत केला. ही मोठी चमत्कारिक गोष्ट घडल्यावर संतमंडळींतील कोणी एका सिद्धपुरुषानें त्याचें शिर धडाशीं जोडून तो मुलगा पूर्ववत् करून दिल्हा.

असें सांगतात कीं, काशीतील लोकांनीं गांवगांवच्या संतमंडळीस खोटीं पत्रें पाठऊन याचे घरीं बहुत पाहुणे आणविले. त्यावेळेस असा चमत्कार घडला कीं, जितकी संतमंडळी आली होती तितक्या कबीररूपानें श्रीकृष्णमूर्त्ति प्रगट होऊन सर्वांची यथास्थित तर्तूद ठेविली. हा चमत्कार भक्तिविजय ग्रंथांत वर्णिला आहे.

आणखी असें सांगतात कीं, कबीराला लहानपणांत साक्षात् श्रीकृष्णानीं विणायास लागून एक उत्कृष्ट सणंग विणून दिल्हें होतें. पुढें असा चमत्कार घडला कीं, त्याची किंमत बाजारांत कोणाच्यानें देववेना ह्मणून तसेंच त्यानें घरीं आणलें. पुढें त्याचे दोन तुकडे करून भिकाऱ्यांस वांटून दिल्हे. त्या अपराधावरून आई मारूं लागली असतां कृष्णानीं प्रकट होऊन त्याला सोडविलें.

कबीर हा मोठा वादी असे. तो यवनांच्या ग्रंथांला तर अगदींच मानित नसे आणि हिंदुधर्मांतील पंडितांचीं आग्रही मतें निर्भीडपणें मोडून त्यांची खातरी करीत असे. त्यावरून कबीर पंथ हें एकमत त्यानें स्थापित केलेलें बहुत मानतात. त्याच्या अंगीं स्वतां सिद्धाई असतां त्यानें मोठे कष्ट सोसून रामानंदस्वामीला गुरु केलें.

एकदां कबीर आणि रोहिदास यांचा आपआपल्या उपासना देवतेच्या उत्कृष्टतेवरून मोठा झगडा लागला असतां गणपति सूर्य, शिव, आणि विष्णू यानीं येऊन मिटविला.

कबीर मरण पावला त्यावेळीं हा आमचा आहे ह्मणून हिंदु आणि मुसलमान यांचा मोठा कलह लागला असतां असें झालें कीं, आच्छादित केलेलें कबीराचें शव उभें राहून सांगितलें कीं, आंत काय आहे हें पाहा! तों त्यामध्यें तुळसी आणि सबजा याशिवाय दुसरें कांहीं नव्हतें. त्यांत मुसलमानानीं सबजाचा भाग घेऊन गोरकपूर शहराजवळ मगर ह्मणून गांव आहे तेथें नेऊन पुरला आणि त्यावर एक मोठी मशीद बांधली आणि तुळशीचा भाग काशीतला राजा वीरसिंह यानें काशींत नेऊन जाळला. याप्रमाणें व्यवस्था केली.

कबीराची वाणी फार रसिक, मनोरंजक, आणि प्रसादिक असी होती. त्यानें हिंदुस्थानी भाषेंत चौपई, समई, दोहोरे, अशा कवितारूपानें पुष्कळ ग्रंथ केले आहेत. त्यांत श्रीकृष्णाच्या कथा, भक्ति, ज्ञान, वैराग्य, आणि उपदेश, यांचें निरूपण आहे. कित्येक ग्रंथ त्यानें केवळ आपल्या संप्रदायाविषयीं रचिले आहेत. कबीराचें जन्मगांव ज्याला कबीरकाशी असें ह्मणतात त्याच्या जवळ चौडा ह्मणून एक गांव आहे तेथें कबीरानें केलेल्या बहुतेक ग्रंथांचा संग्रह आहे. कित्येक संतलोक व हरदास त्याचीं कवनें वारंवार ह्मणत असतात. त्यांच्या शेवटचें पालोपद कहेकबीर, किंवा कहतकबीर सुनभैसाधो, दासकबीर अशा प्रकारचें असतें. **शुकनिधान** हा ग्रंथ कबीरानें आपला अंतरंग जो शिष्य धर्मदास त्याला सांगितला. तो रामानंदाचा शिष्य असे. हा ग्रंथ कबीराचा प्रथम शिष्य जो श्रुतगोपाळ त्यानें रचिला होता. **गोरखनाथकीकथा, रामानंदकीकथा, आनंदसार, शब्दावली, मंगल, वसंत, होली, रेख्ता, झुलना, कहार, हिंदोला, बारमास, छंचर, चौतीस, अलिफनामा,** इत्यादि ग्रंथ कबीराच्या शिष्यानीं केले आहेत. भागोदास हा कबीराचा अंतरंग शिष्य व फार उत्कृष्ट कवि होता, त्यानें **बिज्जक** या नांवाचा ग्रंथ रचिला आहे.

# रोहिदास.

हा जातीचा चर्मक असून परम वैष्णव होतो. याचा बहुतेक काळ हरिभजनांत जात असे. तो मोठा परोपकारी होता. याला जे संत भेटतील त्यांस हा एक एक चर्मी जोडा देत असे. तो चर्मक वृत्तीनेंच आपला निर्वाह करी. त्यानें आपल्या ध्यानाकरितां विष्णूची चतुर्भुज मूर्त्ति चर्माचीच निर्मिली होती.

एकदां कबीर त्याच्याकडे आला, त्यानें ती मूर्त्ति पाहून रोहिदासाला धिःकारलें. त्यावरून रोहिदासानें संपूर्ण सृष्टि चर्मवेष्टित आहे असें बोलून त्याला छकविलें असतां पुढें त्यांचा उपासनेच्या देवतेवरून कलह लागला. तो शेवटीं देवानें उभयतांस दृष्टांत दाखवून मिटविला.

एकदां कोणी बैरागी काशीयात्रेस जात होता त्याच्या जवळ रोहिदासानें एक पैसा देऊन सांगितलें कीं, भागीरथीला नमस्कार सांगून तिला हें माझें तुळसीपत्र अर्पावें. पुढें त्या बैराग्याला त्या गोष्टीची आठवण होऊन रोहिदासानें दिल्हेला पैसा पाण्यांत टाकूं लागला तों भागीरथीनें आपला हात वर काढून मुठींत घेतला आणि आपलें हातांतलें रत्नजडित कांकण बैराग्याला देऊन रोहिदासाला हा प्रसाद द्यावा ह्मणून सांगितलें. तें कांकण रोहिदासानें देव्हाऱ्यांत पुजून ठेविलें होतें.

एके दिवशीं त्याच्या घरीं संतमंडळी आली असतां शिधासाहित्य आणण्याला जवळ कांहींच नव्हतें ह्मणून तें कांकण एका सोनाराला नेऊन दिल्हें आणि शिधा आणिला. पुढें सोनारानें तें कांकण राजाला नेऊन दाखविलें. तें उत्कृष्ट कांकण पाहून राजानें त्याच्या जोडपीचें कांकण आणून द्यावें ह्मणून रोहिदासाला तगादा लावला, त्यावेळेस त्यानें आपली हकिगत सांगितली कीं, हा भागीरथीनें मला प्रसाद पाठविला. याच्या जोडपीचें कांकण माझ्या जवळ नाहीं. शेवटीं राजानें त्याला पुष्कळ धमकावण्या दाखविल्या असतां रोहिदासानें सांगितलें कीं,

आपण माझ्या घरीं यावें. मी आपल्या काठवडींत भागीरथीची प्रार्थना करीतों, तिनें कृपाकरून दुसरें कांकण दिल्हें तर घ्या. त्याप्रमाणें राजा घरीं आला असतां रोहिदासानें प्रार्थना केली तों काठवडींतून कांकणमंडित हात बाहेर निघाला आणि राजा दुसरें कांकण लावून पाहत आहे तों तें तिच्या हातावर पडून भागीरथी जवळच्या लोकां देखतां गुप्त झाली.

कोणे एके दिवसीं याच्या घरीं एक ब्राह्मण पंचांग सांगावयाकरितां आला तों रोहिदास शालग्रामाची पूजा करीत बसला होता. तेव्हां ब्राह्मणानें त्याची पूजासामग्री पाहिली ती सांबळी, कमळ, संपुष्ट वगैरे सर्व चर्मांचीं होतीं. तेव्हां ब्राह्मणानें पवित्र देवाला अशुद्ध चर्मांत ठेवणें व चर्मकारानें शालग्रामाची पूजा करणें हें केवळ अशुद्ध आहे; शालग्राम पूजन यज्ञोपवीत धाऱ्यानींच करावें. असें त्याचें भाषण झाल्यावर रोहिदासानें सर्वव्यापक ईश्वर आहे अशा विषयावर मोठें संभाषण केलें. आणि यज्ञोपवीत धारणकरणाऱ्यानें याची पूजा करावी असें ह्मणतां तर हें यज्ञोपवीत पाहा ह्मणून शस्त्र घेतलें व आपली त्वचा कापून आंत यज्ञोपवीत दाखविलें. तें ब्राह्मणानें पाहिलें. मग याच्या ज्ञानाविषयीं ब्राह्मणाची खातरी झाली आणि आपण रोहिदासाचा छळ व्यर्थ केला असें बोलून घरीं गेला. अशा चमत्कारांवरून रोहिदासाची कीर्त्ति लोकांत फार वाढली.

कबीराप्रमाणें यानें अनेक प्रकारच्या कविता ह्मणजे साक्या, पदें, दोहोरे वगैरे केलेल्या अढळतात.

## निवृत्तिनाथ.

हे गैनीनाथाचे शिष्य. ज्ञानदेव, सोपानदेव, आणि मुक्ताबाई हीं त्यांचीं धाकटीं भावंडें होत. ज्ञानदेवास योग संप्रदायाचा उपदेश निवृत्तिनाथानीं केला. ज्ञानेश्वरी ग्रंथामध्यें जागोजागीं ज्ञानदेवानी निवृत्तिनाथांचें गुरुत्वेंकरून नमन केलें आहे व जेथें भगवद्गीतेचा विशेष अर्थ गाजून सांगायाचा अशा ठिका-

णीं **ज्ञानदेव निवृत्तीचाह्मणे**, अशा भाषणें करून आपण निवृत्तिनाथाचे अंकित आहों असें जागोजागीं ह्मटलें आहे. असी ह्मण आहे कीं, "यथादेवे तथागुरौ" ह्मणजे जसी देवाच्याठायीं भक्ति तसीच गुरूच्याठाई करावी. त्याचप्रमाणें ज्ञानदेवाची निवृत्तिनाथावर दृढ भक्ति होती. गीतेची टीका ज्ञानेश्वरी हा ग्रंथ पूर्ण झाल्यावर ज्ञानेश्वरानी निवृत्तिनाथास दाखविला आणि त्यावरून निवृत्तिनाथ आपल्याला शाबासकी देतील असी ज्ञानदेवाला आशा होती. परंतु सांगतातकीं, त्यावेळीं निवृत्तिनाथ ह्मणाले तूं भगवंताचा अभिप्राय प्रगट केलास ही गोष्ट नीटच आहे परंतु तुझ्यामध्यें जें अनुभविक ज्ञान आहे तें प्रगट करून दाखीव? पाहा, मुकुंदराज केवढा मान्य कीं, त्यानें स्वज्ञानें करून स्वतंत्र ग्रंथ रचिला. मग ज्ञानेश्वरानी अमृतानुभव या नांवाचा ग्रंथ केला.

निवृत्तिनाथानी एखादा ग्रंथ केला असावा असा तर्क होतो, परंतु तो कोठें उपलब्ध नाहीं. कोणी ह्मणतात कीं, **वृत्तिबोध** या नांवाचा ग्रंथ निवृत्तिनाथानी केला आहे.

निवृत्तिनाथ यांचे समाधिस्थान त्र्यंबकेश्वरास त्र्यंबकपर्वताच्या पायथ्यावर आहे. पूर्वी त्यांच्या समाधिस्थानीं लहानसें देऊळ होतें आणि क्षेत्रांतील लोक फारसे दर्शनालाही जात नव्हते. परंतु शके १७५४ यासाली पंढरीमध्यें संतमंडळीला श्रीविठ्ठलाचा दृष्टांत झाल्यावरून तेथें पौषवद्य एकादशीस संतमंडळीची मोठी यात्रा भरूं लागली व पहिलें देऊळ कायम राखून भोंवताला मोठा सभामंडप दुमजली बांधला आहे. हें काम शिंदे बायजाबाई हिनें केलें. हल्लीं निवृत्तिनाथाचे दर्शनास येणारे वारकरी पुष्कळ आहेत.

## ज्ञानदेव.

हे ज्ञातीचे ब्राह्मण यांच्या जन्मप्रभृति बहुत गोष्टी संतलीलामृत, भक्तलीलामृत, व भक्तिविजय यां तीन ग्रंथांत वर्णिल्या आहेत. ते पुण्याजवळ इंद्रायणीच्या कांठीं अळंदी जि-

ला पूर्वी अलकापूरी असें ह्मणत त्या गांवांत राहत असत. निवृत्तिनाथ, ज्ञानेश्वर, सोपानदेव, आणि मुक्ताबाई हीं चार भावंडें शके बाराशाच्या अखेरीस जन्मलीं. तीं लहानपणापासून अंतरनिष्ठ असून विठोबाचीं पूर्णभक्त होतीं. यांचीं मातापितरें आपेगांवकर विठोबा आणि मातोश्री रखमाबाई. विठोबा हे बहुत वर्षें गृहस्थाश्रमांत राहून पुढें आपलें अवशेष आयुष्य परमार्थांत घालवावें ह्मणून काशीक्षेत्रीं जाऊन सन्यासधर्मानें राहिले. पुढें कोणी सिद्ध पुरुषानें येऊन त्यांस सांगितलें तुला कन्या पुत्रांची संतती होणे आहे तर माझ्या आज्ञेवरून कांहीं दिवस त्वां गृहस्थाश्रम करावा. त्यानंतर विठोबानीं स्वदेशीं येऊन गृहस्थाश्रम स्वीकारला. यावरून ज्ञानदेव हे सन्याशाचे पुत्र असा लोकप्रवाद झाला. त्यावरून पुढें लोकांनीं ज्ञात्यभिमानास्तव त्यांचा छळ केला असतां ज्ञानदेवानीं आपल्या शुद्धतेविषयीं चमत्कारिक प्रचीती दाखविल्या ह्मणजे रेड्याकडून वेद बोलविले, तसे चांगदेव चौदाशे शिष्यांसहवर्तमान त्यांच्या भेटीस आले असतां भिंत चालविली, भविष्यें सांगितलीं, इत्यादि. त्या कथा ग्रंथांत व दंतकथेंत प्रसिद्ध आहेत.

**अमृतानुभव** व गीतेवर **भावार्थदीपिका** या नांवाची टीका जिला **ज्ञानेश्वरी** असें ह्मणतात, हे दोन ग्रंथ त्यांचे लोकविख्यात आहेत. अमृतानुभव या ग्रंथांत शुद्ध अध्यात्म विद्येचीं प्रतिपादक साहा प्रकरणें आहेत. त्यांची संख्या १००० ओव्या आहे आणि ज्ञानेश्वरी ग्रंथाच्या ओव्या दाहा हजार आहेत. हे दोन्ही ग्रंथ सांप्रदायिकापासून ऐकिल्याशिवाय समजण्यास दुर्बोध आहेत. तथापि शब्दसौंदर्य आणि दृष्टांत यावरून वेदांताच्या सिद्धांत गोष्टी अज्ञजनास सुलभ रीतीनें समजतील अशा सुरस रीतीनें सांगितल्या आहेत.

ज्ञानेश्वरी हा ग्रंथ शके १२१२ रांत केला असा त्याच ग्रंथांत शेवटीं लेख आहे. ह्यावरून ज्ञानेश्वरास सुमारें पावणें साहाशें वर्षें झालीं असें सिद्ध होतें. त्यानन्तर अमृतानुभव केला परंतु त्याविषयींच्या शकाचा मात्र उल्लेख नाहीं.

असें सांगतात कीं, ज्ञानेश्वरी हा ग्रंथ करते वेळीं ज्ञानेश्वर एका खांबावर कोळशानें लिहित असत. पुढें सच्चिदानंदबावांनीं त्याचा उतारा केला असा ज्ञानेश्वरींत लेख आहे. ज्ञानेश्वरी हा ग्रंथ लोकांच्या उपेक्षाबुद्धीमुळें पहिल्यानें प्रसिद्धीस आला नाहीं आणि प्रतीही फारशा नव्हत्या व ज्या होत्या त्याही पाठभेदानें अशुद्ध झाल्या होत्या. पुढें एकनाथस्वामीस ज्ञानदेवाचा दृष्टांत झाल्यावरून त्यांनी शके १५०० शांत तें पुस्तक शुद्ध केलें. अमृतानुभव ग्रंथावर कल्याणस्वामी ह्मणून एक रामदास सांप्रदायिक विद्वान् होता त्यानें बारा हजार ओव्यांचीं असी सुंदर टीका केली आहे.

अणखीही ज्ञानदेवांनीं एक लहान ग्रंथ केला आहे. त्याची समास या नांवें साहा प्रकरणें आहेत. त्यांत जगदुत्पत्तिक्रम; जीवात्मभेदाचें कारण; परा, पश्यंती, मध्यमा, वैखरी, या चतुर्विध वाणीची उत्पत्ति; त्रिविध अहंकाराचें निरूपण आणि त्यापासून इंद्रियांची आणि विषयांची उत्पत्ति; देहांतील षट्चक्रें आणि त्यांच्या देवता आणि वर्ण यांचे निरूपण; पंचमहाभूतांचे स्वभाव आणि क्रिया व देहांतील दाहा वायूचीं नांवें व त्यांचीं कार्यें व स्थानें; इडा, पिंगला, आणि सुषुम्णा, यांचें निरूपण व कांहीं योग संप्रदाय, इत्यादि बोधोपयोगी सांप्रदायिक विषय निरूपिले आहेत. याखेरीज ज्ञानेश्वराचीं उपदेशपर व स्तुतिपर कित्येक अभंग व पदें अढळतात.

या चाऱ्हीं भावंडाच्या सर्व गोष्टी वीस वर्षांच्या आंत आहेत. निवृत्तिनाथ हे श्रीत्र्यंबकेश्वरीं शके १२२० जेष्ठ वद्य १२ समाधिस्थ झाले. सोपानदेव सासवडास १२१९ वैशाख. मुक्ताबाई ही योगबलानें गुप्त झाली असें ऐकण्यांत आहे. आणि ज्ञानेश्वर हे आपल्या वयाच्या सोळाव्या वर्षीं शके १२१८ कार्त्तिक वद्य १० मीस अळंदीस समाधिस्थ झाले.

ज्ञानेश्वराची यात्रा कार्त्तिक वद्य एकादशीस प्रतिवर्षीं अळंदीस भरत असते.

## सोपानदेव.

हे ज्ञानदेवाचे कनिष्ठ बंधु. यांचें समाधिस्थळ संवत्सर गांवास ह्मणजे सासवडास कऱ्हेच्यातीरीं आहे. सोपानदेव यांजला समाधि देण्याकरितां साक्षात् पंढरीनाथ भक्तमंडळीसुद्धां तेथें आले होते आणि स्वतां सर्व तयारी करून त्यांस समाधि दिल्ही, आणि शेवटीं संवत्सर गांवाचें माहात्म्य सांगितलें कीं, हें ब्रह्मदेवाचें ठिकाण, एथें पूर्वी त्यानें तप केलें, एथें सिद्धसाधक राहतात. हाटकेश्वर एथील देव आणि हा इंद्रकील पर्वत साक्षात् नारायण आहे. याचे सन्निध कौंडण्यपूर आहे, तेथें योगिनीमाता वास करते. त्याच्या पूर्वेस आनंदभैरव देव आणि उत्तरेस मळनाथ क्षेत्रपाळ आहे आणि सोपानदेवाच्या भक्तिस्तव विठोबानें सांगितलें कीं, आह्मी प्रति वर्षी जेष्ठांतील निर्जळ एकादशीस एथें येत जाऊं, त्या प्रमाणें तेथें दरवर्षी यात्रा भरत असते.

सोपान हा ब्रह्मदेवाचा अवतार असें सांगितलें आहे. यानें अभंग, पदें वगैरे पुष्कळ कविता केल्या आहेत.

---

## मुक्ताबाई.

ही आपल्या तिघा बंधूप्रमाणेंच ज्ञानी व योगी होती. ज्यावेळीं सोपानदेवाला संवत्सर गांवामध्यें देवानी समाधि दिल्ही त्यावेळीं उद्धवनामें एका भक्तानें श्रीविठ्ठलास विचारिलें कीं, मुक्ताबाईची गति कशी कराल ? त्यावेळीं देव बोलले कीं, गैनीनाथाचा वरदहस्त तिच्या मस्तकीं आहे. तेणेंकरून तिच्या देहाला कांहीं आघात नाहीं. ती महाकल्पाच्या शेवट कालापर्यंत राहील असें सांगितलें.

तिनें केलेलीं अभंग, पदें, ओंव्या, वगैरे कवितारूपें पुष्कळ प्रकरणें आहेत. त्यापैकीं ताटीचे अभंग हे तिचे लोकांत फार प्रसिद्ध आहेत.

---

## हेमाडपंत.

हा कवि जातीचा यजुर्वेदी ब्राह्मण शके १२०० शांत होता. खानदेशांतील देवगड ज्याला आतां दौलताबाद असें ह्मणतात तेथील हा राहणारा असे. याला कोणी हेमाद्रि असेंही ह्मणतात. तो कांहीं वेळपर्यंत पैठणचे रामराजाच्या पदरीं दिवाणगिरीवर होता. पुढें कांहीं कारणानें तो लंकेस गेला असें सांगतात. त्यानें लंकेहून एक प्रकारचें दुर्मिळ धान्य आणिलें, त्या योगानें राजाला जो दृष्टिपात झाला होता तो दूर झाला. ह्यावरून तें धान्य मोहोऱ्या असावेंसें वाटतें. बाजरी हेंही धान्य त्यानें तेथून आणिलें असें ह्मणतात.

त्यानें महाराष्ट्र देशांत मोडी लीपि, जिला राक्षसलीपि ह्मणतात ती उत्पन्न केली. तो शिल्पशास्त्रामध्यें निपुण होता असें वाटतें. कारण कीं, त्याच्या हातचीं कित्येक ठिकाणीं बांधलेलीं देवळें, घरें वगैरे यांचीं बांधणी प्रस्तुतच्या चालीपेक्षां अगदीं भिन्न आहे. ह्मणजे घर फार निच व पुढील दरवाजा फारच लहान. याप्रमाणें देवळाचीं बांधणीही विलक्षण आहे.

हेमाडपंताला गणपतीची भक्ति फार असे. त्यानें लहानपणीं पोरस्वभावानें मृत्तिकेचीं पक्वानें करून देवास अर्पण केलीं. देवानें त्याची निष्ठा पाहून तीं भक्षण केलीं ह्मणून सांगतात. **लेखनपद्धति** ह्मणून जो ग्रंथ हल्लीं प्रसिद्ध आहे, तोही यानेंच केला. व त्यानें दुसरीं पुष्कळ लोकोपकारक कृत्यें केलीं. मोगलाईंत पैठणाजवळ नांदेड ह्मणून गांव आहे, तेथें तो मृत्यु पावला. ते वेळेस त्याच्या वयाला साठावें वर्ष होतें.

## नामदेव

हा संतमंडळींतील प्रख्यात भक्त पंढरपूरचा राहणारा जातीचा शिंपी शके १२०० शांत पंढरपुराजवळ गोकुळपूर ह्मणून एक खेडें आहे तेथें जन्मला. त्याच्या बापाचें नांव दामशेटी आणि आईचें नांव गुणाबाई. हीं उभयतां सद्भाविक असून

विठोबाची भक्ति करीत असत. कोणी नामदेवाची जन्मगोष्ट फार चमत्कारिक सांगतात. त्याचा बाप दामशेटी याला भीमानदीमध्यें एक विलक्षण शिंपा वाहत आला, त्यांत तो बाळक सांपडला. पुढें त्याचें नांव नामा असें ठेवलें व त्याचें पाळणपोषण केलें. तो आठ वर्षांपासूनच ईश्वरभक्ति व योगाभ्यास यांत निमग्न झाला. तो अन्नाहार सोडून केवळ दूध प्राशन करीत असे. तो लहानपणीं ज्ञानी असा प्रगट झाला नव्हता त्यावेळींच असें सांगतात कीं, त्याच्या बाळपणाच्या विनवणीमुळें देवानें ह्मणजे विठोबाच्या मूर्त्तीनें त्याच्या हातून भोजन केलें. तो उद्धवाचा अवतार होता असें कित्येक लोक मानितात.

याला प्रथम भगवद्भक्ति होण्याचें कारण असें सांगतात कीं, एकदां हा आपल्या गुणाबाई आईसाठीं बाभूळसाल आणायाला गेला तेव्हां बाभळींवर घाव घातल्यामुळें चीक आला तो त्याला रक्तावाणी वाटून हिंसादोषामुळें मनांत खिन्न झाला. पुढें त्यानें ईश्वराकडे बुद्धि लाविली आणि त्याला ईश्वरी साक्षात्कार झाला.

एकदां हा आपल्या चारशें संतमंडळींसुद्धां उत्सवाकरितां जात असतां शहाजीनें त्याला फौज पाठवून धरून आणिलें आणि त्याचा छळ केला तेव्हां त्यानें राजासमक्ष गाईला जिवंत करून उठविलें. हा चमत्कार लोकांनीं पाहिला. असें सांगतात कीं, नामदेवाला पुत्र झाला त्यावेळेस देव आहेर घेऊन आले होते.

एकदां याच्या घरांत खर्चायाची फार तंगी पडल्यामुळें देवानें गोणीभर मोहरा आणून याच्या घरांत लोटून दिल्हा.

एकदां ज्ञानदेव आणि नामदेव हे मारवाड देशांत गेले असतां वाटेंत तृषाक्रांत झाले, तेव्हां नामदेवानें देवाची प्रार्थना करून विहिरीचें पाणी बाहेर वाहतें केलें. तो कुवा अद्यापि त्या देशांत तसाच वाहत आहे. तेथें वार्षिक यात्रा भरत असती.

एकदां नामदेव शिवरात्रीच्या दिवसीं आंवढ्याजगन्नाथास गेले असतां तेथील ब्राह्मणांनीं गलबला होतो ह्मणून त्यांला देवाच्या पाठीमागल्या भागीं भजन करायास सांगितलें. तेथें तो

संतमंडळीसुद्धां भजनाचा घोष करीत असतां असा चमत्कार झाला कीं, अकस्मात् आकाशांतून विद्युल्लतेप्रमाणें देदीप्यमान लाखोनलाख पताका तेथें येऊन उभ्या राहिल्या. तो चमत्कार आबालवृद्धांनीं पाहिला. त्या समारंभांत नामदेवानें आपल्याकडे तोंड करावें ह्मणून देवाची प्रार्थना केली असतां तें देऊळ देवासुद्धां पश्चिमाभिमुख झालें. तें अद्यापपर्यंत तसेंच आहे. अशा त्याच्या बहुत चमत्कारिक गोष्टी भक्तलीलामृत व भक्तिविजय वगैरे ग्रंथांत व लोकांच्या दंतकथेंत पुष्कळ आहेत.

असें सांगतात कीं, नामदेवास शतकोटी अभंग करण्याविषयीं दृष्टांत झाला, त्यावरून नामदेव व त्याच्या कुटुंबांतील माणसें यांणीं मिळून ९९ कोटी व ९६ लक्ष अभंग केले. चार लक्ष उरले ते पुढें तुकारामानें पूर्ण केले.

“ नामाह्मणे ” या खुणेचे लक्षोपलक्ष अभंग त्यानें महाराष्ट्र भाषेंत केले. त्यापैकीं बहुत प्रकरणें प्रसिद्ध आहेत. **हरिपाठ** ह्मणून एक भक्तिपर मनोरंजक ग्रंथ आहे तो नामदेवानें केला असें ह्मणतात. अभंग कवितेचा मुख्य कवि तोच झाला. तो ज्ञानदेवाचा समकालीन होता, ह्यावरून त्यास सुमारें पावणेसाहाशें वर्षें झालीं असें सिद्ध होतें.

नामदेव पन्नास वर्षांचा वयाचा होऊन सुमारें शके १२५० यासालीं मरण पावला.

## जनाबाई.

जनाबाईच्या गोष्टी भक्तिविजयांत लिहिल्या आहेत. ही आपल्या कुवांरपणांत आईबापांबरोबर पंढरीस आली त्यावर माघारी गेलीच नाहीं. तेव्हांपासून तिनें आपलें आयुष्य विठोबाच्या भजनांत घालविलें. नामदेवाच्या घरीं तिचा प्रतिपाळ झाला. तेथें गोणाई आणि राजाई यांच्या समागमानें तिची ईश्वरभक्ति फार वाढली आणि ती प्रेमभक्तीमुळें संतमंडळींत प्रख्यात झाली. तिच्या भाविकपणामुळें ईश्वरीसाक्षात्काराच्या गोष्टी

बहुत वेळां लोकांच्या प्रचीतीस आल्या. असें सांगतात कीं, एके वेळीं जनाबाई रुसली असतां देवानें येऊन तिला विनविलें आणि तिचे ताटांत भोजन केलें. असें कित्येकदां जनाबाईला गाणीं ह्मणायाला सांगून आपण दळीत बसले. ही गोष्ट कोणी एकानें आपल्या कवनांत घातली आहे कीं,

**जनाबाईचेंदळणदळितांकसीनाहींभागली.**

नामदेवाच्या घरीं बहुत संतमंडळी मिळत असतां देवळांतील विठ्ठलमूर्त्ति वेळोवेळ तेथें येत असे.

एके समयीं असें घडलें कीं, जनाबाईची वाकळ ह्मणजे गोदडी देव घेऊन गेले आणि पदक आणि एकावळी नामदेवाच्या घरीं राहिली. पुढें या गोष्टीची चौकशी झाल्यावर त्या अपराधाबद्दल जनाबाईला सुळावर चढवीत असतां सुळाचें पाणी झालें. हा चमत्कार पुष्कळ लोकां देखत घडला.

एकदां कवित्व लिहिण्याविषयीं देवानें एकेकाकडे नेमणूक करून दिल्ही असतां जनाबाईचें कवित्व लिहिण्याचें काम आपण घेतलें आणि कीर्त्तनप्रसंगांत जनाबाईचें कवित्व गातील तेथें आपण सन्निध होत जाऊं असें वरदान दिल्हें, इत्यादि जनाबाईच्या गोष्टी लोकांच्या दंत कथेवरूनही बहुत ऐकण्यांत येतात.

हिची अभंग कविता पुष्कळ ऐकण्यांत येती.

## गोराकुंभार.

हा सांवतवाडी एथें जन्मला. नामदेवाच्या वेळीं विठोबाच्या भक्तमंडळीमध्यें याची मान्यता फार होती. हा रात्रंदिवस विठोबाचें भजन करण्यांत निमग्न असे. याची गोष्ट असी सांगतात कीं, हा एकदां मडक्यांकरितां पायानें माती तुडवीत असतां विठोबाचें भजन मोठ्या कडाख्यानें करीत होता, त्यावेळीं त्याचें एक लहान बाळक जवळ खेळत होतें तें त्या मातीमध्यें पायांखालीं सांपडून मरण पावलें. तरी हा भजनांत तल्लीन असतां याच्या ध्यानांत कांहींच आलें नाहीं. ती गोष्ट त्याच्या बायकोनें पाहून लेंकराकरितां तिनें मोठा आक्रोश मांडिला आ-

णि मोठ्यानें ओरडून आपल्या नवऱ्याला तळतळाट देऊं लागली. तेव्हां पुष्कळ लोक जवळ मिळाले असतां गोऱ्याकुंभारानें त्याच्या देखतां फार करुणास्वरेंकरून विठोबाचा धांवा केला असतां तें लेंकरूं जिवंत होऊन खेळूं लागलें. त्यांवरून सर्व पाहणाऱ्यांस मोठें आश्चर्य झालें. त्यावेळेस गोऱ्याकुंभारानें केलेले अभंग संतलोक ह्मणत असतात. त्याशिवायही त्याचे भक्तिपर अभंग पुष्कळ आहेत.

त्याचें देहावसान तो पन्नास वर्षांचा असतां पंढरपूर मुकामीं झालें.

## उद्धवचिद्घन.

हा कवि मानदेशांत धारुर ह्मणून एक गांव आहे तेथें सुमारें शके १२५० मध्यें राहत असे. एके दिवशीं हा रामनवमीच्या उत्सवांत बेदरगांवीं बहुत संतमंडळी मिळवून कीर्त्तन करीत असतां अकस्मात् असा चमत्कार घडून आला कीं, तेथील दुष्ट यवनानीं संतांना शेणमार करून मशीदींत जाऊन बसले. तेव्हां उद्धवचिद्घनानें राममूर्त्ति घरांत आणून ठेविली. त्या प्रसंगीं मारुतीनें रामभक्तांचा छळ झाला हें जाणून मारुति बेदरीं आले व मशीदीचा विध्वंस करून तींतील सर्व यवनांस ठार मारले व त्यांच्या राजाच्या पोटांत शूळ उत्पन्न झाला. उद्धवचिद्घनाच्या छळामुळें असा अनर्थ झाला असें समजल्यावरून त्या यवनानें उद्धवाजवळ येऊन क्षमा मागितली व रामोत्साहाकरितां सहस्र रुपये दिल्हे. याप्रमाणें अपराध्यांचें शासन करून मारुति अदृश्य झाले. नंतर उद्धवानें पुनः मूर्त्ति स्थापन करून उत्सवाची समाप्ति केली.

यानें **भक्तचरित्र, गोराकुंभाराचेंचरित्र, व द्रौपदीचा धांवा**, हे लहान ग्रंथ केले आहेत.

## नानकशाह.

हा पंजाब देशांत राहणारा ईश्वरभक्त असून मोठा द्रव्य

वान् होता. यानें आपल्या सिद्धाईच्या बळानें लोकांस बहुत चमत्कार दाखविले. हा गोरक्षनाथाचा संप्रदायी होता तरी ईश्वरभजनाचा एक सोपा मार्ग जडमूढ लोकांस उपदेशीत असे. एकच देव, निर्गुण, निराकार आहे, तो सर्वांघटीं भरला आहे, प्राणिमात्रांवर दया करावी, लोकांवर उपकार करावे हेंच ईश्वरीभजन, जातिभेद नाहीं आणि वेगवेगळ्या कर्मांनीं ईश्वर संतुष्ट होत नाहीं असें त्याचें मत होतें.

त्यानें आपल्या नगरांत विष्णुमंदिरें बांधण्याचें काम लावलें, तेव्हां मुसलमान राजाला क्रोध आला. मग मशीदी बांधू लागला तेव्हां हिंदुलोकांनीं याची निंदा केली. तेव्हां यानें दुसरी जागा विकत घेऊन लोकांकरितां शेंकडो शेतखाने बांधिले. त्यानें आपला वेषही हिंदु आणि मुसलमान यांपेक्षां वेगळाच केला होता. तो अठरापगड जातीच्या लोकांस शिष्य करीत असे. त्याच्या पंथाचे लोक पंजाबदेशांत हजारो आहेत. त्यांना नानकपंथी असें ह्मणतात. त्यानें एका मुसलमान राजाला पत्र लिहिलें होतें त्यांत त्यानें आपलें मत दाखविलें. तें येणेंप्रमाणें:—

॥ येकमर्त्तीकेभांडे॥वामेकवणशुद्धकवणपांडे ॥
कबककबीरापढोगायत्री ॥ कबरोहिदासपुराणा॥
कवणवेदसोनामाउद्धरे ॥ जीनोआत्मारामपछा
ना ॥ धनपतिअवरधनाजाठ ॥ सेनाजातको
न्हाई ॥ महापातकीअजामेळउद्धरो ॥ जिणेंपु
त्रसोहेतलगाई ॥ झुटेकामकरेसोझुटा ॥ हरिसु
मरेसोसाच्या ॥ नानकसबनिचसोनिचा ॥ हरि
सुमरणसोसाच्या ॥

सूत्रा आणि मर्दाना हे त्याचे दोन विख्यात शिष्य होते. तो आपल्या मर्दाना शिष्याला सभागमें घेऊन समुद्रावरून चालत मक्केस गेला, आणि तेथें विष्णुमूर्त्ति मशीदींत पालथी घातली होती ती त्यानें उभी केली.

याखेरीज त्याच्या चमत्कारिक गोष्टी पुष्कळ आहेत. त्यानें

उपदेशपर कविता प्रकरणें पुष्कळ बांधिलीं आहेत. त्यांत बहुत करून साक्या आणि दोहेरे आहेत.

हा शके १३५५ नांत आपल्या मताचा उपदेश करूं लागला. त्यावरून याला सुमारें ४२७ वर्षें होतात.

## मिराबाई.

हिंदुस्थानांत उदेपूर या नांवाचें एक नगर आहे, तेथें पूर्वीं राणा या नांवाचा एक राजा होता. तो स्वतां विष्णुभक्त असून अतीत अभ्यागतांचा समाचार घेत असे. मिराबाई ही त्याची कन्या. तिला प्रारब्धयोगेंकरून बाळपणांतच श्रीकृष्णभक्तीचा लाभ झाला. ही उत्कृष्ट कविता करणारी असे. हिनें भक्तिपर पुष्कळ अभंग व पदें रचिलीं आहेत. कबीरपंथ व नानकपंथ यांमध्यें जीं त्यांचीं क्रियाविधिविषयीं प्रकरणें आहेत त्यांमध्यें मिराबाईनें केलेल्या कवितेचा संग्रह केला आहे. त्यावरून ही अकबर बादशाहाच्या वेळीं होती असें वाटतें. तिची कीर्त्ति ऐकून बादशाहानें तिला भेटण्यास इच्छिलें. त्यानें आपला प्रख्यात गायक जो तानसेन त्याला संगती घेऊन तिची भेट घेतली आणि कीर्त्ति ऐकिल्याप्रमाणें तिचें खरेंपण त्याच्या अनुभवास आलें.

भक्तिविजयांत मिराबाईची गोष्ट एक अध्यायभर लिहिली आहे. हिचा बाप जो राणा राजा त्याच्या जवळ श्रीगोपाळकृष्णाची एक फार सुंदर मूर्त्ति असे. तो नित्यशः समारंभानें वस्त्रालंकारसहित षोडशोपचार पूजा करीत असे. मिराबाई ही रूपानें फार सुंदर असून आईबापांची आवडती असे. राजा पूजेचा वेळीं तिला जवळ घेऊन बसत असे. कांहीं काळानंतर असें झालें कीं, मिराबाईला श्रीगोपाळमूर्त्तिशिवाय कांहींच आवडेनाशी उपवर झाली असतां आईबापानीं लग्नाची गोष्ट काढिल्यानंतर तिनें आपला एकच निर्धार सांगितला कीं, श्रीगोपाळभक्तिशिवाय दुसरी गोष्ट काढूं नका, आणि याप्रमाणें आपला निर्धार

शेवटास नेला. पुढें तरुणपणीं ती संतमंडळींमध्यें निर्धास्तपणे वागत असे. हें लोकांस वाईट वाटून तिच्यावर खोटे आरोप घातले ते राजाचे कानावर गेले असतां शेवटीं त्या आईबापांनीं तिला सांगून सवरून विष खायाला दिल्हें, तें मिराबाईनें देवाला धांवा करून नैवेद्य दाखवून घेतलें. पुढें साक्षात्कारासारिखी असी गोष्ट घडली कीं, तें विष तिला अमृता समान झालें. पण तिच्या गोपाळमूर्त्तीचा रंग पालटून हिरवा झाला. या साक्षात्काराची लोकानीं प्रत्यक्ष परीक्षा पाहून तिजविषईच्या सर्व कांक्षा टाकिल्या. त्यानंतर तिनें श्रीगोपाळाची प्रार्थना केल्यावर मूर्त्तीचा रंग पूर्ववत् झाला पण पुढें खुणेसाठीं मूर्त्तीच्या मानेवर मात्र तो रंग राहिला. ती मूर्त्ति उदेपुरास अद्याप आहे असें ह्मणतात.

## सूरदास.

हा कवि मथुरेंत ब्राह्मण कुळीं शके १४५० मध्यें जन्मला. तो जन्मांध असून निरंतर आपला काळ हरिकीर्त्तनांत घालवीत होता. तो अक्रूराचा अवतार होता असें सांगतात. त्यास जन्मांतरचें ज्ञान असे ह्मणून त्यानें कृष्णाच्या वेळचीं अनेक कृत्यें आठवून प्रेमळ शब्दांनीं कृष्णस्तुति केली. तेव्हां त्यास प्रत्यक्ष दर्शन होऊन त्याचे नेत्र आले.

अवंतीनगरांत एक धार्मिक राजा राहत असे. त्याच्या पदरीं ५०० गवई होते. त्यांत तानसेन हा सर्वांत श्रेष्ठ. तो गायनानें दीप लावीत असे. त्यानें एके दिवसीं राजाजवळ सूरदासापाशीं असंख्यात रागिण्या आहेत ह्मणून प्रशंसा केल्यावरून राजानें त्याला आणवून कीर्त्तन करविलें. तेव्हां तानसेनसुद्धां सर्व गवई व राजा हे कीर्त्तन श्रवण करून फार संतुष्ट झाले. याच्या कीर्त्तनांत साक्षात् गणपति व सरस्वती हीं टाळ वीणा वाजवीत असत व श्रीकृष्ण कीर्त्तनसमयीं नृत्य करीत असे असें ह्मणतात.

त्यानें एक नवीन पंथाची स्थापना केली, त्याला सूरदासीपंथ असें ह्मणतात. हल्लीं त्या पंथांतील सांप्रदायी कितीएक

वीणा घेऊन त्याचीं पदें गात फिरत असतात. हा अकबर बादशाहाच्या राज्यांत संदील परगण्याचा वसूल करणारा असे. यानें वृंदावन एथें कृष्णाची मंडनमोहन ह्मणून मूर्त्ति आहे त्या मूर्त्तीला वसुलाचें सर्व द्रव्य अर्पण केलें आणि जामदारखान्यांत पेट्या दगडानीं भरून पाठविल्या. तेव्हां तोडरमल्ल ह्मणून बादशाहाचा प्रधान हिंदु होता, तथापि त्यास दासाचें असें कृत्य न आवडून त्याला बंदांत घातलें. मग दासानीं विनंती केल्यावरून राजानें तूं काम करण्यास योग्य नाहींस असें ह्मणून कामावरून दूर केलें. नंतर त्यानें वृंदावनीं जाऊन आपलें अवशिष्ट आयुष्य ईश्वरसेवेंत घालविलें.

त्यानें कृष्णाच्या स्तुतीपर १२५००० पदें केलीं आहेत. तीं अद्याप लोक विष्णूच्या कीर्त्तनांत व उत्साहांत प्रेमाणें गातात. तसाच त्यानें **सूरसागर** ह्मणून एक मोठा ग्रंथ केला आहे.

अंतकालीं दासाला कृष्णदर्शन होऊन कृष्णानें त्यास आत्मरूपीं मिळविलें. काशीच्या उत्तरभागीं एक कोसावर शिवपुरी ह्मणून एक गांव आहे तेथें त्याची समाधि आहे.

## दामाजीपंत.

हा पंढरपूर परगण्यांत मंगळवेढें ह्मणून एक गांव आहे तेथील राहणारा देशस्थ ब्राह्मण शालिवाहन शकाच्या १६०० व्या शतकांत शिवाजी राजाच्या वेळीं होता. हा सोळाव्या वर्षांपर्यंत आपली कारकुनीविद्या चांगली शिकला. नंतर बेदर मुकामी बादशाहाच्या एका अधिकाऱ्याजवळ चाकरीस राहिला. तेथें चौदा वर्षेंपर्यंत होता. मग त्याला मंगळवेढ्याच्या सुभेदारीचें काम मिळालें. तें त्यानें सतत वीस वर्षेंपर्यंत प्रमाणिकपणानें चालविलें. स्नानसंध्या, देवपूजा वगैरे आपलें नित्यकर्म तो मोठ्या आस्थेनें करीत असे. विठोबावर त्याची फार भक्ती असून पंढरपूरच्या वारीला जाणें कधीं टळलें नाहीं आणि दिवसाचें सर्वकाम आटोपल्यावर रात्रीं चार घटका भजनही करीत असे. इतक्या काळापर्यंत त्याची ईश्वरीनिष्ठा लोकांत प्रगट झाली

नव्हती परंतु तो स्वभावानें उदार, दयाळू, व सत्यशील, असा भला मनुष्य आहे इतकेंच लोक मानीत असत.

एकदा पंढरपूर परगण्यांत अनावृष्टिमुळें मोठा दुष्काळ पडला, त्यावेळेस प्रख्याति होण्यासारिखें याजकडून एक कृत्य घडलें. यानें सर्कारची पेवें फोडून हजारो दरिद्र्यांस धान्य वांटून दिल्हें. ही गोष्ट सर्कारच्या हुकुमावांचून केली ह्मणून त्याला पकडून आणण्याकरितां बादशाहानें शिपायी पाठविले. ते दामाजीपंताला नेत असतां त्यानें विठोबाचें दर्शन घेऊन येतों ह्मणून शिपायांची विनवणी केली. त्या रात्रीं त्यानें विठोबाचें दर्शन घेऊन त्याचा धांवा केला; आणि दुसऱ्या दिवसीं शिपायांबरोबर जात असतां मध्यें असी गोष्ट घडली कीं, विठोबानें महाराचें सोंग घेऊन एका पिशवींत धान्याच्या मोलाचे सोनें भरिलें आणि दामाजीपंताच्याच हस्ताक्षराप्रमाणें जमाखर्चाची वही व बादशाहाला विनंतिपत्र लिहिलें कीं, विठ्यामहाराबरोबर धान्याचा पैका पाठविला तो जमेस करून पावती पाठवावी. त्यावेळीं हा कौतुकाचा महार बादशाहा समोर पत्र देऊन उभा राहिला त्यावेळीं त्याचा साज सरंजाम, बोलणें, हें कसें होतें तें दामाजीपंतानें केलेल्या पवाड्यांत फार चमत्कारिक वर्णिलें आहे.

**॥ अनंतब्रह्मांडेंज्याचेपोटीं ॥ तोसांवळाजगजेठी॥**
**काळीघोंगडीकाळीकाठी ॥ काळादोराकंठीं ॥**
**बोलींथेटमराठी ॥ गांडीसलंगोटी ॥ पायींवाहणा॥**
**मोठाशाहणा ॥ पतीतपावननामतयाचें ॥**

याप्रमाणें दामाजीपंताचा कैवारी श्रीविठ्ठल यानें राजाची पावती घेऊन दामाजीपंताच्या गीतेच्या पुस्तकांत नेऊन ठेविली. दुसरे दिवसीं गीतेचा पाठ करण्याकरितां पुस्तक सोडिलें तेव्हां तें कृत्य विठ्ठलानें आपल्या करितां केलें हें जाणून त्यानें फार काकळूत करून देवाची आभारस्तुति केली. असो. त्या सर्व गोष्टी दामाजीपंतानें प्राकृत श्लोकबद्ध एक पवाडा रचिला त्यांत वर्णिल्या आहेत. कित्येक भाविक लोक त्या श्लोकांचा नित्यनेमानें पाठ करीत असतात.

दामाजीपंताला त्याच्या सद्भावास्तव ईश्वरी साक्षात्कार झाल्यानंतर त्यानें आपल्या यजमानाजवळून रजा घेतली आणि तेव्हांपासून सदासर्वदां विठलाचें चिंतन करीत राहिला.

## गिरधरलाल.

हा नागर ब्राह्मण मोठा विष्णुभक्त सुमारें १६००च्या शतकांत होता. तो राधाकृष्णाचा वेष धारण करून प्रेमरसानें कीर्त्तन करीत असे. याला भक्तीस्तव श्रीकृष्णाचे साक्षात्कारही बहुत घडले.

एकदां हा विष्णुमंदिरांत गेला आणि कीर्त्तन ऐकायाला पुष्कळ लोक मिळाले पण सोंगाचीं वस्त्रें याच्या जवळ नव्हतीं ह्मणून चिंताक्रांत होऊन त्यानें श्रीकृष्णमूर्त्तीचें ध्यान केलें, तेव्हां भरजरीचीं उत्तम वस्त्रें लोकांदेखतां त्याजपुढें येऊन पडलीं आणि तीं लेऊन कीर्त्तन केलें.

एकदां याचे घरीं कोणी विष्णुभक्त मरण पावला असतां त्याची पूजा करून यानें प्रेताचें तीर्थ घेतलें. तेव्हां लोक छळूं लागले असतां श्रीकृष्णाची प्रार्थना करून त्यानें त्या विष्णुभक्ताला जिवंत केलें. नंतर त्याची कीर्त्ति फार वाढली.

यानें राधाकृष्णाच्या वर्णनपर कबीत, कुंडरीया, वगैरे कविता पुष्कळ केल्या आहेत.

## एकनाथस्वामी.

हा ऋग्वेदी देशस्थ ब्राह्मण गोदातीरीं प्रतिष्ठान ह्मणजे पैठण एथें राहत होता. हा ज्ञानदेव व नामदेव यांच्या मागून सुमारें तीनशें वर्षांनीं जन्मला. हा नाथसंप्रदायी होता असें त्याच्या पुष्कळ गोष्टी वरून दिसतें. एकनाथाचा बाप सूर्योजी, आई रुक्मिणी, आजा चक्रपाणी, आणि पणजा भानुदास. तो साक्षात्कारी असून कविता करणारा होता. त्याची कविता ऐकायाला साक्षात् देव आले होते, ही गोष्ट एकनाथीभागवताच्या आरंभीं सांगितली आहे.

**॥ जयाचीपदबंधरीती ॥ पाहों आली श्रीविठ्ठल मूर्त्ति ॥ कानीचे कुंडल जगा जोती ॥ करितां रातीं देखियेली ॥**

एकनाथाचें जन्मवृत्त भक्तिविजयांत आठ अध्याय वर्णिलें आहे. तें एथें समग्र लिहिलें तर ग्रंथविस्तार होईल यास्तव त्याची साधारण स्थिति कसी होती एवढें मात्र एथें सांगतों.

एकनाथ हा सदाचारी, नैष्ठिक, भक्तिमान, क्षमाशील, विरक्त, आणि साक्षात्कारी असा होता, असें त्याच्या जन्मवृत्तावरून ध्यानांत येतें. दैवयोगेंकरून त्याच्या बुद्धीचें वळण लहानपणापासूनच भगवद्भक्तीकडे दिसलें. त्याचे पोरपणचें खेळणें देखील भजन पूजन अशा खटपटीचें होतें. त्याची आईबापें लहानपणांतच निवर्त्तलीं ह्मणून त्याच्या आजाआजीनें त्याची मुंज साहाव्या वर्षींच केली आणि त्यास एकुलता तेवढाच मुलगा होता ह्मणून कौतुकानें त्यास एक्या असें ह्मणत असत.

एकनाथाची बुद्धि फार तीव्र होती. मुंज होतांच पढायाला घातलें आणि कांहीं वेदाध्ययन झाल्यावर तो पुराण ऐकायाला बसूं लागला. तें ऐकण्यानेंच त्याला व्युत्पत्तिपरिज्ञान चांगलें झालें आणि मोठ्या नम्रतेनें पुराणिकांला आणि शास्त्र्यांना ज्ञानाच्या गूढ विषयांवर प्रश्न करूं लागला.

पुढें देवगड किल्ल्यावर जनार्दनपंत ह्मणून एक साधु गृहस्थ होता, त्याजकडें जाऊन सेवेस राहिला. एकनाथाप्रमाणें गुरुसेवेचे कष्ट करणारा विरळाच अढळेल. तो गुरूच्या आज्ञेप्रमाणें कांहीं दिवस सुलिभ पर्वतावर एकांतीं जाऊन उपासना करीत होता. तेथें एका शेतकऱ्या देखतां चतुर्भुज मूर्त्तीचें त्याला दर्शन झालें. नंतर नाशिक, त्रिंबक, इत्यादि ठिकाणीं जातानां वाटेंत चंद्रभटाच्या घरीं राहणें पडलें. तेथें एकनाथानें **चतुःश्लोकीभागवतावर** टीका केली. त्या चंद्रभटाचें समाधिस्थान देवगडावर अद्यापि आहे. जनार्दनगुरूनी त्याची निष्ठा पाहून त्याला दत्तात्रयाचें दर्शन करविलें आणि एकनाथीं भागवत करण्याविषयीं दत्तात्रयानीं त्याला प्रसादवचन दिल्हें. नंतर

जनार्दनगुरूनीं काशी, बद्रिनाथ, उत्तरमानससरोवर, रामेश्वर प्रभृति तीर्थयात्रा करून येण्याची आज्ञा दिल्हीं आणि सांगितल्या मुद्दतीप्रमाणें संपूर्ण मोठाल्या यात्रा करून आला.

लग्न करण्याविषयीं त्याच्या आजा आजींनीं पुष्कळ आग्रह केला, शेवटीं गुरुवचनास्तव त्यानें लग्न केलें. प्रातःस्नान, स्मार्तहोम, देवपूजा, नैवेद्य, वैश्वदेव, आदिकरून गृहस्थाश्रमांतल्या नित्यक्रिया त्याच्या सतत चालल्या असत. क्षेत्रस्थ ब्राह्मणांला त्याची स्थिति दुःसह वाटून त्यानीं पुष्कळदां त्याची छळणूक केली आणि एकनाथानी आपल्या सिद्धाईच्या प्रचीती त्यांस वेळोवेळ दाखविल्या.

एकदां श्राद्धास आमंत्रण दिल्हेले क्षेत्रस्थ ब्राह्मण कांहीं कारणानीं हटून बसले असतां नाथानी पितृदेवतेचें आव्हान करून यथासांग श्राद्ध केलें. हा चमत्कार बाहेर बसलेल्या ब्राह्मणांस समजला.

एकदां त्यानें पाषाणाच्या नंदीकडून गवत खाववून दाखविलें आणि दुसऱ्यानें त्याच नंदीनें नाथाच्या वचनास्तव गंगेंत जाऊन उडी टाकली. तो नंदी आजपर्यंत तेथें आहे असें ह्मणतात. त्याच्या ईश्वरसाक्षात्काराच्या गोष्टी पुष्कळ घडल्या.

कर्नाटक देशांत एका सावकारानें विष्णूची मूर्त्ति करविली होती, ती त्याला दृष्टांत झाल्यावरून त्यानें मोठ्या समारंभानें एकनाथाच्या घरीं आणून स्थापिली.

एकनाथाचें कीर्त्तनामध्यें भाषण फार सुरस होतें आणि समयोचित सुचवायाला आणि ताल व सूर धरायाला साक्षात् श्रीकृष्ण ब्राह्मणवेषानें त्याच्या जवळ कित्येक वर्षें राहिले होते आणि कित्येक वर्षेंपर्यंत त्याच्या घरीं शागीर्दी करायाला राहिले होते. त्यावेळचें नांव कृष्णश्रीखंड्या.

एकदां जनार्दनाच्या पुण्यतिथीनिमित्त एकनाथाला कर्ज झालें होतें, तें श्रीविठ्ठलानी परभारें जाऊन फेडलें आणि तो नित्यशः पुराण सांगत असे त्यावेळेस पुराण ऐकायाला श्रीकृष्ण येत होते. इत्यादि पुष्कळ चमत्कारिक गोष्टी घडल्या.

एकेदां एका पैठणकर गृहस्थानें कांहीं अमोलिक वस्तु (परीस होता असें ह्मणतात.) तो नाथाजवळ आणून ठेविला आणि काशीयात्रा करून परत आल्यावर तो परत मागूं लागला. तेव्हां नाथानी त्याला गंगेंतून तसे पुष्कळ परीस काढून दाखविले आणि त्यांतून तुझा कोणता असेल तो वोळखून घे असें सांगितलें.

एकनाथीभागवताची पहिली पंचाध्यायी पैठणास समाप्त करून पुढील ग्रंथ काशीमध्यें शके १४९५ वांत समाप्त केला. तेथील क्षेत्रस्थ लोकांनीं त्याची छळणूक केली. शेवटीं एकनाथी भागवताचें पुस्तक त्यानीं भागीरथींत टाकून दिल्हें, त्यावेळीं साक्षात् भागीरथीनें आपले हात वर करून तें पुस्तक बुडवूं नये ह्मणून सांगितलें. नंतर त्या ग्रंथाची मोठ्या समारंभानें काशीक्षेत्रीं मिरवणूक काढली आणि उत्साह केला आणि क्षेत्रामध्यें त्या ग्रंथाची मान्यता झाली.

अणखी एकनाथाचे ग्रंथ **रुक्मिणीस्वयंवर**, **शिवलीलामृत**, **रामगीता**, **आनंदलहरी**, **एकनाथी रामायण**, **हस्तामलकाची टीका**, वाल्मिकी रामायणावर **भावार्थरामायण** ह्या नांवाची टीका व शुकाष्टकावर **स्वात्मसुख** या नांवाची टीका असे आहेत. या शिवाय ईश्वर स्तुतिपर व बोधपर केलेले अभंग, पदें, व कांहीं हिंदुस्थानींत केलेली कविता अढळते. याची भाषा सरळ असून तींत फारसे अप्रसिद्ध शब्द नाहींत. याच्या ग्रंथांत संस्कृताप्रमाणें उपमा दृष्टांतादिक अलंकार पुष्कळ आहेत.

एकनाथीभागवत हा त्याचा ग्रंथ प्रसादिक आहे. या ग्रंथाची वाणी, रचना, अर्थनिरूपण व ग्रंथ करते वेळेस अमुक श्लोकाचा किंवा अमुक पदाचा अर्थ असा कर ह्मणून कृष्णाचें साक्षात् सांगणें व ग्रंथाला वरदान इत्यादि गोष्टी जशा ज्ञानेश्वरी ग्रंथाविषयीं घडल्या तशा एकनाथीभागवताविषयीं घडल्या, हें त्याच ग्रंथामध्यें ठिकाणो ठिकाणीं लिहिलें आहे.

एकनाथी भागवताच्या चांगलेपणाविषयीं विशेष लिहिणें

नको. तो ग्रंथ विद्वानांच्या आणि भगवद्भक्तांच्या परिचयांतलाच आहे. ज्ञानेश्वरींच्या ओव्या साडेतीन चरणी आहेत, परंतु भागवताच्या ओव्या चार चरणी आहेत. कारण प्रत्येक ओवीच्या चतुर्थ चरणांत तीन चरणांतील अनुप्रास पूर्ण केला आहे असें नेमानें अढळण्यांत येतें हें वाचणारांनीं ध्यानांत आणावें. एकनाथी भागवताच्या प्रस्तावनेंत एकनाथांनीं आपल्या नांवाची मिळवणी चमत्कारिक दाखविली कीं,

**॥ मी एका आणि माझी कुळस्वामिनी एकवीरा आणि मी ज्या ग्रंथाची व्याख्यां करितों तो एकादशस्कंध ॥**

असें ग्रंथाचें नक्षत्रनाम मिळतें ह्मणून,

**एकादशाची टीका ॥ एकादशीस करी एका ॥ तेणें एकपणाचिया सुखा ॥ फळेलदेखा एकत्वें ॥**

या वरून भागवताची रचना एकादशीचे दिवसीं मात्र करीत असंत हें उघड दिसतें.

ग्रंथ समाप्तीस शक ठिकाण हीं लिहिलीं आहेत. तीं येणेंप्रमाणें:—

**॥ शालिवाहनशकवैभव ॥ संख्याचौदाशेंपंचाण्णव ॥ श्रीमुखसंवत्सराचेंनांव ॥ टीकाअपूर्व तैंझाली ॥ ग्रंथारंभप्रतिष्ठानी ॥ तेथेंपंचाध्याय संपादुनी ॥ इतरग्रंथाचीकरणी ॥ आनंदवनीविस्तारली ॥ वाराणशीमुक्तिक्षेत्रीं ॥ मणिकर्णिका माहातीरीं ॥ पंचमुद्रापीठामाझारी ॥ एकादशावरीटीकाकेली ॥**

शके १५०६ हांत एकनाथानें ज्ञानदेवाची ज्ञानेश्वरी गुप्त होती, ती शोधून प्रसिद्ध केली. शके १५४६ फाल्गुन वद्य ६ या दिवशीं पैठण एथें एकनाथ समाधिस्थ झाले.

## तुकाराम.

याला कोणी तुकोबा असेंही ह्मणतात. याचें नांव बहुधा सर्वांस माहित आहे. हा शिवाजी राजाच्यावेळीं होता. पुण्यापासून सुमारें नऊ कोसांवर देहू ह्मणून एक गांव आहे तेथें शके १५१० ह्मणजे इसवी सन्न १५८८ यांत तो जन्मला. तेंच त्याचें मुख्यत्वेंकरून राहण्याचें ठिकाण असे.

विश्वंभर जो तुकारामाचा सातवा पूर्वज आणि त्याची बायको आमाई हीं उभयतां विठोबाचीं प्रेमभक्त असून साक्षात्कारी होतीं. आणि त्याच्या वंशजानीं देहू गांवात राहावें असा त्यास श्रीविठ्ठलानें दृष्टांत दाखऊन तेथें स्थापण्याकरितां आपली स्वयंभू एक मूर्त्ति दिल्ही. विश्वंभरास दोन पुत्र होते ते राजाजवळ शिपायगिरीच्या चाकरीवर असतां लढाईत मरण पावले. त्यांतील एकाला मात्र पुत्र होता, त्याचें नांव विठोबा. पुढें त्याचा वंश येणेंप्रमाणें:—

**त्याविठोबाचापुत्रजाण ॥ पदाजीत्याचेंनामाभिधान ॥ त्यानेंहिकरूनीसप्रेमभजन ॥ रुक्मिणीरमणआराधिला ॥ १ ॥ पदाजीचापुत्रशंकर ॥ त्यानेंपूजिलारुक्मिणीवर ॥ कान्हयाशंकराचापुत्र ॥ बालोबाकुमरतयाचा ॥ २ ॥ त्याबालोबाचेंपोटिपरम ॥ वैष्णवभक्ततुकाराम ॥ निवृत्ती, ज्ञानदेव, सोपान, मुक्ताबाई, कबीर, भानुदास, चांगावटेश्वर, सांवतामाळि, नरहरीसोनार, विसोबाखेचर, एकनाथ, सेनान्हावी, चोखामेळा, गोराकुंभार, वेंका, बहिरापिसा, जनकाप्रेमळ, परसाभागवत, तुळसीदास, कमाल, कान्हापाठक, सूरदास, नरसीमेहता ॥ रामानंदस्वामी, यतेश्वर ॥ जोगारोहिदासवैष्णवविर ॥ सर्वसिद्धनागनाथथोर ॥ आणिविश्वंभरभक्तराज ॥ केशवचैतन्यराघवचैतन्य ॥ अमा**

**ईगुणनिधान ॥ गोणाईराजाईमिराबाईपूर्ण ॥आ**
**णिकान्होपात्रा,** इत्यादि जी प्रसिद्ध संतमंडळी त्यांतलाच हा तुकाराम विख्यात संत होय. तुकारामाचे सर्व वंशज विठोबाची भक्ति करीत असत. तुकारामाचा बाप बाल्होबा आणि आई कनकाई हीं दोघें विठ्ठलाचीं मोठीं नैष्ठिक भक्त होतीं. त्यांस बहुत दिवस संतती नव्हती. पुढें स्वप्नांत श्रीविठ्ठलाचा दृष्टांत झाला. तेव्हां सावजी आणि तुकाराम हे दोन पुत्र झाले. तुकाराम हा नामदेवाचा अवतार असें सांगितलें आहे. पूर्वीं संतमंडळींत शतकोटी अभंग करण्याविषयीं जी प्रतिज्ञा ठरली होती, ती तुकारामानें सिद्धीस नेली. अभंग कवीतेचा शेवटला कर्त्ता हाच होय. त्यापासून स्वनामांकित अभंग करणारा प्रसिद्ध संत आज तागाईत कोणी झाला नाहीं. ह्याच्या सविस्तर गोष्टी भक्तलीलामृत ग्रंथांत तुकारामचरित्र ह्मणून सत्रा अध्याय आहेत त्यांत लिहिल्या आहेत. तुकाराम वीस वर्षांचा होईपर्यंत त्याची स्थिति सुखाची होती. त्याविषयीं असें सांगितलें आहे कीं,

**मातापिताबंधुस्वजन ॥ सर्वसंपत्तिआणिधन ॥**
**मान्यतातुकयाकारणे ॥ कांहींउणेअसेना ॥१॥**

पुढें त्याला पुष्कळ दुःखें आणि संकटें प्राप्त झालीं. त्यायोगानें वारंवार अनुताप होऊन तो ईश्वरभजन करूं लागला. तो सर्वदां कीर्त्तनांत निमग्न असे. तथापि कुटुंब चालविणें त्यालाच पडलें ह्मणून तो आपला उदीम व्यवसाय पूर्वजाप्रमाणें करीत होता. परंतु सर्व व्यवहारांत त्याची वर्त्तणूक अगदीं भोळी व परमार्थिक प्रकारची चालली. त्यामुळें लोकांनीं त्याला पुष्कळदां ठकविलें. तो परमार्थिकपणें वागत असतां कांहीं काळानीं त्याविषयीं ईश्वरप्रचीतीच्या गोष्टी घडूं लागल्या. त्याविषयींची बहुत उदाहरणें सदहु ग्रंथांत लिहिलीं आहेत.

एकदां रानामध्यें पावसाच्या तुफानांत तुकारामाच्या बैलावरून गोणी खालीं पडली, त्यावेळीं व मध्यें नदीला पूर आला त्या सर्व संकटांत कोणी चमत्कारिक पुरुषानें येऊन त्याला घरापर्यंत निर्विघ्न पोंह्चविलें.

एकदां तुकाराम मिरच्याच्या गोण्या घेऊन परगांवीं हटास गेला तेथें त्याच्या सर्व मिरच्या लोकांनीं भोळेवारी नेल्या. तेव्हां कोणी विलक्षण पुरुष मध्यस्थ येऊन त्याच्या मिरच्याचा सर्व दाम उगवून दिल्हा. हें ईश्वरी कृत्य असें त्याला पुढें समजलें.

जिजाई आणि आवळाई ह्या त्याला दोन बायका होत्या. त्या त्याला वारंवार गांजीत असत. तुकारामाच्या भक्तीस्तव विठोबानें त्यांस प्रचीती दाखविल्या. परंतु त्यांचें मन पालटलें नाहीं. तुकारामाला संसारिक संकटें पुष्कळ पडलीं तथापि त्यानें देवावर भार घातला नाहीं. पुष्कळदां विठोबानें त्याचीं संकटें दूर केलीं.

एकदां तुकारामानें अडचणीस्तव अदमण दाण्यावर कोणाचें शेत राखूं पत्करलें असतां त्यानें पशुपक्ष्यांचें कधींच वारण केलें नाहीं. त्यामुळें शेताची अगदी खराबी झाली ह्मणून त्याच्या धन्यानें तें शेत तुकारामाच्या अंगावर टाकलें आणि त्या बद्दल दोन खंडी धान्याचा रोखा लिहून घेतला. पुढें असा चमत्कार झाला कीं, त्याच शेतांतून मळणीच्यावेळीं सत्रा खंडी धान्य निघालें.

एकदां तुकाराम बैल घेऊन ग्रामांतरी गेला, तेथें त्याला अडीचशें रुपये नफा झाला. तेव्हां कोणी ब्राह्मणानें आपल्या लग्नकार्यास पाहिजेत ह्मणून काकळूत केली असतां त्याला सर्व रुपये दिल्हे.

एकदां तुकारामानें कोणाला तेल आणून दिल्हें होतें, तें बहुत दिवस सरेना. असें प्रगट झाल्यावरून बहुत लोक त्याच्या गळ्यांमध्यें नळे बांधून त्याच्याकडून तेल आणवीत असत. तो सर्व लोकांचें काम ममतेनें करीत असे.

देहू गांवाजवळ भामनाथ आणि भांडार यां पर्वतांवर तुकाराम भजन करायाला व ज्ञानाचे ग्रंथ पाहायाला बसत असे.

लोकांकडे त्याचें येणे पुष्कळ होतें परंतु त्याची त्यानें खतपत्रें बुडवून कोणाकडे मागणें केलें नाहीं. वाघोळींत रामशास्त्री ह्मणून एक विद्वान् राहत असे. त्यानें त्याजवर ग्रामण्य करून

त्यानें केलेले अभंग बुडवून टाकले. ते बुडवून बारा दिवस झाल्यावर तुकारामाला विठ्ठलानीं दृष्टांत देऊन बाहेर काढले.

तुकाराम डोंगरावर बसत असे तेव्हां त्याची बायको जिजांई भोपळाभर पाणी आणि एक भाकर नेत असे. एकदां उष्णकाळीं दुपारी जिजाईला कांटा मोडला असतां विठोबानें तिचा कांटा काढून तिला तत्काळ बरें केलें आणि टोपली पक्वान्नानें भरून दिल्ही. तुकाराम रात्रंदिवस भजन करीत असतां झोंप घेत नसे. त्याविषयीं असें लिहिलें आहे कीं,

शेंडीसबांधोनियांदोरी ॥ आपुल्यांह्मातेंटांगीव
री ॥ ह्मणेमानेशींआंसडाबैसल्यावरी ॥ मगनि
द्रादुरीपळेल ॥

एकदां तुकारामाची पितृतिथी आली तेव्हां घरांत सामग्री नव्हती ह्मणून भाजी शिजवून पित्रांस जेवूं घालावें असें सांगून आपण रानांत भजन करायाला गेला, तों मागें विठोबानें त्याचें रूप धरून सामग्री आणून दिल्ही आणि सर्व गांवकरी यांस आमंत्रण देऊन जेवूं घातले. मग तुकाराम बाहेरून आल्यावर तें देवाचें करणें जाणून मनांत फारच उपकारी होऊन प्रेमानें रडला. याप्रमाणें तो देवाच्या उपकारांचें वारंवार स्मरण करीत असे. तो कीर्त्तनामध्यें ईश्वरपर अनेक आख्यानें लावून लोकांस उपदेश करीत असे. तुह्मी विरक्त व्हा, संसार सोडून द्या, असें ह्मणत नसे. कोणत्याही स्थितींत असून ईश्वरावर भाव ठेवला असतां मनुष्य तरतो असें त्याचें मत होतें. त्याच्या बोलण्याला रंगदेवता फार होती आणि अभंग कविता वर्चेवर करीत असे. त्याविषयीं असें लिहिलें आहे कीं,

कीर्त्तनामाजिसाचार ॥ चरित्रनसलेंपाठांतर ॥
त्याचेअभंगवरच्यावर ॥ वैष्णववीरकरीतसे ॥
प्रसादीककविताऐकोनिकानीं ॥ श्रोतेआश्चर्य
करितीमनीं ॥ कीर्त्तनीरंगयेतसेचौगुणि ॥ वरद
वाणीह्मणोनियां ॥ जैसामेघवर्षतांसाचार ॥ अ

**गणीतउठतीतृणांकुर ॥ कींसागरीतरंगअतिअ पार ॥ संख्यानकरवेतयांची ॥ तैशाचपरीतु कयाप्रती ॥ कीर्त्तनीअनेकदिव्यस्फुरती ॥ संश यनराहेकोणाप्रती ॥ खळतेहीहोतीभाविक ॥**

कडूसकर गंगाधरमवाळ ब्राह्मण आणि संताजी तेली चाकणकर हे दोघे त्याची कविता लिहिणारे असत.

तुकारामाच्या तीन कन्या उपवर झाल्या असतां त्यानें असें केलें कीं, वाटेंत चालतां चालतां स्वजातीचीं तीन मुलें आढळलीं. त्याविषयीं असें लिहिलें आहे कीं,

**तेदिवसींहोतेलग्नतिथ ॥ मगविप्रबोलविवैष्णवभक्त ॥ हळदिलाऊनिवधुवरांतेथें ॥ लग्नेंत्वरीतलाविलीं ॥ मोसेंगाढेंजांबूजकर ॥ हेसोहिरेकरीवैष्णववीर ॥**

बीड परगण्यांतला देशपांड्या ब्राह्मण आपल्याला पुराण व्युत्पत्ति व्हावी ह्मणून अळंदींत ज्ञानेश्वराजवळ बारा दिवस उपास करीत बसला. त्याला ज्ञानदेवानी तुकारामाकडे पाठविलें परंतु तुकाराम हा शूद्रजातीचा आहे ह्मणून विश्वास ठेवला नाहीं परंतु कोंडोबा या नांवाचा ब्राह्मण जो अगदी निर्बुद्धि होता त्याजवर प्रसन्न होऊन विद्या येण्याचें त्याला अकरा अभंग दिल्हे. तो कोंडोबा शिवाजीराजाच्या एथें पंडिताच्या ठिकाणीं राहिला. अमदाबादेस कोणी सावकार होता त्यानें ज्ञानेश्वराला नवस केला होता कीं, मी लक्ष रुपयांचें जवाहीर समाधीला वाहीन. त्याविषयीं असें लिहिलें आहे कीं,

**नवसपुरवितांसत्वर ॥ दर्शनाआलासावकार॥ मगदृष्टांतसांगेज्ञानेश्वर ॥ तुकयासमोरहेंठेवी॥**

मग तें द्रव्य त्यानें कोंडोबाला दिल्हें. पुढें तुकारामाची भेट घ्यावी असी शिवाजी राजाला इच्छा झाल्यावरून त्यानें आपले कारकून, घोडे, रथ पाठऊन तुकारामाला आणाविलें आणि राजा त्याला पुष्कळ द्रव्य देत असतां त्यानें असें ह्मटलें कीं,

**तेंराजद्रव्यदेखोनिनयनीं॥तुकाकंटाळलातयेक्षणीं॥**

**मगकायबोलेप्रसादवाणी ॥ तेंसादरश्रवणीऐ**
**किजे ॥ कासयापाहिजेद्रव्यठेवा ॥ एकविठ्ठल**
**चिमजव्हावा ॥ त्यावांचूनिआमुच्याजिवा ॥**
**आणिकहेवानसेची ॥**

तुकाराम तें द्रव्य घेईना ह्मणून राजानें तें ब्राह्मणांला वाटून दिल्हें.

लोहगांवांतील लोक तुकारामाच्या पुष्कळ भजनीं लागले होते. तेथें एक विहीर जिला कासारविहीर असें ह्मणतात ती अद्याप आहे, तिचें पाणी पहिल्यानें खारट होतें तींत तुकारामानें स्नान केल्यापासून गोड झालें.

असो. अशा तुकारामाच्या सिद्धाईच्या प्रचीती हजारो लोकांच्या देखत घडलेल्या त्याच्या चरित्रांत लिहिल्या आहेत. तो सर्वाभूतीं दयाळू, परमनम्र, आणि परोपकारांत त्यानें आपलें शरीर अगदीं वेंचलें होतें, असें त्याच्या बहुत गोष्टीवरून दिसतें.

तो शके १५७१ रांत फाल्गुनवद्य द्वितीया सोमवारीं चार घटका दिवस आला असतां कीर्त्तन करितां करितां गुप्त झाला असी त्याच्या चरित्रांत त्याचे मरणाची गोष्ट वर्णिली आहे. त्याला पूर्वीं दृष्टांत झाला होता ह्मणून त्यानें आपल्या बायका जिजाई आणि आवळाई यांना नेण्याकरितां बोलावूं पाठविलें. तेव्हां त्यास ती गोष्ट खरी वाटली नाहीं. आवळाई असें बोलली कीं,

**मीपांचमाहिन्यांचीगरोदर॥घरींह्मैसदुभतीथोर॥**
**पोरवडालहानलेंकुरें ॥ मागेंसंसारकोणकरी ॥**

आणि जिजाईही ह्मणाली कीं, तो यात्रेला जात असतो तेव्हां आह्मी वैकुंठाला जातों असें सांगत असतो; ह्यावरून तिनेंही त्याचा निरोप नकारला.

तुकारामानें गुप्त होते वेळीं २७ अभंग केले. त्याच्या अभंगकवितेची वाणी त्याच्या गुणानुरूप होती. तो अगदीं ढोंगी नव्हता ह्मणून त्याचें बोलणें निर्भीड आणि खरें होतें; तो साक्षात्कारी होता ह्मणून त्याचें बोलणें प्रसादिक; आणि तो भाविक, प्रेमाळू, व दयाळू होता तसें त्याचें बोलणें करुणारसभरित, प्रेमळ

आणि नम्र होतें; आणि तो स्वभावानें रंगेला असे ह्मणून त्याची वाणी फार रसाळ आहे. तो कीर्तनामध्यें प्रायः आपणच कविता करून ह्मणत असे. कथा करण्याची चाल तेव्हांपासूनच पडली असें ह्मणतात.

त्यानें **सिद्धिपालचरित्र, प्रल्हादचरित्र, पत्रिकेचेअभंग**, इत्यादि केलीं आहेत.

देहू गावांत तुकारामाची समाधि आहे, तेथें फाल्गुनवद्य प्रतिपदेपासून वद्यषष्ठीपर्यंत प्रतिवर्षी मोठा उत्साह होत असतो, तेव्हां यात्रा जमते.

---

## रामदासस्वामी.

रामदास हे गोदातीरीं जाम ह्मणून गांव आहे तेथील कुळकरणी सूर्याजीपंत यांचे पुत्र. सूर्याजीपंताच्या स्त्रीचें नांव राणूबाई. सूर्याच्या प्रसादानें त्यांस पुत्र झाला ह्मणून त्याचें प्रथम नांव नारायण ठेविलें. पुढें तो रामाची उपासना करूं लागला ह्मणून त्यास रामदासस्वामी असें नांव पडलें. त्यानीं स्त्रीपरिग्रह केलाच नाहीं. बाळपणापासून वैराग्यशील असून रामभक्ति करूं लागले. सातान्याच्या पश्चिमेस परळी नांवाचा किल्ला आहे तेथें बहुतकरून त्यांचें राहणें असे. यांचे जन्म शके १५३० सांत झालें. शिवाजीराजा हा यांचा पूर्ण कृपेतील शिष्य होता. त्यानें त्यांच्या प्रसादानें मोठमोठाले पराक्रम करून राज्य संपादिलें. यावरून मराठ्याच्या फौजेंत भगवा झेंडा असे. रामदास हे सिद्ध पुरुष असून मोठे विद्वान् होते. रामराम करण्याची चाल रामदासानींच घातली असें ह्मणतात. त्याच्या पूर्वी लोकांत जोहार करण्याचा संप्रदाय असे. त्यानीं लोकोपकारार्थ प्राकृत भाषेंत बहुत ग्रंथ केले. त्यांत कांहीं ओव्याबद्ध व कांहीं श्लोकबद्ध व कांहीं अभंग असे आहेत. **दासबोध** हा ग्रंथ त्यानींच केला. अणखी **समास आत्माराम** व **मनाचेश्लोक** २१० व किंत्येक राजनीतिपर ग्रंथ करून शिवाजी राजास दिल्हे. राम-

दास यानीं रामभक्तीचा संप्रदाय वाढवून शेंकडो शिष्य केले, तेही जगविख्यात झाले. त्यांतील एकानें स्वामींचें साद्यंत जन्मवृत्त शके १६४० सांत लिहून ठेवलें आहे. त्यांत लोकांदेखतां स्वामींनी जे अद्भुत चमत्कार केले ते सविस्तर वर्णिले आहेत. त्यांत रामदासस्वामी हे मारुतीचा अवतार असें सप्रमाण दाखविलें आहे.

नाशिकाजवळ टांकली या नांवाचें खेडें आहे तेथें रामदास हे लहानपणीं मारुतीची उपासना करीत असतां जवळचें गांव जें दसक पंचक तेथील कुळकरणी मरण पावला, त्याची स्त्री सहगमन करण्यास आली. तिचा आक्रोश पाहून स्वामींनी गंगोदक शिंपून शव उठविलें आणि त्या स्त्रीपुरुषांस घरीं पाठविलें. पुढें त्यांस एक पुत्रही झाला तो त्यानीं स्वामीस अर्पिला. त्याचें नांव उद्धवगोसावी. स्वामींनी पृथ्वी प्रदक्षिणा व बहुत तीर्थयात्रा केल्या. काशीमध्यें हनुमंत घाट आहे त्यावर मारुतीची स्थापना केली.

बद्रिकाश्रमास स्वामी गेले तेव्हां तेथें मारुतीनें प्रत्यक्ष दर्शन देऊन पादुका व माळ व हुरमुजी वस्त्रें व कुबडी ह्मणजे टेंकायास काठी इत्यादि दिल्हीं. जगन्नाथ क्षेत्रीं एक मठ स्थापिला, त्यांत पद्मनाभ या नांवें ब्राह्मणाची नेमणूक केली. सेतुबंध समुद्रास गेले तेथेंही मारुतीनें दर्शन देऊन त्यांस लंकेंत नेऊन बिभीषणाची भेट करविली. तेवेळीं तेथें बिभीषणाच्या स्तुतिपर स्वामींनी कांहीं अभंग केले. तीर्थयात्राकरून आल्यावर स्वामीची मातुश्री वृद्ध होऊन डोळे गेले असतां हस्तस्पर्श करून तिचे नेत्र पूर्ववत् केले.

एकदां पाल या गांवीं स्वामीचा एक शिष्य अंब्याची फांदी तोडीत असतां विहिरींत पडून मेला. त्याला स्वामींनीं रामनामानें हाका मारून जिवंत केलें आणि पुढें त्याचें नांव कल्याण असें ठेविलें. त्या नंतर कारणपरत्वें त्यालाच शिवकल्याण असें नांव दिल्हें. अमृतानुभव ग्रंथावर शिवकल्याणकृत ओव्याबद्ध एक मोठा ग्रंथ आहे.

रामदासस्वामींनी शहापूर, मसूर, चांफेळ, उंबरज, मालगांव, शिगनवाडी, शिरोळ, पाडळी, पारगांव, व मिजरमांतीं वाळवेगांव, कृष्णातीर, इत्यादि अकरा ठिकाणीं मारुतीची स्थापना केली. तसें स्वामींची शिष्य मंडळी नांवनिशी व गांवें यासुद्धां लिहिली आहे. त्यांत बरोबर असणार अठरा वीस. त्या खेरीज त्यांचे सांप्रदायिक बाहात्तर महंत होते. त्यांचीं सर्व नामें डाब गांवच्या मठांत लिहिलेलीं हल्लीं आहेत. शके १५७० यां मध्यें शिवाजी राजानें स्वामींची भेट घेतली. पुढें स्वामींचा प्रसाद होऊन त्याचा प्रताप वाढला आणि त्यानें स्वामींची मर्जी बहुत संपादिली. शके १५७१ यांत शिवाजीला अनुग्रह दिल्हा, पुढें राज्यकारणीं सर्व मसलत तो स्वामींला विचारून करित असे.

एकदां शिवाजीराजा दोन हजार फौज व चार पांचशे ब्राह्मणमंडळीसुद्धां अरण्यांत स्वामींचें दर्शनास अकस्मात् आला असतां असा चमत्कार घडला कीं, स्वामींनीं आपल्या मठाजवळची एक धोंड लोटून देववून एक मोठी गुहा दाखविली, तींत षड्रस पक्वान्नेंसुद्धां पात्रें वाढून तयार होतीं तेथें सर्वांस यथातृप्त भोजन घालून रवानगी गेली. हा चमत्कार बहुतांनीं समक्ष पाहिला.

एकदां स्वामी जांबेस असतां घरीं रामनवमीचा उत्साह चालला, तेव्हां भोजन पात्रें वाढून सर्व तयारी झाली असतां तूप आलें नव्हतें तेव्हां मुंजे या उपनांवाचा एक यजुर्वेदी ब्राह्मण जवळ होता त्यास स्वामींनी आज्ञा केली कीं, समोर पडलेली घागर घेऊन नदींतून भरून आण. त्याप्रमाणें केल्यावर स्वामींनी स्पर्श करितांच पाण्याचें तूप झालें. तें तूप हजारो पात्रांस पुरलें. पुढें तीच घागर प्रतिवर्षी तुपानें भरून तूप वाढावें, कितीही भोजनास असले तरी तोटा यावयाचा नाहीं. ती घागर अद्यापि मुंजे याचें घरांत आहे. उत्साहांत तुपाचा तोटा येत नाहीं.

एकदां स्वामी इंदुरास आले. तेथें साठ ब्राह्मण पाण्यांत उभे राहून पर्जन्याकरितां अनुष्ठान करीत आहेत, असें पाहून स्वामींनीं सांगितलें कीं, सर्वांनी बाहेर यावें. आणि सांगतों त्या-

प्रमाणें करावें ह्मणजे आज वृष्टि होईल. मग स्वामींनी कोळशाचा मारुती रेखून त्याजवर अभिषेक करविला. नंतर दोन प्रहर झाले असतां स्वामींनी जवळच्या झुडपांत भोजनाचें सर्व सामान दाखविलें व सर्वांस भोजन घालून विडादक्षिणा सुद्धां दिल्ह्या. तों अकस्मात् ढगें येऊन सर्वत्र वृष्टि झाली, पण स्वामी मंडळीसुद्धां होते त्या ठिकाणीं कोरडे राहिले. हा चमत्कार सर्वांनीं पाहून आश्चर्य केलें.

एकदां रामदासस्वामी रामघळीचे रानांत असतां दोन प्रहरीं साठ ब्राह्मण आले, ते स्वामीचें दर्शन घेऊन निरोप घेत असतां भोजनास राहा असें सांगून स्नानास पाठविलें. नंतर कल्याण गोसावी स्वामीचा शिष्य हा भोजनाची तयारी एथें अरण्यांत कोठून करावी असी चिंता करीत आहे तों स्वामींनी आज्ञा केली कीं, पात्रें मांडा. त्यावरून जवळ जीं दोन चार पात्रें होतीं तीं मांडू लागला तों तीच साठ पात्रें झालीं. याप्रमाणें भोजनाचे सर्व पदार्थ विडा दक्षिणेसुद्धां सर्वांपुरतें वाढले. हा चमत्कार पाहून सर्वांनीं विस्मय केला.

एकदां माहुली संगमीं स्वामी स्नानास गेले ते दिवसीं कपिलाषष्ठी पर्व होतें, तेव्हां रामदास हे राजगुरु ह्मणून ब्राह्मणांनीं स्नानाचा संकल्प सांगितला. स्वामींनी एकेकास गंगेंतील गोटे उचलून दिल्हे ते त्यानीं स्वामीची थट्टा करून फेकून दिल्हे. त्यापैकीं एका ब्राह्मणानें तो धोंडा धोत्राचे पदरीं बांधून घरीं नेला तो दुसरे दिवसीं सोडून पाहातांच सोन्याचा झाला.

स्वामीचा एक शिष्य फार प्रेमळ होता तो स्वामीला विडा कुटून द्यावयाचा तो चावून देत असे. हा अपराध उघडकीस आणावा ह्मणून जवळच्या मंडळीनी असें केलें कीं, एकदा स्वामींनी विडा खलबत्त्यासुद्धां मागितला. तेव्हां त्यानें आपलें शिरकमळ चावलेल्या विड्यासुद्धां छेदून शिवाजीचे हवाली केलें. नंतर स्वामींनी कृपाळू होऊन शिवाजीकडून त्याचे मस्तक धडावर बसविलें आणि त्यास यथापूर्व जिवंत केलें.

या प्रमाणें शिवाजी राजाच्या कारकीर्दीत रामदासस्वामींचें

बहुत चमत्कार हजारो लोकांनीं पाहिले. जितके त्यांच्या दर्शनास येत त्यांजवर ते कृपादृष्टि ठेऊन सर्वांसी समाधानानें भाषण करीत. बहुतांच्या विषबाधा दूर केल्या, रोग घालविले, इत्यादि लोकोपकारी बहुत कृत्यें करून शके १६०३ माघ वद्य ९ स आपल्या वयाच्या ऱ्याहत्तराव्या वर्षीं समाधिस्थ झाले.

## वामनपंडित.

हा सातार प्रांत किंवा कोल्हापूर एथील राहणारा ऋग्वेदी ब्राह्मण होता. तो मध्वमतानुसारी असे. हा प्रथम महा पंडित असून त्यानें संस्कृत भाषेंत पुष्कळ ग्रंथ केले होते आणि वादविवादामध्यें पंडितांस जिंकीत असे.

त्याविषयीं असी एक दंतकथा आहे कीं, काशीच्या पंडितांस जिंकावें याबुद्धीनें तो त्या क्षेत्रीं गेला. तो रात्रौ एका अश्वत्थाच्या वृक्षाखालीं राहिला. मध्यरात्रीचे सुमारास त्या वृक्षावर ब्रह्मसमंध होते ते आपआपल्यांत स्थळाविषयीं भांडूं लागले. पंडितानें तो वाद ऐकून प्रश्न केला कीं, तुह्मी किमर्थ भांडतां ? त्यांनीं उत्तर केलें कीं, दक्षिणेंतून वामनपंडित ह्मणून कोणी एक ब्राह्मण काशीच्या पंडितांस जिंकण्याकरितां आला आहे. तो उद्यां सर्व पंडितांस जिंकील आणि हर्षवायु होऊन मरेल. तो ब्रह्मसमंध होणार आहे, या करितां त्याला बसायाला जागा पाहिजे ह्मणून आह्मी भांडतों. पंडितास तें ऐकतांच पश्चात्ताप झाला आणि तेव्हां पासून त्यानें ईश्वरभजनाकडे चित्त लावलें, आणि संस्कृत भाषेचा व्यासंग सोडून महाराष्ट्र भाषेंत कविता करूं लागला.

असो. त्यापुढें त्यानें भक्तिपर आणि वेदांतपर असे श्लोकबद्ध कविताग्रंथ पुष्कळ रचिले. त्याची वाणी मधुर, प्रौढ, गंभीर, आणि शब्दालंकार व अर्थालंकार अशा गुणानीं पूर्ण असल्यामुळें रसिक जनांस प्रिय असी आहे.

वामनकृत ग्रंथ येणें प्रमाणें. भागवतांतील ब्रह्मस्तुतीवर श्लोकबद्ध टीका. भगवद्गीतेवर समश्लोकी टीका. तसी यथार्थ-

दीपिका या नांवाची ओवीबद्ध दुसरी एक मोठी टीका.

तसें भागवतांतील कित्येक प्रकरणांवर आख्यानें रचिलीं, तीं येणें प्रमाणें. नामसुधा, वनसुधा, वेणुसुधा, दधिमंथन, भामाविलास, रुक्मिणीविलास, वामनचरित्र, कालीयामर्दन, इत्यादि. निगमसार, चित्सुधा, कर्मतत्व, राजयोग, चरमगुरुमंजरी, आणि श्रुतिकल्पलता हीं वेदांत प्रकरणें. भारतांतील भीष्मप्रतिज्ञा, पार्थभाग्य, लोपामुद्रासंवाद, इत्यादि प्रकरणें श्लोकबद्ध रचिलीं. तीं एकंदर ३६ आहेत. रामायणांतील भरतभाव, रामजन्म, सीतास्वयंवर, इत्यादि आख्यानें रचिलीं आहेत. आणि भर्तृहरीकृत तिन्ही शतकांवर, गंगालहरीवर व शंकराचार्यकृत अपरोक्षानुभूतीवर समश्लोकी. अशा अनेक विषयांवर श्लोकबद्ध ग्रंथ व टीका केल्या आहेत.

निगमसार ग्रंथांत वामनानें असें लिहिलें आहे कीं, मी ब्रह्म आणि आत्मा यांच्या ऐक्याविषयीं विचार करीत असतां, आत्म्यास सत् आणि चित् पदांच्या संबंधानें ब्रह्मता प्राप्त होते हें मला कळलें. परंतु आनंद पदाचा संबंध कळेना यास्तव मी चिंतेंत पडलों, इतक्यांत ईश्वर सन्याशाच्या रूपानें प्रगट झाला आणि माझ्या सर्व शंका दूर करून मला सर्व उपनिषदांचें सार समजावून दिल्हें.

अणखी असें सांगतात कीं, रामदास, तुकाराम, आणि वामनपंडित या तिघांच्या भेटी घडल्या होत्या आणि रामदासाच्या अनुग्रहेंकरून वामनाला अनुभविक ज्ञान प्राप्त झालें.

निगमसार ग्रंथ समाप्त झाल्यावर वामनपंडित फार दिवस जगला नाहीं. तो शके १५९५ वैशाख शुद्ध ६ या दिवसीं कृष्णातीरीं वांईक्षेत्राजवळ पांडववाडी ह्मणून गांव आहे तेथें मरण पावला. त्याच्या शिष्य मंडळीनें त्याच्या पादुका अद्यापि संभाळून ठेवल्या आहेत व त्यांची पूजा करीत असतात, असें ऐकण्यांत आहे. त्याचे वंशज अद्यापि काशी क्षेत्रीं आहेत.

## मुक्तेश्वर.

लीलाबाई ह्मणून एक एकनाथाची कन्या होती. तिचा पुत्र हा मुक्तेश्वर. तो जातीचा देशस्थ ब्राह्मण पैठणचा राहणारा शके १५३१ सांत जन्मला. त्याच्या बापाचें नांव विश्वंभरबावा. मुक्तेश्वर जन्मतः मुका होता परंतु एकनाथस्वामीच्या प्रसादानें त्यास वाचा फुटून तो मोठा कवि झाला. त्यानें महाभारताच्या अठरा पर्वांवर पांडवप्रतापाप्रमाणें एक ग्रंथ केला आहे, तो विराट पर्वापर्यंत पाहण्यांत आहे. बाकीचा कोणी द्वेषानें बुडविला असें ह्मणतात. मुक्तेश्वरानें प्राकृत रामायणही केलें आहे परंतु तो ग्रंथ कोठे सांपडत नाहीं. तसाच भागवतावर मराठी भाषेंत ओवीबद्ध त्याचा एक फार सुंदर आणि रसभरित असा मोठा ग्रंथ आहे.

मुक्तेश्वराप्रमाणें रसाळ ओंव्या कोणत्याही कवीच्या नाहींत. त्यानें आपल्या कवितेमध्यें शृंगार, वीर, आणि करुणा, हे रस चांगले साधले आहेत. उपमा, उत्प्रेक्षा, दृष्टांत, इत्यादि अर्थालंकार हे त्याच्या कवितेंत पुष्कळ अढळतात. त्याचें वर्णन प्रौढ असून चमत्कारिक आहे. त्याच्या वाणींत मार्दव आणि माधुर्य हे गुण असून ती प्रासादिक आहे असें लोक मानतात.

मुक्तेश्वरानें **हरिश्चंद्राख्यान** केलें आहे, तें छापलें आहे. तेंही फार रसाळ आहे. आणि **शतमुखरावणाख्यान** केलें आहे, तेंही छापलें आहे व अणखी पुष्कळ ग्रंथ असतील परंतु ते प्रचारांत नसल्यामुळें त्यांचीं नांवें समजलीं नाहींत.

मुक्तेश्वराचें मरणवृत्त कळलें नाहीं. तो शिवाजी राजाचे वेळीं होता. त्याला सुमारें २५० वर्षें झालीं.

## देवीदास.

हा मोठा भगवद्भक्त होता. याला साक्षात्कार असे. याच्या कवितेच्या रचनेवरून हा मुक्तेश्वराचे वेळेस असावा असें वाटतें. यानें **व्येंकटेशस्तोत्र** या नांवाचें लहानसें पुस्तक केलें आहे. त्यांत विष्णूची स्तुति व मानसपूजा आहे. त्याच्या ओंव्या १०८

आहेत. ह्या देशांत पुष्कळ लोक हें स्तोत्र दररोज भक्तिपुरःसर पठण करितात. यानें **करुणामृत** ह्मणून दुसरें लहानसें पुस्तक केलें, त्यांत भगवद्भक्तांचें संक्षिप्त वर्णन आहे, व **संतमालिका** हीं यानेंच केली आहे. हीं तिन्ही पुस्तकें छापून ह्यांच्या असंख्य प्रति झाल्या आहेत.

## तुळसीदास.

हा बृजभाषेंतला उत्कृष्ट कवि चित्रकूटाजवळ हाजीपूर ह्मणून एक गांव आहे, तेथें सरवरिया ह्मणून एक गौड ब्राह्मणाची शाखा आहे तींत जन्मला. तो वाल्मीकीऋषीचा अवतार होता असें त्याच्या कित्येक कृत्यांवरून समजलें. त्याच्या बापाचें नांव आत्मारामपंत. त्याचा व्रतबंध केल्या नंतर बापानें त्याला बारा वर्षेंपर्यंत ब्रह्मचारी ठेऊन त्याजकडून वेदाध्ययन करविलें. मग सोडमुंज करून त्याचें लग्न केलें. त्याच्या बायकोचें नांव देवीममता. ती मोठी पतिव्रता असून उभयतांमध्यें प्रीति पराकाष्ठेची असे. कांहीं काळानंतर तुळसीदासाला रामभक्ति आणि कडकडीत वैराग्य हीं प्राप्त होण्यास असें कारण घडलें कीं, एके दिवशीं देवीममता ही माहेरी गेली असतां हा मध्यरात्रीं पांच कोस चालून तेथें गेला, तेव्हां दारें बंद होतीं परंतु देवीममता ज्या माडीवर निजत असे त्या खिडकींतून एक मोठा साप खालीं लोंबत होता तो दोर आहे असें समजून त्या सापालाच धरून वर चढला. उभयतांची भेट झाल्यानंतर तो साप होता असें देवीममतेला समजल्यानंतर तिनें तुळसीदासाला ह्मटलें जसें माझ्या भेटीस्तव तुह्मी सापालाही ओळखिलें नाहीं असें जर तुमचें देवाकडे लक्ष लागेल तर केवढें कल्याण होईल बरें ? हेंच तिचें बोलणें तुळसीदासाच्या ह्रदयांत ठसून त्याला वैराग्य आणि रामभक्ति हीं प्राप्त झालीं. अयाचित वृत्तीनें जें मिळेल तें भक्षण करून तो प्राण रक्षण करी. कोणी कांहीं उत्तम वस्त्रें दिल्हीं तर तीं वांटून देऊन आपलें शरीर केवळ अमंगळ ठेवित असे.

एके दिवशीं हा चित्रकूट एथें असतां यानें शौचाच्या वेळीं कांहीं उदक वृक्षाच्या मुळांत टाकिलें, त्या उदकानें तेथील पिशाच तृप्त होऊन त्यानें याला मारुतीची खूण सांगितली. त्यावरून याला मारुतीचें दर्शन झालें. मग मारुतीनेंही हा तुळसीदास वाल्मिकाचा अवतार असें जाणून याला रामदर्शन करविलें. तेव्हां रामानें याच्या मस्तकावर वरदहस्त ठेविला, तेव्हांपासून याच्या अंगीं कविताशक्ति व अद्भुत चमत्कार करण्याचें सामर्थ्य आलें.

एकदां वाराणसींत असा चमत्कार झाला कीं, एका सावकाराची पतिव्रता स्त्री सहगमन करण्यास निघाली, तेव्हां तिनें दासाकडे येऊन नमस्कार केला. दासानें तिला सौभाग्यवती, तुला आठ पुत्र होतील असा आशीर्वाद दिल्हा. मग तिनें आपला पति शांत झाल्याचा सर्व वृत्तांत सांगितला असतां दासानें ह्मटलें कीं, जें मी बोललों तें सर्व रघुपति खरें करील. पुढें त्याचप्रमाणें ती प्रेताजवळ गेली तों तिचा भ्रतार जिवंत झाला व पुढें तिला आठ पुत्रही झाले.

दासाचे अनेक चमत्कार ऐकून शके १५८५ मध्यें दिल्लीचा बादशाहा जो शाहाजाहान यानें प्रधानाकडून दासाला हस्तनापुरीं आणविलें व त्याचा यथोचित सत्कार करून सिंहासनावर बसविलें आणि सांगितलें कीं, मला रामदर्शन करवावें. तें त्यानें अमान्य केल्यामुळें तुला कारागृहीं टाकूं असें भय घातलें. त्यासमयीं दासानें मारुतीचें स्मरण करून त्याजकडून बहुत वानर सैन्य आणविलें. तें हस्तनापुरीचा समूळ नाश करण्यास प्रवृत्त झालें. हें जाणून बादशाहा दासाला शरण गेला व विनंती करून चूक मागून घेतली. ती असी कीं, महाराज मी तुमचा व्यर्थ छळ केला, त्याबद्दल तुला पाहिजे तें माग. त्यावरून दासानें तें शहर रामचंद्राचें आहे, तूं तें सोड इतकें ह्मणतांच बादशाहानें तें सोडून देऊन नवें शहर शाहाजाहानाबाद ह्मणून स्थापन करून तेथें राहिला. पुढें दास तेथून तीर्थाटन करीत करीत मथुरावृंदावनीं गेले, तेथें नाभाजीचें याचें संभाषण झालें व त्या-

नें केलेलें **संतचरित्र** त्यांत साक्षात् रामानीं भावि तुळसीदासाचें चरित्र वर्णन केलें होतें तो समग्र ग्रंथ नाभाजीपासून श्रवण केला.

तुळसीदासाचे पंक्तीस सहस्र ब्राह्मण नित्य जेवित असत. असें करितां करितां त्याची जनांत फार प्रसिद्धि झाली. कोणी द्रव्य, कोणी सुवर्ण पात्रें आणून देत असत. भोजनोत्तर पुष्कळ लोक मिळून मठांत भजन चालत असे. मग मठाचे दरवाजे उघडे टाकून सर्व मंडळी निजे. असें जाणून एके रात्रीं मठांत दोन चोर आले व सोन्यारुप्याच्या मोटा बांधून निघाले व सर्व दरवाजांतून बाहेर जाण्यास त्यानीं यत्न केला, परंतु रामलक्ष्मण धनुष्यबाण घेऊन रक्षण करीत होते. त्यामुळें त्यांची सुटका न होतां प्रातःकाळ झाला. तेव्हां त्यांनीं दासाला रात्रीचा सर्व वृत्तांत निवेदन केला व त्याला शरण जाऊन क्षमा मागितली. दास रामचंद्रानें आपल्या करितां फार कष्ट भोगले असें जाणून विस्मय पावले आणि चोरांला सांगितलें कीं, आतां तुमची इच्छा असेल तितकें द्रव्य न्यावें. परंतु दासाच्या दर्शनानें त्यांची बुद्धि निर्मळ होऊंन ते पुढें दासाजवळ राहिले व भक्तिमार्गांत निष्णात झाले.

एकदा एक सावकाराची अति रूपवती कन्या उपवर झाली, तेव्हां तिचा बंधु उत्तम वर पाहाण्याकरितां बहुत देश फिरून बऱ्हाण पुरीं आला. तेथें एका सावकारास एक कन्या व एक पुत्र अशीं दोन अपत्यें फारच सुरूप होतीं, तीं पाहण्यास त्याचे घरीं गेला. मुलाच्या बापानें पुत्राला एक नेत्र जाणून मुलीला मुलाचा वेष देऊन दाखविली. त्याचा असा विचार होता कीं, लग्नसमयीं मुलाला पुढें करावा परंतु तसें नहोतां मुलीमुलींचें लग्न लागलें. त्यावेळीं उज्जनींतील सावकारानें बऱ्हाणपुरकरांस तुच्छ करून त्याच्या मुलीला गाढवावर बसविलें व तिची फार विटंबना केली. मग तिनें आर्त स्वरानें ईश्वराचा धांवा केला. तेव्हां दासाच्या प्रसादानें तिचे सर्व अवयव पालटून तत्क्षणीं तो मुलगा झाला. हा चमत्कार पाहून सर्वांस सानंदाश्चर्य झालें. त्यावेळेपासून तुळसीदास हा साक्षात्कारी असें लोकांस समजलें.

याचा गुरू जो जगन्नाथदास त्या बरोबर वृंदावन एथें गोवर्धन ह्मणून ठिकाण आहे तेथें गेला व नंतर थोड्याच वेळानें काशीस परत आला. तेथें शके १६०९ वांत रामायण केलें. तें **तुळसीकृतरामायण** यानांवानें लोकांत प्रसिद्ध आहे. त्यावेळीं त्याचें वय ३१ वर्षांचें होतें. **रामगुणावली, गीतावली,** व **विनयपत्रिका** हेही ग्रंथ यानें केले. ते काव्यरूपानें लिहिलेले असून त्यांत नीतीचा व भक्तिमार्गाचा विचार फार चांगला सांगितला आहे. याखेरीज त्यानें केलेलीं पदें, दोहरे, चोपय्या, वगैरे पुष्कळ लोकांच्या ऐकण्यांत आहेत.

तुळसीदास काशीस राहत असतां तेथें सीतारामप्रीत्यर्थ एक देवालय बांधिलें व त्याच्या समीप एका मठाची स्थापना केली, तीं अद्यापि आहेत. तो शके १६२४ या वर्षांत जाहांगीर बादशाहाच्या वेळीं मरण पावला.

## नाभाजी.

हा कवि हिंदुस्थानांत राहत असे. हा जन्मांध होता. पांच वर्षांचा असतां सर्व देशांत दुष्काळ पडला होता आणि अन्न मिळेना ह्मणून त्याच्या आईबापानीं त्याला अरण्यांत नेऊन सोडिलें. तेव्हां हा तेथें खेळण्याच्या नादांत कांहीं वेळपर्यंत राहिला. मग आईचें स्मरण करून रडूं लागला. इतक्यांत आग्रदास व कील हे दोघे महा वैष्णव होते, ते गंगास्नानाला जात असतां त्यानीं नाभाजीला पाहिलें आणि सर्व विचारून घेऊन त्यांस त्याची दया आली. नंतर कीलानें आपल्या कमंडलूतून उदक घेऊन त्याच्या नेत्राला सेचन केलें, त्या योगानें त्याचे नेत्र आले. पुढें उभयतांनीं त्याला बरोबर घेऊन आपल्या मठांत आणिलें. परंतु हा मुल डोंब ह्मणजे महार होता असें समजल्या वरून त्यानीं त्याची झोंपडी अंगणांत बांधून दिल्ही होती आणि तेथें त्याला ठेविलें व उच्छिष्ट जें असेल तें त्याला देण्याची परवानगी सांगितली. तेव्हां भक्तांचें उच्छिष्ट भक्षण केल्यानें, सत्कथाश्रवणानें, व जे साधु येतील त्यांच्या वंदनानें नाभाजी कांहीं दि-

वसानीं त्रिकालज्ञ झाला व त्याला त्रैलोक्यांतील सर्व गोष्टी सहज समजूं लागल्या. परंतु ही गोष्ट कोणास माहित नव्हती.

पुढें आग्रदासाच्या आज्ञेवरून नाभाजीनें **संतचरित्र** या नांवाचा एक ग्रंथ केला. त्यांत श्रीहरीचीं व भक्तांचीं चरित्रें वर्णन केलीं आहेत. त्याच्याच आधारानें पुढें भक्तलीलामृत ह्मणून ग्रंथ झाला. तशाच त्यानें छपय्या चालीच्या पुष्कळ कविता केल्या आहेत.

हा जयपुरचा राजा मानसिंग याच्या वेळीं होता, यावरून त्याला अडीचशें किंवा तिनशें वर्षें झालीं असावीं. आणि तुळसीदास जो शाहाजाहान बादशाहाच्या वेळीं होता, त्यानें या नाभाजीची भेट वृंदावन एथें घेतली. ह्यावरून या ग्रंथकाराचा उदय अकबर बादशाहाच्या राज्याच्या शेवटीं झाला असें अनुमान होतें.

## चोखामेळा.

यानें विठोबाच्या स्तुतिपर कित्येक अभंग केले आहेत. याचें गांव पंढरपुर. हा जातीचा अंत्यज ( महार ) असून विठोबाच्या अट्टल भक्तांत याची गणना केली आहे. हा शिवाजी राजाच्या अमलांत शके १५७३ रांत होता. याच्या प्रेमभक्तिमुळें विठोबानें साक्षात् येऊन याचें घरचें दहीं दूध खावें, व प्रसंग विशेषीं भोजनासही जावें. याप्रमाणें संतलीलामृत ग्रंथांत याच्या चमत्कारिक गोष्टी लिहिल्या आहेत. पंढरपुरच्या लोकांनीं कट करून याला सरकारांतून असी शिक्षा ठरविली होती कीं, त्याला बैलाच्या पायीं बांधून मारावयास चालविलें. त्या प्रसंगीं विठोबानें प्रगट होऊन याला संकटांतून मुक्त केलें. असी त्याच ग्रंथांत याची गोष्ट लिहिली आहे.

## महिपतराव.

हा कवि जातीचा ब्राह्मण सातारा एथील राहणारा असे. त्याला होऊन दोनशें वर्षें झालीं. त्याला लहानपणींच शुद्ध म-

राठी भाषा शिकविली होती. मग त्याला सातारच्या राजाच्या पागेकडे कारकुनीची चाकरी मिळाली. चाळीस वर्षांचा वयाचा होईपर्यंत त्यानें ती चाकरी केली. भग विठोबाचा भक्त झाला. विष्णूच्या स्तुतिपर त्यानें शंभर आर्या केल्या. तो पन्नास वर्षांचा असतां मरण पावला.

## श्रीधरस्वामी.

हा पंढरपुराजवळ नाझरें ह्मणून गांव आहे तेथील एका कुळकरण्याचा मुलगा शके १६०० शांत जन्मला. तो जातीचा देशस्थ ब्राह्मण. त्याच्या बापाचें नांव ब्रह्मानंद आणि आईचें नांव सावित्री.

असें सांगतात कीं, हा चौदा वर्षांचा असतांच त्यानें चतुर्थाश्रम घेतला आणि तो बहुधा पंढरपुरासच राहत असे. तेथें त्यानें **पांडवप्रताप, हरिविजय, रामविजय, शिवलीलामृत, काशीखंड, ब्रह्मोत्तरखंड, जैमिनिअश्वमेध, पांडुरंगमहात्म्य**, इत्यादि प्राकृत भाषेंत ओंव्याबद्ध मोठमोठे ग्रंथ केले, आणि तसीच भगवद्गीतेवर ओंव्याबद्ध टीका केली.

श्रीधराची कविता फार रसाळ आणि कोमल असी आहे. त्याचे ग्रंथ बहुतेक हल्लीं छापिले आहेत आणि पुष्कळ लोक आस्थेनें वाचतात.

तो पैठण एथें सुमारें शके १६५० सांत आपल्या वयाच्या पन्नासाव्या वर्षीं समाधिस्थ झाला.

## नरसीमेहता.

हा कवि जुन्या गढईत राहणारा एक नागर जातीचा ब्राह्मण शके १६०० शांत होता असें अनुमान होतें. त्याची मुंज झाल्यानंतर सातव्या वर्षींच त्याची आईबापें निवर्तलीं. भक्तिविजयांत संतमालिकेंत याचें वर्णन चार अध्याय केलें आहे. पहिल्यांत त्याचा जन्म आणि त्याला शिवप्रसाद झाला ही गोष्ट; दुसऱ्यांत शिवानी त्याला वृंदावनांत नेऊन श्रीकृष्णाची रासक्री-

डा दाखविली. तिसऱ्यांत त्याच्या लग्नांत वऱ्हाड्यासुद्धां श्रीकृष्ण आले ही गोष्ट. चवथ्यांत हा मंगळकार्यानिमित्त आपल्या कन्येच्या घरीं गेला असतां तेथें हा दरिद्री ह्मणून छळणा केल्यावरून श्रीकृष्णानी कापडाचें दिंड आणून इष्टमित्रांसुद्धां जांवयाला उत्तम पोषाक दिल्हे ही गोष्ट. व कोणी पांथस्थ ब्राह्मणाला सातशें रुपयांची हुंडी द्वारकेस श्रीकृष्णावर लिहून दिल्ही आणि ते रुपये त्या ब्राह्मणाला द्वारकेंत मिळाले ही गोष्ट व अणखी दुसऱ्या कांहीं गोष्टी वर्णिल्या आहेत.

त्यानें **रासमंडळ** या नांवाचा गुजराथी भाषेंत एक ग्रंथ केला आहे. त्यांत कृष्णाचीं रासक्रीडा फार उत्कृष्ट वर्णिली आहे. तो ग्रंथ गुजराथी लोकांस मान्य आहे.

## केशवस्वामी.

हा कवि जातीचा ब्राह्मण असून विजापुरीं राहत असे. तो पूर्ण आत्मज्ञानी होता, तरी सगुण मूर्त्तीचा मोठा उपासक असे. त्याची पहिली गोष्ट असी सांगतात कीं, हा भजनांत तल्लीन असतां श्रीकृष्ण बाळरूपी होऊन त्याच्या खांद्यावर बसले असें एका कुणब्यानें आपल्या शेतांतून पाहिलें. ही गोष्ट स्वामीच्या लक्षांत नव्हती. पण त्या शेतकऱ्यानें श्रीकृष्णमूर्त्तिविषयीं विचारिलें असतां स्वामीनी अरण्यांत जाऊन भगवंताची प्रार्थना केली. ते वेळीं कृष्णाचा त्यास साक्षात्कार झाला. असें सांगतात कीं, विजापुरांत एका सावकारानें पन्नास हजार रुपये खर्च करून एक वाडा बांधिला. पण त्यामध्यें ब्रह्मसमंध असे तो सावकाराला फार पीडा देई. एकदां केशवस्वामी हे त्याचे वाड्यांत गेले असतां ब्रह्मराक्षसानें येऊन स्वामीला साष्टांग नमस्कार केला आणि त्याचा निरोप घेऊन वाड्यांतून निघाला.

एकदां केशवस्वामी हजारो संतमंडळीसुद्धां भजन करीत असतां कीर्त्तन समाप्तिनंतर सुंठ साखर ह्मणून प्रसाद वांटला. पण ती सुंठ नव्हती, वाण्यानें चुकून बचनाग दिल्हा होता. ही गोष्ट दुसरे दिवसीं वाण्याचे लक्षांत येऊन त्यानें शोध केला. परंतु

कोणाला कांहीं बाधा झाली नाहीं असें आढळलें. त्यानंतर पुढें स्वामींनी पूजा समयीं आपल्या मूर्तिकडे पाहिलें तों ती मूर्त्ति विवर्ण दिसूं लागली. तेव्हां स्वामींनी त्याचें कारण लक्षांत आणून ईश्वराची प्रार्थना केली आणि ती मूर्त्ति पूर्ववत् स्वच्छ दिसूं लागली. पुढें तो वाणी अनुताप पावून केशवस्वामीचा अनुग्रह घेऊन ईश्वरभक्ति करूं लागला.

केशवस्वामींनी ईश्वरस्तुतिपर पुष्कळ अभंग, आर्या, व पदें केलेलीं आहेत. तसें **एकादशीचेंचरित्र** हें स्वामींनीच केलें आहे.

---

## बोधलेबावा.

हा धामन गांवचा राहणारा शीघ्रकवि शके १६०० शांत होता. हा संतमंडळीमध्यें मोठा प्रख्यात होऊन गेला, आणि यानें पुष्कळ अद्भुत चमत्कार केले. याला कीर्त्तनांत आधीचें पाठांतर नसून वेळच्या वेळेस प्रसादिक कविता सुचत असे. हा पराकाष्ठेचा परोपकारी व नम्र होता.

एकदां दुष्ट यवनराजानें त्याचा छळ केला, त्यावेळीं पंढरीनाथाची त्यानें प्रार्थना केली असतां त्याजपुढें आणून ठेवलेल्या मासाचीं फुलें झालीं.

एकदां त्यानें यात्रेकऱ्यांकरवीं आपल्या क्षेत्रांतली सर्व कणसें खावविलीं आणि आपली पेवें ब्राह्मणांकरवीं लुटाविलीं. पुढें असा चमत्कार घडला कीं, त्याच्या शेतांतील सोंपटाला दुप्पट कणसें आलीं आणि रीतीं पेवें नव्या धान्यानीं भरलीं. हा चमत्कार बहुत लोकांनीं पाहिला.

धामन गांवापासून राळेर ह्मणून दोन कोसांवर एक गांव आहे, तेथें बोधलेबावा एकादशीच्या दिवसीं कीर्त्तनाला जात असत. एकदां असें घडलें कीं, राळेरच्या एका कुणब्याला सर्पदंश होऊन तो शेतांत मरण पावला. तेव्हां गांवांतील कुटाळ लोकांनीं असा विचार केला कीं, बोधलेबावा रामनामाचा मोठा महिमा सांगत असतात. रामनाम घेणाराला अग्नि जाळीत नाहीं, विष

बाधीत नाहीं, तर आतां तेथें हें प्रेत नेऊन बोधलेबावाची फजिती करूं. मग कोणाला नकळतां प्रेत कीर्त्तनांत आणून ठेवलें. जेव्हां रामनामाचा गजर करून टाळी वाजवावी ह्मणून बोधलेबावानी सांगितलें, तेव्हां जे प्रेत घेऊन आले होते ते ह्मणाले महाराज, हा तुमच्या समोर बसलेला गृहस्थ तुमचें ऐकत नाहीं. परंतु तो मरण पावला ही गोष्ट बोधलेबावास ठाऊक नव्हती. मग बावा त्या प्रेतासमोर येऊन बोलले, "बाबा, नरदेहास येऊन हरिभजनाचा आळस करूं नको, टाळी पिटून मुखानें नामघोष कर." हें बोलतांच तो कुणबी नामघोष करून टाळ्या पिटून पूर्ववत् जिवंत झाला. हा चमत्कार पाहून सर्व लोक त्याला शरण आले.

याप्रमाणें त्याजकडून पुष्कळ चमत्कार घडले. ते भक्तिविजय व भक्तलीलामृत नामें ग्रंथांत वर्णिले आहेत. त्याचे वंशज अद्यापि धामन गांवास आहेत.

## अमृतराय.

कटिबंध किंवा कटाव असा एक कवितेचा प्रकार आहे. अमृतराय हा कटिबंध कविता करणारा प्रख्यात चतुर, विद्वान्, व शीघ्रकवि होऊन गेला. तो पद्यरचना इतकी जलद करी कीं, लेखकास ती लिहिण्यास अवकाश सांपडत नसे. त्याची वाणी फार मनोरंजक असून कवनांत यमकाचा भरणा अतिशय आहे. अमृतरायानें विरक्त होऊन अनेक बोधपर विषयांवर व कांहीं आख्यानांवरही कटाव केले आहेत. ते बहुधा उपलब्ध असून कित्येक छापले आहेत. आजपर्यंत अमृतरायाच्या कटावा सारखा कटाव कोणत्याही कवीला साधला नाहीं. याची पद जोडण्याची व यमक बांधण्याची शैली फार उत्कृष्ट असे. त्याचे ग्रंथ. **दामाजीपंताचीरसद, शुकचरित्र, ध्रुवचरित्र, सुदामचरित्र, द्रौपदीवस्त्राहरण, मार्कंडेयावरचूर्णिका, रामचंद्रवर्णनावर, जीवदशेवर, गणपतीवर, दुर्वासयात्रा,** इत्यादि आख्यानें कटावबद्ध रचिलीं आहेत. तसे हिंदुस्थानी भाषेंतही

बोधपर व आख्यानपर त्याचे पुष्कळ कटाव ऐकण्यांत येतात. हरदास लोक कीर्त्तनामध्यें तालासुरावर कटाव ह्मणत असतात.

अमृतरायाचा इतिहास नवनीतांत जो लिहिला आहे, तो आह्मी एथें उतरून घेतों.

हा गृहस्थ औरंगाबादेस राहत असे. हा जातीचा देशस्थ ब्राह्मण होता. त्याच्या आईबापांविषयीं व जन्मकाळाविषयीं कांहीं शोध लागला नाहीं. औरंगाबादेस विसामोरो ह्मणून एक मोंगल सरकारचा मुत्सद्दी होता, त्याच्या पदरीं अमृतराय होता. हा स्वभावानें थट्टेखोर असे. असें सांगतात कीं, एकेदिवशीं त्यानें मध्वमुनीश्वर ह्मणून एक साधु होता त्याची थट्टा केली, त्यावरून त्यानें त्यास बोलावून नेऊन बोध केला. तो त्यास ह्मणाला कीं, ईश्वरानें तुला अमृततुल्य वाचा दिल्ही आहे व तुझ्या आईबापांनीं तुझें नांवही तसेंच ठेविलें आहे. तूं आपल्या वाणीचा असा वाईट उपयोग करून ती विफळ करतोस हें नीट नव्हे. तिची जर ईश्वरस्तवनाकडे किंवा लोकोपकाराकडे योजना केली तर फार चांगलें होईल. हा बोध ऐकून अमृतरायास पश्चात्ताप झाला. तेव्हां त्यानें मध्वमुनीश्वर यास गुरु करून आपलें लक्ष परमार्थ साधनाकडे लाविलें.

अमृतराय कथा करीत असे. असें सांगतात कीं, नानासाहेब पेशवे यानीं याची एक कथा करविली होती, ती ऐकून त्यांस संतोष झाला आणि त्यानीं त्याची फार प्रशंसा केली, यागोष्टीवरून अमृतराय १०० वर्षां पूर्वीं होता असें सिद्ध होतें.

अमृतरायाच्या कवितेंत अर्थगांभीर्य विशेष नाहीं परंतु त्यानें जें वर्णन केलें आहे तें इतकें सुरस आहे कीं, त्याच्यायोगानें ते ते विषय डोळ्यापुढें उभे राहिल्यासारखे दिसतात.

सुमारें शके १६७५ च्या सालीं अमृतरायाचें देहावसान झालें.

## मध्वमुनीश्वर.

हा कवि जातीचा ब्राह्मण अमृतरायाच्या वेळीं होता. तो नाशिकास राहत असे. याला पांडुरंगाचा साक्षात्कार हो-

ऊन त्यानें पदें, अभंग, यारूपानें ईश्वराचे गुणानुवाद वर्णिले. कांहीं दिवसांनीं तो औरंगाबादेस आला, तेव्हां तेथील लोकांनीं त्याला सकुटुंब राहण्याविषयीं आग्रह केल्यावरून तो तेथें राहिला. तो फार प्रेमभावें हरिकीर्त्तन करीत असे. कीर्त्तनांत स्वकपोलकल्पित प्रसादिक कविता करून गात असे, ह्यामुळें त्याची कीर्त्ति चहूंकडे पसरली.

कान्होजी आंग्र्या ह्मणून कोणी मराठा मुंबईंत राहत होता. तो फार धर्मशीळ व उदार असून पंडितांचा आदरसत्कार करीत असे. त्याचे पदरीं चौदाशें पंडित होते. त्यांत भास्कररायपंडित मुख्य होता. त्याला प्राकृत भाषेंत केलेले ग्रंथ आवडत नसत, यामुळें तो हरदासांचा द्वेष करी. तो जो कोणी कथेमध्यें अभंग, आर्या, पदें ह्मणेल त्याशीं वाद करून त्याची मानखंडना करी.

कांहीं दिवसानीं मध्वनाथ कान्होजीच्या घरीं आले. रात्री कीर्त्तनाचा घोष करतां करतां भास्कररायास फार क्रोध आला, नंतर नाथाचा व त्याचा पुष्कळ वाद होऊन पंडिताचा गर्वपरिहार होऊन कान्होजीस आनंद झाला. पुढें नाथ स्वदेशीं परत आले.

औरंगाबादेंत लक्ष्मणपंत ह्मणून कोणी गृहस्थ होता. तो नाथाच्या मागें टाळकरी असे. कांहीं कारणानें त्याला कारागृह प्राप्त झालें, त्या योगानें नाथ चिंताग्रस्त झाले ह्मणून विठोबानें काजीचें रूप धरून हाजीमहंमदखान कोतवाल होता त्यास शासन केलें. नंतर त्यास बंधमुक्त केलें. तो कोतवालही विरागी होऊन फकीर झाला.

मध्वनाथाला जरा प्राप्त झाली तेव्हां अशक्ततेमुळें त्यास पंढरीस येववेना ह्मणून त्यास दृष्टांत झाला कीं, उद्धवभट जोशी यांच्या अंगणांत दीड पुरुष खोल खाडा केला असतां विठोबारखुमाईची मूर्त्ति सांपडेल. त्याप्रमाणें त्यानीं खणून पाहिलें तों मूर्त्ति सांपडली. त्या मूर्त्तीची स्थापना नाथानीं केली आणि पुढें आमर-

णांत हरिकीर्त्तन गजरांत त्यानीं आपला काळ घालविला. ध-नेश्वराचेंचरित्र हें नाथानीं केलें.

## प्रेमाबाई.

प्रेमाबाई या नांवानें अंकित भक्तिपर कांहीं गाणीं, अभंग ऐकण्यांत आलीं आहेत त्यावरून कविमंडळांत या बाईची गणना करितों. ही शके १६०० शांत असावी असें वाटतें. हिचें गांव, जात, गोत याविषयीं ऐकण्यांत नाहीं. भक्तलीलामृत ग्रंथांत संतमाळिकेंत इचा वृत्तांत लिहिला आहे, त्यांत इचा स्वभाव, नेम, आणि मरणाची गोष्ट लिहिली आहे. ही स्वभावानें फार दयाळू आणि प्रेमळ होती. गंगास्नान, श्रीगोपाळाची पूजा, भागवतश्रवण, ईश्वरनामाचें कीर्त्तन हें अखंड करीत असे. पुराण कीर्त्तन ऐकतां ऐकतां सद्गदित होऊन प्रेमाश्रू ढाळतांना वारंवार लोकांच्या अढळण्यांत आल्यावरून तिला प्रेमाबाई हें नांव दिल्हेलें आहे.

एके दिवसीं संतमंडळी घरीं आली असतां पुराणास जायाला बनलें नाहीं. पण आपल्या दाहा वर्षाच्या मुलांकडून श्रीकृष्णाची कथा ऐकत असतां सद्गदित होऊन संसारकृत्य आपल्या मुलाकडे सोंपून देऊन हिनें त्याच वेळीं देह विसर्जन केलें.

## निंबराज.

हा नामलगांवकर कुटुंबवत्सल ब्राह्मण देवैदैठण गांवची कुळकरण वृत्ति करून त्या गांवीं राहत असे. हा शके १६०० शांत होता. कांहीं दिवसांनीं तो प्रपंचांत विरक्त होऊन तीर्थाटन करूं लागला. तो हिमालयापर्यंत जाऊन तीर्थें व क्षेत्रें फिरला. भागीरथीच्या तीन कावडी रामेश्वरास आणून वाहिल्या. तो आपले जपव्रतादिक निष्काम बुद्धीनें करीत असे. असें असतां त्यास गजाननाचा प्रसाद झाला. तो असा कीं, ब्राह्मणाच्या रूपानें रात्रीं येऊन निंबराजाच्या हातीं विडा दिल्हा, तो त्यानें भक्षिला

व त्या विंड्याची तांबडी खूण त्याच्या हातावर अक्षय राहिली होती असें ह्मणतात. " पुढें कीर्त्तन करूं लागला तें वैष्णवजन श्रवण करून तल्लीन होत असत.

एकदां हा पंढरपुरीं गेला तों रुक्मिणीनें त्याचें सत्त्व पाहण्या करितां असें केलें कीं, आपण माळणीचा वेष घेतला आणि गाजरांच्या फोडी पांटी भरून हटांत बसली. तेथें निंबराज आले, त्याची प्रार्थना केली कीं, मी आपलें तान्हें मूल घरांतून आणी तोंपर्यंत ही पांटी संभाळ. इतकें सांगून गेली ती पुनः आलीच नाहीं. यानें कांहीं वेळानें पांटीकडेंस पाहिलें तों ती पांटी सोन्यानी भरली होती. हें ईश्वरी मायेचें कृत्य जाणून तो पांटी टाकून निघाला.

एकदां भगवानही ब्राह्मणाचें रूप धरून चंद्रभागातीरीं स्नानार्थ गेले व उदकांत स्नान करण्याच्या वेळीं तुळसीची माळ व टोपी याच्या स्वाधीन केली व अदृश्य झाले. नंतर सर्वांनीं यास देवाची देणगी आहे असें सांगितल्यावरून ती माळ व टोपी तो धारण करीत असे. तो कीर्त्तन करीत असतां श्रीकृष्ण मयूर पिच्छांनीं त्याजवर वारा घालीत असत असें सांगतात, इत्यादि त्याच्या चमत्कारिक गोष्टी भक्तिविजयांत सांगितल्या आहेत.

यानें पदें वगैरे ईश्वर स्तुतिपर कविता केल्या आहेत असें ऐकण्यांत आहे.

## कान्होपाठक.

हा केंदूर नामें गांवांत राहणारा ब्राह्मण मोठा भगवद्भक्त शके १६०० शामध्यें होता. याची वृत्ति बाह्यात्कारी प्रपंचांत निमग्न दिसून अंतरीं मोठा विरक्त होता.

एकदां कोणी काशीकर पंडित त्याची भेट घ्यावी ह्मणून मुद्दाम काशीहून केंदूरास आला. पण कान्होपाठकाची भेट झाली तेव्हां तो आपल्या मुलाला खेळवीत बसला होता. हें पाहून काशीकर यानें उपहास करून ह्मटलें "महाराज, लेंकरांच्या

मायाजाळांत कशासाठीं गुंतलां, याचा त्याग करा." तें बोलणें मान्यकरून कान्होपाठकानें आपलें लेंकरूं उचलून विहिरींत टाकून दिल्हें. तेंव्हां काशीकर याला बहुत पश्चात्ताप झाला. पुढें असें घडलें कीं, कान्होपाठकानें ईश्वराचा धांवा केला आणि तें लेंकरूं काशीकरादेखतां त्याच्या समोर धांवत आलें. हा ईश्वरी साक्षात्कार पाहून काशीकर यास बहुत विस्मय झाला आणि त्याचा उपदेश घेऊन आपल्या क्षेत्रीं गेला.

कान्होपाठकानें **नामापाठकी अश्वमेध** या नांवाचा एक ग्रंथ केला आहे. त्याचे १२० अध्याय आहेत.

## मुद्गलभट्ट.

हा ब्राह्मण उत्कृष्ट रामभक्त होता. तो वेदशास्त्रसंपन्न असून निगर्वी, सर्वांभूतीं नम्र आणि दयाळू असा होता. अयाचित वृत्तीनें तो आपला प्रपंचनिर्वाह करी. याचे घरीं सीता, राम, लक्ष्मण, भरत, आणि शत्रुघ्न यांच्या फार सुंदर मूर्त्ति वडिलोपार्जित होत्या. त्यांची तो नेमानें पूजा करीत असे. प्रतिवर्षी रामनवमीचा मोठा उत्साह करीत होता. त्या उत्साहानिमित्त द्रव्यवान् लोकांकडून त्याला पुष्कळ पैसा मिळत असे.

एकदां मुद्गलभट्ट काशीयात्राकरून येत असतां त्याची कीर्त्ति ऐकून बहुत लोकांनीं त्याला द्रव्य आणि वस्त्रेंभूषणें वगैरे दिल्हीं. तेंव्हां चोरांनीं त्याची पाळत राखून लुटायाला हात्यारबंद होऊन आले. त्यावेळेस असें कौतुक घडलें कीं, राम, लक्ष्मण, भरत, शत्रुघ्न यांनीं धनुर्धराचें रूप धरून मजलदरमजल मुद्गलभट्टाच्या पाठीशीं राहून त्याला घरापर्यंत पोंहचविलें. परंतु ते धनुर्धारी चोरांच्या मात्र दृष्टीस पडत असत. मुद्गलभट्ट घरीं पोंहचल्यावर चोर त्याला शरण आले आणि धनुर्धाऱ्यांची गोष्ट त्यास सांगितली. त्यावेळीं मुद्गलभट्टानें ह्मटलें "हर हर, द्रव्यानिमित्त देवाला शिणविलें." याप्रमाणें अणखीं त्याला ईश्वरी साक्षात्कार घडले. यांनें रामचंद्राच्या स्तुतिपर आर्या केल्या आहेत, त्या फारच करुणारसभरित आहेत. त्याला **मुद्गलश**

तक असें ह्मणतात. तसाच त्यानें दुसरा एक ग्रंथ केला, त्याला मुद्गलरामायण असें ह्मणतात.

## सुभानराव.

हा कवि जातीचा ब्राह्मण असून मद्रासेपासून पश्चिमेस सुमारें चाळीस कोशांवर अरनि ह्मणून एक गांव आहे, तेथला राहणारा असे. त्याची भरभर आरकाटचा नबाब सादत्तउल्लाखान याच्या वेळीं शके १६४० सांत झाली. अरनि एथील राजाच्या दरबारीं त्याला चाकरी असे. सुभानरावास लहानपणीं चांगली शिक्षा प्राप्त झाली. त्यानें आपलें आयुष्य ईश्वरसेवेंत घालविलें. वीस वर्षांचा असतां आपली बुद्धि वाढावी ह्मणून तो ज्योतिष्मती ह्मणजे मालकांगोणीचें तेल प्याला, तेणेंकरून त्याला खायखाय सुटली. त्याला आपले धन्यापासून दोन गांव इनाम मिळाले. त्यांचे उत्पन्नानें त्यानें कांहीं औषधोपचार करून आपली भूक शांत केली. त्याला हैदराबाद एथें तानीशाकडे वकील ह्मणून पाठविला असतां त्यानें मोठ्या व्यवस्थेनें आपला उद्देश साधला. बादशाहाला आपल्या पराक्रमाचीं उदाहरणें दाखवून त्यापासून मोठीं मोलवान् बक्षिसें मिळवून पुनः स्वग्रामीं परत आला. तो हनुमंताचा भक्त असे. त्यानें सीता आणि राम यांच्या विवाहाविषयीं शंभर श्लोकांचें एक आख्यान रचिलें आहे. तो ह्मातारा होई तोंपर्यंत वांचला आणि अरनि एथेंच समाप्त झाला.

अरनि राजाच्या पदरच्या मुजुमदाराजवळ जे लेख होते त्यांवरून त्याचें हें चरित्र सांगितलें आहे.

## मोरोपंतपंडित.

पुण्यापासून सुमारें तीस पस्तीस कोसांवर बारामती ह्मणून गांव आहे, तेथें बाबूजी नाईक जोशी ह्मणून कोणी जहागीर-

दार गृहस्थ राहत होता. त्याच्या पदरीं बापूजीपंत-ऊर्फ रामचंद्रपंत पराडकर या नांवाचा एक कारकून असे, तो जातीचा कऱ्हाडा ब्राह्मण होता. त्याचा पुत्र हा मोरोपंत. तो कोल्हापुरानजीक पन्हाळी ह्मणून एक गांव आहे तेथील राहणारा शके १६५१ मध्यें जन्मला.

पूर्वी असी चाल होती कीं, कारकून असला तरी त्यानें काव्याभ्यास करून भागवत लागे इतकी व्युत्पत्ति शिकावी. त्या संप्रदायाप्रमाणें मोरोपंतानें काव्य, नाटकें, व पुराण इत्यादि व्युत्पत्ति संपादिली होती.

प्रथम मोरोपंत हा कारकुनी लिहिण्यांत हुशार व प्रमाणिक असून यजमानाचे पदरीं जामदार खान्याची देखरेख करणारा होता. एके दिवसीं जमाखर्चाच्या लिहिण्यामध्यें मोरोपंताला पाव आण्याची चूक लागली, ती शोधून काढण्याकरितां पंताला तीन रात्र जागरण करावें लागलें, तरी चूक सांपडली नाहीं. इतक्यांत त्याचे यजमान अकस्मात् त्याच्या बसायाच्या जागीं आले आणि त्यानीं विचारिलें कीं, जागरण किमर्थ करितां ? पंतानीं उत्तर दिल्हें कीं, जमाखर्चांत कांहीं चूक लागली आहे ती शोधून काढण्याकरितां. यजमानास मोठें आश्चर्य वाटलें आणि सहजावृत्त्या बोलले कीं, मोरोबा, पाव आण्याच्या शोधा करितां त्वां त्रिरात्र श्रम करून व्यर्थ जागरण केलेंस, असें जर ईश्वराच्या शोधाकरितां श्रम करितास तर व्यर्थ गेलें असतें काय ? मोरोपंताला तें यजमानाचें उपदेशपर भाषण ऐकून अनुताप झाला आणि लागलेंच कानावर लेखणी होती ती यजमानाच्या पायांवर वाहिली आणि घरीं राहण्याविषयीं आज्ञा मागितली. यजमानानेंही त्याचा पक्का भाव जाणून त्याला घरीं राहण्याविषयीं आज्ञा दिल्ही.

असें सांगतात कीं, मोरोपंत पुराण सांगत असे. एकदां बाबूजी नाईक त्याचें पुराण ऐकून खुष झाले आणि त्याला सालीना ५०० रुपये वेतन देऊन आपल्या जवळ पुराण सांगण्यास ठेविलें आणि त्याचा संसार जन्मपर्यंत चालविला.

मोरोपंत हा चतुरस्र व उत्कृष्ट बुद्धिमान असतां कविता करण्याचाही त्याला छंद होता. त्यानें निवांतपणीं आपल्या घरीं राहून आर्याबद्ध पुष्कळ ग्रंथ रचिले.

त्याजविषयीं अणखी असी गोष्ट सांगतात कीं, तो शके १७१० मध्यें काशीस गेला. तेव्हां त्यानें आपली कविता बरोबर नेली होती, ती काशींतल्या पंडितांनीं पसंत केली.

त्यानें १०८ रामायणें केलीं ह्मणून सांगतात. परंतु त्यांपैकीं थोडींच उपलब्ध आहेत. तीं येणेंप्रमाणें:—

**परंतुरामायण**—यांत प्रत्येक आर्येमध्यें "परंतु" हा शब्द आणिला आहे.

**निरोष्ठरामायण**—यांत ओष्ठस्थानिक जीं पवर्गाक्षरें तीं कोणत्याही आर्येंत न येऊं देतां संपूर्ण रामायणकथा रचिली. **दानरामायण**, **मंत्ररामायण**, **अग्निवेश्यरामायण**, **भाविष्यरामायण**, **भावार्थरामायण**, **मयोरपंतीरामायण**, **हनुमंतरामायण**, इत्यादि चमत्कारिक रामायणें आहेत. भारताची मूलग्रंथाप्रमाणें १८ पर्वें केलीं आहेत, व तीं सर्व उपलब्ध असून त्यांपैकीं कांहीं छापलींही आहेत. भागवतांतील दशमस्कंधावर आर्या केल्या आहेत, त्याही छापल्या आहेत आणि त्यांतील कित्येक इतिहासावरही आर्या आहेत. सप्तशती व मल्लारीमहात्म्य यांवर आर्या आहेत. **केकावळी** ह्मणून ईश्वरस्तवनपर एक फारच उत्कृष्ट ग्रंथ केला आहे, तो छापला आहे. शंकराचार्यांचा प्रश्नोत्तरमालिका ह्मणून एक ग्रंथ आहे त्यावरही आर्या आहेत. नळोपाख्यान, पंढरीस्तुति, हनुमत्स्तव, सन्मणिमाला, रासक्रीडा, धनाक्षरी, रामचरित्र, आणि अहिल्योद्धार यांवर साक्या, आणि कित्येक पदें. याप्रमाणें अनेक विषयांवर आर्या, साक्या, पदें, केलेलीं अढळतात. परंतु त्याची कविता प्रायः आर्याछंदोबद्ध आहे. प्राकृत कवितेमध्यें आर्या कवनांत मोरोपंत फारच प्रख्यात कवि झाला. त्याविषयीं कोणी एकानें आर्या केली आहे कीं,

॥ सुश्लोक वामनाचा अभंगवाणीप्रसिद्धतुकयाची ॥
॥ ओवी ज्ञानेशाची किंवा आर्या मयोरपंताची ॥

यावरून सहजच कळेल कीं, कोणकोणत्या कवितेमध्यें कोणकोणते कवी उत्कृष्ट होऊन गेले.

मोरोपंताची वाणी शुद्ध, प्रौढ, सरळ, आणि स्थळविशेषीं फारच रसाळ आहे. त्याच्या कवितेंत यमकादिक शब्दालंकारांचा मोठा भरणा आहे. बहुधा सर्व यमकें श्लिष्ट अथवा द्व्यर्थपदांनीं साधलेलीं आहेत. उपमा, रूपक, उत्प्रेक्षादि अर्थालंकार तर पुष्कळच आहे. त्याच्या कवितेंत संस्कृत शब्द फार आहेत. कित्येक ठिकाणीं एक एक चरण अथवा अर्ध शुद्ध संस्कृत भाषेंतच केलें आहे. ज्यांस संस्कृत येत नाहीं, त्यांस त्याची कविता चांगलीशी समजत नाहीं. संस्कृत भाषेंतही त्यानें कांहीं शतकें व स्फुट श्लोक केले आहेत.

मोरोपंत आपल्या वयाच्या ६५ व्या वर्षीं शके १७१६ चैत्र शुद्ध १५ मंगळवार आनंदनाम संवत्सर या दिवशीं मरण पावला. त्याचे वंशज हल्लीं पंढरपुरास आहेत.

## साळ्यारसाळ.

हा पंढरपुरकर यजुर्वेदी ब्राह्मण शके [illegible] हा शास्त्रांत निपुण असून वक्ता, आचारसंपन्न, आणि विठोबाचा उत्तम भक्त होता. यानें संपूर्ण **रामायण** महाराष्ट्र भाषेंत ओव्याबद्ध रचिलें आहे. त्याला लोक **रसाळरामायण** असें ह्मणतात. याची वाणी फार रसभरित होती, त्यामुळें रसाळ हें नांव लोकांनीं दिल्हेलें आहे. यानें सुंदरकांडापर्यंत रामायण ग्रंथ रचिला त्यावेळेस श्रीरुक्मिणीनें कांहीं चमत्कार दाखविला. त्यानंतर संपूर्ण ग्रंथ सिद्धीस गेला, असी याविषयीं सविस्तर गोष्ट संतलीलामृतांत लिहिली आहे.

## रामजोशी.

हा सोलापुरचा-सुखवस्तू राहणारा जातीचा देशस्थ ब्राह्मण

होता. तो पहिल्या बाजीरावाच्या वेळीं होता. तो कथाकीर्तन करून आपलें उपजीवन करीत असे. तो कवि असून मोठा चतुर वक्ता होता. त्यानें लावण्यांच्या चालीवर कविता फार केली आहे. तो कथेंत प्रायः आपलीच कविता ह्मणत असे. मोरोपंताची कविता त्यानें फार प्रसिद्ध केली असें सांगतात.

रामजोशी याचा जन्म शके १६८४ या वर्षी झाला; आणि तो शके १७३४ या वर्षी मृत्यु पावला. मरण समयीं त्याचें वय पन्नास वर्षांचें होतें असें सांगतात

यानें छंदःशास्त्रावर **छंदोमंजरी** या नांवें एक ग्रंथ केला आहे. या खेरीज याचे दुसरे ग्रंथ एथें फारसे सांपडत नाहींत. याची कविता सरस असून बोधपर आहे.

## रघुनाथपंडित.

हा कवि सुमारें १७०० व्या शतकांत प्रसिद्धीस आला. याचें दुसरें वृत्त कांहींच माहीत नाहीं. यानें एक लहानसा ग्रंथ केला आहे, त्याला **नलदमयंती स्वयंवराख्यान** असें ह्मणतात. त्याचीं एकंदर चाळीस पंचेचाळीस पृष्टें आहेत. त्यांत माधुर्य व रस इतका आहे कीं, तो आरंभापासून शेवटपर्यंत वाचल्या वांचून मनाची तृप्ति होत नाहीं.

नलदमयंतीस्वयंवर हा विषय शृंगाररसप्रधान असल्यामुळें बहुधा सर्वांस आवडणारा आहे. तशांत कवीची रसानुकूळ रचना व प्राकृत असून मनोहरण करण्यासारिखी वाणी यांचें साहाय्य झाल्यावर ती कविता आल्हादकारक व चित्तवेधक कां होणार नाहीं ?

रघुनाथपंडिताच्या कवितेंत प्रास, यमक, इत्यादि शब्दालंकार व उपमा, रूपक, उत्प्रेक्षा, इत्यादि अर्थालंकार पुष्कळ व चांगले साधले आहेत. छंद गोड व नानातऱ्हेचे योजले आहेत. शब्दरचना जरी संस्कृतमिश्रित आहे तरी क्लिष्ट नाहीं, व वर्णन चमत्कारिक असून अमर्याद अतिशयोक्तीनें भरलें नाहीं.

## शाहामुनी.

शाहाबावा ह्मणून कोणी एक परदेशी जातीचा मनुष्य मयाग एथें जन्मला. त्याच्या बायकोचें नांव आमीनाबाई, ती मोठी पतिव्रता होती. तिच्या पोटीं जानाजी ह्मणून एक पुत्र उज्जिनीस झाला. तो मोठा विष्णुभक्त असे. त्याच्या बायकोचें नांव मंडूबाई. तिच्या पोटीं एक पुत्र झाला, त्याचें नांव मानशिग. त्याचा जन्म भीमातीरीं सिद्धटेक ह्मणून एक क्षेत्र आहे तेथें झाला. तो गणेश उपासक असे. त्याच्या बायकोचें नांव अमाई, तिला लोक ताई असें ह्मणत असत. तिच्यापासून एक मुलगा झाला, त्याला त्याच्या पणज्याचें नांव ठेऊन शाहमुनी असें ह्मणत असत. हाही मोठा वैष्णव असे व वेदांतामध्यें फार निपुण असे.

त्यानें **सिद्धांतबोध** ह्मणून एक महाराष्ट्र भाषेमध्यें प्राकृत ओवीबद्ध ग्रंथ केला आहे, त्याचे पन्नास अध्याय आहेत. त्यांत बहुधा वेदांताचाच उपदेश आहे, कथाभाग फारसा नाहीं. हा ग्रंथ शालिवाहन शकाच्या १७०० व्या शतकांत समाप्त झाला आहे. यावरून हा आलिकडचाच आहे. ह्या कवीचे दुसरे ग्रंथ किंवा त्याची दुसरीं कृत्यें मस्तुत कोठें उपलब्ध नाहींत.

## महिपति.

याला कोणी महिपतिबावा असेंही ह्मणतात. हा जातीचा देशस्थ ब्राह्मण गोदावरीच्या कांठीं पैठणा जवळ ताहराबाद नामें गांव आहे त्यांत राहत असे. तो वैराग्यशील साधु होता. त्यानें **भक्तिविजय**, **संतविजय**, **संतलीलामृत**, **भक्तलीलामृत**, आणि **कथासारामृत** हे अनुक्रमानें मोठे ओवीबद्ध ग्रंथ केले. त्यांत मुख्यत्वेंकरून भक्तांच्या व संतांच्या लीला वर्णिल्या आहेत. नाभाजी याचें ग्वाल्हेरी ह्मणजे हिंदुस्थानी भाषेंतलें जें संतचरित्र व मानदेशचा उद्धवचिद्घन याचें भक्तचरित्र व इतर ग्रंथांतरीच्या कथा यांच्या आधारानें त्यानें हे ग्रंथ रचिलें आहेत. तसेच त्यानें **पांडुरंगस्तोत्र**, **शनिमाहात्म्य**, **कृ-**

**क्तलीलामृत, तुकारामचरित्र,** इत्यादि लहान लहान ग्रंथ केले. महिपति हा शरीरप्रकृतीनें अशक्त होता. त्याला एवढे मोठाले ग्रंथ करण्याची शक्ति नव्हती तथापि त्यानें भगवत्प्रेरणेनें ग्रंथ लिहिले असे त्याच्याच ग्रंथांत पदोपदीं लेख आहेत. तो आपल्या वयाच्या ८० वर्षी मरण पावला.

भक्तलीलामृत ग्रंथाच्या शेवटीं शालिवाहन शक १६९६ हा लिहिला आहे, यावरून या कवीला ८६ वर्षे होतात.

## भैरवनाथ.

हा अर्वाचीन कवि शके १७०० मध्यें होता. तो जातीचा कोण होता हें पक्कें ठाऊक नाहीं; परंतु त्याच्या लेखावरून तो बहुधा ब्राह्मण असावा असें वाटतें. तो विटपक्षेत्रीं राहत असे.

त्यानें **नाथलीलामृत** ह्मणून फार उत्कृष्ट व रसिक असा एक ग्रंथ केला आहे, त्याचे २८ अध्याय आहेत व ओव्या एकंदर ४८५ आहेत. ह्या ग्रंथांत प्राचीन काळचे गोरक्ष मच्छेंद्रादि भक्तांच्या कथा वर्णिल्या आहेत व प्रसंगवशांत वेदांतही सांगितला आहे. हा ग्रंथ शके १७५६ जयनाम संवत्सर, चैत्रमास, गुरुवार, रामनवमीचे दिवशीं समाप्त झाला. असा त्या ग्रंथांत लेख आहे. याचे अणखी ग्रंथ असतील परंतु ते प्रस्तुत अनुपलब्ध आहेत.

## बाळगंगाधरशास्त्री जांभेकर.

हा अर्वाचीन काळांत पश्चिम हिंदुस्थानामध्यें प्रख्यात बुद्धिमान व विद्वान् असा पुरुष होऊन गेला. राजापुराजवळ पोंभुर्लें ह्मणून एक गांव आहे, तेथें तो सन्न १८१० मध्यें जन्मला. याला इंग्लिश, संस्कृत, कानडी, पर्शियन वगैरे भाषा चांगल्या येत असून इंग्रेजी व हिंदुज्योतिष व इतर विद्या यांतही तो निष्णात होता. त्याच्या विद्वत्तेवरून त्याला अल्प वयांतच प्रोफेसरची पदवी दिल्ही आणि सन्न १८२९ मध्यें एल्फिन्स्टन विद्यालयांत गणितशास्त्र व ज्योतिष इत्यादि शिकविण्यास त्याला विद्यागुरु

नेमिलें. त्या शाळेचें काम त्यानें सजनदारीनें चालविलें. मुंबईतील ज्याग्रफिकल सोसैटि व रायल एशियाटिक सोसैटि यांच्या विद्यावृद्धि करण्याच्या कामांत त्यानें पुष्कळ मदत केली. मुलांच्या विद्याभ्यासाकरितां त्यानें कित्येक पुस्तकें तयार केलीं. त्यांपैकीं **बाळव्याकरण, नीतिकथा, सारसंग्रह, भूगोलविद्या** हे चार ग्रंथ प्रथम होत. **इंग्लंडदेशाचा इतिहास** व **एल्फिनूष्टनकृत हिंदुस्थानाच्या इतिहासाचासंक्षेप** आणि **भूगोलशास्त्र गणितभाग** याग्रंथांचे मराठी भाषेंत उतारे त्यानेंच केले.आणि **मरेज व्याकरण** शोधिलें.

त्यानें **दर्पण** नामें एक आठवड्यास निघणारें वर्तमान पत्र कित्येक वर्षें चालविलें, तें मराठी व इंग्लिश या दोन्ही भाषांत होतें. याच्या पूर्वीं मुंबईमध्यें वर्तमानपत्र कोणतेंच निघत नव्हतें. पुढें **दिग्दर्शन** नांवाचें एक मासिक पुस्तक त्याच्याच आश्रयानें कांहीं वर्षें निघत होतें.

तो विद्याभ्यासाविषयीं व अनेक उपयुक्त विषयांचे शोध करण्याविषयीं उत्कंठित आणि प्रयत्नशाली असे. त्याची आयुष्यमर्यादा दीर्घ असती तर आजपर्यंत विद्येच्या कामांत त्याच्या हातून मोठालीं कृत्यें घडलीं असतीं, याविषयीं संशय नाहीं. तो सभ्यतेमुळें साहेब लोकांस व नेटिवांसही मान्य असून सर्वांस प्रियकर असे. त्याच्या कारकीर्दींत कित्येक चांगले विद्यार्थी तयार झाले, ते अजून सरकारी मोठमोठाल्या कामावर व शाळांवर नेमिले आहेत.

बाळगंगाधरशास्त्री हा आबरक्रांबीच्या पुस्तका प्रमाणें मानसविद्येवर कांहींसे पुस्तक करीत असतां आणि एल्फिनूष्टन साहेबाच्या पुस्तकाधारें हिंदुस्थानची बखर रचीत असतां त्या काळांत कांहीं नवीन शोध करण्यासाठीं कित्येक दिवस श्रीकनकेश्वरीं जाऊन राहिला होता, तेथें ज्वर आल्यावरून मुंबईस परत आला. पुढें त्याच दुःखण्यानें तो सन्न १८४६ सांत मे महिन्याचे १७ वे तारिखेस बारावर एक वाजतां मरण पावला.

# तामिळ कवि.

## सेंतकर.

ह्या कवीचा जो आपणास वृत्तांत मिळाला आहे त्यावरून असें समजतें कीं, तो शालिवाहन शकाचे पूर्वीं सुमारें १०० वर्षांवर होऊन गेला आणि जो लेख आहे, त्यावरून असें दिसतें कीं, तो संघातर नामक राजाच्या अठ्ठेचाळीस कविरत्नमाळिकेंत शिरोमणि होता. मधुरा हें त्याचें वास्तव्य असे. चंपकमार ज्याला वामनचंडामणिपांडेय असेंही ह्मणतात, त्याच्या राज्यांत सुंदरेश्वर देवानें ह्या कवीला कविगणांत एक स्थान दिल्हें होतें त्यावर तो बसत असे. एके दिवशीं चंपकमारानें सर्व कवींस विचारिलें कीं, माझे पत्नीचे केशांस जो सुगंध आहे तो स्वाभाविक आहे किंवा कृत्रिम आहे ? राजानें एका खांबास एक सहस्र रुपयांची थैली टांगली आणि सांगितलें कीं, जो कोणी या प्रश्नाचें उत्तर देईल त्यास ती मिळेल. धामग नामें एक गरीब वृद्ध ब्राह्मण तेथें होता, त्यानें सुंदरेश्वराची मनांत प्रार्थना केली, तेणेंकरून त्याला असी प्रेरणा झाली कीं, "राणीच्या केशांस जो सुगंध आहे तो स्वाभाविक आहे असें तूं उघड सांग." तें सांगितल्या वरून त्याला ते रुपये बक्षीस मिळाले. सुंदरेश्वरानें वृद्ध ब्राह्मणाचें रूप घेऊन धामगाला साहाय्य केलें ह्मणून सेंतकर कांहीं भाषणें बोलला आणि तसाच वादविवाद चालविला. ईश्वरानें आपलें रूप प्रगट करून त्याला तृतीय नेत्र दाखविलें. मग ह्या कवीला प्रथम भय वाटलें ह्मणून आपल्या आसना वरून उठला. परंतु मोठ्या धैर्यानें कांहीं वादाचे प्रश्न केले, तेव्हां सुंदरेश्वराचा क्रोधाग्नि पेटला, आणि त्यानें त्याला शाप दिल्हा कीं, एक अति नीच पुरुष तुला वादामध्यें जिंकील. यानंतर यादकदर हा सेंतकराशीं बहुत दिवस संभाषण करीत असे. एक नीच जातीचा कवि तेरूवेल्लूवर तेथें आला, त्यानें **कोरल** नामक आपला ग्रंथ त्याच्या पुढें टाकला, तो तत्काळ अदृश्य झाला.

## आव्हैयरप्रभृतिसमज्ञानी.

हीं नामांकित सात माणसें एका अंत्यजाच्या कन्येपासून उत्पन्न झालीं. त्यांत आव्हैयर, अपग्गा, वालींज, आणि आरव्वे ह्या चौघी कन्या आणि तेरूवेह्रूवर, आधिकनान, आणि कपिलर हे तिचे पुत्र. हीं सातही भावंडें नीतिशास्त्रांत प्रख्यात होतीं. प्राचीन ग्रीक आणि तामिळ लोक हे आजतागाईत यांची कीर्त्ति गात आहेत.

आव्हैयर सर्वांत वडील. ही तर नीतिशास्त्रज्ञांपैकीं प्रख्यात स्त्री असून इतर पुष्कळ विद्याविषयांत निष्णात होती. हिनें नीतिशास्त्रावर ग्रंथ केले, त्यांपैकीं **अतिसुदि, कोनिवेंडन, मुदुरुसी, नादवाली,** आणि **कालवीऊलुकं** हे ग्रंथ तामिळ देशांतील विद्यालयामध्यें शिकवीत असतात. या खेरीज ज्योतिःशास्त्र, वैद्यक, रसायन, आणि भूगोल या शास्त्रांवर तिचे ग्रंथ आहेत. याशिवाय कल्प, मंत्र, धातुवाद, जटिलीक्रिया, इत्यादि कलांच्या प्रकरणांतही ती फार माहितगार असे. आव्हैयर ही कल्पविद्येच्या योगानें २४० वर्षें वांचली होती असें सांगतात, आणि ही स्त्री अवतारी आहे असे लोक मानीत असत.

हीं सातही भावंडें जन्मतांच आईबापानी रानांत टाकिलीं होतीं. ममतेस्तव आई मात्र त्यांचा समाचार घ्यायाला जात असे आणि फार कष्टी होई. त्या साता जणाला वाचा फुटून त्यानीं वेगवेगळ्या प्रकारानें आपल्या आईचें समाधान केलें. तें संभाषण **कांडप्रनाम** या ग्रंथांत लिहिलें आहे. हीं सातही भावंडें वेगळाल्या ठिकाणीं धार्मिक पुरुषांपासून सुशिक्षित झालीं. यांचा चमत्कारिक जन्मवृत्तांत त्या ग्रंथांतून संक्षेपानें लिहितों.

यांच्या बापाचें नांव पिरली आणि अजाचे नांव वेदमौळी. हा तर भविष्यवेत्ता कोणी सिद्धपुरुष आहे असा त्या वेळच्या लोकांमध्यें त्याचा सन्मान होता. एकदां वेदमौळीनें एका अंत्यजाच्या घरावर रात्रीचा दैदीप्यमान तारा पडतां पाहिला. तेथें एक नुकतीच कन्या जन्मली होती. वेदमौळीला तर भविष्य

समजलें कीं, ह्या कन्येचें माझ्या पुत्रा बरोबर लग्न होणार आहे. त्यावेळेस त्याचा मुलगा पिरली बारा वर्षांचा होता. त्या भवितव्यावरून वेदमौळीला फार वाईट वाटलें आणि त्यानें ती दुःखाची गोष्ट आपल्या ब्राह्मण मंडळीला मोहगम कळविली कीं, काल रात्रौ एका अंत्यजाच्या घरीं एक मुलगी जन्मली आहे आणि तिच्या योगानें ब्राह्मण मंडळी संकटांत पडणार आहे. वेदमौळीच्या बोलण्यावर लोकांचा भरवसा असे त्यावरून ब्राह्मणांला भय पडलें आणि त्या मुलीची कांहीं तरी व्यवस्था करावी असें ठरवून त्या अंत्यजाला बोलावून आणिलें आणि विचारिलें कीं, तूं आपल्या कन्येची हानि सोसितोस किंवा ब्राह्मण मंडळीला संकट यावें हें तुला आवडतें? त्या बिचाऱ्यानें ती मुलगी ब्राह्मणांच्या स्वाधीन केली आणि तुह्माला योग्य वाटेल तसें करा ह्मणून मोठ्या नम्रतेने सांगितलें. पुढें त्या कन्येचा घात करूं नये परंतु पेटींत घालून नदीमध्यें सोडून द्यावी. तेथें तिच्या प्रारब्ध योगानें जें घडेल तें घडो! असें वेदमौळीचें संमत पडल्यामुळें ती कन्या कावेरीच्या प्रवाहांत सोडून दिल्ही. पेटी पाण्यांत टाकण्याच्या पूर्वीं पिरलीनें त्या कन्येच्या मांडीवर एक लखलखीत तीळ पाहिला होता. याप्रमाणें ती गडबड शांत झाल्यावर थोडक्या काळांत वेदमौळी मरण पावला. ती पेटी नदींतून वाहत वाहत एका दूरदेशी कडेस लागली. तेथें कोणी प्रातःस्नायी ब्राह्मण स्नानसंध्या करीत बसला होता. तो तर अनपत्य असून संततीविषयीं नेहमी व्रतनियम करीत असे. त्याला ती नुकतीच जन्मलेली कन्या पेटींत सांपडली, ती देवानेंच दिल्ही असें त्याला वाटलें. पुढें त्यानें कन्येप्रमाणें तिचें पाळणपोषण केलें, विद्या शिकविली, आणि नीतिशास्त्रांत प्रवीण झाल्यावर साधुसंतांच्या संगतीनें आपला उद्धार व्हावा ह्मणून ती क्षेत्रयात्रा करूं लागली.

कांहीं दिवसानंतर पिरली हा पर्यटण करीत करीत सहजावृत्त्या त्या ब्राह्मणाच्या घरीं उतरला. कोठें तरी राहून विद्याभ्यास करावा असें त्याच्या मनांत आहे असें जाणून त्या

ब्राह्मणानें पिरलीला ठेऊन घेतलें आणि दोघांचें फार सख्य पडलें. शेवटीं त्यानें आपली गवसी कन्या देऊन त्यांचें लग्न केलें. कांहीं दिवसांनीं असें घडलें कीं, पिरलीची बायको स्नान करून दुसरें वस्त्र नेसत असतां तिच्या मांडीवरचा तो लखलखीत तीळ त्याच्या दृष्टीस पडला परंतु त्या तिळाविषयीं त्या बिचारीला कांहींच ठावकें नव्हतें, तरी पहिल्या खुणेवरून ती अंत्यजाची कन्या आहे असें पिरलीला वाटून चकित झाला. मग त्यानें ब्राह्मण मंडळींत बारीक शोध करून ती कन्या आपल्या सासऱ्याला कसीकाय प्राप्त झाली त्याविषयींचा पत्ता लावला.

मग पिरलीनें आपल्या उपकारी व ममताळू सासऱ्याचें मन न दुखावें ह्मणून कोणतीच गोष्ट प्रस्फुट न करितां मुकाट्यानें त्याच्या घरांतून बाहेर पडला आणि आपण सर्वथैव भ्रष्ट झालों असें त्याला वाटून फार खिन्न झाला.

तो निघून गेल्यामागें त्या ब्राह्मणाला मोठी चिंता प्राप्त झाली. शेवटीं त्यानें कन्येला आज्ञा केली कीं, तूं आपल्या नवऱ्याला शोधून आण किंवा तो जेथें राहील तेथें राहा. त्या नंतर तिनें आपल्या नवऱ्याचा पाठलाग केला आणि त्याच्या बरोबर ठिकाणोठिकाणीं फिरली. त्याला परत आणावें किंवा त्याच्या जवळ राहावें ह्मणून विनवणी केली. सरशेवटीं एका दिवसीं ती झोपेंत असतां तिला टाकून गेला. परंतु असें करण्याचें मुख्य कारण काय होतें तें बोलून दाखविलें नाहीं. मग ती एकटी एका गावांमध्यें रडत आणि उसासे टाकीत फिरत असतां त्या गावांतील एका सद्गृहस्थानें तिचा वृत्तांत ऐकून घेतला आणि तिला आश्वासन देऊन कन्येप्रमाणें घरीं बाळगिलें. ती त्याचे घरीं नीतीनें आणि नम्रतेनें वागत असतां त्याचीं सर्व मुलें तिला बहीण असें मानूं लागलीं. पुढें त्या गृहस्थानें मरणाच्या वेळीं आपल्या लेकरां बरोबर संपत्तीचा तिला वांटा दिल्हा. त्या संपत्तीवर तिनें अन्नछत्र घातलें. तेथें यात्रकऱ्यांचा आणि पांथस्तांचा उत्तमप्रकारें सांभाळ होत असे. अशा प्र-

कारें ती आपलें आयुष्य धर्माचरणांत आणि ईश्वरसेवेंत घालवीत असे.

या गोष्टीला पुष्कळ दिवस लोटल्यावर कर्मधर्मसंयोगानें असें घडलें कीं, तिचा नवरा सहजावृत्त्या त्या छत्रांत आला आणि इतर पांथस्थांप्रमाणें तिनें त्याचें आतिथ्य केलें, परंतु त्यानीं परस्परांस ओळखिलें नाहीं. तोतर विद्वान् व सुशीळ असतां तिनें आपली कांहीं कांहीं हकीगत त्याला सांगितली, त्यावरून त्याला तिची ओळख पटली. तिचा सदाचार, नीति , आणि पातिव्रत्य असे सद्गुण पाहून त्याला फार आश्चर्य वाटलें.

तिला ओळख देऊं नये ह्मणून सकाळीं मुकाट्यानें उठून चालला तेव्हां जें तिनें सत्काराचें भाषण केलें त्यावरून त्याला फार गहिंवर आला आणि गांठोडे जमिनीवर टाकून तिला ओळख दिल्ही आणि अतःपर सोडून जाणार नाहीं ह्मणून वचन दिल्हें. पुढें त्या उभयतांनीं तीर्थयात्रा केल्या आणि तीं सुखानें नांदूं लागलीं.

पुढें असी आश्चर्याची गोष्ट झाली कीं, पिरलीच्या बायकोला सात मुलें झालीं. चार कन्या आणि तीन मुलगे. तीं प्रसूत झाल्यावर पिरलीच्या आज्ञेस्तव लेंकरूं रानांत नेऊन टाकीत असे. परंतु ममतेस्तव आई फार कष्टी होऊन वारंवार त्या लेंकरांकडे जाऊन समाचार घेऊन येई.

त्या सातांसही बाळपणांत वाचा फुटून त्यानीं आईचें समाधान केलें. त्यांत पहिल्यानें आईला ह्मटलें, आई, ज्या ईश्वरानें मला तुझ्या उदरांत अन्नोदक पोंहचवून उपजेपर्यंत वांचविलें तो आतां माझी उपेक्षा करील काय? करणार नाहीं. तूं संशय कां धरितीस? तर जा आणि ईश्वरावर भाव ठेव. दुसरा बोलला जो ईश्वर खडकाच्या पोटांत बेडकाला जीवन पोंचवितो तो माझी तजवीज करणार नाहीं काय? तर जा, काळजी करूं नको, आनंदाने राहा. तिसरा बोलला, आई, ज्या ईश्वरानें मला हें जग दाखविलें आणि ज्यानें माझी देवगति लिहिली तो

जीवंत नाहीं काय? तो मला उपासी मरूं देणार नाहीं. प्राणप्रिये आई, माघारे जा, चिंता करूं नको. चवथा बोलला पक्ष्यांची आंडीं कवचीनें वेष्टिलीं असतां जो आंतल्या पिलांस वांचवितो, मग तीं बाहेर आल्यावर पोसणार नाहीं काय? देव माझें तसेंच रक्षण करील. खिन्न होऊं नको, देवावर विश्वास ठेव. पांचवा ह्मणाला, ज्या परमेश्वरानें झाडांलाही अति सूक्ष्म रसवाहिनी शिरा दिल्या आणि त्यांस त्वचा आणि सालपटें यांनीं वेष्टून त्यांला वाढवितो आणि त्यांजकडून जीवजंतूंचें पोषण करितो तो माझा समाचार घेणार नाहीं काय? तर जा, खेद करूं नको. साहावा ह्मणाला, आई, मनुष्यांचें प्रयत्न केवळ क्षुल्लक आणि व्यर्थ आहेत. ज्या परमेश्वरानें एवढें अपार जग उत्पन्न केलें आणि त्यांतील असंख्यात जीवांचा समाचार घेतो तर ही गोष्ट मनांत आणून हर्ष कर. सातवा बोलला, ज्या परमेश्वरानें अनेक प्रकारच्या वनस्पती उत्पन्न केल्या आणि त्यांना मधुर, आम्ल, लवण, कटु, कषाय असे वेगळाले रस, स्वाद, व सुगंध इत्यादि दिल्हे तर असा समर्थ परमेश्वर मला पुरविणार नाहीं काय? तर प्रियकर आई, रडूं नको, आनंद कर.

असो. पुढें तीं लेंकरें मोठ्या चमत्कारानें वाढलीं आणि वेगळाल्या जातीच्या लोकांच्या घरीं त्या प्रत्येकाचा सांभाळ झाला. आव्हेयर हिला एका कवीनें पढविलें. ती आमरणांत कुमारीच राहिली. ती विद्या आणि कलाकौशल्यांत बुद्धिमान असे ह्मणून तिच्या मरणावरून लोकांस फार दुःख वाटलें.

## तेरूवेल्लूवर.

हा कवि आव्हेयर हिचाच दुसरा बंधु होय. त्यानें तिच्या प्रमाणेंच जन्मतः विपत्ति भोगिली; परंतु मैलापूर एथील पेरूयर नामक पुरुषानें त्याचें पालनपोषण करून त्याला वाढविलें. तो आपल्या पणांत आला तेव्हां मधुरा शहरास जाऊन त्या

वेळच्या वंदेशेखर राजाचे दर्बारांत वादविवाद करून एकूण पन्नास पंडितांस जिंकीले. तो नीच जातीचा असतांही त्याला तामिळ एथील विद्यालयांत घेतलें. त्यानें त्यालूवरकोरल नामक एक ग्रंथ रचिला, त्यांत मानवी प्राण्याच्या आयुष्यांतील निरनिराळ्या स्थितींचें अनुक्रमानें उपदेशरूप श्लोकबद्ध वर्णन केलें आहे. ह्या ग्रंथाची प्रसिद्धि दक्षिण हिंदुस्थानभर आहे आणि तामिळ भाषेंत जे सांप्रत ग्रंथ आहेत त्यांत याची रचना सर्वोत्कृष्ट असी मानलेली आहे. त्या ग्रंथाचें इंग्रेजींत भाषांतर मयत मिस्तर. एफ् एलिस साहेबानें केलें आहें. वेल्लूवर यानें ह्याला वाढविलें होतें, यावरून ह्याला तेरूवेल्लूवरं असें ह्मणत असत. अणखी नीतिविषयावर याची फार उत्कृष्ट आणि मनोरंजक श्लोकबद्ध कविता सर्वत्र अढळते.

## अधिकनान.

हा कविही आव्हेयर इचाच बंधु होय. तो इतका दैववान होता कीं, त्याला एका राजानें वाढविलें आणि शेवटीं त्याला आपल्या जातींत घेतलें. त्यानें नानातऱ्हेच्या विषयांवर पुष्कळ काव्यें केलीं.

## कपिलर.

हा वर सांगितलेल्या कवयित्रीच्या बंधुपैकीं एक होता. चोलादेशांत तेरूवेल्लुवर ह्मणून एक गांव आहे ती त्याची जन्मभूमि असें सांगतात. त्याला एका ब्राह्मणानें वाढविलें आणि तामिळ भाषा शिकविली. तींत तो फार प्रवीण झाला. त्यानें **आगवर** नामें एक ग्रंथ रचिला, त्यांत आपलें व आपल्या भाऊ व बहिणी यांच्या आयुष्यांत ज्या सर्व गोष्टी घडून आल्या त्यांत त्यांच्या जन्मभूमि इत्यादि सर्वांचें काव्यरूपानें निरूपण केलें आहे.

## अप्पगा.

ही कवयित्री आणि पुढील दोघींजणी आव्हेयर इच्या बहिणी होत. ती आरकाट प्रांतांत ऊटकाडू खेड्यांत जन्मली होती आणि तिला एका परीटाच्या स्त्रीनें वाढविलें. तिनें **नीतिपातल** नामें एक नीतिशास्त्रावर ग्रंथ लिहिला आहे.

## मुरग्गा.

ही कवयित्री चोला देशांत कावेरीपटनम् एथें जन्मली होती. तिला एका भंडाऱ्याचे स्त्रीनें वाढविलें होतें. तिनें नानाप्रकारच्या विषयांवर थोडी थोडी कवनें केलीं आहेत.

## वालीज.

ही कवयित्री एका डोंगरी देशांत जन्मली होती. कारवार जातीच्या लोकांनीं तिचें पालनपोषण करून तिला वाढविलें. तिनें पुष्कळ काव्यें रचिलीं आहेत.

## गणासंबंधर.

हा कवि जातीचा ब्राह्मण असे. त्याचा जन्म चिदंबर शहराजवळ शालि नामक खेड्यांत झाला होता. त्याला लहानपणीं चांगली विद्या शिकविली होती. तो फार सुज्ञ मनुष्य असे. त्यानें **तेवरम्** नामक एक ग्रंथ रचिला, त्यांत जैन लोकांच्या मताविषयीं जे त्यानें वादविवाद केले होते त्यांचें वर्णन आहे. ह्या कवीच्या मरणाचा सत्य वृत्तांत कोणास प्राप्त झाला नाहीं.

## अप्पर.

हा जैन मताचा कवि होता. हा गणासंबंधराशीं धर्माविषयीं वादविवाद करीत असे. असें ह्मणतात कीं, त्यानें ह्याचा पराजय केला, मग अर्थातच तो हिंदुधर्माप्रमाणें वागूं लागला. त्यानें तामिळ भाषेंत कित्येक कवनें केलीं, तीं सांप्रत उपलब्ध नाहींत.

## माणिक्यव्यासर.

हा कवि जातीचा द्रावीड ब्राह्मण होता. ह्याचा जन्म चिदंबर एथें झाला. शाळा सोडल्या नंतर तो फार धर्मनिष्ठ झाला आणि त्यानें चिदंबर नामक देवाच्या स्तुतिपर पुष्कळ कवनें रचिलीं. त्यानें सर्व विषय एकाच ग्रंथांत संग्रह करून त्यास **चिदंबरकोरू** असें नांव दिल्हें. त्याचे शिष्य व सर्व जातीचे लोक त्याला सन्मान देऊन त्याची फार वाखाणणूक करीत असत. तो बराच वृद्ध होऊन मरण पावला.

## सुंदरर.

हा कवि तेरूनिल्लूरू एथील राहणारा ब्राह्मण असे. त्यानें चिदंबरास अध्ययन केलें. त्यानें एक काव्य केलें, त्यास **तेवरम्** असें ह्मणतात.

## अगस्त्य.

हा एक मोठा नामांकित कवि होऊन गेला. लोकप्रसिद्ध जो अगस्त्य महामुनी त्याचा हा अवतार शूद्र जातीपासून उत्पन्न झाला, असें दक्षिण हिंदुस्थानांतील विद्वान हिंदुलोकांचें मत आहे. प्रथमतः यानेंच तामिळ भाषेंत एक व्याकरण केलें, त्याला **अगस्त्यव्याकरण** असें नांव दिल्हें. त्यांत एलकनम् याचे पांच प्रकार आहेत. त्यांचीं नांवें. एलूटू, चोलू, परलू, आप्पू, आणि आलंकारू.

त्यानें पुराण, न्यायशास्त्र, वैद्यशास्त्र, रसायनशास्त्र, धर्मशास्त्र, पूजापद्धति ह्या विषयांवर पुष्कळ ग्रंथ केले. तो फार पुरातन काळांत झाला होता ह्मणून त्या विषयीं परंपरागत ज्या इतिहासरूपी कथा आहेत त्याजवरूनच त्याचें हें चरित्र घेतलें आहे.

# तेलंगी कवि.

## अथर्वणाचार्य.

हा कवि फार प्राचीन काळांतला ह्मणजे सुमारें कलियुगाच्या तीन हजार वर्षांवर जन्मला असें ह्मणतात. संस्कृत व तेलंगी या भाषांत तो फार निष्णात होता. त्यानें महाभारताचा सारांश काढून एक ग्रंथ रचिला. आतां त्या ग्रंथाची सर्व प्रत कोठें उपलब्ध नाहीं परंतु त्याचे कांहीं भाग अर्वाचीन महा कवींनीं कोठें कोठें आपल्या ग्रंथांत उतरून घेतले आहेत.

## बालसरस्वति.

हा कवि जातीचा ब्राह्मण होता. तो विजयनगरची मुख्य राजधानी जी राजमहेंद्रि एथें जन्मला. तो नन्नयभट्टाचा गुरु होता व राजनरेंद्र याचा पुत्र जो शार्ङ्गधर तो याचा गुरुबंधु असे. प्रथम हा एका नामांकित पंडिताजवळ न्यायशास्त्र शिकला. त्याच्या मरणानंतर बालसरस्वतीची बुद्धि प्रकाश पाऊं लागली. मग नन्नयभट्टकृतजी आंध्रकौमुदी तिच्यावर टीका केली. तिचें नांव **आंध्रसभाचिंतामणि.** त्यानें दुसरे पुष्कळ ग्रंथ केले, परंतु त्यांचें कोणी रक्षण करून ठेविलें नाहीं.

## नन्नयभट्ट.

हा कवि शके ३२२ व्या वर्षी राजमहेंद्रि एथील राजा राजनरेंद्र याच्या वेळीं होता. लहानपणापासून याचें मन धर्माचरणाकडेस होतें. प्रथम त्यानें वेदांचा चांगला अभ्यास करून स्वल्प कालांत शास्त्राध्ययनही केलें. तो याज्ञिक क्रियेंत निष्णात असून त्यानें स्वतां सोमादिक पुष्कळ यज्ञ केले. तेलंगीभाषेंत त्यानें व्याकरण रचिलें, त्याला **आंध्रसभाचिंतामणि**

किंवा **आंध्रकौमुदी** असें नांव दिल्हें. या ग्रंथांच्या रचनेंत त्यानें आपलें मगल्भ ज्ञान आणि विद्वत्ता दर्शविली आहे. नन्नयभट्टानें बृहस्पती आणि व्यास यांच्या धर्मस्मृतीवर उत्तम व्यासंग केला त्यामुळें तो व्यवहारशास्त्रावर ग्रंथ रचण्यास समर्थ होता. या कवीनें आंध्रदेशीचा नारायणभट्ट नामें एका विद्वानाच्या साहाय्यानें महाभारताच्या दोन पर्वांचें तेलंगींत उत्कृष्ट भाषांतर केलें आणि तिसऱ्या पर्वाचें भाषांतर करीत असतां मरण पावला. तें काम समाप्त करण्यास कोणीच पत्करीना; नंतर नन्नयभट्टाचा शिष्य जो बालसरस्वती त्यानें तें मोठ्या मयासानें व व्यासंगानें पुरें केलें.

नन्नयभट्ट हा वेदशास्त्रसंपन्न व धर्मनिष्ठ असून महान् कवि होता आणि त्याचे ग्रंथ तैलंगणांत सर्व ठिकाणीं मान्य आहेत तरी त्याचें अणखी चरित्र लिहिण्यास ममाणिक आधार नाहीं.

## आंध्रकालिदास.

ह्मा कवीचा उदय शालिवाहन शकाच्या ९०४ यावर्षीं झाला. हा जातीचा तेलंगी ब्राह्मण होता. तो कृष्णानदीच्या किनाऱ्यावर एक देश आहे तेथला रहिवासी असे. तो लहानपणापासून तेलंगी व संस्कृत भाषा शिकत होता आणि तो यथाकाळीं मोठा गुणवान कवि झाला. तो नानामकारचे मदेशांतून पर्यटन करीत असे. त्यानें **संवर्तविजय** ह्मणून एका ग्रंथाचें तेलंगींत भाषांतर केलें. हा ग्रंथ अद्यापि असून सर्व तैलंगण देशभर याचा मोठा विस्तार आहे. भोजराजाच्या दर्बारीं कालिदास या नामें एक कवि होता, ह्मणून त्याहून या कवीचें अभिधान भिन्न असावें, या करितां ह्याच्या नांवाला **आंध्र** हें पद जोडलें.

## तिक्कनसोमयाजी.

हा पुरुष इतिहासवेत्ता असून नामांकित कवि होता. ने-

ल्लूरू प्रांतांत पोतूरु ह्मणून एक खेडें आहे तेथें जन्मला. याचा उत्कर्ष शालिवाहन शकाच्या १२०० च्या शतकांत झाला. यानें लहानपणीं कविराट याच्या जवळ तेलंगी व संस्कृत या दोन्ही भाषांत व्यासंग करून स्वल्प काळांत तो त्यामध्यें फार निष्णात झाला. मानसिंध राजाच्या आज्ञेवरून त्यानें तेलंगी भाषेंत महाभारताचें भाषांतर करण्यास आरंभ केला आणि त्याचीं पंध्रा पर्वें फार त्वरित संपविलीं. तो संस्कृत भाषेंत मार्मिक असून कवितेविषयीं मोठा शीघ्रमति होता. तो ग्रंथ संपविल्या बद्दल राजानें त्याला पुष्कळ जमीन इनाम दिल्ही. तिच्या उत्पन्ना पैकीं पुष्कळ द्रव्य त्यानें यज्ञ करण्यांत खर्चिलें. अशा त्याच्या धर्मकृत्यावरून त्याला तिक्कनसोमयाजी हें नामाभिधान प्राप्त झालें.

## पोतराजू.

हा बोम्मन कुलोद्भव कवि शालिवाहन शकाच्या १३०० च्या शतकांत प्रख्यातीस आला. हा रामाची भक्ति करीत असे. यानें लहानपणींच रामचंद्राच्या स्तुतिपर पुष्कळ पदें व अभंग रचिले होते. कांहीं काळानंतर त्याला रामचंद्राचा दृष्टांत झाला कीं, तूं श्रीमद्भागवताचें तेलंगींत भाषांतर करून मला अर्पण कर आणि हें कार्य सिद्धीस न्यायाला मी तुझें साह्य करीन, असें भगवंताचें अभिवचन प्राप्त होतांच पोतराजूनें भागवताचें भाषांतर करूं आरंभिलें तो दशमस्कंधाचें भाषांतर करीत असतां एक चमत्काराची गोष्ट घडली कीं, रूपलावण्यसंपन्न श्रीरुक्मिणीच्या वर्णन प्रसंगीं **पेनीडेलूबालकमरे** असा एक श्लोकाचा चरण रचिला. याचा अर्थ असा कीं, रुक्मिणी कुमारी बारा वर्षांची झाली. परंतु याच शब्दांतून दुसरा एक अर्थ निघतो कीं, रुक्मिणी कुमारी अग्नींत दग्ध झाली. असो. एथपर्यंत त्यानें कविता रचून मग स्नानाला गेला. तेव्हां वाटेंत असी गोष्ट घडली कीं, ती कुमारिका जमीनीवर रांगत असतां अकस्मात् अग्निकुंडांत पडली. तेव्हां रामचंद्रानें सत्वर येऊन त्याच्या कवितेचा कागद घेतला आणि

पेर्नाडेलू या चरणा बद्दल नेलता केव्वनंबू निंडियुंडे असा चरण लिहून ठेविला. तेव्हां ती कन्यका ईषन्मात्रही इजा नपावतां अग्निकुंडांतून बाहेर आली. या गोष्टीचें तात्पर्य एवढेंच समजायाचें कीं, हा कवि जसें चरित्र लिहील तदनुरूप गोष्ट घडली पाहिजे. असो. मग पोतराजू घरीं आल्यावर झालेली गोष्ट त्याला समजली आणि तें अर्धें पद्य वेगळ्या शब्दांनीं पूर्ण केलें, तें कृत्य भगवंताचें जाणून त्यानें रामचंद्राची स्तुति केली.

पोतराजूला माध्यान्ह काळाची देखील भ्रांति होती. एवढ्या हलाकींत होता तरी त्यानें आपली कविता मानवी प्राण्याला पैका मिळविण्या करितां दाखविली नाहीं. पोतराजूचा मेव्हणा स्त्रीनाथ तो रेड्डीवारू कुळांतील राजांकडे भेटायाला गेला आणि त्यांनीं त्याला आपल्या पदरीं ठेविलें होतें म्हणून पोतराजू त्याची वारंवार थट्टा करीत असे. पोतराजू हा फार वृद्ध होऊन मरण पावला.

## मल्लन.

तैलंगणामध्यें बोम्मन पोतराजू म्हणून एक विद्वान ब्राह्मण होता त्याचा हा पुत्र. याला बापानें घरीच काव्यालंकार, व्याकरण, इत्यादि ग्रंथ पढविले. यानें लहानपणींच **रुक्मांगद चरित्र** या नांवाचें वीररसप्रधान एक काव्य रचिलें. त्यांत विंध्यावली नामें राजकन्या आणि रुक्मांगद राजा, यांचा विवाहोत्सव वर्णिला आहे. या शिवाय त्यानें पुष्कळ काव्यग्रंथ केले म्हणून दंतकथा सांगतात परंतु त्या पैकीं सांप्रत एकही ग्रंथ उपलब्ध नाहीं.

## स्त्रीनाथ.

हा महा बुद्धिमान कवि पोतराजूचा मेव्हणा असून यानें अध्ययन त्याच्याच जवळ केलें. याला इतिहासग्रंथ चांगले वागत होते आणि रुद्रवीणा वाजविण्यांत मोठा निष्णात असे. यानें

काशीखंडांतील मरुतराजांची कथा काव्यरूपानें रचिली आहे. या कवीवर कोंडवीडू एथील राजा आन्नावेमारेड्डी याची मर्जी फार प्रसन्न असून त्यानें मुख्य न्यायाधीशीचा अधिकार याच्याकडे सोंपिला होता. याची व्यावहारिक भाषणशैली फार गोड होती आणि विशेषें करून स्त्रियांचे गुण, दोष, शील, स्वभावादि जाणून घेण्याकरितां हा अनेक देशांत फिरला आणि त्यांचें यथायोग्य वर्णन करून यानें कवितारूपें रचून ठेविलें. दुसऱ्याला बोलण्यामध्यें कोठेतरी छकवावें हा एक त्याच्यांत दुर्गुण होता. कारण कीं, अशा स्वभावाच्या पुरुषांस दुसऱ्यानीं छकविलें ह्मणजे ते खिशाणे होतात.

एकदां स्त्रीनाथ हा पर्यटन करीत असतां सूर्यास्ताच्या वेळीं नेल्लूरू नामक शहराच्या जवळ जवळ आला. तेथें एक गोंवाऱ्याचें लहान पोर वाटेने गाई हांकीत चाललें होतें. त्याला स्त्रीनाथानें सहजावृत्त्या विचारिलें कीं, एथून नगर किती दूर आहे? तेव्हां त्या पोरानें ह्मटलें तूं सूर्याकडे, मजकडे, आणि माझ्या गाईकडे पाहा ह्मणजे समजसील. तेव्हां स्त्रीनाथ चकित होऊन समजला कीं, खरें हें पोर गाई घराकडे जातात आणि संध्याकाळची वेळ त्यापेक्षां नगर जवळ आहे हें माझ्या ध्यानांत यावें.

पुढें जात असतां एका स्त्रीनें त्याला विचारिलें दादा, तुझें नांव काय? तेव्हां यानें उत्तर केलें कीं, स्त्रीनाथ * तेव्हां तिनें याला ह्मटलें कीं, तर मग तुझ्या आईचा नवरा कोण ? हा प्रश्न ऐकून स्त्रीनाथ ओशाळवाणा झाला आणि त्या नगराची वाट सोडून पुढच्या गावीं जाऊन राहिला. हा द्रव्यवान व राजेलोकांवर वर्णनपर काव्यें रचून त्यांपासून पैका मिळवीत असे. आणि त्यांच्या मध्यें याची मान्यताही होती तरी तो अर्जवी आणि लालची आहे ह्मणून पोतराजू त्याची थट्टा करीत असे.

---

* स्त्रियांचा स्वामी किंवा पति असा सर्व साधारण अर्थ होतो.

## रायनीभास्कर.

हा कवि तैलंगणातील कोंडवीडू एथें राहत होता. यानें रामायणाचें तेलंगींत भाषांतर करून तें आनावेमारेड्डी याच्या पंडित रत्नामध्यें जो साहींणिमारा ह्मणून एक श्रेष्ठ कवि होता त्याला तें समर्पण केलें. त्याविषयीं त्याला कांहीं पारितोषिक मिळालें, पण तें फारसें बहुमूल्य नव्हतें. याची भरभर १३०० व्या शतकांत झाली.

## आयलभास्कर.

हा कवि तैलंगणांतील रहिवासी शालिवाहन शकाच्या १४०० व्या शतकांत होता. यानें लहानपणीं साधारण तेलंगीभाषेचा अभ्यास करून मग तिचें व्याकरण शिकला. मग मोठेपणीं त्या भाषेंत कविता करूं लागला. त्यानें **केतुमतन** नांवें एका ग्रंथाचे तेलंगींत श्लोकबद्ध भाषांतर केलें आहे. या ग्रंथाचीं दोन प्रकरणें आहेत. त्यांत युगकल्पादिकालपरिवर्त्तन, ऋतुपर्याय, पर्जन्य, मेघगर्जना, विद्युल्लता, आणि सृष्टींतील पर्वत, नद्या, लोक, देश, इत्यादि नानाविध पदार्थ, तसे जळमळय, इत्यादि पुष्कळ विषय निरूपिले आहेत. दंतकथेवरून इतकें समजलें आहे कीं, हा कवि फार ह्मातारा होऊन मरण पावला.

## आलसानी पेद्दन्ना.

हा कवि शालिवाहन शकाच्या १४३० व्या वर्षीं दुप्पटग्रांतांत दुरल्ला ह्मणून एक खेडें आहे, तेथें जन्मला होता. तो नृसिंहदेवरायलू याच्या राज्यांत उदयास आला. त्यानें लहानपणींच संस्कृत व तेलंगी या भाषांचा अभ्यास करून मार्मिक ज्ञान संपादिलें आणि त्या दोहोंतही श्लोकबद्ध काव्य करण्याचें त्याला सामर्थ्य आलें. त्याच्या विद्वत्तेवरून नृसिंहदेवरायलू याच्या दर्बारांत त्याला पंडिताचें पद प्राप्त झालें. त्या राजाच्या प्रशंसापर त्यानें कित्येक प्रकरणें रचिलीं. नृसिंहदेवरा-

यल्लूच्या मरणानंतर त्याचा पुत्र जो कृष्णदेवरायल्लू तो विद्यानगराचा राजा झाला; त्यानेंही आलसानीपेद्दन्ना याला आपल्या दर्बारांत बाळगिलें होतें आणि ज्या पंडितांस अष्टदिग्गज असें नामाभिधान दिल्हें होतें त्यांमध्यें याची गणना केली.

आलसानीपेद्दन्ना हा रामभक्त असे. तेलंगी भाषेंत त्याच्या कवितेमध्यें योजना चांगली असे ह्मणून लोकांस ती फार प्रिय व रसिक वाटे. मोठे परिश्रम करून त्यानें **स्वारोचिषमनुचरित्र** नामें एक ग्रंथ केला, त्याचे त्यानें चार भाग केले होते. त्यांतील विषय येणेंप्रमाणें.

हरिद्वार ज्यास पुराणांतरीं मायापुरी असें ह्मणतात, तेथें मवराख्य नामें एक धर्मशील ब्राह्मण राहत होता. त्यास हिमालय पर्वताचें शिखर पाहावें असी उत्कंठा उत्पन्न झाली. परंतु तें मनुष्याच्या शक्तिपलीकडेस होतें ह्मणून कांहीं अद्भुत कृति करून आपला उद्देश सिद्धीस न्यावा, असें त्याला वाटलें. तेथें जात असतां वाटेंत ज्या प्रत्येक वाटसरास तो पाही, त्यास तें गुज पुसावें. असा संकल्प करून आपल्या संकटाचें निवारण करावें आणि शिखर दृष्टीस पडावें, अशा हेतूनें त्यांस थांबवीत असे. त्यांस घरीं बोलावी आणि त्यांपासून गुह्य समजावें, या आशेनें त्यांचें आदरसत्कारपूर्वक आतिथ्य करी. एके दिवसीं कोणी साधु त्याच्या घरीं आला, तो बोलून चालून फार भला असे. ब्राह्मणानें त्याची प्रार्थना करून त्यास विचारिलें कीं, महाराज, मला हिमालय पर्वताचें शिखर पाहण्याची इच्छा आहे, तर आपण कांहीं उपाय सांगावा. साधूनें त्याचें बोलणें मान्य करून त्याला एका वनस्पतीचा रस दिल्हा. तो त्यानें आपल्या पायांस चोळला आणि एका देवीचें नांव उच्चारून उडायास सांगितलें. तेव्हां मवराख्य परत येण्याची युक्ति विचारिल्या वांचून तत्क्षणींच हिमालय पर्वताचें शिखरावर उडून गेला. जेव्हां तो पायांचा रस सुकला, तेव्हां मवराख्याची उड्डाणशक्ति नष्ट झाली आणि तो त्या पर्वताच्या शिखरावरील रमणीय बागांत संचार करूं लागला. तो याप्रमाणें संचार करीत असतां एक मंजूळ गायनाचा

स्वर त्याचे कानीं पडला. त्या धोरणानें जवळ जाऊन पाहतो तों एक लावण्य, मनोहर, व रूपवती गंधर्वस्त्री त्याचे दृष्टीस पडली तिच्याजवळ जाऊन त्यानें तिची प्रार्थना केली कीं, बाई, मला सरळ रस्ता दाखीव. ब्राह्मण रूपानें फार सुंदर होता आणि त्या गंधर्वस्त्रीनें पूर्वी कधीं पुरुष पाहिला नव्हता ह्मणून ती त्याला पाहतांच सकाम झाली. परंतु संकोचानें त्याच्याशीं वर्त्तावें ह्मणजे आपल्या मनांतील वास्तविक इच्छा त्याला समजणार नाहीं असा तिनें निर्धार केला. ह्मणून माझ्या आज्ञेवांचून तुला माझ्या कुंजवनांत येण्यास परवानगी नाहीं, तुझा तूंच आपला रस्ता शोधून काढ, असें तिनें त्यास निषेधपूर्वक सांगितलें. तिच्या त्या रुक्ष भाषणावरून प्रवराख्य मनामध्यें खिन्न झाला आणि लागलाच माघारा परत जाऊन एका जवळच्या वनांत गेला. तेथें त्यानें अग्निदेवतेच्या प्रीत्यर्थ तीव्र तपाचारण केलें आणि असें ह्मणतात कीं, ती देवता त्याला ब्राह्मणाच्या रूपानें प्रगट होऊन त्यास त्याच्या घरीं पोंहचविलें. इकडे गंधर्वस्त्री तो कोठें नाहींसा झाला असें पाहून शोक करूं लागली आणि हें माझ्या उद्धतपणावरून झालें असावें असें तिला वाटलें. तेव्हां तिनें आपलें डोकें जमीनीवर आपटलें व गडबडा लोळली आणि अशा दुसऱ्या नानाप्रकारच्या अघोर कृत्यांनीं आपल्या दुःखाची प्रखरता दर्शविली.

ही गोष्ट कोणा एका मनुष्याला कळवून त्यानें ब्राह्मणाचा वेष धारण करून त्या गंधर्वस्त्रीजवळ गेला आणि मीच प्रवराख्य असें तिला कळवून तिच्या बरोबर संभोग केला. तें कपट तिच्या दृष्टोत्पत्तीस फार उशीरानें आलें व त्याविषयीं त्याचा सूड उगवावा असा तिनें निश्चय केला. त्या पुरुषापासून ती गरोदर राहिली आणि योग्य काळीं प्रसूत होऊन पुत्र झाला, तो पुढें जंबूद्वीपाचा राजा झाला. ज्याला स्वारोचिषमनु असें ह्मणतात. स्वारोचिषमनुचरित्राच्या प्रस्तावनेंत आलसानीपेद्दन्ना यानें कृष्णरायाचे पराक्रम आणि त्यानें केलेला यवनलोकांचा पराभव यांविषयीं सविस्तर वर्णन केलें आहे.

आलसानीपेद्दन्ना यानें दुसरा एक ग्रंथ रचिला, त्याचें नांव रामस्तवराज. त्यानें तेलंगी भाषेंत अद्वैतसिद्धांत ह्मणून एक ग्रंथ केला, त्यावेळेस त्याचें वय पंचावन्न वर्षांचें होतें. आलसानीपेद्दन्नाला साठावें वर्ष होतें तेव्हां त्याचा आश्रयदाता कृष्णदेवराय वारल्यामुळें त्याला फार दुःख झालें. ह्या प्रसंगी त्यानें राजाच्या औदार्यादि गुणांचें स्मरण करून एक कविता केली आहे, तिजमध्यें इतका करुणारस ओतला आहे कीं, कोणी वाचली असतां त्याला गहिंवर आल्यावांचून राहणार नाहीं. तो राजाच्या मागें कांहीं महिन्यांनीं दुरल्ला एथें आपल्या घरीं असतां मरण पावला. कृष्णदेवरामरायल्लू जो पुढें गादीवर बसला, तोही या कवीची फार मानमान्यता राखीत असे. याच्या ग्रंथांचा प्रसर सर्वत्र तैलंगणभर झाला. पेद्दन्ना जिवंत असतां जसा तो लोकप्रियता व प्रतिष्ठा पावला होता, तसे दुसरे थोडेच कवी पावले असतील.

## कृष्णरायल्लू.

हा विजयनगरची मुख्य राजधानी जी आनागोंदी, जिला किष्किंधानगर असें ही ह्मणतात तेथील राजा शालिवाहन शकाच्या १४४६ मध्यें राज्य करीत होता. याचा बाप नृसिंहराय तो मेल्यानंतर याला गादीवर बसविलें होतें. तो जयसंपादक व विद्येस उत्तेजन दाता असे ह्मणून त्याची चहूंकडे प्रख्याति झाली होती. आप्परसू किंवा तीम्मरसू जो त्याचा लहानपणीं शिक्षक होता. त्यानें त्याला नीतिशास्त्र किंवा राज्यव्यवस्था शिकविली, तसा तो विजयीही असे. त्यानें आपल्या सैन्याच्या योगानें तैलंगण आणि दुसरे देश जिंकीले. ह्या राजाचें लक्ष तेलंगी कवितेकडे फार असे. आलसानीपेद्दन्ना यानें आपला स्वारोचिषमनुचरित्र नामक ग्रंथ ह्या राजास नजर केला होता, त्यावर कृष्णरायल्लूनें टीका केली. तिला मुक्तामाला असें नांव दिल्हें. त्यांत राज्यकारभार चालविण्याच्या रीति आणि राजधर्म हे विषय होते. ह्यानंतर राजानें शृंगाररसान्वित विषयांवर रसमंजरी नामक एका

ग्रंथाचें भाषांतर केलें. आणि सकलचरित्र ह्मणून एका नामांकित राजाचा वृत्तांत होता तो आणि दुसरा सकलकथासारसंग्रह ह्मणजे लोकप्रिय गोष्टींचा सारांश इत्यादि ग्रंथ केले. हा विद्येचा मोठा उत्तेजनदाता असे आणि कवींला उदारपणानें आश्रय दिल्हे होते. तो आपल्या वयाच्या ४० वे वर्षी मरण पावला.

## मोहनांगी.

ही कवयित्री कृष्णदेवरायल्लु याची कन्या होय. तिला बाळपणीं फार चांगलें शिक्षण मिळालें आणि ती अलंकारशास्त्र व काव्य यांत निष्णात झाली. तिनें यौवन दशेंत रामरायल्लु बरोबर पाणिग्रहण केलें. त्यानंतरही तिनें आपला विद्याभ्यास सोडला नाहीं आणि तिच्या बापाच्या पदरच्या कवींनीं जे ग्रंथ केले होते, ते वांचण्यांत तिनें आपला पुष्कळ वेळ घालविला. सतत अभ्यासानें काव्य करण्याची शक्ति तिच्या अंगीं आली. तिनें महाभारतांतला विषय घेऊन मरीचीपरिणय यानांवाचें एक काव्य केलें. त्यांत मरीची नामक अप्सरांचें फार सुंदर वर्णन केलें आहे. त्या काव्याचे पांच सर्ग आहेत. ह्या राजकन्येच्या पोटीं संतान नव्हतें. दंतकथेवरून समजतें कीं, ती भरज्वानींत असतां प्रारब्धवशात् तिचा भर्ता नष्ट झाला आणि तिनें सहगमन केलें.

## मूकृतिमण्णा.

हा कवि नियोगी जातीचा ब्राह्मण गन्नवरम खेड्यांतील रहिवासी होता. विजयनगरचा राजा कृष्णरायल्लु याच्या राज्यांत शालिवाहन शकाच्या १५०० व्या शतकांत तो प्रख्यातीस आला. त्यानें पारिजातापहरण नामें एक काव्य रचिलें. त्यांत कृष्णानें सत्यभामेकरितां स्वर्गांतून नंदनवनांतल्या पारिजातकाचें एक पुष्प आणिलें होतें, ही कथा सालंकार व सश्लेष रचिली आहे. या काव्याचीं तीन प्रकरणें केलीं आहेत.

## तेनाल रामलिंग.

हा शालिवाहन शकाच्या १५०० शांमध्यें तेनाली नामक खेड्यांत ईश्वरप्रगडवारू या कुळांत जन्मला. हा विजयनगरचा राजा कृष्णरायल्लु याच्या दर्बारांत जे प्रख्यात अष्टकवी होते त्यांतील एक होता असें ह्मणतात. याची जन्मपत्रिका कोणी पाहिली होती, तींत याला जन्मकाळींचे ग्रह उत्तमस्थानीं पडले होते असें सांगतात तेनालरामलिंग यानें भट्टूपालक्या याजवळ जे कवी होते त्यांपासून संस्कृत भाषा आणि तेलंगी व्याकरण यांचा चांगला अभ्यास केला. कांहीं काळानंतर तो महाकवीं प्रमाणें उत्तम कविता करूं लागला. त्यावेळीं कृष्णदेवरायल्लु रामलिंग नामक राजा विद्वान् लोकांस आश्रय देत असतो असें ऐकून रामलिंग त्याजकडे गेला परंतु हा पराकाष्ठेचा थट्टेबाज, नकल्या, आणि खोडसाळ होता ही गोष्ट सर्वत्रांस माहीत असे, त्यामुळें राजाजवळ याची दाद कोणी लावीना. मग त्यानें राणीच्या भूमंडली नामक एका दासीचें आर्जव करून तिच्यावर कवन रचिलें आणि त्याच्या कवितेवर कोणी द्वेषभावानें दोष दिल्हा तरी तो ऐकून घेत असे. शेवटीं तेनालरामलिंगाचे गुण राजानें ऐकिले आणि त्याला दर्बारच्या कवींमध्यें बाळगिलें. तेथें यानें **पांडुरंगमाहात्म्य** या नांवाचें एक अत्यंत रसाळ काव्य रचिलें. राजदर्बारामध्यें तेनालरामलिंग याचा थट्टा मस्करी करण्याचा क्रम नेहमी चालू असे.

एकदां असें घडलें कीं, ताताचार्य ह्मणून एक भाविक पुरुष तो कृष्णदेवरायाचा गुरु होता. तो प्रातःकाळीं नित्यनेमानें प्रथम गोमयाचें दर्शन करून मग दुसरे पदार्थ पाहत असे. रामलिंगानें असी नक्कल केली कीं, तातचार्य हा डोळे मिटून गोठ्यामध्यें ज्या ठिकाणीं गाईजवळ उभा राहत असे ती सोडून देऊन तातचार्य येतांच त्या ठिकाणीं शौचविधि केला. तेव्हां ताताचार्यानें तेवढी चाहूल ऐकून आपले हातानीं त्याचें पुरीष चांचपून डोळे उघडून पाहिलें तों तेथें गाय नाहीं. तेव्हां रामलिंग खदखदा हांसला. त्यानंतर ही थट्टा ऐकून राजा फार रागा-

वला आणि त्याचा शिरच्छेद करण्याची आज्ञा दिल्ही. राजाज्ञेप्रमाणें रामलिंगाला रानांत नेऊन गळ्यापर्यंत पुरून टाकिलें आणि त्याचा शिरच्छेद करण्याची आज्ञा घेण्यास चाकर लोक परत गेले. तेवढ्या वेळांत त्या वाटेनें एक परीट जात होता. तो कुबडा असे. तेव्हां रामलिंगानें त्याला ह्मटलें, गड्या मी तुझ्याच सारिखा कुबडा होतों परंतु पुरून घेतल्यानें मी चांगला झालों असें वाटतें. मला काढसील तर तुझ्याही प्रत्ययास येईल. मग परीटानें माती मोठ्या झपाट्यानें उकरून काढिली तों खराच चांगला झाला. असें पाहून याच खांचेंत मला पुरून टाक असें परीटानें ह्मटल्यावर रामलिंगानें त्याला गाडून आपण तेथून पळाला. त्यानंतर राजाज्ञा घेऊन आलेल्या मांगानीं त्या बिचाऱ्या परीटाचें डोकें उडविलें असें सांगतात. कांहीं दिवसानीं रामलिंग हा राजाच्या दर्बारांत अकस्मात् गेला आणि सांगितलें कीं, माझ्या देवतेनें मला पुनः जीवंत केलें. तेव्हां दर्बारच्या साऱ्या लोकांला आणि राजाला मोठा विस्मय झाला आणि खरें वाटलें. पुढें राजानें रामलिंगाला एवढी माफी दिल्ही कीं, तूं शंभर अपराध केलेस तरी तुला शासन करणार नाहीं.

आन्नावेमारेड्डी ह्मणून कोणी राजा होता, त्याच्या जवळ चांगल्या जातीचे दोन कंधारी घोडे होते. त्यांतून एक आपल्याला असावा ह्मणून कृष्णदेवानें मागण्याकरितां आन्नावेमारेड्डी याजकडे आपला वकील पाठविला. तेव्हां त्यानें सांगितलें कीं, कृष्णदेवाजवळच्या कोणत्याही कवीनें माझ्या कवींची समस्या पूर्ण करावी ह्मणजे मी घोडा देईन. कृष्णदेवाजवळचा कोणताही कवि तें पत्करीना. शेवटीं रामलिंग आन्नावेमारेड्डीच्या दर्बारांत गेला आणि तेथील कवींच्या सर्व समस्या पूर्ण करून दिल्ह्या आणि शेवटीं आपण एक समस्या त्या कवींला घालून साहा महिन्याचा अवकाश दिल्हा. मग साहा महिन्यानीं पुनः तेथें जाऊन त्या कवींस आपली समस्या विचारिली परंतु कोणालाही पूर्ण करवली नाहीं. मग त्यानें ती पूर्ण करून दाखविली. तेव्हां आन्नावेमारेड्डी याची मर्जी प्रसन्न झाली आणि त्यानें

रामलिंगाला आलिंगन दिल्हें व कंधारी घोड्यांपैकीं एक घोडा व अणखी कांहीं बक्षिसें देऊन कृष्णदेवाच्या दर्बारीं बोलाविलें. त्यानंतर बहुतेक दिवसपर्यंत राजाची मर्जी त्याजवर फारच प्रसन्न होती. परंतु त्यानें खुद्द राजाचीच असी एक कुचाळी केली कीं, एक फार सुंदर स्त्री तुला आणून देतों असा संकेत करून राजाच्या पलंगावर एक मोठी धोंड शेल्याखालीं झांकून ठेविली. राजातर नेमल्या वेळीं पलंगावर जाऊन मोठ्या उत्कंठेनें पाहूं लागला तों शेल्याखालीं धोंड होती. या थट्टेवरून राजा फारच संतापला आणि रामलिंगाचा शिरच्छेद करावा असा हुकूम केला असतां तो तेथून पळाला. कांहीं दिवसानीं राजाचा क्रोध शांत झाल्यावर पुन्हा त्यानें त्याची मर्जी संपादिली.

या गोष्टीला कित्येक दिवस लोटल्या नंतर असी गोष्ट घडली कीं, कृष्णदेवाच्या कन्येनें मरीचिपरिणय नामें एक फार सुंदर नाटक रचिलें आणि तें सभेमध्यें कृष्णदेवाला वाचून दाखवावें असें तिच्या मनांत होतें. परंतु रामलिंग थट्टा करील ह्मणून तिला भय होतें.

एके दिवसीं कृष्णदेवराजा रामलिंगाला सभेस येण्याची मनाई करून सर्व मंडळीसुद्धां कन्येचें नाटक ऐकायाला बसला. ही बातमी रामलिंगाला कळतांच त्यानें बटकीचें सोंग घेतलें आणि आपलें तोंड झांकून राजकन्येच्या अगदीं जवळ जाऊन बसला. तिनें आरंभापासून नाटकाचें कांहीं संविधान वांचिलें, त्यांत प्रसंगपरत्वें नीति व पर्वत वृक्षादि सृष्टिरचना व स्त्रियांचे भूषणालंकार इत्यादि विषयांचे उत्कृष्ट निरूपण केल्यावर त्यांत गरोदर स्त्रीचें वर्णन आलें तें राजकन्या वाचूं लागली. तेव्हां रामलिंगानें हावभाव करून थट्टेनें सभेंतील लोकांस खदखदा हांसविलें आणि नाटकाचा बेरंग केला. तेव्हां राजकन्या खिशाणी होऊन उठून गेली. असो. ह्या वर्त्तणुकीवरून कृष्णदेव आपल्याला मोठें शासन करणार असें जाणून रामलिंग तेथून पळाला आणि कलिंग देशाच्या राजाजवळ जाऊन राहिला.

## वेंकटपतिराजा.

हा कवि जातीचा क्षत्रिय असून आनागोंदी ज्याला किष्किधानगर असें ह्मणतात एथील राहणारा असे. यानें तेलंगी भाषेंत मोठमोठ्या नामांकित कवींनीं केलेले ग्रंथ अवलोकन केल्यामुळें त्याला ती भाषा फार चांगली येत असे. अल्पकालांतच वेंकटपति उत्कृष्ट गुणवान् कवि झाला. त्याच्या काव्यरचनेंत नैसर्गिक शब्दसामर्थ्य व मार्दव असे ह्मणून लोकांत तिची फार प्रसिद्धि होती. व्याख्यानें देण्यांत तर त्याच्या बराबर कोणीच नव्हता. थोडेच कवी त्याच्या सारिखे बुद्धिमान झाले असतील. लहानपणापासून वेंकटपति लश्करी खात्यांत चाकरीस होता, परंतु त्यानें तो धंदा सोडून आपलें सर्व आयुष्य विद्याभ्यास करण्यांत घालवावें, असा त्यावेळीं त्याच्या मनाला कल प्राप्त झाला. त्यावेळचे जे मोठे वैयाकरणी होते, त्यांचे हाताखालीं तो व्याकरण शिकला. वेंकटपतीचे गुण तेथील राजाचे कानीं पडतांच त्यानें त्याला आपल्या दर्बारीं पाचारण केलें आणि त्याला आपल्या दर्बारांतील कवींपैकीं एक कवि करून ठेविलें. नंतर थोडक्याच वेळानें त्यानें वीररसप्रधान एक काव्य रचिलें, त्याला **चंद्रांगदचरित्र** असें नांव दिल्हें. त्यांत निषध देशचा राजा चंद्रांगद याच्या सर्व कृत्यांचें वर्णन केलें आहे. तें काव्य त्यानें कृष्णदेवराय यास समर्पण केलें होतें.

---

## पिंगळसूरण्णा.

हा कवि पिंगल कुळांतील नियोगी जातीचा ब्राह्मण होता. विजयनगरचा राजा कृष्णरायल्लू याच्या राज्यांत हा मोठ्या उंच पदास चढला. त्याला तेलंगी व्याकरणाची पूर्ण माहितगारी होती ह्मणून त्या भाषेचा तो एक आचार्यच होता. कांहीं वेळानें तो कृष्णरायल्लूच्या दर्बारांत गेला असतां राजानें त्याला आपल्याजवळ बाळगिलें. तेव्हां पिंगळसूरण्णा यानें **राघवपांडवीय** नामें एक काव्य रचिलें, तें रामायण व महाभारत असें द्व्य-

र्थक केलें आहे. अशा प्रकारचें काव्य रचणें मोठ्या बुद्धीचें व परिश्रमाचें काम आहे. या काव्याची सहा प्रकरणें आहेत.

## भट्टमूर्त्ति.

हा कवि पेनूमंडलू सुभ्यांतील भट्टूपालक्या नामक खेड्यांत जन्मला. तो तेलंगी व संस्कृत या दोन्ही भाषेंत चांगला मर्मज्ञ असून मोठा प्रख्यात वक्ता होता. त्या वेळचे मांडलिक राजे कविलोकांस आश्रय देत, त्या लोभास्तव भट्टमूर्त्तीनें तेलंगी भाषेंत उत्तम काव्यें रचिलीं. त्यानें आपली कविता सर्वांपेक्षा वरिष्ठ व्हावी अशा हेतूनें शब्दसौंदर्यादिक उत्तम काव्याचे गुण तिच्यामध्यें मोठ्या परिश्रमानें साधिले होते. त्यामुळें कविलोकांत त्याची प्रशंसा होऊन कित्येकांनीं त्याचें शिष्यत्व केलें. छंदःशास्त्रांत त्यानें पुष्कळ विद्यार्थी तयार केले. कांहीं काळानंतर तो कृष्णदेवराय नामक राजाच्या दरबारांत गेला. तेथें राजाला त्याच्या बुद्धीचें मोठें आश्चर्य वाटून त्यानें आपल्या जवळच्या उत्तम कवींमध्यें त्याची गणना केली. भट्टमूर्त्तीनें राजाला **नरसभूपालेय** ह्मणजे नरसभूपालाचा इतिहास पद्यरूपानें रचून दिल्हा. हें काव्य रचण्यास त्याला फार परिश्रम पडले परंतु तें काव्य पाहून त्याच्या बरोबरीच्या व हल्लींच्याही कवींस आश्चर्य होण्यासारिखें आहे. कृष्णदेवरायाच्या मरणानंतर त्यानें **वसुचरित्र** या नांवाचें दुसरें एक वीररसप्रधान काव्य रचिलें. त्यांत वसुराजा व अत्यंत रूपवती गिरिकन्यका नामें यक्षिणी यां उभयतांचा विवाह वर्णिला आहे. तें काव्य त्यानें तिरूमलराव याला समर्पण केलें. पुढें त्यानें त्याच राजाच्या आज्ञेवरून अणखी कित्येक ग्रंथ रचिले. राजानें भट्टमूर्त्तीला मोठालीं इनामें दिल्हीं. तेणेंकरून त्यानें आपलें उत्तर वय सुखासमाधानानें घालविलें आणि साठाव्या वर्षी स्वग्रामीं मरण पावला.

## रामभद्र कवि.

हा कवि तैलंगण देशचा राहणारा मोठा नामांकित विद्वान् होता. आनागोंदी एथील राजा कृष्णदेवरायल्लू याचे वेळीं यानें फार कीर्त्ति मिळविली. याची रामचंद्रावर मोठी निष्ठा होती. यानें रामलीला वर्णनपर एक काव्य रचिलें, त्याचे तीन सर्ग आहेत. त्याला **रामभद्रेय** असें नांव दिल्हें आहे. तें सर्वांशीं फार आश्चर्य करण्याजोगें आहे; परंतु ज्या वेळेस रामाचा आणि सीतेचा वियोग झाला, त्यावेळेस रामानें सीतेविषयीं जो शोक केला आहे, तो तर अतिशय करुणारसानें पूर्ण व रसिक असून मोठ्या बुद्धिकौशल्यानें लिहिला आहे. रामभद्रानें तें काव्य श्रीरामास समर्पण केलें होतें.

## मौल्ली.

विद्वान लोकांत एक ह्मण आहे कीं, **स्त्रियंपुमांसंजातिंवानेक्षंतेसद्गुणाःक्वचित्** ह्मणजे सद्गुण जे आहेत ते स्त्रिया, पुरुष, किंवा कोणती एक जाति यांकडे पाहतात असें नव्हे. या गोष्टीला उदाहरण ही मख्यात बाई जातीनें कुंभाराची मुलगी असून इच्यामध्यें कविताशक्ति विलक्षणच होती. कृष्णदेवरायाच्या राज्यांतील मोठ्या कविवर्गामध्यें हिची गणना करीत असत. प्रौढपणीं बुद्धीची धारणाशक्ति कमी होते हें प्रायः सर्वांच्या अनुभवास आहे; परंतु या बाईची गोष्ट असी सांगतात कीं, ही वयानें अधिक होत गेली तों तों हिची धारणा आणि स्फुरता पराकाष्ठेची वाढली. एकदां हिनें स्नान केल्यावर एक आख्यान रचायाला आरंभ केला तों केंस वाळले नाहींत इतक्यांत रामायणाचा एक कथाभाग समग्र रचिला. ती कविता ओबडधोबड असी नव्हती परंतु सालंकार व सश्लेष असून कवीलोकांनीं मान्य करण्यासारिखी होती. तिचे कविताग्रंथ त्या देशांत हल्लीं उपलब्ध आहेत.

## माधवराय.

हा कवि जातीचा वेलमवारू आनागोंदी एथील राहणारा असून त्याच राजाजवळ मंत्री होता. हा सर्वदा राजकीय कामांत निमग्न होता तरी महाविद्वानामध्यें याला गणीत असत. हा सर्कारी काम आटोपल्यावर फावल्या वेळांत ग्रंथ वाचन आणि कविता रचणें हें साधेल तितकें करीत असे. तेलंगी भाषेंत **चंद्रिकापरिणय** यानांवाचें एक सुरस काव्य यानें रचिलें आहे.

## मलय्या.

हा कवि कोंडवीडू एथील राहणारा मूळचा ब्राह्मण मादेर नामक एका संभावित गृहस्थाचा मुलगा होता. परंतु ज्यावेळीं कल्याणी एथील राजा विजलराय यानें ब्राह्मणांची बहुत कुळें बाटविलीं तेव्हां हाही त्यांत सांपडला असतां लिंगायतांप्रमाणें गळ्यांत पाषाणाचें लिंग बाळगून त्यांच्या धर्माप्रमाणें वागूं लागला. हा लहानपणीं आपल्या सोबत्यांत पढत होता त्यावेळेसच यानें पुरातन काळांतील राजशेखर राजाचें चरित्र काव्यरूपानें रचिलें आणि तें सालूतिमन्ना नामक राजाचा पुत्र जो नंदालअपय्या त्याला नजर केलें. तो राजा आनागोंदी एथील कृष्णदेव महारायलू याच्या राज्यानंतर ७५ वर्षांनीं गादीवर बसला होता. मलय्या कवीला राजे लोकांनीं मोठाल्या जाहगिरी व इनामें दिल्हीं होतीं.

## चक्रापा.

हा कवि जातीचा ब्राह्मण असून दाता कुळांत जन्मला होता आणि तो नेलूरू प्रांतांत मन्नूरू पेळूरु जवळ टेटू ह्मणून एक शहर आहे तेथला राहणारा असे. तो दरिद्री होता व तो श्रीरामचंद्राचा नैष्ठिक भक्त असे. असें ह्मणतात कीं, त्या देवाच्या कृपेनें आणि त्याच्या जातीच्या सामर्थ्यानें त्याला उत्कृष्ट ज्ञान प्राप्त झालें. हा शालिवाहन शकाच्या १६२५ व्या वर्षीं होता. तो

काळास्ती एथला जमीनदार बंगारूयाचमनीडू याचे वेळीं होता हा कवि सोळा वर्षांचा असतांच काव्यें करूं लागला. तो यमक बांधण्यांत फार कुशल असे. जें कांहीं संभाषणांत त्याच्याशीं बोलावें तें तो नेहमी श्लोकबद्ध करीत असे. हा कवि मोठा बुद्धिमान् आहे असी कीर्त्ति याचमनीडूच्या कानांवर गेली व त्यास भेटावें ह्मणून तो फार उत्कंठित झाला आणि त्याला बोलावणें पाठविलें. आपल्यामागें कुटुंबाचा चरितार्थ चालणार नाहीं ह्मणून त्यानें जाणें नकारलें. त्याची बायको गरोदर होती व तिचे दिवस अगदीं भरले होते ह्मणून तिच्यानें कोठे बाहेर जावऊन दुभती गाय आणि दुसरे आवश्यक पदार्थ आणवणार नाहींत या करितां तो काळास्ती एथें वर्गणीने पैसा जमवण्यासाठीं गेला. जातां जातां अकस्मात् त्याची आणि याचमनीडूची रस्त्यांत गांठ पडली. तो मृगया करून परत येत होता. त्यानें ह्या कवीला पुष्कळ प्रश्न केले, त्यांची त्यानें मोठ्या सुंदर काव्यरूपानें उत्तरें दिल्हीं. त्यावरून त्याला इतका आनंद झाला कीं, त्याला त्यानें आपल्या दर्बारीं पाचारिलें आणि श्रीरामचंद्राच्या प्रीत्यर्थ एकशत स्तोत्रें करावी असी आज्ञा केली. हें काम केल्यावर त्याला मोठी प्रतिष्ठा मिळाली आणि याचमनीडूलाही मोठा संतोष झाला आणि त्याला सांगितलें कीं, तुला पाहिजे तें माग. तेव्हां चक्राप्पानें ऐंशी शेर जोंधळे मागितले. परंतु जमीनदार मोठा उदार होता, त्यानें त्याला कांहीं जमीन इनाम करून दिल्ही आणि वर्षासन करून दिल्हें आणि तो घरीं सुखरूप पोंचावा ह्मणून त्याजबरोबर शिपायी प्यादे दिल्हे. चक्रापानें कोणत्याही उपयुक्त विषयावर ग्रंथ केले नाहींत. त्यानें जे कांहीं केले ते सर्व रामस्तुतिपर कविता होत्या. ह्या कवीनें आपले मनोरथ सिद्धीस जाण्यासाठीं कोणत्याही मोठ्या गृहस्थाचे आर्जव केले नाहींत. तो साठावे वर्षी फार दरिद्री व संपत्तिमानूही नव्हता अशा स्थितींत मृत्यु पावला.

## लिंगय्या.

हा कवि शास्त्राध्ययनसंपन्न असून इतिहासवेत्त्यांमध्यें गणनीय होता. यानें काश्मीर देशाचा राजा जो केयूरबाहू त्याचा वृत्तांत काव्यरूपानें वर्णिला आहे, त्यांत त्या राजाचीं औदार्य पराक्रमादि महाकर्में फार सरस वर्णिलीं आहेत. कोंडवीडू राजाच्या कारकीर्दींत याजकडे प्रधानकीचा कारभार होता तरी फावल्या वेळांत त्यानें पुष्कळ ग्रंथ रचिले.

## बप्पन कवि.

हा तैलंगण देशस्थ कवि कोंडवीडू एथील रेड्डीवारू नामक राजाचे वेळीं उदयास आला. तो तेलंगी व्याकरणांत निष्णात असून त्या भाषेच्या वाग्व्यवहारांत मोठा वक्ता असे. त्यानें आंध्र भाषेंतील ह्मणींचा संग्रह करून एक मोठा ग्रंथ केला, त्याला **आंध्रप्रयोगरत्नाकर** असें नांव दिल्हें. तो त्यानें आपल्या बापास नजर केला होता.

तैलंगण देशांतील सर्व शाळांमध्यें त्याचा उपयोग करीत होते. बप्पनकवीनें स्वतां एक विद्यायल स्थापिलें होतें, तेथें त्यानें आमरणांत पुष्कळ शिष्य पढविले.

## भैरव कवि.

हा कवि कोंडवीडू एथील राजांच्या वेळीं तेलंगी भाषेंतल्या व्याकरणांत मोठा प्रख्यात होता. त्यानें छंदःशास्त्रावर **कविगजांकुशचंडांशु** या नांवाचा एक ग्रंथ केला. त्या ग्रंथाची प्रसिद्धि क्रमाक्रमानें झाली. भैरवकवीनें कोणतेही सरकारी काम घेतलें नाहीं. त्यानें बिनचाकरीनें काळ घालविला. त्याची चालचलणूक फार सभ्य होती ह्मणून त्याच्या मरणानंतर लोक त्याची मोठी प्रशंसा करूं लागले.

## लक्ष्मण कवि.

या कवीनें तेलंगी व्याकरणाचे पुष्कळ ग्रंथ पाहिले होते आणि त्या भाषेंतील शब्दसंग्रहाचा तो पूर्ण वेत्ता होता. त्यानें **आंध्रनामसंग्रह** नामें एक शब्दकोश रचिला. त्याचीं चार कांडें आहेत. प्रथम त्या कोशांत संस्कृत भाषेप्रमाणें पर्याय नामांचें निरूपण करून मग अनेकार्थक शब्दांचा संग्रह केला आहे. हा ग्रंथ संपविल्यानंतर त्याच भाषेंत संस्कृताप्रमाणें अर्थ विचारात्मक **सुभाषितरत्नाकर** या नांवाचा ग्रंथ केला. त्यांत प्रत्ययार्थभेद, अलंकार, शब्दशक्ति, लक्षणा, इत्यादि विषय बांधिले आहेत. हा ग्रंथ पहिल्या शब्दकोशाचाच शेषभूत असा मानलेला आहे. तैलंगणांतील राजांनीं या कवीला मोठें उत्तेजन दिल्हें होतें आणि त्यांच्या औदार्यानें तो इतरांपेक्षां बराच संपत्तिमान असे. त्याची समाप्ति स्वदेशांतच झाली.

## दुसरा लक्ष्मण कवि.

हा कोंडवीडू एथील राहणारा कवि तेलंगी व्याकरणांत महा धुरंधर होता. याला लहानपणांतच ह्मटलेले शास्त्रग्रंथ चांगले शाब्दशुद्ध उपस्थित होते. यानें **प्रबंधराज** या नांवाचें तेलंगी भाषेंत स्वतंत्र व्याकरण रचिलें आणि तें शाळेमध्यें शिकायाला फार उपयोगी झालें, त्यावरून त्याची **वैयाकरण लक्ष्मणकवि** ही आख्या पडली. या कवीनें बहुतकरून असल्या ग्रंथरचनेवर आपला संसार चालविला.

## बंधन कवि.

हा तैलंगणांतील रहिवासी प्रख्यात कवि होता. पालिगर ह्मणून कोणी बलाढ्य राजे होते ते या कवीचा फार बहुमान राखीत असत. त्यांच्या आज्ञेवरून त्यानें **राजनीति** याचें संस्कृतांतून तेलंगींत भाषांतर केलें. त्यांत दुसरेही राजकीय प्रकरणीं

पुष्कळ विषय आहेत. ते येणेंप्रमाणें. दुर्गप्राकारादि रचना, नगर रक्षण प्रकार, राज्यरीति, कायदे, मंत्रिपरीक्षा, आयव्यय, युद्धसाहित्य संग्रह, इत्यादि. त्या सर्व पुस्तकाचे तीन भाग केले आहेत. पालिगरचे मांडलिक राजे आपला राज्यकारभार त्या पुस्तकावरून चालवीत असत. बंधन कवीला विद्येच्या प्रभावद्दल पुष्कळ जहागिरी मिळाल्या. तो मरेपर्यंत शांतीनें आणि सुखानें राहिला.

## चिन्नवीरन्ना आणि पेद्दवीरन्ना.

हे दोघे सहोदर बंधु कोंडवीडू एथील राजा अन्नावेमारेड्डी याच्या वेळीं होते. हे तेनालीदेशांतील राहणारे पिल्लुलमरीवारू कुळांत जन्मले. यांत चिन्नवीरन्ना जो धाकटा त्याला लहानपणांतच विद्याभ्यासाची मोठी आवड होती. त्यानें आपला सर्व काळ व्यासंगांत घालविला आणि अल्पकाळांतच त्याला कविपद प्राप्त झालें. परंतु पेद्दवीरन्ना जो वडील भाऊ त्यानें आळसांत आणि दुराचरणांत आपला काळ व्यर्थ गमाविला. अशामुळें त्याचें बुद्धिवैभव दृष्टोत्पत्तीस आलेंच नाहीं. राजदर्बारांत ते दोघेही प्रतिष्ठेनें वागत होते तरी विद्वत्तेमुळें जी मानमान्यता असायाची ती चिन्नविरन्नाची होती. पेद्दवीरन्ना हा केवळ जडभारती आहे असें सर्वत्रांस ठाऊक होतें. एकदां राजानें पेद्दवीरन्नाला बोलावून बुद्ध्या सांगितलें कीं, प्राचीन कवींनीं जी गोष्ट घेतली नसेल अशा अभिनव विषयावर कांहीं काव्य रचून आण. तेव्हां असा ग्रंथ रचणें केवढें दुर्घट काम आहे हें मनांत नआणितां ताबडतोब पेद्दवीरन्नानें कबूल केलें कीं, होय थोडक्या दिवसांत करून आणितों. परंतु दर्बारांतून घरीं आल्यावर मोठ्या चिंतेंत पडला. मग त्यानें आपल्या भावजईला कळविलें कीं, ही गोष्ट चिन्नवीरन्नाला युक्तीनें सांग. मग तिनें आपल्या वडील दीराचा वृत्तांत नवऱ्याला कळविला असतां त्यानें सांगितलें कीं, कांहीं चिंता करणें नको, मी तें कार्य करीन. परंतु तूं मात्र मला त्याची मुद्दत भरण्या पूर्वी तीन दिवस अगोदर सूचना कर. मग ही गोष्ट तिनें

आपल्या दीराला कळविली. पुढें मुद्दत भरण्याच्या पूर्वी चिन्नवीरन्नाला बायकोनें स्मरण दिलें असतां त्यानें सांगितलें कीं, एक खोली झाडून सारवून तयार कर आणि तींत एक चौरंग व त्याच्या भोवताल्या चार समया, सोन्याची लेखणी, कोरे कागद व दऊत वगैरे लिहिण्याची सामग्री तयार करून ठेव. तिनें आज्ञेप्रमाणें तदूंद ठेविली. त्या दिवशीं रात्रीं भोजन झाल्यावर चिन्नवीरन्ना नित्याप्रमाणें बाहेर नजातां तयार केलेल्या खोलींत गेला आणि चौरंगा समोर उभा राहून आपल्या आराध्य देवतेची स्तुती करूं लागला. तेव्हां साक्षात् सरस्वती देवी प्रगट होऊन त्या चौरंगावर बसून ग्रंथ लिहूं लागली तों प्रभातकाळ होई पर्यंत देवीनें पांच सर्ग लिहून तयार केले आणि समाप्तीचे पांच श्लोक लिहायाचे होते इतक्यांत असें घडलें कीं, पेद्दवीरन्ना हा आपला भाऊ खोलींत काय करीत आहे ह्मणून दाराच्या फटींतून पाहूं लागला. हें कृत्य देवीनें जाणून लागलीच अंतर्धान पावली. मग चिन्नवीरन्नानें तो ग्रंथ आपल्या भावजईकडून पेद्दवीरन्नाला देऊन सांगितलें कीं, तूं आपलें नांव घालून राजाला नजर कर. तो ग्रंथ **पंचडब्बू** या नांवानें तैलंगण देशांत प्रख्यात आहे. पेद्दवीरन्ना तो देवीकृत लोकोत्तर ग्रंथ पाहून व आपल्या भावाची देवताभक्ति जाणून आनंद पावला. मग तो ग्रंथ त्यानें राजाला नजर केला. त्या दिवसापासून पेद्दवीरन्ना हाही महाकवि आहे ह्मणून लोकांत ख्याति झाली.

## लोकभनय्या.

हा एक तैलंगण देशांत मोठा रसिक कवि होऊन गेला. याचें नांव नुस्तें देखील ऐकण्यांत कर्णप्रिय आहे आणि तैलंगी भाषेंत लोकभनय्या या शब्दाचा अर्थही जगन्मित्र असाच होतो. हें नांव त्याला मूळचें नव्हतें. त्यानें भारतांतील **हरिश्चंद्राख्यान** तैलंगी भाषेंत केलें. तें इतकें रसिक व सुबोध आहे कीं, बाळगोपाळांसही समजायाला अगदींच अवघड. नव्हतें ह्मणून त्या ग्रंथाचे वाचणारे लोक त्याच्या उपकारास्तव त्याला लोकभनय्या

असें ह्मणू लागले. त्यामुळें त्याचें पहिलें नांव लोपलें. कोणतेंही सत्कार्य करून जगांत नांव मिळवावें असें जें ह्मणतात त्या गोष्टीला ह्या कवीचा दृष्टांत घेण्यासारिखा आहे.

## गोविंद कवि.

हा कवि दक्षिण देशांत राहणारा असे. तदनंतर ज्यावर एथील तेलंगी राजांच्यावेळीं त्याची भरभर झाली. त्या राजांनीं जी शाळा स्थापिली होती, तेथें त्यानें अभ्यास केला. तेलंगी भाषेंतल्या व्याकरणाची त्याला पुरी माहिती असे. त्यानें सौराष्ट्र ह्मणजे गुजराथ देशींच्या राजाची कन्या इंदुमति हिचें स्वयंवराचें आख्यान रचिलें आहे, त्याला **इंदुमतिपरिणय** असें नांव दिल्हें. त्याशिवाय त्यानें द्राविडं देशांतील नानाप्रकारच्या देवालयांचीं वर्णनें लिहिलेलीं आहेत. तो मध्यार्जुनम या ग्रामीं मृत्यु पावला.

## वडवानल भट्ट.

हा कोंडवीडू एथील राहणारा होता. त्याला लहानपणांत कोणी उत्कृष्ट शिकविणारा भेटला, त्यानें याला अल्पवयांतच कवि करून ठेविलें. त्यानें अनेक विषयांवर नानाप्रकारचे प्रबंध केले. वडवानलभट्ट हा सिद्ध पुरुषासारिखा होता. तो स्वभावानें मोठा तापट असून कर्मठ असे. त्याविषयीं असी एक चमत्कारिक गोष्ट सांगतात कीं, तो एके दिवसीं माध्यान्हिक करायाला एका तळ्यावर गेला. तेथें ब्रह्मयज्ञ करतां करतां त्याच्या बोटांतलें सोन्याचें पवित्रक निघून पाण्यांत पडलें. तेव्हां त्याला मोठा संताप आला. तेव्हां वडवानलभट्टानें पाण्याला शाप दिल्हा कीं, सुकून जा. शाप झाल्यावर चार तासांनीं तें तळें अगदीं कोरडें झालें. नंतर भटजी आपलें पवित्रक उचलून घरीं गेले.

या कवीचे लेख फार मनोरंजक असत, त्यामुळें त्यांचा सर्वत्र प्रसर झाला. याचा नांवलौकिक ऐकून मांडलिक राजे याचा समाचार घेत असत. त्याचें प्राणोत्क्रमण स्वग्रामींच झालें.

## मधुरंगचोक्कनाथ.

हा जंटू जातींचा कवि त्रिचनापल्ली एथें जन्मला. याचें घराणें मोठें संभावित होतें. याचा बाप विजयरंग चोक्कनाथ. तो तंजावर प्रांताचा मांडलिक राजा होता. हा प्रांत विजयनगर सर्काराच्या ताब्यांत असे. मधुरंग चोक्कनाथ यानें स्वतां आपल्याजवळ शास्त्री, पंडित, कवि, गवय्ये, आदिकरून पुष्कळ गुणिजन बाळगिले होते, आणि त्यांनीं आपले गुण वृद्धिंगत करावे ह्मणून तो तितक्या आश्रित लोकांचे संसार सर्वस्वी चालवित असे. श्रीरंगनाथ देवाच्या वारीला जाणें याचें कधीं टळलें नाहीं. यानें एक ग्रंथ करून त्या देवाला अर्पिला. त्यांत सृष्टिजन्य नानाविध पदार्थ, लेणी, तुलापरिमाणादि विविधमानें, गणित, हीरकादिरत्नें, सुवर्णखनी, भूमिति, इत्यादि शिक्षणोपयोगी अगत्याचे विषय पुष्कळ आहेत. या ग्रंथाची रचना मुलालेंकरांच्या समजुतींत येण्यासारिखी सरळ आणि बाळबोध होती त्यामुळें शाळेंमध्यें मुख्यत्वें तोच ग्रंथ शिकविण्याचा परिपाठ पडला.

## अन्नाय्याच्यारी.

हा कवि तैलंगणांत जन्मला. त्याला पुराणांतील सर्व गोष्टींचें चांगलें ज्ञान होतें. त्यानें **पितामहचरित्र** नामें एक ग्रंथ रचिला, त्याचे दोन भाग केले आहेत. त्यांतील विषय पुराणांतून घेऊन विश्वाचा उत्पन्नकर्त्ता जो ब्रह्मदेव त्याचें वर्णन केलें आहे.

## मंचनामात्या.

हा कवि सामुद्रिकविद्येमध्यें अत्यंत निष्णात होता. यानें त्या विद्येचे बहुतेक संस्कृत ग्रंथ तेलंगी भाषेंत काव्यरूपानें रचिले. ते विद्वज्जनांस आणि राजेलोकांस फार आवडले.

## अब्बन्न कवि.

हा कवि तैलंगणांत जन्मला. त्यानें मोठमोठ्या कवींचें संस्कृत व तेलंगी भाषेंतले पुष्कळ ग्रंथ वाचले, तेणेंकरून तो फार व्युत्पन्न झाला. तो मोठा बुद्धिमान् होता. त्याची गणना मध्यम कवींत नव्हती. त्यानें पुराणांतून सोमवंशी पुरूरवचक्रवर्त्ती हिंदुस्थानच्या राजाचा इतिहास घेऊन त्याचें तेलंगींत भाषांतर केलें. त्याचे तीन अध्याय आहेत, त्यांत त्या राजाचे जन्म, राज्य, आणि विवाह यांविषयीं वर्णन आहे.

## आप्पा कवि.

हा कवि तैलंगणांत राहत होता. यानें तेलंगी भाषेंत छंदःशास्त्रावर **आंध्रप्रयोगरत्नाकर** आणि **वृंदासंभावना** असे दोन ग्रंथ रचिले. पहिला ग्रंथ छंदःशास्त्रावर फार उत्कृष्ट असून लोकमान्य आहे. दुसऱ्या ग्रंथांत वृंदानामक एका दैत्याची स्त्री तिचें जन्मवृत्त वर्णिलें आहे. त्या स्त्रीची विष्णूवर पूर्ण भक्ति होती. त्या योगेंकरून तुळसीरूपेंकरून जन्म पावली असतां सर्वदा कृष्णसान्निध्य तिला प्राप्त झालें. मध्वमतानुसारी लोक तुळसीची उपासना फार करितात. इत्यादि कथा वृंदासंभावना ग्रंथांत मनोरंजक वर्णिल्या आहेत.

## तिमय्यासाति.

हा कवि राजमहेंद्रि नामक गावांत राहत होता. याचा बाप चीमासींसाती आणि अजा बक्कल्लुगोरप्पा. तिमय्यासाती

यानें **कन्यकापुराण** यानांवाचा तेलंगी भाषेंत सुंदर ग्रंथ रचिला. त्यांत विष्णुवर्धन नामक राजपुत्र आणि एक वैश्य जातीची कुमारी यांचा वृत्तांत वर्णिला आहे.

पूर्वीं राजमहेंद्रि जवळ पेनुगोंडा या गावांत विष्णुवर्धन या राजपुत्रानें एका वैश्य कन्येवर बलात्कार करून तिच्या कुंवारपणाचा भंग केला. ती कन्या महा साध्वी होती. तिनें त्या खेदामुळें चितेंत प्रवेश करून आपला देह दग्ध केला. तिच्या घराण्याची शंभर माणसें होतीं तितक्यांनी तिच्या शोकामुळें त्याच चितेमध्यें देह जाळिले. त्या ठिकाणीं लोकांनीं देऊळ बांधून तिची मूर्त्ति स्थापिली, तिला **कन्यकापरमेश्वरी** असें ह्मणतात. वाणीलोक तिची पूजा अर्चा करीत असतात. ती नवसाला पावते असें सांगतात. असो. ही गोष्ट त्या कन्यकापुराणांत करुणारसभरित वर्णिली आहे.

## बसव कवि.

हा कवि श्रीरामचंद्राचा भक्त असून कृष्णातीर प्रांतीं राहणारा असे. रामायण निरंतर वाचल्यानें त्याला श्लोक करण्याची गोडी लागली. त्यानें रामायणाचें तेलंगी भाषेंत भाषांतर केलें. तें फार चांगलें ह्मणून लोक मानीत असत.

## भीम कवि.

तैलंगण देशांत या कवीच्या ज्या कित्येक दंतकथा आहेत त्या ऐकल्या तर हा कोणी देवांशी प्रतापी मनुष्य होता असें खचीत वाटेल. त्रिजंडल प्रांतांत वेमूलवाड ह्मणून गांव आहे ती याची जन्मभूमि. त्यावेळेस याच्या मातोश्रीनें शंकराची पूजाअर्चा फार केली होती त्यावरून असें ह्मणतात कीं, तो पुत्र तिला शिवाच्या प्रसादानें प्राप्त झाला. भीमकवि विद्वान् आणि लोकांमध्यें मान्य व्हावा ह्मणून त्याच्या आईनें शिवाला नवस केले होते. असें ह्मणतात कीं, हा बाळपणांतच आपली तेलंगी भाषा प्रतिष्ठित लोकांप्रमाणें बोलूं लागला, तेव्हांपासून लोकांस

त्याच्या बुद्धीचें आश्चर्य वाटलें. त्याच्या बापाचें नांव शिव. तो मोठा तपस्वी आणि शिवभक्त होता. तो मरण पावल्यानंतर भीमकवि चार महिन्यांनीं जन्मला तरीं बापानें त्याला असा आशीर्वाद देऊन ठेवला होता कीं, तो जें कांहीं बोलेल तें खरें होत जाईल. पुढें ती गोष्ट बहुत वेळां लोकांच्या प्रत्ययास आली. त्याच्या ग्रंथांवरून असें दिसतें कीं, त्यानें कर्नाटक, महाराष्ट्र, इत्यादि परकीय देशांत पर्यटन केलें असावें.

कलिंग देशांत तंजावर ह्मणून शहर आहे, तेथील राजा रायकलिंगगंगु यास भीमकवि भेटायाला गेला होता; परंतु राजानें त्याचा अवमान केला ह्मणून त्यानें त्याला शाप दिल्हा. त्यामुळें त्याची सर्व संपत्ति लयास जाऊन त्या राजानें बहुत दुःखें भोगिलीं. पुढें त्या राजाला पश्चात्ताप होऊन तो भीमकवीला शरण आला. तेव्हां त्यानें उश्शाप दिल्यावर त्याची स्थिति पूर्ववत् झाली. तेव्हां रायकलिंगगंगु शत्रूस जिंकून आपल्या राज्यासनावर पुनः अधिरूढ झाला.

भीमकवीनें छंदःशास्त्रावर एक ग्रंथ रचिला, त्याला **भीमकविचंडांशु** असें नांव दिल्हें आणि ज्यातक प्रकरणीं त्याचा स्वतंत्र एक ग्रंथ आहे त्याला **भीमनज्योतिष** असें ह्मणतात. या शिवाय अणखी त्यानें अनेक शास्त्रांचे विषय कवितारूपानें रचिले. त्यापैकीं पुष्कळ ग्रंथ प्रस्तुत उपलब्ध नाहींत. कारण ते उपयोगी ग्रंथ लोकांनीं दाबाडून ठेविले. याच्या कांहीं कविता भाट लोकांच्या जवळ आहेत आणि कांहीं ग्रंथ श्रीमंत लोकांच्या संग्रहीं आहेत. भीमकवीनें केलेले सर्व चमत्कार सर्व तैलंगणदेशभर बायका मुलांच्या तोंडीं आहेत. त्याचें नांव सर्वांस माहित असून त्यानें जे सर्व अद्भुत चमत्कार केले ते यद्यपि दंतकथेवरून परंपरेनें चालत आलेले आहेत, तथापि त्या गोष्टी खऱ्याच घडल्या असा सर्व लोकांचा विश्वास आहे. तो पराकाष्ठेचा नीतिसंपन्न आणि दाता होता त्यामुळें तो मरण पावल्यावर त्याच्या आप्तलोकांस फार दुःख झालें.

## गंगाधर कवि.

हा कवि ओरिस्सा ज्याला उत्कलदेश असें ह्मणतात तेथील राहणारा असे, परंतु त्यानें तेलंगी भाषेंत काव्यें केलीं आहेत. तो लहानपणींच तैलंगण देशांत गेला आणि एका नामांकित घरगुती शाळेमध्यें त्यानें विद्याभ्यास केला. तो नीतिमान् आणि धार्मिक असून प्रवास करणारा मोठा अट्टल होता आणि बालनराय नामक राजा विद्वज्जनांस आश्रय देतो असें ऐकल्यावरून तो त्याच्या दर्बारीं गेला. त्याला राजानें उदारपणानें आश्रय देऊन सुखस्थितींत ठेविलें. तो राजा लिंगायत मतानुसारी होता ह्मणून गंगाधरकृत काव्यग्रंथांत लिंगायतांच्या जातीप्रकरणीं पुष्कळ गोष्टी अढळतात. तो फार नीतिमान् मनुष्य असे ह्मणून तो कालग्रस्त झाला तेव्हां लोकांनीं पुष्कळ शोक केला. राजा आणि प्रजा हे दोन्ही त्याला फार चाहात असत.

## घंटय्यकवि.

घंटय्य हें एका देवतेचें नांव या कवीला त्याच्या आईबापानीं ठेविलें होतें. तो तैलंगण देशांत जन्मला. त्यानें आपलें अध्ययन संपविल्यानंतर काशिखंडांतून सुराभांडेश्वराची कथा तेलंगी भाषेंत काव्यरूपें उतरली आहे. या कथेचे पांच अध्याय आहेत.

घंटय्य कवीनें स्वकपोलकल्पित कोणतीही गोष्ट रचिली नाहीं, परंतु ग्रंथांतरीच्या सिद्ध कथा घेऊन त्या काव्यरूपानें बांधिल्या. या कवीला पदरचना इतकी चांगली साधली होती कीं, ती पाहून कविजन फार चकित होत असत. या कवीला दुसरेही राजे द्रव्य देत असत. तो आपल्या गांवीं स्वर्गस्थ झाला.

## जगन्नाथ.

हा कवि तैलंगणाच्या उत्तरेकडील प्रांतांतला राहणारा एका प्रख्यात कुळांत जन्मला. यानें तेलंगी भाषेंत राजनीतिपर

पुष्कळ ग्रंथ केले आहेत. या कवीच्या वाक्यावर जितक्या राजे लोकांचा भक्तिभाव होता तितक्यांकडून या कवीला स्वास्थ्य मिळालें होतें. भारतांतील शांतिपर्वाचा एक भाग जो राजधर्म त्याचें या कवीनें तेलंगींत भाषांतर केलें आहे. या कवीचे बहुत ग्रंथांमध्यें दर्शन होतें.

## लिंगकवि.

हा कवि असून मोठा इतिहासवेत्ता होता. याला बाळपणांतच सूर्यवंशी षोडश सार्वभौमांच्या कथा तोंडपाठ येत असत. त्याशिवाय तेलंगी भाषेंतले यच्चयावत् इतिहासग्रंथ यानें वाचले होते. पुराणामध्यें सन्नियुध राजाचें आख्यान फार मनोरंजक आहे त्याचें यानें तेलंगींत उत्कृष्ट भाषांतर केलें. त्याचे तीन भाग आहेत. पहिल्यामध्यें राजाचा जन्म, विवाह, रानटी लोकांच्या वर्त्तणुकी, आणि राजव्यवहार हे विषय सांगून दुसऱ्यांत श्वापदवृद्धि, मृगया, उद्यानविहार, जलक्रीडा, इत्यादि निरूपण करून तिसऱ्या प्रकरणांत राजांची जैत्रयात्रा, पुनरागमन आणि पुरःप्रवेश, राज्यप्रवर्त्तन, इत्यादि अनेक विषय बांधिले आहेत. या कवीला स्वदेशांतील मोठमोठ्या धनिक लोकांकडून पुष्कळ द्रव्य मिळत असे. तो स्वदेशीं पंचत्व पावला.

## लिंगराजा.

असें सांगतात कीं, हा कवि बुद्धीनें मोठा जबरदस्त आणि कल्पक होता. याची लहानपणांतच बहुत विद्येमध्यें तयारी झाली होती आणि याच्या आंगीं व्यवहारचातुर्य फार होतें, त्या योगेंकरून यानें अल्पकालांतच आंध्र देशींच्या राजघराण्यांत परिचय पाडून एक हुद्दा मिळविला. त्या शिवाय दुसऱ्याही राजा रजवाड्यांमध्यें त्यानें मित्रत्व जोडलें. हा मलयाद्रि पर्वतांवरील नृसिंह देवाची भक्ति करीत असे. यानें फावल्या

वेळांत तेलंगी व्याकरणाचा एक ग्रंथ रचून नृसिंहदेवाला अर्पि-
ला. कालांतरीं त्या ग्रंथाचें नांव मलयाद्रिनृसिंहचंडांशु असें पडलें. हा आपल्या उमेदींत मृत्यु पावला.

## कावेल्ली वेंकटबोरय्या.

हा कवि आरवेल्ली नियोगी ह्मणून एक ब्राह्मणाची शाखा आहे तींत एका उत्तम कुळांत उत्पन्न झाला. उत्तर सर्कार गांवाच्या सन्निध एलोर नामक एक किल्ला आहे तेथें तो इसवी शकाच्या १७७६ मध्यें जन्मला. याला वडील धाकटे अणखी भाऊ होते. याचा बाप कावेल्ली वेंकट सुबय्या तो मोठा संभावित असून विजयनगरांतील राजाचा कुळपरंपरागत मंत्री असे. लहानपणीं एलोर एथील एका गांवठी शाळेंत दाहा वर्षांचा होईपर्यंत शिकत होता. मग ती शाळा सोडून तो काव्यें पढूं लागला. त्याची बुद्धि अत्यंत तीव्र होती त्यामुळें पांच साहा महिन्यांत संस्कृत कविता करूं लागला. त्याची श्लोककविता उद्दाम आणि सुरस असी पाहून विद्वान मंडळीस मोठें आश्चर्य वाटूं लागलें.

वेंकटबोरय्याचा वडील भाऊ मोठ्या अधिकारावर होता तसी जागा संपादन करण्याची आपल्यास योग्यता यावी ह्मणून तो एका मख्यात काजीजवळ विद्यार्थीपणा करून हिंदुस्थानी व फारसी ह्या दोन भाषा शिकला. तो काजी एलोरच्या नजीक कोत्तूरू ह्मणून एक खेडें आहे तेथील जहागीरदार असे. त्या उपरांत मार्गन साहेबानें मच्छलीपट्टन एथें एक इंग्लिश शाळा स्थापिली होती, त्या शाळेंत कांहीं दिवस अभ्यास केला. तेव्हां त्याला नुक्तेंच पंधरावें वर्ष लागलें होतें. पुढें कर्नल पीयर्स ह्मणून एक साहेब एलोरचा सेनाधिपति होता, त्याचा व याचा मित्रभाव होऊन त्याचा आश्रय बोरय्यानें संपादन केला. तेव्हांही तो कांहीं अवकाश मिळे तितक्यांत तेलंगी भाषेंतील काव्यें व व्याकरण यांचें अवलोकन करीत असे. त्यांत आत्तालूरूअप्पय्या नामक जो प्रसिद्ध कवि होता त्याचे ग्रंथ बहुत करून यानें पा-

हिले. नंतर बोरय्या मच्छलीपट्टुन एथील सैन्यास पगार वांटणारा जो साहेब होता त्याच्या आश्रयानें राहिला आणि त्या कामाची थोडक्याच दिवसांत माहितगारी करून घेतली. नंतर ओंगोल, मनुबोल, कोंडपल्ली, इत्यादि ठिकाणीं सैन्यास पगार वांटण्याविषयीं बहुत वेळां त्याचीच नेमणूक झाली होती आणि तो आठरा वर्षांच्या वयाचा झाला तेव्हां माधवपाल्यम एथें डेंट साहेबानें त्यास आपल्या जवळ कार्कुनीची जागा दिल्ही. परंतु त्याच्या पूर्वींच्या साहेबाकडे बोरय्याच्या वडील बंधूनें शिफारस केल्यावरून त्या साहेबानें त्यास बोलावून आणून सरकार्कुनीची जागा आपल्यापाशीं दिल्ही. पुढें असें झालें कीं, लेफ्टनेंट मेकेन्झी ह्मणून जो एक साहेब मख्यात इंजनेर होता, त्याला सर्व्हेअर जनरल आफ् इंडिया ह्मणजे हिंदुस्थानांतील पाहाणी करणाऱ्या सर्व साहेबांवर वरिष्ट असी पदवी मिळाली आणि तो निझाम सर्कारच्या राज्यांत आपलें काम पाहत होता. त्या वेळेस बोरय्याला त्या साहेबापाशीं दुभाषीपणाची व सरभाषांतर करण्याची मोठी जागा मिळाली. त्या साहेबानें सर आलेक्झ्यान्डर जानसन् यास एक पत्र लिहिलें, त्यांत बोरय्याची फार तारीफ केली आहे. ती त्या पत्राचा पुढील भाग उतरून घेतला आहे त्यावरून दृष्टोत्पत्तीत येईल.

"त्यानें जानसन् याला असें लिहिलें आहे कीं, माझा एतद्देशीय एका बुद्धिमान गृहस्थ ( मयत कावेल्ली वेंकटबोरय्या ) याच्याशीं समागम झाला, तेव्हां तो केवळ अल्पवयस्क होता. तरी तो महा प्रज्ञाशाली असून स्वभावानें सर्वांशीं इतका मनमिळाऊ असे कीं, ह्या माझ्या पाहाणीच्या कामांत अनेक उपयुक्त विषयांचे शोध करण्यामध्यें ज्या ज्या जातीच्या लोकांबरोबर मला प्रसंग पडले त्यांचीं त्यानें मला समजूत घालून दिल्ही. हिंदुलोकांच्या ज्ञानरूपी द्वारांत माझा प्रवेश करून देणारा कायतो पुरुष हाच मला प्रथमतः भेटला. मला अन्य भाषांचें ज्ञान नसतां ज्या गोष्टीविषयीं मी फार दिवस शोध करीत होतों त्या प्राप्त होण्याचे उपाय आणि उत्तेजन त्याच्या बुद्धिबळानें मला मिळा-

लें ह्मणून मी त्याचा फार ऋणी आहें. हल्लीं जसे अति गहन व अव्यवहारिक शब्दांनीं मिश्रित कानडी, तामीळ, संस्कृत, इत्यादि भाषेंतील लेखांचींही भाषांतरें झालीं आहेत तशीं त्यावेळेस नव्हतीं. जेव्हां श्रीरंगपट्टन जिंकून घेतलें त्या वेळीं आमच्या लोकांत कोणीही कानडी भाषेंतून भाषांतर करण्यास समर्थ नव्हता. त्यांत संस्कृत भाषेची तर मला कोणीच कांहींच माहिती देईना. त्यावेळीं हिंदुस्थानांत येऊन मला थोडीं वर्षें झालीं होतीं. असें असतां मला मयत बोरय्याची मदत मिळाल्या दिवसापासून हिंदुलोकांच्या ज्ञानरूपी भांडाराला एक नवीनच द्वार उघडल्या सारिखें झालें. यद्यपि तो तारुण्यावस्थेंत मरण पावल्यामुळें माझा त्याचा वियोग झाला तथापि त्यानें जी पद्धत आणि कित्ते घालून दिल्हे होते त्यांचें त्याच्या देशबांधवानीं आणि शिष्यांनी मोठ्या आनंदानें अनुकरण केलें. पुढें सर्व प्रांतांची मूळस्थिति शोधून काढण्याकरितां त्यानें जो क्रम घालून दिल्हा होता त्याच पायावर एका मंडळीची स्थापना झाली; तिचा क्रम जसा सुखप्रद होता तसाच शेवटही चांगलाच झाला. ह्याच कार्याकरितां उपयुक्त विषयांच्या संग्रहार्थ बोरय्याला मी नेमिलें होतें. त्याविषयांचे संग्रह करण्यांत त्यानें चातुर्य व तत्परता हीं दर्शविल्यावरून मी फार संतुष्ट झालों. त्यांत सर्वांशीं ईस्टइंडिया कंपनीचें हित करावें हाच याच्या परिश्रमाचा मुख्य उद्देश होता. त्याची चाकरी कठीण व मेहनतीची होती. त्याला श्रीशैल देशाच्या प्रांतवर्त्ती जे उंच पर्वत, दरेखोरे, आणि जंगलें यांतून फिरावें लागत असे."

या पत्रांतील त्याचें वृत्त केवळ दिग्दर्शनार्थ लिहिलें. याखेरीज तो कर्नल मेकेन्झी साहेबाच्या संग्रहीं होता, त्यावेळेस त्याजकडून पुष्कळ लोकोपयोगी कृत्यें घडून आलीं. मनीला देशावर स्वारीमध्यें कर्नल मेकेन्झी साहेबाला इंजनेर नेमला, त्यावेळेस बोरय्याला घरीं येणें प्राप्त पडलें. त्यानें हैद्राबादेहून मद्रासेस येतांना मार्गांत जो वृत्तांत घडला त्याचें त्यानें

दिनवृत्त टिपून ठेविलें आणि त्या मजकुराचीं संस्कृत व तेलंगी भाषेंत त्यानें कांहीं कवनेंही रचिलीं. तसेंच अणखी त्यानें हिंदुस्थानाचा इतिहास रचावा या बुद्धीनें विद्याविषयक पदार्थांची सामग्री पुष्कळच जमा केली होती. एलोर एथें असतां यंत्रें, नानाप्रकारच्या कला व विद्या यांत त्यानें आपली ज्ञानशक्ति व चातुर्य हीं दर्शविलीं. तेणेंकरून त्याच्या देशबांधवांस फार आश्चर्य वाटलें. तो सुशील व निर्दोष वर्त्तणूकीचा असे ह्मणून ते त्याजवर पराकाष्ठेचा लोभ करीत असत. मेकेन्झी साहेब स्वारीहून परत आल्यावर बोरय्या पुन्हा त्याच्या समागमें आपल्या पूर्वीच्या शोधार्थ गेला.

सन्न १७९८ मध्यें टिप्पूसुलतान याबरोबर लढाई होत असतां तेथें बोरय्या त्याजबरोबर गेला आणि निझामाच्या राज्यांत गदवाल ह्मणून एक मांडलिक जमीनदार आहे तेथें पोंहचेपर्यंत मार्गांत जें नित्यवृत्त घडून आलें त्याचें त्यानें काव्यरूपानें लखन करून ठेविलें. एकदां असें झालें कीं, मेकेन्झी साहेबाचीं सर्कारी कागदपत्रें त्या जमीनदाराच्या लुटारू लोकांनीं चोरून नेलीं, तेव्हां तीं परत आणण्याकरितां बोरय्याची नेमणूक केली. बोरय्या तेथें गेल्यावर तेथील जमीनदारानें त्याला पकडून कैदेंत टाकिलें आणि त्याचें अन्नोदक बंद करून प्रथमतः त्याच्याशीं मोठ्या कठोरतेनें वागणूक केली. परंतु बोरय्यानें आपली मनमिळाऊ वर्त्तणूक आणि रसिक व ह्रदयंगम कविता यांच्या योगानें त्या सरदाराचें कठोर अंतःकरणाला द्रव आणिला, आणि त्यापासून आपल्या साहेबाचीं कागदपत्रें परत घेऊन कांहीं इनामेंही मिळऊन परत आला. कांहीं दिवसानीं बोरय्या मेकेन्झी साहेबाबरोबर श्रीरंगपट्टन एथें गेला आणि तेथील किल्ल्यावर हल्ला होऊन तो इंग्रेजांचे हस्तगत होई तोंपर्यंत ज्या सर्व गोष्टी घडून आल्या त्यांचे त्यानें करुणारसभरित कवितारूपानें वर्णन केलें आहे. त्यांत ब्रिटिश सर्काराचे किल्ल्यावर बावटे चढविले त्यावेळचें तर वर्णन फारच उत्कृष्ट केलें आहे. ह्या अशा त्याच्या कृत्यावरून त्याला मेकेन्झी साहेबा-

पासून मोलवान बक्षिसें मिळालीं. टिप्पूसुलतान याचा पराभव झाल्यावर थोडक्याच काळानें कर्नल मेकेन्झी याला म्हैसूर देशाची पाहाणी करण्यामध्यें देखरेख करणारा नेमिलें. तेव्हां बोरय्या त्याच्या बरोबर बंगलोर, निगागल, आणि शीरा ह्या देशांच्या मार्गानें चित्रदुर्ग एथें गेला. दक्षिण हिंदुस्थानाचा इतिहास रचायाला मेकेन्झी साहेबाला जी विद्याविषयक सामग्री पाहिजे होती ती त्यानें पुष्कळच जमा करून दिल्ही. त्याचें लक्ष प्रायः ईस्टइंडिया कंपनीचें होईल तितकें हित करण्याकडे होतें. त्याला आपल्या चाकरीच्या कृत्यांत ज्या ज्या पदार्थांचें व विषयांचें शोध कर्तव्य होते ते व्यवस्थेनें प्राप्त करून घेण्यांत तो फार तत्पर असे आणि त्याप्रमाणें त्याजकडून उपयोगही घडला.

सन्न १८०० मध्यें सर आर्थर वेलेस्ली याच्या फौजेनें महाराज धुंडी यास हरिहर एथें पकडलें त्या वेळच्या गोष्टींचें बोरय्यानें एक काव्य रचिलें. नंतर त्यानें एका पवित्र मनुष्याच्या वर्णनपर शंभर श्लोक रचिले, ते इतके मनोरंजक व यथार्थ होते कीं, त्यावरून त्या सत्पुरुषाची कीर्त्ति फार वाढली. अणखी त्यानें **श्रीरंगराजचरित्र** या नांवाचा एक ग्रंथ केला. त्यांत उमातुर देशाची स्थापना झाल्या तागाईत श्रीरंगपट्टणच्या राजांची वंशावळी व श्रीरंगपुराचा विध्वंस व तेथें यादव राजानीं कस कसीं राज्यें केलीं व ते कसे प्रबळ होत गेले याविषयींचें वर्णन आहे. जेव्हां श्रीरंगपट्टण एथें इंग्लिश फौजेची दाणादाण झाली, तेव्हां वेंकटबोरय्या हा त्या फौजे बरोबर इंग्लिशानीं जिकलेल्या प्रांतांतून जात असतां जनरल क्यांबेल, कर्नल टामस मनरो आणि तसेच दुसरे नामांकित सरदार व म्हैसूरचा दिवाण ह्यानीं वाटेमध्यें त्याची अगत्यानें भेट घेतली आणि सर्वांनीं त्याची फार तारीफ केली. या राज्यप्रकरणीं गडबडीची शांतता झाल्यावर पुढें मेकेन्झी साहेबाच्या आज्ञेवरून बोरय्यानें गणित, भूगोल, भूमिति, ज्योतिष, इत्यादि नानाप्रकारच्या विद्याविषयांवर व्यासंग केला. तेव्हां तो इंग्लिश आणि हिंदू या दोन्ही प्रकारच्या समजुतीनें त्याला सर्व विद्यांत माहितगारी झाली. त्याची धारणाशक्ति मोठी

होती त्यामुळें स्वल्पकाळांत त्यानें बहुत भाषांचें ज्ञान संपादिलें. तो नकाशे इतके कांहीं नीटनेटके व बिनचूक काढीत असे कीं, ते पाहून मेकेन्झीला वारंवार विस्मय वाटला.

त्यानें वेगळ्या प्रकारची नाणी आणि शिक्के यांचा संग्रह केला होता आणि दोदारी एथें दगडाच्या तक्त्यावर ज्या हळेकनड ह्मणजे प्राचीन कानडी लीपि फार बिकट होत्या त्यांच्या यानें हुबेहुब प्रतिमा काढिल्या आणि त्या हल्लीं कलकत्ता एथील एशियाटिक सोसायटि नामक सभेच्या कौतुकसंग्रहालयांत ठेविल्या आहेत. त्याच्यावर मेकेन्झी साहेबानें त्याचें नांव घातलें आहे.

मेकेन्झी साहेबाचें सर्कारी कामाकरितां मद्रासेंत दोन वर्षे राहणें पडलें होतें आणि बोरय्याही त्याच्या बरोबर गेला होता. तेथें तो अनेक प्रकारचीं हस्तलिखित पुस्तकें यांचें भाषांतर करण्यामध्यें दोन वर्षे राहिला होता. असो, या मनुष्याचीं बहुत कृत्यें विस्तारभयास्तव लिहिण्याचें पुरें करितों.

याचें विसाव्या वर्षीं कशिनीकोटा प्रांतांतील वेंकटाचलम याच्या धाकट्या कन्ये बरोबर लग्न झालें होतें. याला संतति मिळून एक कन्या मात्र झाली होती. पुढें तो आपल्या २६ व्या वर्षीं ह्मणजे सन्न १८०३ मध्यें अकस्मात् अपस्मार होऊन मरण पावला. मेकेन्झी साहेबानें त्याच्या स्मरणार्थ समुद्र किनाऱ्यावर एक पुतळा स्थापिला, तो अद्यापि आहे.

ह्या विशाळ बुद्धीच्या पुरुषास ईश्वरानें अणखी कांहीं दिवस वांचविलें असतें तर याच्या हातून विद्याप्रकरणीं आणि देशसुधारणूक ह्या विषयींही कांहीं तरी अचाट कृत्यें घडलीं असतीं, यांत संशय नाहीं.

## कृष्णमूर्त्ति.

हा कवि कोट तालुक्यांत रामचंद्रपुर एथें हल्लीं विद्यमान आहे. याचें उपनांव शिष्टवारू. याला वेगवेगळ्या बहुत भाषा

येतात असें ऐकतों. सांप्रतकाळांमध्यें साऱ्या तैलंगणांत याच्या बरोबरीचा बुद्धिमान् कवि कोणी नाहीं असें सांगतात. यानें यक्षानंद या नांवाचा एक ग्रंथ केला आहे. हा कवि सुमारें पंचावन्न वर्षांचें वयाचा आहे.

समाप्त.

# ग्रंथकारांच्या नांवाची अनुक्रमणिका.


## अ.

अगस्त्य, २०९.
अच्युतोपाध्याय, ३५.
अथर्वणाचार्य, २१०.
अन्नंभट्ट, १०२.
अन्नाय्याय्यारी, २३३.
अपग्गा, २०२. २०८.
अप्पय्यादीक्षित, १०५.
अप्पर, २०८.
अब्बन्नकवि, २३४.
अभिनवनृसिंहभारती, १६.
अभिनवसच्चिदानंदभारती, १६.
अमरुगराजा, २२.
अमरदेव, ३४.
अमरसिंह, ३४.
अमृतराय, १८७.
अय्यादीक्षित, ११३.
अक्षोभ्यदीक्षित, १०२.
आत्तालूरूपप्पय्याकवि, २३९.
आंध्रकालिदास, २११.
आधिकेनान, २०२. २०७.
आनंदगिरी, २.१६. १८.
आप्पाकवि. २३४.
आपिशली, ७५.
आयळभास्कर, २१५.
आरव्हे, २०२.
आलसानी पेद्दन्ना, २१५.
आल्हेयरप्रभृतिसतज्ज्ञानी, २०२.

## इ.

इमादिभारती, १६.
इमादिसच्चिदानंदभारती, १६.
इंद्र, ७५.
इंडुय, ७६.
ईलेश्वरोपाध्याय, ४६.

## उ.

उत्पलभट्ट, ९२.
उदयनाचार्य, ३५.
उदंक, १६.
उद्धवचिद्घन, १५५. १९८.
उरगप्पादंडनाथ, ७६.
उंबका, २०.
उंबा, २१,२२.

## ए.

एकनाथस्वामी, १४३.१६१.
एलिस,मिस्तर.एफ्. २०७.

## क.

कदंब, ९४.
कन्यादानी, १२०.
कपिलर, २०२. २०७.
कबीर, ६९.१४१. १४५.
कर्पूर, ५२.
कल्याणस्वामी, १४९.
कल्याणमल्ल, ६३.
कलिंग, ५३.
कात्यायन, ३५.
कान्होपाठक, १९१.
कार्तिकस्वामी, ८.
कालिदास, ३२. ५४, ५५, ५६, ५७. ५९. २११.
कावेल्लीवेंकटबोरय्या, २३९.
काशकृत्स्नी, ७५.
काशिकाकार, ११४.
कुमारिलभट्ट, ८, ९, १०. २०.

कृष्णदेवराजा, कृष्णदेवरायल्लु, ८८.९६.९८.१०५. २१६.२१८,२१९, २२०.२२३.२२५.
कृष्णमूर्त्ति, २४४.
केशवस्वामी, १८५.
केळदीबसवप्पानाईक, १२०.
कैयट, ३७.१२३.
कोकिल, ५३.
कोलब्रुक, साहेब. ३५. ७४.
कोंडभट्ट, ११५.

ग.

गंगाधरकवि, २३७.
गंगाधरपंडित, ६२.
गजपतिप्रतापरुद्र, १०४.
गणासंबंधर, २०८.
गणिकानंद, १०१.
गणेश, ६२.
गदाधरकवि, ९९.
गिरधरकवि, ९४.
गिरधरलाल, १६१.
गुणाढ्य, ७०.
गोपाळदास, ९९.
गोवर्धन, ७०.
गोविंदकवि, २२२.
गोविंदयति, ७. १४, १५.
गोविंदाचार्य अष्टपुत्रे, १२५.
गोरक्षनाथ, ३९. १३८.
गोराकुंभार, १५४.

घ.

घंटय्यकवि, २३७.

च.

चक्राप्पा, २२६.
चर्पटिनाथ, ३७. ३९.
चंद्र, ७५.
चंद्रशेखर, १६.
चांगदेव, १३६.१४८.
चांगाकेशवदास, १३९.
चांगावटेश्वर, १३६.
चित्सुख, १६.
चिन्नवीरन्ना, २३०.
चोखामेळा, १८३.

ज.

जगन्नाथ, २३७.
जगन्नाथरायपंडित, १०८.
जनाबाई, १५३.
जयदेवस्वामी, ३०.
जैमिनी, २१, २२.
ज्योन्स, सर. उलियम. ३२. ३४.७४.

ट.

टेलर, डाक्तर. ६२.

त.

ताताचार्य, १२०.
तारेंद्र, ५३.
तिक्कनसोमयाजी, २११.
तिमय्यासाति, २३४.
तुकाराम, १५३. १६६. १७७.
तुळसीदास, १७९.
तेनालरामलिंग, २२०.
तेरूवेल्लुवर, २०१, २०२. २०६.
त्र्यंबकभट्ट, १२५.
त्र्यंबकराजवैद्य, ११९.
त्रिविक्रमदेवचक्रवर्ती, ७.
त्रोटक, १६.

द.

दंडी, ५२. ५६, ५७. ५९.
दामाजीपंत, १५९.

दिवभूपाळ, २९.
दुर्गादास, ७५.
देवीदास, १७८.

ध.

धनेश्वरदैवज्ञ, ६२.
धावक, ७०.

न.

नन्नयभट्ट. २१०.
नरसीमेहता, १८४.
नागेशभट्ट, ११४.
नागोजीभट्ट, १२२.
नानकशाह, १५५.
नाभाजी, १८१, १८२. १९८.
नामदेव, १५१. १६७.
नारायणचक्रवर्ती, ३५.
नारायणाचार्य, ८५.
निवृत्तिनाथ, ४२.१४६.१४८,१४९.
निंबराज, १९०.
नीळकंठ, १६. ३५.
नृसिंहगणक, ६२.
नृसिंहभारती, १६.
नृसिंहमूर्त्ति, १६.

प.

पतंजली, ८.१५.
पद्मपादाचार्य, १५, १६.
पक्षधरमिश्र, ३०.
पाणिनी, ७५.
पार्थसारथीमिश्र, ७२.
पिंगळसूरण्णा, २२३.
पुरुषोत्तम, १०१.
पुरुषोत्तमभारती, १६.
पेद्दवीरन्ना, २३०.
पेद्दीभट्ट, ८९.
पोठय्या, ९२.
पोतराजू, २१२.
प्रेमाबाई, १९०.

ब.

बप्पनकवि, २२८.
बसवकवि, २३५.
बहारीलाल, १२१.
बंधनकवि, २२९.
बाणकवि, ५३.६०
बालसरस्वति, २१०.
बाळगंगाधरशास्त्री, १९९.
बाळंभट्टपायगुंडे, ११५. १२५.
बोधलेबावा, १८६.
बोपदेव, ७४.
ब्रह्मगुप्त, ६२.
ब्रह्मानंदबावा, ४२.

भ.

भट्टभास्कर, ५१.
भट्टमूर्त्ति, २२४.
भट्टोजिदीक्षित, ११३. १२३.
भवभूति, ५३, ५४. ५६, ५७.
भरत, ११४.
भरतमाल, ३५.
भर्तृहरी, ३७.
भाऊदाजी, डाक्तर. ६.५७. ६५.
भागोदास, १४४.
भानुदीक्षित, ३५.
भामह, ३६.
भारतीकृष्ण, १६.
भारवी कवि, ५९.
भास्कराचार्य, ६१.
भास्करपंडित, १६,१७.
भीमकवि, २३५.
भीमाचार्य, १२५.
भूधर, ६२.
भैरव कवि, २२८.

भैरवनाथ, १३९.
भोजचंद्रलक्ष्मण, १०५.
भोजराजा, ३३. ३६. ५३. ५५, ५६, ५७,५८, ५९, ६०.१०५. २११.

म.

मयपंडित, १०.
मच्छेंद्रनाथ, ३९. ४१.
मथुरेशपंडित, ३५.
मदन, ५३.
मधुरंगचोक्कनाथ, २३३.
मध्वमुनीश्वर, १८८.
मयूर, ५३.
मलय्या, २२६.
मल्हन, २१३.
मल्लीनाथ, ९०.
महादेववेदांती, ३५.
महिधरभट्ट, ९२.
महिपतराव, १८३.
महिपति, १९८.
महेश्वरभट्ट, १२५.
मंचनामात्या, २३४.
मंज, ५४.
मंडनमिश्र, ९.२१,२२.
माघकवि, ५७.
माणिक्यपव्यासर, २०९.
माधव, ७७.११४.
माधवराय,२२६.
मिराबाई, १५७.
मिश्रजी, १२५.
मुकुंदराज, १३६.१४०.
मुक्ताबाई, १४६.१४८,१४९,१५०.
मुक्तेश्वर, १७८.
मुद्गलभट्ट, १९२.
मुरग्गा, २०८.
मुरारिमिश्र, १६,१७.
मुकूतिमण्गा, २१९.
मॅकेंझी, कर्नल. कालिन. ७ ८१. २४०.
मोरेश्वरभट्ट, १२२.
मोरोपंतपंडित, १९३.
मोहनांगी, २१९.
मौल्डी, २२५.

र.

रघुनाथपंडित, १९७.
रत्नेश्वरमहोपाध्याय, ५४.
रंगनाथ, ६२.
राघवेंद्राचार्य, १२५.
राजशेखर, १०.१२.
राजाराममोहनराय, १२७.
रामचंद्रभारती, १६.
रामजोशी, १९६.
रामदासस्वामी, १७२.१७७.
रामदेव, ५३.
रामन्यायालंकार, ७५.
रामभद्रकवि, २२५.
रामानाचारी, ७५.
रामानुजाचार्य, ६३.
रामाश्रम, ३५.
रायनाभास्कर, २१५.
रायमुकुट, ३५.
रुद्रभट्ट, ३५.
रोहिदास,१४५.

ल.

लक्ष्मणकवि, १०४.२२९.
लक्ष्मीनारायणाद्या, ५१.
लिंगकवि, २३८.
लिंगय्या, २२८.
लिंगराजा, २३८.

लेशामयतिलक, ६५.
लोकभनय्या, २३१.
लोलिंबराज, ११६.

## व.

वडवानलभट्ट, २३२.
वरदराज, २९.
वरदाचार्य, ८६. ८८.
वररुचि, ३५. ५३.
वराहमिहिर, ९१.
वल्लभाचार्य, ९४.
वामन, ११४.
वामनपंडित, १७६.
वारेन, क्यापटन. ७६.
वालीज, २०२. २०८.
विक्रमादित्य, ७.३७, ३८.४२.५८.
विठ्ठलनाथ, १००.
विद्याधिराज, १०.
विद्यानाथ, १६.८२.
विद्यारण्य, ७७.
विद्याविनोद, ५३.
विद्याशंकर, १६.
विद्यामैन्य, १६.
विद्येंद्रगुरु, १७.
विनायक, ५३.
विलकिन्स, साहेब. ७४.
विलसन, प्रोफेसर. ३४.
विष्णुशर्मापंडित, ७३.
विष्णुशास्त्रीभट, १२५.
वीतराग, १६.
वृत्तिकार, ११४.
वेदांताचार्य, ८४.
वेंकटपतिराजा, २२३.
वेंकटाध्वरी, ११८.
वैयाकरणलक्ष्मणकवि, २२९.
वैयाकरणसर्वस्वकार, ११४.
बोपालित, ३५. ११४.
व्यासमुनी, १.८.१७.२१.

## श.

शंकर, ५३.
शंकरभारती, १६.
शंकरपंडित, १२५.
शंकराचार्य, १.६.३५.
शाकटायन, ७५.
शार्ङ्गधर, ६४.२१०.
शालवाहन, ४२.
शाहामुनी, १९८.
शितिकंठ, १०३.
शिवगुरु, १०.
शिवकल्याण, १७३.
शेकस्पायर, ३४.
श्रीकंठ, ५४.
श्रीधर, ९६.
श्रीधरस्वामी, १८४.
श्रीहर्ष, ६९.
श्रुतगोपाळ, १४४.

## स.

सच्चिदानंदभारती, १६.
सनंदन, १६.
संकर्षण, ८.
साकल्यमाला, ७७.
साहीगिमारा, २१५.
साळ्यारमाळ, १९६.
सिंहगिरीश्वर, १६.
सुधन्वा, ९.
सुपद्मनाभदत्त, ३५.
सुबंधू, ५३.
सुभानराव, १९३.
सुरेश्वर, १६.
सुंदरर, २०९.

ग्रंथकारांच्या नांवाची अनुक्रमणिका.


सुदर्शन, ६२.
सूरदास, १५८.
सेतेकर, २०१.
सोपानदेव, १४६. १४८, १४९, १५०.
सोमदेव, ७०.
सोमनाथभट्ट, ७१.
स्टेन्झलर, आडालफस. फ्रेडरिक. ३४.
स्त्रीनाथ, २१३.
स्वारोचिषमनु, २१७.


ह.


हरिवल्लभ, ११५.
हरिवंश, ५३.
हलायुधभट्ट, ५१.
हस्तामलक, १६.
हेमचंद्र, ६४.
हेमाडपंत, १५१.
हेमाद्रि, १५१.


क्ष.


क्षीरस्वामी, ३५. १०२.


ज्ञ.


ज्ञानघन, १६.
ज्ञानेश्वर, ४२. १४६, १४७, १४८, १४९, १५०. १५२.
ज्ञानेंद्रसरस्वती, ११४.
ज्ञानोत्तम, १६.

# ग्रंथांच्या नांवांची अनुक्रमणिका.

## अ.


अगस्त्य व्याकरण, २०९.
अग्निकुमार, १००.
अग्निवेश्यरामायण, १९५.
अणुभाष्य, १०१.
अतिसुदि, २०२.
अद्वैतकौस्तुभ, ३०.
अद्वैतसिद्धांत, २१८.
अध्यात्मप्रकाशिकाशतश्लोकी, २९.
अनेकार्थकैरव, ६५.
अनंगरंग, ६३.
अभिधानरत्नमाला, ५१.
अभीतिस्तव, ८७.
अभंग, १४९, १५०. १५७. १६४. १७१. १८३. १८६. १८९, १९०.
अमरकोश, ३५.
अमरविवेक, १२६.
अमरवृत्ती, ३५.
अमरुशतक, २९.
अमृतसागरा, ६२.
अमृतानुभव, १४७, १४८, १४९. १७३.
अलिफनामा, १४४.
अशौचनिर्णय, ११५. १२४.
अश्वघाटीकाव्य, ११२.
अष्टपद्या, ३१, ३२.
असज्जनवर्जन, ३४.
अस्थिमाला, १२५.
अंतर्ज्योति, ८६.
अंतःकरणप्रबोध, ९९. १०१.
आगवर, २०७.
आत्मार्पण, १०६, १०७.
आनंदलहरी, १६४.
आनंदसार, १४४.
आन्हिक, ११५.
आर्या, १८४. १९२. १९५.
आर्त्या, १८६.
आंध्रकौमुदी, २११.
आंध्रनामसंग्रह, २२९.
आंध्रप्रयोगरत्नाकर, २२८. २३४.
आंध्रसभाचिंतामणि, २१०.
ओव्या, १५०.


## इ.


इलेश्वरविजय, ५०.
इंग्लंडदेशाचा इतिहास, २००.
इंदुमतिपरिणय, २३२.
ईष, १७.


## उ.


उत्तरगोग्रहण, ५२.
उत्तरनैषधचरित्र, ६९.
उत्तररामचरित्र, ५५.
उदाहरण, ६२.
उपदेशसहस्री, २९.
ऊर्ध्वपुंड्रविधि, ८७.


## ऋ.


ऋतुसंहार, ३४.


## ए


एकनाथीभागवत, १६४.
एकनाथीरामायण, १६४.
एकादशीचेंचरित्र, १८६.

एकाक्षरनिघंट, ७७.
एकाक्षरीकोश, १०१.
एलफिन्स्टन्कृत हिंदुस्थानाच्या इतिहासाचा संक्षेप, २००.
ऐतरेय १७.
ऐरावतविजय, ५२.

## क.

कटाव, १८७, १८८.
कटिबंध, १८७.
कठ, १७.
कथासरित्सागर, ७०.
कथासारामृत, १९८.
कन्यकापुराण, २३५.
कवीत, १६१.
कर्पूरमंजरी, ३४.
कर्मतत्व, १७७.
करुणामृत, १७९.
कल्पद्रुम, १०१.
कविगजांकुशचंडांशु, २२८.
कविकल्पद्रुम, ७५.
कविकल्पद्रुमव्याख्या, ७५.
कविकामधेनु, ७५.
कस्तूरीतिलकपंचाशती, ८७.
कव्हार, १४४.
कादंबरी, ६०,६१.
कामाक्षीअष्टक, २९.
कारिका, ३७.
कालमाधव, ७९.
कालवीऊलुकं, २०२.
कालियामर्दन, १७७.
काव्यादर्श, ५७.
काशीखंड, १८४.
कांडप्रनाम, २०२.
कुचमर्दिनी, ११२.
कुमारसंभव, ३३.
कुवलयानंद, १०७.
कुवलयानंदाच्यामूळकारिका. ३१
कुंडलीया, १६१.
कृष्णलीलामृत, १९९.
कृष्णाश्रय, ९९.
केकावळी, १९५.
केतुमतन, २१५.
केन, १७.१२९.
केरलउत्पत्ति, २.
कोनिवेंडन, २०२.
कोरल, २०१.
कौस्तुभ, ३७.

## ग.

गंगालहरी, ११२.
गजेंद्रविजय, ७७.
गणपतीवरचूर्णिका, १८७.
गणिकानंद, १०१.
गदा, १२५.
गरुडपंचाशती, ८७.
गार्गी, १९०.
गिरिजानाटक, ४९.
गीतगोविंद, ३०. ३२.
गीताभाष्य, १७. ६७.
गीतावली, १८२.
गुढार्थप्रकाशिका, ६२.
गोरखनाथकीकथा, १४४.
गोरक्षकल्प, ४१.
गोरक्षगीता, ४१.
गोरक्षशतक, ४१.
गोरक्षसहस्रनाम, ४१.
गोराकुंभाराचें चरित्र, ११५.
ग्रंथमहोदधि, १.

## घ.

घटखर्परकाव्य, ३४.
घंटापथ, ९०.

## च.

चतुःश्लोकीभागवतटीका, १६२.
चंडमारुती, ६७.
चंडीपाठ, १२३.
चंद्रांगदचरित्र, २२३.
चंद्रिकापरिणय, २२६.
चरमगुरुमंजरी, १७७.
चित्तप्रबोध, ९९.
चित्सुधा, १७७.
चित्रमीमांसा, १०७.
चिदंबरकोरू, २०९.
चौतीस, १४४.
चौपई, १४४. १८२.
चौऱ्यांशींवैष्णवांचीकथा, १००.

## छ.

छपय्या, १८३.
छंचर, १४४.
छंदःशास्त्रकोश, ७५.
छंदोमंजरी, १९७.
छांदोग्य, १७.

## ज.

जगचंद्रिका, ९२.
जलभेद, ९९.
जीवदशेवरचूर्णिका, १८७.
जैमिनिअश्वमेध, १८४.
जैमिनीसूत्र, ९.
जैमिनीसूत्रभाष्य, ९९.
ज्योतिषतत्व, ६२.
ज्योतिषार्णव, ९४.

## झ.

झुलना, १४४.

## त.

तत्वदीपनिबंध, ९९, १००.
तत्वबोधिनी, ११४. १२४, १२५.
तत्वत्रयनिरूपण, ८८.
तत्वानुसंधान, ३०.
तर्कभाष्य, ६७.
तर्कसंग्रह, १०३.
तर्कसंग्रहदीपिका, १०४.
तारींचेअभंग, १५०.
तिथितत्व, ६२.
तुकारामचरित्र, १६७. १९९.
तुळसीकृतरामायण, १८२.
तेवरम्, २०८, २०९.
तैत्तिरीय, १७.
त्रिकांडशेष, १०१.
त्रिगद्य, ६८.
त्रिपथगा, १२५.
त्रिषष्टिशिलाकापुरुषचरित्र, ६५.
त्रिशत्ध्यान, ६७.
त्र्यंबकी, ११९. १२५.

## द.

दधिमंथन, १७७.
दयाशतक, ८७.
दर्पण, २००.
दशअवतारस्तुति, ८७.
दशकुमार, ५७.
दशकुमारचरित्र संक्षेप, १०७.
दानरामायण, १९५.
दामाजीपंताचीरसद, १८७.
दासबोध, १७२.
दिग्दर्शन, २००.
दुर्गसप्तशती, ४६.
दुर्वासयात्रा, १८७.
दोनशेंबावन्न वैष्णवांची कथा, १०१.
दोहोरे, १४४. १४६. १५७. १८२.
द्रौपदीचाधांवा, १५५.
द्रौपदीवस्त्राहरण, १८७.
द्वारकेशकृत नित्यकृत्य, १०१.
द्विरूपकोश, १२६.

ध.

धनेश्वराचें चरित्र, १९०.
धातुदीपिका, ७५.
धातुपाठ, ७५.
ध्रुवचरित्र, १८७.

न.

नरसभूपालेय, २२४
नलदमयंतीस्वयंवराख्यान, १९७.
नवरत्न, ९९.
नवाह्निकी, ११५.
नळोदय, ३३.
नक्षत्रमाला, २९. १२५.
नंजननाटक, ५२.
नंदराजयशोभूषण, ५२.
नागानंदनाटक, ६९.
नाचीनाटक, ५०.
नाथलीलामृत, १९९.
नादवाली, २०२.
नानार्थरत्नमाला, ७७.
नामसंग्रहमाला, १०६.
नामसुधा, १७७.
नामापाठकी अश्वमेध, १९२.
नारदीयपंचरात्र, ६८.
निगमसार, १७७.
निजवार्ता, ९४, १००.
निदानमाधव, ७८.
निबंधभक्तिप्रकरण, ९९.
निरोधलक्षण, ९९.
निरोष्ठरामायण, १९५.
नीतिकथा, २००.
नीतिपातल, २०८.
नीलकंठविजय, ११९.
नृसिंहतापिनीभाष्य, १७.
नैषधकाव्य, ६९. ९०.
न्यायकुसुमांजली, २९.
न्यायमाला, ८०.
न्यायामृत, ६७.
न्यासतिलक, ८७.
न्यासदशक, ८७.

प.

पतंजलिसूत्र, १२३.
पतंजलिसूत्रवृत्ति, १२३.
पत्रावलंबन, ९९.
पत्रिकेचेअभंग, १७२.
पदें, १४६. १४९, १५०. १५७.
१५९. १६४. १८२. १८६. १८९.
१९१. १९५.
परमामृत, १४०.
परिभाषेंदुशेखर, १२४.
परंतुरामायण, १९५.
पंचकाव्यटीका, ९०.
पंचछब्बू, २३१.
पंचदशी, ७९.
पंचायुधस्तोत्र, ८६.
पाठकी, १२५.
पाणिनीसूत्रें, ३६.
पातंजलमहाभाष्य, ३७. १२२.
पादुकासहस्र, ८६.
पार्थभाग्य, १७७.
पाराशरमाधवीय, ८०.
पारिजातापहरण, २१९.
पांडवप्रताप, १८४.
पांडुरंगमाहात्म्य, १८४. २२०.
पांडुरंगस्तोत्र, १९८.
पितामहचरित्र, २३२.
पुरुषोत्तमसहस्रनाम, ९९.
पुष्टिप्रवाहमर्यादा, ९९.
प्रकाशिका, ७९.
प्रक्रियानीतिवाक्यामृत, ७१.
प्रतापरुद्रनाटक, ८२.

प्रबंधचिंतामणि, ५७.
प्रबंधराज, २२९.
प्रबोधसुधाकर, ३९.
प्रयोगविवेकसंग्रह, ३६.
प्रल्हादचरित्र, १७२.
प्रश्न, १७.
प्रश्नोत्तरमाला, ३४.
प्रसंगरत्नावली, ९२.
प्रसन्नराघव, ३०.
प्राकृतप्रकाश, ३५.
प्रायश्चित्तेंदुशेखर, १२३.
प्रेमामृत, ९६.
प्रौढमनोरमा, ११२. ११४.

## ब.

बारमास, १४४.
बालबोध, १०१.
बाळव्याकरण, २००.
बिज्जक, १४४.
बीजगणित, ६१.
बुधमनोहरा, ३५.
बृहच्छब्दरत्न, ११४. १२४.
बृहच्छब्देंदुशेखर, १२४.
बृहज्जातक, ९१.
बृहत्कथा, ३६. ७०.
बृहन्मंजूषा, १२४.
बृहदारण्यक, १७.
ब्रह्मगीता, ७९.
ब्रह्मसिद्धांत, ६२.
ब्रह्मसूत्र, १. १५.
ब्रह्मस्तुतीचीटीका, १७६.
ब्रह्मोत्तरखंड, १८४.

## भ.

भगवत्ध्यानसोपान, ८७.
भगवद्गीतासमश्लोकी, १७६.
भगवद्गीताटीका, १८४.
भक्तचरित्र, १५५. १९८.
भक्तलीलामृत, १९८.
भक्तिवर्द्धनी, ९९.
भक्तिविजय, १९८.
भरतभाव, १८७.
भविष्यरामायण, १९५.
भागवतटीकासुबोधिनी, ९९.
भामाविलास, १६७.
भामिनीविलास, ११२.
भावार्थदीपिका, १४८.
भावार्थरामायण, १६४. १९५.
भाष्यप्रदीप, ३७.
भाष्यप्रदीपोद्योत, १२३.
भीमकाविचंडांशु. २३६.
भीमनज्योतिष, २३६.
भीष्मप्रतिज्ञा, १७७.
भूगोलविद्या, २००.
भूगोलशास्त्र गणितभाग, २००.
भूषणसार, ११५.
भूषणसारदर्पण, ११५.
भैमी, १२५.
भोजचरित्र, ५४.
भोजचंपू, ३३. ५४. १०५.
भोजप्रतिदेशव्यवस्था, ५४.
भोजप्रबंध, ३३. ५४.

## म.

मकलचरित्र, २१९
मगधबोध, ७४.
मठाम्नाय, २७.
मनाचेश्लोक, १७२.
मन्युदेवी, १२५.
मनोरमा, १२४.
मनोरमावृत्ति, ३६.
मयोरपंतीरामायण, १९५.

मयूखमाला, ७२.
मरीचीपरिणय, २१९. २२२.
मरेजव्याकरण, २००.
मलयाद्रिनृसिंहचंद्रांशु, २३९.
मल्लीनाथी, ९१.
महाभारततात्पर्यरक्षा, ८६.
महाभाष्य, १५.
मंगल, १४४.
मंगलाष्टक, ३४.
मंजरतिदेशव्यवस्था, ५४.
मंत्ररामायण, १९५.
मार्कंडेयावरचूर्णिका, १८७.
माघकाव्य, ५९.
माघवृत्ति, ८०.
मालतीमाधव, ५५.
मालविकाग्निमित्रनाटक, ३४.
मालाप्रसंग, १००,१०१.
मांडूक्य, १७.
मिश्री, १२५.
मुक्तामाला, २१८.
मुद्गलरामायण, १९३.
मुद्गलशतक, १९२.
मुदुरुसी, २०२.
मुंड, १७.१३०.
मूळपुरुष, ९४.१०१.
मृतसंजीविनी, ५१.
मेघदूतकाव्य, ३४.

## य.

यतिराजसप्तति, ८६.
यथार्थदीपिका, १७७.
यक्षानंद, २४५.
यात्रानिबंध, ९२.
योगसूत्रें, १५.

## र.

रघुवंश, ३३.
रघुवीरगद्य, ८६.
रत्नावली, ६९.
रसगंगाधर, ११२.
रसमंजरी, २१८.
रससिंधु, १०१.
रसाळरामायण, १९६.
रहस्यत्रयसार, ८८.
रंगनाथस्तोत्र, ६८.
रंभानाटक, ५२.
राघवपांडवीयकाव्य, २२३.
राजनीति, २२९.
राजमार्तंड, ५४.
राजयोग, १७७.
राजशेखरचरित्र, २२६.
रामचंद्रवर्णनावरचूर्णिका, १८७.
रामगीता, १६४.
रामगुणावली, १८२.
रामजन्म, १७७.
रामभद्रेय, २२५.
रामविजय, १८४.
रामस्तवराज, २१८.
रामानंदकीकथा, १४४.
रामायण, १८२. १९५, १९६.
रामायण, ( प्राकृत ) १७८.
रामायणचंपू, ३३. १०५.
रामायणसारस्तव, १०६.
रासमंडळ, १८५.
राहटकाव्य, ३७.
रुक्मांगदचरित्र, २१३.
रुक्मिणीविलास, १७७.
रुक्मिणीस्वयंवर, १६४.
रेखुता, १४४.

## ल.


लघुमंजूषा, १२४.
लघुशब्दरत्न, ११४. १२४.
लघुशब्देंदुशेखर, १२३.
ललितास्तवराज, ३०.
लक्ष्मीसहस्र, ११८.
लावण्या, १९७.
लीलावती, ६१, ६२.
लीलावतीभूषण, ६२.
लेखनपद्धति, १५१.
लोपामुद्रासंवाद, १७७.


## व.


वनसुधा, १७७.
वरदराजपंचाशती, ८६.
वराहमिहिरसंहिता, ९१.
वल्लभाख्यान, ९९.
वसंत, १४४.
वसंततिलक, ८८.
वसुचरित्र, २२४.
वाक्यप्रदीप, ३७.
वामनचरित्र, १७७.
वार्त्तिकें, २०. २६.
वाशिष्ठाद्वैतभाष्य, ६८.
विक्रमचरित्र, ५४.
विक्रमोर्वशी नाटक, ३३. ३४.
विठ्ठलनाथजी अष्टोत्तरनाम, १०१.
विद्यारण्य कालज्ञान, ८०.
विद्वन्मंडण, १००.
विद्वन्मनोरमा, २९.
विनयपत्रिका, १८२.
विरोधलक्षण, ९९.
विवेकधैर्याश्रय, ९९. १०१.
विवेकसिंधु, १४०.
विश्वगुणादर्श, ११८.
विश्वप्रकाशकोश, १२६.
विष्णुलोकगद्य, ६८.
विष्णुपूजा, ६८.
विष्णुप्रबोधन, ६८.
विष्णुसहस्रनाम, ६८.
विष्णुसहस्रनामभाष्य, ३०.
वीरचरित्र, ५५.
वीरशैव, १०६.
वृत्त, ७५.
वृत्तिबोध, १४७.
वृंदासंभावना, २३४.
वेणुसुधा, १७७.
वेदार्थसंग्रह, ६७.
वेदांततत्वसार, ६७.
वेदांतमाला, ८०.
वेदांतमुक्तावली, ३०.
वेदांतपरिभाषा, २९.
वेदांतप्रदीप, ६७.
वेदांतभाष्य, ८५.
वेदांतविजय, ८६.
वैरुयशुद्धि, ३५.
वैद्यजीवन, ११७.
वैद्यवल्लभ, ९९.
वैद्यामृत, १२२.
वैयाकरणभूषण, ३७. ११४, ११५.
व्यालूवरकोरल, २०७.
व्यासब्रह्मसूत्र, १.
व्याससूत्रभाष्य, ६७. ९९.
व्यंकटेशस्तोत्र, १७८.


## श.


शाकुंतलानाटक, ३३.
शतकें, ३८.
शतप्रश्नकल्पलतिका, ७९.
शतश्लोकी, ७६.
शतमुखरावणाख्यान, १७८.
शनिमाहात्म्य, १९८.
शब्दकौस्तुभ, ११४.

शब्दप्रकाश, १०६.
शब्दावली, १४४.
शरणगतिदीपिका, ८६.
शरणगद्य, ६८.
शरणोपदेश, १००.
शंकरकथा, २.
शंकरचरित्र, २.
शंकरविजय, २. ७९.
शार्ङ्गधर, ६४.
शार्ङ्गधरपद्धति, ६४.
शारदासंभव, ५२.
शालिवाहनचरित्र, ४२.
शालिवाहनसप्तशती, ४६.
शास्त्रदीपिका, ७२.
शांकरी, १२५.
शितिकंठी, १०४.
शिवकर्णामृत, १०६.
शिवतत्वविवेक, १०६.
शिवतत्वरत्नाकर, १२०.
शिवमणिदीपिका, १०६.
शिवमानसपूजा, ३०.
शिवरहस्य, २.
शिवलीलामृत, १६४. १८४.
शिवसर्वोत्तम, ३०.
शिवस्तोत्र, ३०.
शिवार्चनचंद्रिका, १०६.
शुकचरित्र, १८७.
शुकनिधान, १४४.
शुद्धाद्वैतमार्तंड, १०१.
शृंगारतिलक, ३४.
शृंगाररसमंडण, ९९.
श्यामलादंडक, ३४.
श्रीगुणरत्नकोश, ८७.
श्रीमद्भागवत्, ७६.
श्रीरंगगद्य, ६८.
श्रीरंगराजचरित्र, २४३.
श्रीरामानुजभाष्य, ६७.
श्रीशृंगाररसदीपिका, २९.
श्रुतबोध, ३४.
श्रुतिकल्पलता, १७७.
श्रोतभाष्यशतदूषणी, ६७.

## ष.

षट्पंचाशती, ९२.

## स.

सकलकथासारसंग्रह, २१९.
सतसय्या, १२१.
सनत्सुजातियभाष्य, १७.
सन्यासनिर्णय, ९९.
सन्नियुध आख्यान, २३८.
सप्तशती, १२३.
समई, १४४.
समयविलोक, ६४.
समास आत्माराम, १७२.
सर्वदर्शनसंग्रह, ८०.
सरस्वतीकथाभरण, ५४.
सरस्वतिविलास, १०४.
संकल्पसूर्योदय, ८५.
संतचरित्र, १८१. १८३. १९८.
संतमालिका, १७९.
संतलीलामृत, १९८.
संतविजय, १९८.
संप्रदायप्रदीप, ९४. ९९.
संवर्तविजय, २११.
संक्षेपशारीरक, २९.
साकया, १४६. १५७.
सात्विकब्रह्मविद्याविलास, १२०.
सारसंग्रह, २००.
सारसुंदरी, ३५.
साहसांकचंपू, ६९.
सिद्धांत, ६८.

सिद्धांतकौमुदी, ११४. १२३.
सिद्धांतबोध, १९८.
सिद्धांतमुक्तावली, ९९.
सिद्धांतरहस्य, ९७. ९९.
सिद्धांतशिरोमणि, ६२.
सिद्धिपालचरित्र, १७२.
सिंहासनबत्तीशी, ३६.
सीतास्वयंवर, १७७.
सुखाचा व शांततेचा मार्ग, १३०.
सुदर्शनस्तोत्र, ८७.
सुदामचरित्र १८७.
सुपद्मव्याकरण, ३५.
सुभाषितरत्नाकर, २२९.
सुभाषितशार्ङ्गधर, ६४.
सूत्रभाष्य, १७.
सूर्यसिद्धांत, ६२, ७६.
सूरसागर, १५९.
सेवाप्रकरण, १०१.
सेवाफल, ९९.
सौंदर्यबोधिनी, १२६.
सौंदर्यलहरी, २९.
स्मृतिदर्पण, ४६.
स्वात्मसुख, १६४.

ह.

हठदीपिका, ४२.
हनुमंतरामायण, १९५.
हम्मीरविजय, ६४.
हररायजीकृतशिक्षापत्री, १००.
हर्षचरित, ६०.
हरिकारिका, ३७.
हरिपाठ, १५३.
हरिविजय, १८४.
हरिविलास, ११८.
हरिस्मरण, ८७.
हरिश्चंद्राख्यान, १७८. २३१.
हलायुधकोश, ५१.
हस्तामलकाचीटीका, १६४.
हस्तिगिरिचंपू, ११८.
हारावली, १०१.
हास्यार्णवनाटक, ३४.
हितोपदेश, ७३.
हिंदुस्थानचें न्यायखातें आणि वसूलखातें व लोकांचीस्थिति यांचें विवेचन. . . . १३२.
हिंदोला, १४४.
हेमचंद्रकोश, ६५.
हेमकोश, ६५.
हेमशेषकोश, ६५.
होली, १४४.

क्ष.

क्षमाषोडशी, ८७.
क्षीरस्वामिनिघंट, १०२.

ज्ञ.

ज्ञानेश्वरी, १४७, १४८. १६४, १६५.